# तुकाराम महाराजांचे

# 1000 सहस्त्र विचार



रामचंद्र सोनार

# l gL«k fopkj

## श्री संत तुकाराम महाराजाचें



Ykgkui.kkikl u eyk HkfDrph vkoM fuekZ.k dj.kkÚ;k ekÖ;k ieG vkbZ oMhykl Eg.kts ft th o nknkuk J )kiold vi.k

nk l HkDr--- jkepæ ek] l kukj]

17]fo|kfogkj dkyuh] vk;]Vh]vk;] lekj]

dGck jkM] dkYgkij]] 416007

**श्री. संत तुकारामाचे सहस्त्र विचार गाथेमधील**

भागवत धर्माचा कळस म्हणजे संत तुकाराम. त्यांनी कर्मकांडाची जळमटे कीर्तनातून पुसून टाकली व समाजास सत्यधर्माची शिकवण दिली. जाती-धर्माची उतरंड मोडून काढली. छ. शिवाजी महाराज व त्यांची भेट झाली होती. त्यांनी महाराजास संत रामदास स्वामीकडे जाण्यास सांगितले. त्याची आलेली भेट परत पाठविली.

संत तुकाराम पुण्याजवळी देहु गावांत राहत होते. ते विरक्त स्वभावाचे होते. घरी सावकारकी श्रीमंती होती. परंतु त्यांनी वाटणीला आलेल्या उधार-उसनवारीच्या वहया इंद्रायणीत बुडविल्या. कर्जदाराचे सर्व कर्ज माफ करणारा हा जगातील पहिला संत होय. स्वत:चाही संसार सुख दु:खाचा त्याग केला.

समाजाने त्यांना त्रास दिला. त्यांना कन्या भागिरथी, काशी व मुलगे नारायण, महादेव अशी चार मुले होती. पैकी दोन मुले व बायको दुष्काळात वारली. दुसरी बायको पुण्यातील अप्पाजी गुळवे यांची कन्या अवलाई उर्फ जिजाऊ केली. ती स्वभावाने खाष्ट होती पण सती सावित्री सारखी पतिव्रता होती. तिने संसार चांगला केला.

पंडीत रामेश्वर भट्ट याने तुकारामाचे अभंग इंद्रयणीत बुडविले. त्याचे एक कोटी अभंग होते त्यातील साडेचार हजार अभंग लोकांनी वाचविले त्यावेळी तुकाराम तेरा दिवस ध्यानस्थ होते. रामेश्वर भट्टास उपरति झाली त्यांनी तुकारामाचे संतपण मान्य केले. याच गाथेमधून हे सहस्त्र विचार एकत्र केलेले आहेत.

वारकरी - रामचंद्र मा. सोनार

कोल्हापूर मोबा. 9422047369.

# तुकाराम महाराजांचे सहस्त्र विचार

## लेखक परिचय

श्री ज्ञानेश्वर महाराज व श्री तुकाराम महाराज हे दोन्ही संत महाराष्ट्राचे अध्यात्मिक भक्तिचे पूजनीय दैवते आहेत समाज सुधारणेचे कार्य त्याच्या ग्रंथामुळेच झाले. त्यांचेमुळे अनेकांना भक्तिच्या प्रेरणा मिळाल्या व मिळत आहेत. त्यांचे अनंत उपकार महाराष्ट्रावर आहेत. त्याचे ग्रंथ डोक्यावर घेऊन लाखो लोक आनंदाने नाचत, भजन करत पायी पंढरपूरास दरवर्षी आषाढी यात्रेस जात असतात. जगात असा कुठलाही देश नाही व ग्रंथ् नाही श्री संत तुकारामाची गाथा व श्री संत ज्ञानेश्वराची ज्ञानेश्वरी असे हे दोन ग्रंथ आहेत त्यातील गाथाचा या लेखकाने अभ्यास करुन सहस्त्र विचाराचे संकलन करुन हे पुस्तक तयार केलेले आहेत.

श्री रामचंद्र सोनार हे 20-25 वर्षापासून माझे परिचयाचे स्नेही आहेत. ते एक अध्यात्मिक लेखक आहेत त्यांचे अध्यात्मिक साहित्य 'विश्वपंढरी' मासिक कोल्हापूर मधून दरमहा प्रसिध्द होत असते त्यांचा गाथा, ज्ञानेश्वरी, दासबोध, रामायण इत्यादी विषयावर लेखन आहे ते विश्वपंढरी कोल्हापूर येथील ज्ञानेश्वर मंडळाचे सदस्य आहेत तसेच ते नियमित शिवथर, पावस, पंढरपूर, आळंदी, कोल्हापूर येथील पारायणास जात असतात. पंढरपूरची वारी करतात.

श्री सोनार योग-प्राणायाम शिक्षक आहेत. आम्ही दोघांनी श्री रामदेवबाबा हरिव्दार यांचेकडे योग प्राणायाम शिक्षण घेतलेले आहे. आता आम्ही दोघे योग प्राणायाम शिक्षक आहोत दोघाचेही दोन्ही ठिकाणी दोन योग- प्राणायम आम्ही योग-प्राणायामची शिबीरे घेतलेली आहेत श्री. सोनार यांचे योगावरचे लेख प्रसिध्द झालेले आहेत.

उद्यमनगर कोल्हापूर येथे यांचा कारखाना आहे. ते उत्तम लघु उद्योजक आहेत. ते किर्लोस्कर कंपनीस मटेरिअल देत होते आता त्यांची मुले कारखाना संभाळतात ते स्वत: निवृत्त होऊन अध्यात्मक लेखन, वाचन, तीर्थयात्रा करतात. त्यानी चारोधाम यात्रा केलेल्या आहेत. तसेच त्यानी एका पानावर (रोल) संपूर्ण ज्ञानेश्वरी हस्ताक्षराने लिहीली व रोल एका बॉक्समध्ये बसवून ज्ञानेश्वरी वाचता येईल अशी योजना केलेली आहे.तो बॉक्स पू. श्री. सद्‌गुरु आनंदनाथ महाराज विश्वपंढरी कोल्हापूर यांनाअर्पण केली त्या पध्दतीने दासबोध हस्ताक्षराने लिहिलेली बाक्स सज्जनगड येथे अर्पण केली आहे ती त्याने सध्या त्याचा प्रमुख वाचनालयात सर्वांसाठी ठेवली आहे.

श्री. रामचंद्र सोनार याचे प्रयत्न स्थुत्य आहेत. अध्यात्मप्रेमी लोक त्यांचे अभिनंदनच करतील. त्याच्याकडून अशाच प्रकारची अध्यात्मिक साहित्य निर्माण व्होवो व जनसेवा घडो हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

**श्री. रघुनाथ घाटगे**

**निवृत्त एक्सिक्युटीव्ह इंजिनिअर (महाराष्ट्र शासन)**

**माजी अध्यक्ष, रोटरी क्लब सेंट्रल कोल्हापूर**



**लेखक**

| | |
|---|---|
| **नांव** | :रामचंद्र मारुती सोनार |
| **पत्ता** | : विद्याविहार कॉलनी, प्लॉट 17<br>आय.टी.आय. समोर कळंबा रोड.<br>श्री. हॉस्पिटल जवळ कोल्हापूर 416007 |
| **मोबा.नं.** | : 9422047369 |
| **जन्म** | : 02-06-1938 |
| **व्यवसाय** | : प्रवीण टूल्स कारखाना<br>वाय.पी.पोवार नगर<br>कोल्हापूर. सध्या निवृत्त |
| **साहित्य** | : 1. श्री. रामचरित मानस (मराठी)<br>ओवीमध्ये- तुलसीदास ग्रंथावरून पुस्तक<br>2 ज्ञानेश्वर माऊलीचे सहस्त्र विचार<br>3. तुकारामांचे सहस्त्र विचार<br>4. समर्थ रामदासाचे सहस्त्र विचार<br>5. विश्वपंढरी मासिकाचे (कोल्हापूर) लेखक . |



# सहस्त्र विचार तुक्याचे
# (श्री संत तुकाराम महाराजाचें)
## 1.प्रार्थना, अर्जना, बोध,आरती.

०१ सुंदर ते ध्यान उभे विटेवरी - विटेवर विठ्ठल उभा आहे. सुंदर आहे. तेच ध्यान मला सतत आवडते. तेच माझे सर्व सुख आहे. तेच मी सतत मनन करीत राहीन (अ1)

02 आपणास गोड गळा नसला तरी चालेल. पांडुरंग त्यासाठी भुकेलेला नाही. आपणास येईल तसा "रामकृष्ण" श्रष्ठेने निष्ठेने व प्रेमाने देवांजवळ म्हणावा. हा देवाच्या आवडीचा, भक्तिचा, प्रेमळ क्षणाचा मार्ग आहे. (अ7)

03 जो क्रोधरुपी चांडाळास स्पर्श करतो त्याचे आचरण शुध्द नाही. वेडेपणाने संत सेवा, हरिभक्ती केली नाही त्याचेच अहित होते. तुकाराम म्हणतात जे संताचे दास असतील, त्याचा मला दास करा मग मला खुशाल गर्भवास होवे. नापसाधना सतत मुखांत असावी तुझ्या सेवेची ईच्छा माझी प्रार्थना आहे. (अ 32)

04 मानसपूजा - लौकिक पूजेचा दंभ करण्यापेक्षा देवाची मानसपूजा करणे उत्तम. परमार्थात अवडंबर काय कामाचे ? देवास मानसपूजा समजते व आवडते. बीज तसे फळ. ज्या भजनाने खरे समाधान होते त्यामुळे भवसागर पार करता येतो. अघोरी भजनाने फायदा, तोटा होतो. चांगले फळ मिळत नाही. (अ 46)

05 जे भोग प्राप्त होतात ते देवाचे चरणी अर्पण करावेत यालाच सहजपूजा म्हणतात. त्यासाठी मीपणाचा त्याग करावा. सर्व भोगाचा मी भोक्ता नाही, असा अभिमान ठेवला नाही तर देव आपल्यापासून भिन्न नाही. (अ 337)

06.. पाणीच जर स्वच्छ नसेल साबण वापरून काय उपयोग. चित्र शुध्द नसेल कतर आत्मबोध करणे व्यर्थ आहे. झाडालाच फूल फळ नसेल तर वसंतऋुतू काय

करील ? पती नपुंसक तर पत्नीने काय करावे. जीव गेल्यावर देहाचे व्यवहार कसे होणार. पाण्याविना धान्य उगवत नाही चित्रशुध्दी विना आत्मबोध व्यर्थ आहे. (अ 381)

7.. शेतीमध्ये एक बीजापासून अनेक बीजाच्या कणसाची प्राप्त होते. साधना केल्याशिवाय कोणतेही साध्य लाभत नाही. प्राणखर्ची घातल्याशिवाय कोणताही फायदा मिळत नाही. युध्दांत मरणानंतर स्वर्ग आणि इहलोकात कीर्ती मिळते. (अ 383)

8.. ज्याला अवगुणाची बाधा आहे त्यास सरळ सुध्दा वाकडेच दिसते. योग्य अयोग्य ठिकाणाचा सुध्दा विचार न करात कुत्रे भुंकते, दुर्जनांच्या सहवासाने व पंगतीने परमार्थ नासला जातो. दुष्ट लोक अमंगल बोलतात संताची निंदा करता, तो मातृगामी आहे. (अ 436)

9.. मनाच्या अप्रसन्नतेने माणसाचे कोणतेही काम होत नाही. दुराग्रह करणे वेडेपणाचे आहे. स्त्रीविषयी काम आणि धनाविषयी लोभ हे दोन्ही नरकावस्था भोगणारी आहेत. परत्मयाची चिंतनाने सेवा करा विदेह मुक्ती मिळते. (अ 441)

10.. वाफशाच्या वेळी शेतकरी घरात मढे (प्रेत) ठेवून शेतात पेरणीसाठी जातो. अति दक्ष असतो. सहज नर देहप्राप्त झाल्याने संसारातील सर्व गोष्टी बाजूस ठेवून खरोखर आपले हित ज्यात आहे असा परमार्थ करण्याची त्वरा करावी. काळ कोणत्याही वेळी येऊ शकतो. निर्धार करा त्वरीत स्वहित करा. संसारी पाशातून सुटका करा तोच शहाणा पुरुष होय. (अ 423)

11.. निर्गुण निराकार ईश्वराला सगुण रुपामध्ये आणून सर्वांना भक्तिसाधने करितां सुलभ केला आहे. प्राथनेमुळेच तो सगुणांत आलेला आहे. विठ्ठल नाम हेच आमचे भांडवल, मनाचे व्यवहार आनंदमय होत आहेत संतोषामुळे देहाला पुष्टी येत आहे. आत्मनिवेदन भक्तिमुळे सर्वांना मी व्यापून आहे. (अ 490)

12.. स्वत:स ज्ञान नाही अनुभव नाही असे ढोंगी लोक फसवित असतात. असे लोक अधोगतीस जातत. कोणत्याही गोष्टीचे स्वरुप पूर्णपणे समजून घेऊन चित्तात ठसेल अशा पध्दतीने, श्रध्देने व प्रेमाने केल्याशिवाय त्यापासून फळ प्राप्त होत नाही. अन्न पाहून भूक लागत नाही. हरिकथा समजून ऐकून अंत:करणांत कायम राखावी. साधना समजून साधना केल्याशिवाय सफल होत नाही. (अ494)

13.. सर्वभूतेही देवच आहेत अशी शास्त्र मर्यादा आहे. आपल्या ठिकाणची थोरवी ओवाळून पलीकडे फेकून दे. भक्तिसाठी मनापासून त्याग केला पाहिजे. एक शूर योध्दा व्हा अथवा संसाराचा मजूर व्हा. आपल्या पुढे कोणीही असला तरी तो माझा देव आहे अशी भावना ठेवा म्हणजे आपले शैक्षण्कि जीवन सफल झाले असे. (अ.504)

14.. आम्ही द्रव्य निषिबध् विटाळ मानले आहे. त्याच्या मागे काळ सारखा पाठलाग करीत असतो. म्हणून द्रव्याचा स्नेह करणे फार वाईट आहे. नरकाचे मूळ द्रव्य आहे. आपल्या प्रारब्धतील दु:ख चुकत नाही. परमार्थाचे श्रवण करुन परमार्थ करावा. (अ 508)

15.. आपले रुप आपण समजून घ्या विनाकारण आरशावर रागावून काय उपयोग ? कोणतीही व्यक्ती चांगली किंवा वाईट असते ते देहतादात्म्यामुळे वाटते. सुंदरपणा देवाची कृपा आहे. परमार्थात सत्याचा विचार केल्यावाचून प्रवेश नाही. (अ 529)

16.. कोणतीही गोष्ट निर्धाराने, निश्चयाने करणे मोठे रूचकर असते व त्याचे कोड कौतुक वाटते. आम्हास आश्वासनाचा आधार देऊन आपल्याविषयीचे प्रेम द्यावे. आम्ही भक्तिमार्गात पडलो. देहाहंकार नाहीस झाला देवा. मला आपणापासून दूर करु नका. (अ 580)

17.. कळत अजून प्राणी भ्रमात पडतात. मासा गळाला लावलेल्या खाद्यपदार्थाच्या आशेने फासा गळयांत लावून घेतो. त्याप्रमाणे संपत्तीचा लोक माणसास भ्रमात पाडतो जसे प्रारब्धांत असेल तशीच बुध्दी माणसाला होते कळत असुन सुध्दा भ्रमित होऊन तो कर्म करतो. कर्म मोठे बलवान आहे. त्याचे लिखित खोटे होत नाही. (अ 602)

18.. अनेक दुराचारी माणसे दुराचाराचा त्याग करीत नाही आणि जीवाचा नाश करुन घेतात. त्याची त्याना शरम वाटत नाही. दुर्जनाचे कर्म बलवान असल्याने त्याना दुसरे विचार सुचत नाही. विष्णु भक्तास हरिभक्तीची सोयी आहे. सर्व संसार विठ्ठलरुप आहे असे समजून संसार ब्रम्हरुप केला असे. सर्व लोकासह नेहमी हरीचे प्रेमसुख भोगुया. (अ 621)

19.. चांगली वाईट गती प्राप्त होणे मनाचे कौशल्य आहे. त्याला एकांतवास करणाऱ्या साधूच्या संगतीत लावा. मन संभाळा. ते ओढाळपणाने विषयाकडे धांवते.

मानापणात ह्या मनाच्या कल्पना आहे. ज्या ध्यानाची गोडी लावावी तेच ध्यान करणे. तुका म्हणे या भवसागरांतून मनच पार करते, बंधन घालणारे सुध्दा मनच आहे. (अ 650)

20.. खरेपणाचे आचरण नेहमी खरे फळ देते. पंचमहाभूतापासून देह झाला. मायेने अहंकार जीवात्म्याच्या मागे लावला असे. जड देहाशी जीवात्म्याचा संबंध नाही. काळाचा घास असणाऱ्या या देहाचा लोभ का धरता ? जीवाला मरण नाही. जीर्ण होताच नवे धारण करतो. पूर्वजन्मीच्या पापपुण्याचा भोग घेणे हे नवीन देह धरण्याचे कारण आहे. तुका म्हणे वासनेमुळे जन्म-मरणाचा वेळ विस्तार वाढतो. वासना पूर्ण नष्ट करावी हे मोलाचे खरे बोल आहे. ब्रम्हस्थिती प्राप्त होईल. (अ 688)

21.. घरचे देव कोपऱ्यांत फेकून रस्त्यावरील दगडाच्या देवाची पूजा करितो हे सर्व माकडाचे छंद आहे. काम क्रोध चोरापासून सावध रहा. जसा भाव, श्रध्दा असेल तसे त्याचे वर्तन देव त्याजबरोबर ठेवतो आणि खोट्याचे वाटोळे खोटेपणानेच होते. खरेपणा देवाला अंत:करणापासून मान्य आहे. (अ 729)

22.. अगा पांडुरंगा मला तम लहानपण दे कारण मुंगी लहान प्राणी असल्याने त्यास साखर खावयास मिळते. हत्तीस साखर न मिळता अकुंशाचा मार मिळतो. त्याच्या ठिकाणी थोरपण त्याला अनंत यातना भोगाव्या लागतात. लहानपण सर्वांत चांगले. महापुरांत मोठे झाडे वाहून जातात तेथे लहान लव्हाळी तग धरुन राहतात. पोहणारा नभ्र झाल्याने सागराच्या प्रचंड लाटा त्याच्यावरुन निघून जातात. नम्रता हेच मुख्य वर्ण आहे. (अ 745 )

23.. आम्ही श्रेष्ठ अन्नदान केले आहे. सर्व कर्म व त्याचे फळ हरीला अर्पण केले आहे. ब्रम्ह बोलण्याचा विषय नाही कारण कायेने वाचेने मनाने आम्ही श्री हरीपासून वेगळे राहिलो नाही. आंब्याला जेवढा मोहर येतो तेवढी फळे लागत नाहीत. लागलेली पैकी थोडीच परिपक्व होतात तसेच परमार्थात पुष्कळलागलेली असतात पर श्रीहरीचे दर्शन एकाद्यासच प्राप्त होते. (अ752)

24.. देह मी आहे. असा अहंकार नाहीसा झाल्यावर जीव विठ्ठल रुपाने उरेल. जीव अर्पण केल्याने हृदयात देव प्रकट होईल जो विषय विषयी लोभी आहे तो आत्मघातकी आहे त्याला भिऊ नकोस. वेदाभ्यासी याज्ञिक पुण्यामुळे स्वर्ग

मिळवितात व पुण्य संपताच परत जन्म मृत्यू लोकांत येतात हा खरा परमार्थ नाही. (अ.759)

25.. देवाच्या ठिकाणी वासना ठेवून ब्रम्हज्ञान आम्ही तुच्छ मानतो. आम्ही मुले देवाचे प्रेमसुखाची हट्ट करणारी आहोत. उत्तम नरदेह प्रापत झाला असता परमार्थ सोडून संसार करणे वेडेपणाचे आहे. स्वहितासाठी अंत:करणात प्रेमामृताच्या धारेचा जिव्हाळा पाहिजे. देवा व्यतिरिक्त अन्य कल्पना करु नका तुका म्हणे जी शांती सर्व प्राणीमात्रांपर्यत प्राप्त होते ती मी खात्रीने योजलेली आहे. (अ800)

26.. जगांत आपल्या अनुभवाचे खरे वर्ण कोणासही सांगु नकोस, आपल्या अज्ञानीपणाचा भ्रम कायम ठेवा. सर्व नारायणाच्या निर्मितीनुसार घडत असते. वाघाच्या भुकेसाठी आईचा वध करुन खाण्यास देणे. पुण्यकर्म होईल काय ? पुढे स्पष्ट केलेल्या विचाराने अपूर्ण सुखाची प्रापती होते. सारे जग परमात्म्याचे स्वरुप आहे या निष्ठेने केलेली पूजा फलद्रूप होते. दरीला एकदेशी समजून केलेली पूजा व्यर्थ जाते. (अ 821)

27.. यज्ञ, दान,तप,ध्यान समाधी विवेक वैराग्य यापैकी कोणतेच साधन शक्य नाही. ते लोक वाया जातात परंतु अशासाठी श्रीहरीचे चिंतन करणें हेच सुलभ साधन आहे. यात काही श्रम करावे लागत नाहीत. मरण प्रसंगी सर्व उपाय थांबतात. तुका म्हणे - सर्व जनहो हरीचिंतनाचे ठिकाणी तुमचे मन ठेवा. (अ 900)

28.. एका भगवंतापासून ब्राम्हण, क्षत्रिय, वैश्य, क्षुद्र चार वर्ण निर्माण झाले. पापपुण्याच्या भागाने वाटले गेले सर्वाचा आधार श्रीहरी, आदी, मध्य, अंत भेद नाही. ज्याप्रमाणे आंबा, बाभूळ, चंदन वृक्षातील गुण-अवगुणाचे अनेक भेद आहेत पण त्यांचा अग्नीबरोबर संबंध आल्यास ते एकच होतात. तुका म्हणे जोपर्यंत मन उन्मन अवस्थेत झाले नाही तो शास्त्राच्या विधीमार्गानेच वागले पाहिजे. (अ 920)

29.. जे साधक तप, तीर्थ, दान, व्रत आचरणारे व हरिगुण गाणारे असतील त्यांना त्या त्या साधनापासून दूर करु नये. परमार्थी लोकास साह्य करावे, भय घालू नये. साह्य करण्यांत पुण्य मिळते. भय घालण्याने व्यर्थ हानी होते. (अ 937)

30.. लोक तीर्थयात्रा करुन, नाना तपे करुन अहंकाराने गुरगुरतात. खोटा अभिमान धरतात. परंतु वैष्णव निराभिमानी असतात ते एकमेकाचे पाया पडतात.

वेदाचा अभ्यास करणारे ज्ञानी आपली पूजा व्हावी अशी इच्छा करतात. तुका म्हणे अशाप्रकारे जे कर्ममार्गातील विधिनिषेधाच्या डोहात पडले आहेत ते त्यातच बुडतात. त्यांनी भगवंताची प्राप्ती कधीही होणार नाही. (अ 964 )

31.. मडक्यातील पाण्यांत सूर्याचे प्रतिबिंब आहे तरी सूर्य पाण्यापासून पूर्ण अलिप्त आहे. काष्टामध्ये अग्नि तो काष्ठापासून वेगळा आहे. त्याप्रमाणे सर्व भूमात्राच्या जीवामध्ये नारायण आहे. तो साक्षीत्वाने भिन्न आहे. प्रत्येकाच्या प्रारब्धाप्रमाणे जीवास भोग मिळतात. मृत्यूसमयी जसा ज्यास संकल्प होतो तसा त्यास देह प्राप्त होतो (अ 970)

32.. आपल्या जीवाच्या समाधानासाठी किंवा जीव जाण्याचा प्रसंग आला तरी शांतता धारण करावी ही अवस्था महत्वाची आणि सर्वात चांगली आहे. आपल्या देहास मिथ्या मानावे. देहाचे कौतुक करण्यापेक्षा देहाने परोपकार करणे चांगले. जीव दशेचा नाश करुन ब्रम्हानंदात बुडी मारावी हीच खरी माणसाची वतनदारी आहे. दारुड्यास देहाची जाणीव नसते. तयाप्रमाणे ब्रम्हानंदात ज्याची वृत्ती तदरुप झाली आहे त्यास देहाची प्रतीती नसते. त्यास समाधान प्राप्त झालेले असते. ज्ञानी पुरुष बाह्य सुखास पूर्णपणे विटलेले असतात.(अ 1039)

33.. देवा सारा संसारच निष्फळ आहे. हे जाणून संताच्या संगतीविषयी माझी इच्छा प्रेम श्रध्दा आहे. पांडुरंगा मला भेटण्यास वेळ लागू देऊ नको मोकळ्या अंतकरणाने मला अलिंगन दे. तुझ्या शाश्वत सुखाची प्राप्ती होईल. अशीच कृपा कर. मायिक पदार्थाची मला मुळीच इच्छा नाही. (अ 1071)

34.. वेश्येला सुवासिनी म्हणू नये. नेहमी सद्गुणाला किंमत असते. इतर थोरपणा व्यर्थ आहे. शूराच्या हाती शस्त्र शोभून दिसते. एकनिष्ठ पतिव्रत स्त्रीला अलंकार शोभतात. असभ्य स्त्रीला डोळ्यात काजळ घालण्याची लाज वाटते. दासीपुत्र व धर्मपत्नीचे चिरंजीव यांची योग्यता एक असत नाही. आंत शुध्द असेल तर बाह्यवेश शोभून दिसतो. चांगले-वाईट व्यक्तिच्या योग्यतेवर आहे. (अ 1119)

35.. जो हरिनामाचा मान राखत नाही तो विव्दान असला तरी मी त्यास किंमत देत नाही. तो वाचाळ आहे असे माझे मत आहे. तसेच चंदन धारण करुन गोड भाषण करतो. परंतु ज्याच्या अंत:करणात भगवंताविषयी प्रेम नाही त्यास मी किंमत देत नाही त्याप्रमाणे भगवंत प्राप्तीची मनांत इच्छा नाही परंतु विषयाकरिता लोकांना लुबाडतो. आपले मरण अगदी जवळ आले आहे. अशी

आठवण ठेवूनच माणसाने लवकर परमार्थ मार्गाला लागावे मरणापूर्वी हरिप्राप्ती करुन घ्यावी व कृतार्थ व्हावे (अ 1166)

36.. पाण्यावाचून मासा जगू शकत नाही. गाय आपल्या वासराकडे ओढ घेते. पतीसह  पतिव्रतेस जगण्यात अर्थ वाटतो. तुझ्यावाचून माझे प्राण राहणार कसे ? मानवी देहाची प्राप्ती, नामसंकीर्तन, संत संगती हे सर्व तुझ्या कृपेमुळे झाले आहे. तुझे माझ्यावर अनंत उपकार आहेत. यातून उतराई होण्यासाठी माझ्याजवळ काही नाही. (अ 1220)

37.. चंचल मन माझे कांही ऐकत नाही. त्याच्यावर ताबा नाही. पूर्व संचिम समजत नाही. ज्ञान ग्रहण करण्याची शक्ति नाही. भवसागर तरून जाण्याची शक्ति नाही. पापाचरण (दोष) करणे आमचे कर्तव्य आहे. विठोबा तुझे कर्तव्य तू करावे. तूमची करुणा सतत करावी वाटते. देहरूपी पिंडाचे दान तुम्हास दिले आहे. योगक्षेत्र आपण करावे. (अ 1224)

38.. विषयवासनेने पछाडलेल्या माणसाला कसलेही भय नसते. भविष्याचा विचार करत नाही. स्त्री भोगापुढे स्वत:चे शरीर कस्पटाप्रमाणे वाटते. प्रारब्धामुळे त्याची कामवासना प्रबळ असते. कृपण माणसाचा लोभ केवळ धनासाठी असतो. इतराची पर्वा करत नाही. भूकेला माणूस मिळेल ते खातो. धोतऱ्याचे बी खाल्ले तर भ्रम निर्माण होतो. त्याला देहाची शुध्द राहत नाही. मायेमुहे भोगणारा आणि भोगविणारा कोण कळत नाही. माया दूर करतात. सर्व ठिकाणी तू सर्वार्थाने, रुपाने भरला आहे. (अ1227)

39.. भगवंत विश्वव्यापी आहे. तो स्वच्छंदी, भटक्या वृत्तीचा आहे. जळी, स्थळी सर्वत्र तो आहे. तो काही करत नाही मला नामाचे वेड लावतो. म्हणून त्यास मी हृदयांत ठेवले आहे तो ----- अंत:करणांत कायम चिकटून राहतो. लोचट आहे. वेडा आहे. देव आम्हास नको, प्रपंचात अडथळे आणतो. भक्ताला स्वत:चे कामांत अडकवितो. परंतु तो दासाचा दास होतो. भक्त सांगेल तसे ऐकतो तो अणुरेणुपेक्षा सुक्ष्म आहे.  (अ 1265)

40.. देव भक्तांत विलीन होतो. देव परम उदार आहे भरपूर देतो, शक्मितान आहे तो आनंद स्वरुप आहे. देव पाहण्यासाठी निष्काम कर्मयोग, भक्तियोग, विवेक वैराग्य, शमादिष्टक जिज्ञासत्व गुरु शरणागती, महावाक्य श्रवण करावे

लागते. ज्यानी देव पाहिला तो भीत नाही देव मनातील इच्छा पूर्ण करतो. आमचा उध्दार करा, तुम्ही भक्त रक्षणाची प्रतिज्ञा पूर्ण करा. (अ 1273)

41.. हरी वैकुठांत नाही, तो शेषाच्या ठिकाणी नाही. तर ज्या ठिकाणी वैष्णवाचा अतिदाट समुदाय असतो त्या ठिकाणी भगवंत धांवत जातात. हरि भक्तप्रिय आहे. भक्ताने नाम घेतल्याने समाधान जो हरी तप, दान, व्रत यज्ञ साधनानी मिळत नाही तो रामकृष्ण हरि गोंविद मंत्राने सहज प्राप्त होतो चौदा भुवने आहेत परंतु तो भक्ताच्या कंठात राहतो. भक्ताचे प्रेम घेतो आणि बदल्यात आपले चित्र देतो. तो निर्गुण, निराकार आहे. भक्ताकरिता नाना अवतार घेतो. भवसागरातून भक्ताला तारण्यासाठी स्वत:ला हजार नांवे ठेवून घेतो. हरी भक्ताचा ऋणी आहे तो योग्याच्या ध्यानांत येत नाही. पण तो किर्तनात नाचतो. (अ 1294)

42.. जेथे जातो तेथें तू माझा सांगाती असे. हात धरुन चालवितोस. आमच्या संसाराचा भार सोसतोस हरिनामाचे (भक्ति, ज्ञान, वैराग्य) आम्ही धारण केलेले आहेत ते आम्हास शोभून दिसतात, आमची काया, वाचा, साधने विठ्ठलाची आज्ञा पाळतात. पाप-पुण्याचे कर्माने जन्म मृत्यचे रहाटघाडगे चालु आहे. माझ्या मनाला नामाचे प्रेम वाटू लागले आहे. रामनाम कंठात असावे हेच मनुष्य जन्माचे हित आहे. त्यामुळे देहभावाचा विसर पडतो. मनांत हरिविषयी प्रेमाचा जिव्हाळा निर्माण होते. (अ 1315)

43.. हरी कथेत चित्त नसेल तर ते प्रेतच होय. जे सिध्दी प्राप्त करुन घेतात ते दुर्बल होत. विश्वरुप परमात्म्याची समाधी साधतात ते दैववान आहेत. भक्ताना मात्र सर्व पाणी गंगाजळ आणि सर्व प्राणी देवरुप वाटतात आम्ही सर्व भगवंताचे लाडके बालके आहोत. आईच्या गर्भात बाळाचे लाड कोण पुरवितो. जमिनीमधील खोलवर दगडाच्या पोटांत बेडूक असतो त्याचा जीव जगविणारा कोण आहे निवांत राहून जे जे होईल ते ते पहा. (अ 1358)

44.. पांडुरंगा मला संतबुध्दी देणारा मार्गदर्शक हो आणि माझ्या मनाला विषयापासून दूर ठेव. माझ्या चित्रांत दुर्गुण अनावर झाले आहेत ते माझ्या वर्तनातून आणि मुखांतून बाहेर पडणार नाहीत असे कर. हे मायबापा माझ्या जीवनाचे स्वरुप, कल्याण या सर्व गोष्टी तुलाच समजतात. मी विषय लोभी आहे तूच माझे रक्षण कर. माशाने गळ गिळला आहे तो परत ओकण्याची शक्ति

त्याचेकडे नाही. चित्ताला मायेच्या जाळातून तूच सोडव. मी अज्ञानी आहे परंतू देवा परमार्थात तुझीच वाट पाहत आहे. (अ 1452)

45.. हे भगवंता तुझ्या अंतकरणांत दुजा भाव नाही. तू खाऊ घेऊन बालकाच्या मागे लागतोस व मुखांत ब्रम्हरस घालतोस. देवा माझी विनंती तू आताच आम्हाला मान्य करु नकोस. तुझी चरणसेवा घडेल असे कितीही जन्म दे. जन्मी मी तूझो गुणगाण गाईन विट्ठल विट्ठल म्हणत नाचेन. तुझा दास कर. तुझ्याच अंगणात जागा दे या मृत्यूलोकांत आम्हीच तेवढे भाग्यवान आहोत. (अ1461)

46.. तुम्ही जे शिकवले तेच शब्द मी पोपटासारखे बोलत आहे पण जसे शब्द बोलतो तशी अंतकारणाची पारमार्थिक स्थिती बनली गेली नाही. विषय वासनेचा नाश होऊन आत्मस्वरुप स्थिती प्राप्त झाली नाही. बुध्दी स्थिर झाली नाही प्रपंचाच्या पुरात वाहत चाललो आहे हे भगवंता तुझी करुणा भाकत आहे. आम्हाला तूच वाचवू शकशील. तूच माझे डोळे आहेस तू सर्व शक्तिमान आहेस. (अ 1469)

47.. चित्तात जे चैतन्य आजवर होते ते मला आता ब्रम्हरुपाने अनुभवास आले. जे जवळ आहे तसे ते दूर आहे. आवडीमुळे ते पुन्हा पुन्हा मजभोवती फिरत राहते. एगदा सेवन केले की पुन: सेवन करावेसे वाटते आम्ही देवावर लोभ ठेवला आणि त्याला विटेवर उभे केले. जन्म-मरणाचे दु:ख ठेवून माझा लौकिक का वाढवतोस ? तुझी माझी भेट होत नाही. केवळ बाह्य लौकिकाला काय करायाचे आहे. दासीच्या पोटी जन्मतो त्याला बाप कोण आहे ते कळत नाही. बाहेरचे सोंग व्यर्थ आहे. तुम्ही माझा अभिमान घालविण्यासाठी काहीतरी करा, तुम्ही सर्वज्ञ व उदार आहात. काम-क्रोध अद्याप अंत:करणात आहेत देवा तुमच्या चरणाजवळच आहे. (अ 1476)

48.. पांडुरंगा तू अनाथाचा नाथ आहे. थांबत ये. काम, क्रोध, मोह, मत्सर आदी श्वादपदानी पकडला गेलो आहे मायेच्या भोवऱ्यात सांपडलो आहे. मृगजळात बुडत आहे. तुझ्याशिवाय मला कोण आहे ? मी अनाथ पापी आहे. मला आपल्या चरणापासून दूर करु नका. संतचरणी माझा विश्वास आहे. माझा स्वामी विठ्ठल मोठा कृपानिधी आहे देवा तूझे दर्शन झाले तर तूझ्या चरणावर माथा ठेवीन (अ 1542)

49.. धैर्य, ओदार्य, निर्मळत्व आणि निर्मत्सरत्व हे असे त्यास नारायण म्हणतात. त्याला सर्वेश्वर म्हणतात. सच्छिदानंद एवढा भाग अंगी बाणला तरी सुध्दा मनुष्य ईश्वरप्रत जातो. नारायणाची लक्षणे सुध्दा प्रयत्नाने आणता येतात. प्रथम सच्दिानंद आत्मसात करावे. देवाला आपल्याबद्दल आपुली वाटेल असे गोड भाष्य करुन भगवंताला वश करु आपण देवाचे संगतीने देवासारखे होऊ, शास्त्र शिकण्यात मन. नसेल तर त्या भानगडीत पडू नये. अध्यात्मशास्त्र ठिकाणी मन स्थिर केल्यावर देव आपणांपासून कोठे जात नाही. निवांत मनांत देव निवांतपणे राहतो. मन हालण्यामुळे तो हालतो. (अ 1559)

50.. अंधारात समजून न घेता, विष घेणे आत्मघात होय. ‘बुध्दी कर्मानुसारणी’ या सिध्दीप्रमाणे वाईट घटना घडतात. मन शुध्द करण्यात आपले हित आहे. प्रसंगाने लक्षांत ठेवून मन शुध्द करावे. मृत्यूनंतर संचित कर्मावाचून कोणीही तुम्हास सोबत करणार नाही. वेळ आहे तोपर्यंत सत्कर्म, परमार्थ करा. दिवसामागून दिवस जात आहे माझे माझे काय म्हणतोस ‘इदं न मम’ म्हणा भगवान विठ्ठलास शरण जा. (अ 2039)

51.. प्रारब्धाने धन प्राप्त होते व मान मिळतो. पोट देखील प्रारब्धानेच भरते. म्हणून मी व्यर्थ माझे गाऱ्हाणे सांगत नाही, देवा माझे मन चंचल आहे ते तू स्थिर केल्याशिवाय शांत होत नाही. भगवंताचे नाम स्मररल्याने गाणिका वेश्या आणि अजामेळासारखे पापाच्या राशी तरुन गेले, शिळा झालेली अहिल्या तरली. हिरण्यकस दैत्यामुळे पृथ्वी पाताळात चालली होती ती भगवंतानी तारली आता आम्हाला तारने काय अवघड आहे ? (अ 2074)

52.. कोणास कसे ठेवावे याची सुत्रे विठ्ठलाच्या हाती आहेत. कांही धनवंताना विविध असाध्य रोग असतात. पूर्वजन्मातील पापात्मक संचित असते. भेद आणि अभेदाचा घोळ सोडून नारायणाचे स्मरण कर. नाम साधनेने सर्व गोष्टी पूर्ण होतात, आणि अच्युताशी ऐक्य होते. कोणताही साधक भक्तिवाचून संसार सागर पार करु शकत नाही हेच परमार्थाचे सार आहे आयुष्य क्षणाक्षणाला जात आहे. विव्दित्तेचे भूषण आणि भक्तिचा दंभ माणसाला नागवीन असतो. (अ 2291)

53.. भगवंताजवळ मोक्ष नाही तो तुझ्या ठिकाणीच आहे. हे साधका तू देहाचा खोटा अभिमान धरुन बसला आहे. आत्मस्वरुप विसरलेला आहे. आपण कोण समजत नाही देवाला आपलेसे करुन घेतल्याखेरीज जीवास संतोष प्राप्त होणार

नाही. देवावाचून सर्व मायिक दु:खदायक आहे. चित्ताला गोविंदाचे वेड लावावे. देवाला ज्याने आपले केले आहे. जाणले आहे. त्याला एकदाच मरण आहे पुन्हा जन्मास येत नाही. त्याच्या पश्यात उत्तम कीर्ती राहते. (अ 2298)

54.. श्रेष्ठ माणसाबरोबर गाठ पाडून घ्यावी. भेकडासारखे मनांत भय धरु नये. अगदी अटीतटीने शत्रूशी भांडावे. मोठ्यांशी मोठे होऊन भांडावे. तरच त्याला शूर म्हणतात. अज्ञान-अंधकाराचे ज्ञानदृष्टीवर आलेले पडदे विठ्ठलाने नाहीसे केले आहे. म्हणून जग ब्रम्हानंदाने भरले आहे. विविध तापाने त्रासलेल्या मुढास नारायण स्मरणाचे औषध उत्तम आहे. त्यामुळे संसाररुपी रोगाचा समूळ नाश होतो. व्यथा, भोग त्वरीत बरे होतात. (2356)

55.. दरिद्री माणसास अचानक धन मिळाल्यास त्याचे रक्षण त्याला करता येत नाही. आपण् मला मुक्ती भक्ती कांही दिले तर त्याचे रक्षण करण्यास मी असमर्थ आहे. दुर्बळास धन भोगता येत नाही. फक्त तळमळ राहते. माझ्यात भक्ति होती, भाव नसल्याने पारमार्थिक नुकसान झाले. मी स्वत:ला लोकमान्य करण्याकरिता दुसऱ्याच्या गुण दोषाचा विचार मनांत आणतो. देवा माझी कोबंड्यासारखी स्थिती झालेली आहे. आपल्या पायाने उकिरडा उकरुन मागे फेकतो पण त्यातील खाद्यपदार्थ मागे पडतात. तयाचा लाभ त्याला कळत नाही पुढे उकरत राहतो, देवा बुध्दि दे माझे हित मला अनुभवला दे. (अ 1454)

56.. आपले अंत:करण खरे शुध्द आहे किंवा नाही हे अंत:करणाने, विश्वासाने सांगावे लागते. या संदर्भात एकाने दुसऱ्याचे सांगणे नको, आपण बोलतो तशी मनाची अवस्था असावी. त्याप्रमाणे त्याचा परिणाम होतो. सर्व प्राणीमात्रात भगवान आहे हे प्रार्थना करुन शब्दज्ञानापेक्षा प्रत्यक्ष अनुभव घ्यावासा वाटतो. ज्याकारणे नारायणाचा योगक्षेम होईल त्याचे वर्म शोधून घ्यावे. (अ 2405)

57.. केवळ वारकरी लोकासाठी नव्हे तर दुर्बळ, शक्तिहीन असलेल्यासाठी हा देव विटेवर उभा आहे. ज्याच्या अंत:करणात विठ्ठल देव आहे त्यास रोकडा मोक्ष आहे. मला भगवंताचे गुह्य ज्ञान झाले आहे की त्यामुळे माझा प्रपंच विषयभ्रम झाला आहे. मी आनंदी आनंद आहे माझ्या अंत:करणात नारायण नामाचे चिंतन स्थिर झाले आहे. माझ्या ठिकाणचा भेदभाव नष्ट झाला आहे त्यामुळे माझा देह, प्रपंच अप्रिय वाटू लागला आहे. (अ 2493)

58.. ज्याला कसलीही इच्छा नाही व जो सुख दु:खादी व्दंव्दरहित आहे अशा देवाचा मी दास आहे. तो पांडुरंग त्याच्यावर माझा पोषणाचा भार आहे त्यालाच माझी काळजी आहे आणि माझे हित करणारा तोच आहे. चुकीचे मार्गाने जाणाऱ्याला योग्य मार्गावर लावावे अशी कठोर बोधवचने धर्मनीतीचे आहेत सांगूनही दुराचाऱ्याने उपदेश ऐकला नाही तर त्याला खुशाल शासन करावे तसे करण्यांत ताप तर नाहीच उलट पुण्यच आहे. कडलिंबाच्या रसाने देहाच्या आतील रोग बरे होतात. (अ 2515)

59.. भगवान नारायणाने माझे जीवन सुखाचे आणि आनंदाचे केले आहे. बसल्या ठिकाणी आनंदाचे भांडवल प्राप्त झाले असून भीक मागण्याची जरुरी नाही. आजवर मी तुमचे चिंतन केले आहे. तुम्ही माझ्या इच्छेप्रमाणे ब्रम्हरसाचे एकदाच भोजन दिल्यानंतर वरचेवर तुम्हास कांही मागणार नाही. हे आई विठाई शेवटचा आनंदाचा गोड घास मला खाऊघाल. (अ 2608)

60.. ज्याक्षणी माझे जीवन (जीवभाव) अर्पण केले त्याच क्षणी जीभावाचा आश्रय, अज्ञान ते मी सोडून दिले आहे हे भगवंता आता या संसारात तुझ्या सत्तेने सर्व व्यवहार करीत आहे. देवा आता माझ्या ठिकाणी 'मी' आणि माझे हे उरले नाही. तुमच्या कृपाप्रसादाचे अभयदान द्या. आपला वरदहस्त माझ्या डोक्यावर ठेवा. 'भिऊ नको, भिऊ नको' असे म्हणून माझे अंत:करण शांत करावे (अ 2614)

61.. एखाद्या खाद्यपदार्थात मीठ नसले तर तो पदार्थ फिका वाटतो. अनुभवावाचून बोलणे म्हणजे पोकळ बडबड होय. कोणते बी खोलात आणि ओलाव्यांत पडले म्हणजे उत्तम पीक येते उथळ पेरणी वाया जाते. श्रम होतात, पोट भरण्यासाठी परमार्थ करतात तो दंभ होय. चांगले सोने अग्नीत सतेज होते ते शुध्द होय. जो परमार्थ अनंभवाच्या कसाला उतरतो तोच खरा असतो. (अ 2630)

62.. हरिप्रेम हे सांगता, बोलता किंवा दाखविता येत नाही. त्या प्रेमाचा चित्ताला येणारा अनुभव चित्तच जाणू शकतो. कासवीचे पिलू हे तिच्या कृपा दष्टीने वाढते. त्याला स्तपान संबंध होत नाही. मुक्या माणसास खारट गोड सांगता येत नाही तरी मनातील भेद त्याला कळतो हरिप्रेम कसे असते हे शहाण्याने विचारु नये. अनुभव घेऊन विचार करावा. देवा मला वृत्ती शुन्य आत्मस्थिती नको. त्याचा विचार नको, तुझ्या चरणाची अखंड सेवा दे. तुझा दास

होण्याची गोडी दे. सायुज्य मुक्ति नको. ज्ञानाच्या अहंकारापासून मला त्वरीत सोडव, चरण सेवा दे. सायुज्य मुक्तित आनंद रुपता येते पण आनंदाचा भोग मिळत नाही. गोड पदार्थास त्याची गोडी कळत नाही. (अ 2709)

63.. विठोबाचे श्रीमुख जणू सुखाच्या मुशीत ओतलेले सुशोभित आहे. त्याच्या दर्शनाने शोक, दु:ख व मोह ही सर्व नाहीशी होतात. चरणाजवळ सुखाच्या राशी आहे. त्याच्या प्राप्तीमुळे काळजी करण्याचे कारण उरत नाही. जीव व ईश्वर भेद भ्रमाच्या तावडीत सापडण्याने माझी ओढाताण होते. देवा तूच यातून मला सोडव व आपल्याबरोबर निजधामास घेऊन जावे. (अ 2713)

61.. या देहाला तू निर्माण केले आहेस म्हणून याच्या पोषणाचा भार तुझ्यावरच आहे. खाल्लेले आवडीचे पदार्थ पुन: पुन्हा खावेसे वाटतात. भेटलेल्या प्रियजनांना वारंवार भेटावेसे वाटते. त्याप्रमाणे पांडुरंगाच्या भेटीचा कधी वीट येत नाही. उलट त्याच्या भेटीची उत्कंठा वाढते चिंतनाची आवड वाढते. त्याच्या योगाने पोट भरते तरी ही भूक उरते. (अ 2766)

65.. एके स्थळी बसून, अन्नपाणी सेवन करताना घासाघासाला देवाचे चिंतन करतो. निरंतन मन जागे ठेवतो. व्यवहारिक जगाच्या मान दंभादी उपचारांत मी गुंतून पडत नाही. वैरागर नांवाचा मणी जेथे असतो, तेथे रत्नाच्या खाणी असतात. कारण त्या मण्याच्या स्पर्शाने खड्याचे रत्न बनतात. भोजन समारंभात पान वाढले आहे तेथे शांतपणे सेवन करावे. वाढणाऱ्यास खाणाऱ्याची इच्छा कळून येते. तुमच्या आवडीमुळे नातेवाईकाचे संबंध तुटले आहेत. लोकनिंदेस पात्र झालो आहे. तुम्ही माझ्याकडे धांव घेतलीच पाहिजे. (अ 2824)

66.. माय लेकराच्या प्रेमांत नित्य नूतनता असते. सुखाला सुख भेटते. स्वरुपाचा आनंद संतमंडळीच्या चरणाजवळ असतो. पांडुरंगा समार्थाची सेवा केल्याने कोठेही घात होत नाही असा संकेत आहे. तुम्ही समर्थ आणि मी सेवक माझ्या अंत:करणात येऊन वास्तव्य करा. तुझ्या दर्शनाची मला इच्छा आहे आणि दर्शन दिव्यानेच तू समर्थ ठरणार आहे. त्यायोगे तुझी कीर्ती होईल (अ 2859)

67.. मूर्ख माणूस मी मी अशा अभिमानाने दु:ख भोगतो. कोणासही राग येईल असे बोलत जाऊ नका. विचारपूर्वक गोष्ट करणे, चांगले, विचाराने वागलेले बरे आणि मर्यादा राखून बोललेले उपयोगास येते. विवेकावाचून असलेले कोरडे वैरागय जगांत महत्तव वाढवीत असले तरी ते उन्मतपणा आणते. खरे

वैराग्य ज्याठिकाणी आहे. तो खरा शूर होय. केशवा तुझ्याशिवाय मला सत्ता, धन नको, सामुज्य मोक्ष ही नको, हरिभक्ताच्या कुळात हरिभक्ती करण्यासाठीच जन्म मिळावा, समाधान मिळेल. (अ 2948)

68.. हे अनंता, लोभ, माया, मोह यानी आम्हास बांधून टाकले आहे तर त्याचा दोष तुमच्यावर नाहीतर कोणावर ठेवावयाचा ? हे दात्या मी पतित आहे, मी तुम्हांला शरण आलो आहे. मायिक पदार्थाचा मोह मला लावू नकोस या त्रासातून मला मुक्त कर. तुझ्या नामाचे गुणाचे वर्णन करीत आनंदाने नाचेन, तुझ्या पायाची प्राप्ती होईल असाच वर दे. मी जरी आवडीप्रमाणे मागीतले तरी पण ते मला देऊन माझे समाधान कर (अ 2961)

69.. सागरांतून जाळे बाहेर काढल्यास त्यात पाण्याचा थेंब राहत नाही ज्याला कीर्तनात गोडी नसते त्याच्या मनात उपदेश राहत नाही. गाढवाला गंगास्नान घातले तरी ते उकिरड्यावर लोळतेच. कावळ्याला रूचकर अन्न आवडत नाही. खेकड्याला कस्तुरी आवडत नाही. त्याप्रमाणे पाप्याला कीर्तन आवडत नाही. नारळ बाहेरुन कठीण आंत गोड खोबरे असते. फणस बाहेरुन कांटेरी आतून गोड असतो. ऊस बाहेरुन काळा पण रसाने गोड असतो. अंत:करण शुध्द करणे हाच परमार्थ होय. (अ 3075)

70.. ज्याला ज्या गोष्टीची आशा असतो तो मनाने त्याच्याजवळ राहतो. त्याच्याबद्दल प्रेम नाही तो जवळ असून दूरच असतो. प्रिय माणसाच्या भेटीने सुख आनंद मिळतो आणि त्यानांच महत्वाचे गुह्य बोलणे घडते. मुलगा एक वेळ आईशी निष्ठूर होईल. परंतु आई मात्र निष्ठूर होणार नाही. उलट ती मुलावर सतत प्रेम करीतच असते. त्याप्रमाणे पुरषोत्तमा तू आम्हांस क्षणभर देखील विसरत नाही. आपली भूक विसरुन त्याला खाऊ घालते. आई हाक मारताच धांवत येऊन त्याचे रक्षण करते. (अ 3077)

71.. हरीकथा करा तेच तुम्हांला संसारातून तारील ज्यास कोणी नाही त्यास भगवंत आहे असा अनेकांचा अनुभव आहे. सर्व भूताचे ठायी नारायण भावनेने नम्र व्हावे. भगवता माझ्या अंगी भजनाचा आळस आला आहे तरी सत्वर ये माझा आळस घालवून टाका. अमंगळ बीजाचे अमंगळ फळ मिळते. नारायण माझी व्यसने त्वरीत नष्ट करा. तुम्ही आम्हांस दुर करु नका. (अ 3100)

72.. मनाला समजावून सांगितले तरी विषयवासना सोडीत नाही. एके **ठिकाणी स्थिर राहत नाही. विषयाच्या प्रलोभनाने मला सर्व** नाशाकडे घेऊन जात आहे. मनाचे मी काय करु ? श्रीहरी तू लवकर धांवत ये. नाहीतर मी वाया गेलो असे समज. चित्त मला संसाराच्या डोहांत उडी घालू पाहत आहे. संसार सुखाची आशा, धनाची तृष्णा संशय, भ्रम, कल्पना या पापिणीनी देखील माझा घात मांडला आहे. तू धावून ये ताबडतोब. (अ 3116)

73.. चोराचा सहवास घडला तर चोरासारखी बुध्दी होते. रस्त्यावर पडलेल्या चिंधीवर मन धांवते स्त्रीलंपट माणसाजवळ थोडावेळ बसले तर बाई दिसताच तिच्याकडे मन जाते. यासाठी प्रपंचाचा छंद सोडून दे. हा छंद नसून बंध आहे. अंत:करणाने केशवाला साठव हरिकीर्तनाची आवड धर. पांडुरंगाचे नाम घे. (अ 3205)

74.. आम्ही प्रकाशरुप अशा शुध्द ब्रम्हाच्या निर्मळ स्वरुची घर बांधून निरंतर वास्तव्य केले आहे. माया प्रतिबिंबीत ईश्वर आणि अंत:करणसहित अविद्या प्रतिबिंबित जीव हे दोन्ही ज्या अवस्थेत नाहीत अशा शुध्द ब्रह्मामध्ये आम्ही समरस झालो आहोत आणि त्रिकाळबाधित ऐक्यास प्राप्त झालो आहोत. आता आमच्या स्वरुपाशी अहंकारादी उपाधीचा वास्तव संबंध राहिला नाही. त्यामुळे आम्ही नित्यशुध्द झालो आहोत. पांडुरंगाने माझ्यावर अनुग्रह (कृपा) केला. माझ्यातील संदेह (संशय) व देहबुध्दी नाहीशी केली जीवा-शिवाचे ऐक्य करुन आनंद दिला. ओंकारपदी मला स्थिर केले. (अ 3252)

75.. सात दिवसाचा कडक उपवास झाला तरी कीर्तन सोडून भोजनास जावू नये. शरीर तुटले तरी नामाचा गजर सोडू नये. असाजयाचा निर्धार असतो तेथे देव सदैव राखितो. धनामध्ये कुकर्मात अनर्थ आहे ते टाकून स्वहिता मार्ग घ्या. कल्पनेचा वाईट मार्ग सोडून दे. पंढरीला भल्या मार्गाकडे जावा. तेथील भगवंताचे रुप पाहून सुख प्राप्त करुन घ्या. तेथे विटेवर आनंदाचा कंद उभा आहे. (अ 3261)

76.. गंगा नदी सागराजवळ गेली आणि सागराने तिला परत पाठविले तर तिने कोणाच्या आश्रयाला जावे. देवा मी तुम्हाला शरण आणे आहे. तुम्ही जर माझा स्वीकार केला नाहीतर, आम्ही कोठे जावे. आम्ही शरण आलो आहोत. हरी नाम वेदाचे बीज आहे व “ॐ तत्सत्” ही पांडुरंगाची वेदप्रणीत नांवे आहेत. या

नामानी कार्यसिध्दी होते. या नामात वेदाचे सार आहे. म्हणून याला सूत्र म्हणतात. याही सूत्राचे सार विटेवर उभा असलेला सगुण साकार पांडुरंग आहे. (अ 3271)

77.. संतमुखाची हरिकथा ऐकल्यास आपण हरी कथा केली वाया जात नाही. देवळांत गेला, देवाची पूजा केली तीर्थयात्रा, नाना व्रते केली, संताचे दर्शन घेतले, शुध्द आचरण केले आणि हे सर्व करीत असता दृढ श्रध्दा असेल आणि सतवृत्तीने चांगली कर्मे करण्याचा प्रयत्न केला तर त्यातील थोडे देखील वाया जाणार नाही. चांगली कर्मे करणारा कधीही दुर्गतीला जात नाही. पाण्यावाचून मासा अगर पुरुन ठेवलेले धन सापडत नाही तेव्हां त्याचे मन जसे तडफडते तसे देवा तुमच्या वाचून माझे मन तळमळते देवा माझ्यावर लवकर कृपा कर. (अ 3317)

78.. हरीजवळ अभिमान नाही. म्हणून हा विश्वदेव भक्ताने सांगितलेली कामे करतो. हरिकथेच्या दुधापुढे अमृतदेखील लाजुन मागे राहिले. हरिकथेची आवड मनांत धरुन हरिकथा सर्व साधनाचे सार आहे. हरिकथामुळे भगवंताची प्राप्ती सहज सोपी झाली आहे. भक्ताच्या मनांत चिंता नसते. भक्ताच्या अंगाला पाप-पुण्य चिकटू शकत नाही. कारण चक्रपाणी त्याचे रक्षण करतो. (अ 3323)

79.. आपण माती खाली याची सत्यता पटवून देण्यासाठी श्रीकृष्णाने यशोदा मातेस तोंड पसरुन दाखविले. त्यामध्ये मातेला चौदा भुवने दृष्टीस पडली ते कृष्णाचे भयंकर रुप पाहून यशोदेने डोळे झाकले. पुन्हां डोळे उघडले तर लेकरुं तिच्यापुढे खेळत होते. तिच्यापुढे जाऊन गळ्याला मिठी घातली. देहाशी तादाम्य असणाऱ्याना देव आपली माया कळू देत नाही. मायिक पदार्थांशी तादाम्य असणाऱ्याना देव आपली माया कळू देत नाही. लोभी माणसाच्या चित्तांत श्रध्दा, भक्ति, प्रेम नसते ते शहाणे असून परमार्थात मूर्ख, आंधळे असतात. (अ 3846)

80.. यशोदाची भक्ति परीक्षा- यशोदा म्हणाली देवासनैवद्य दाखवून तुला जेवू घालीत. हे ऐकताच कृष्ण देव घरांत गेला व देव गिळून टाकून तेथेच उभा राहिला. यशोदा आली तर तेथे देव नाहीत, कृष्ण हसू लागला म्हणाला मीच देव खाल्ले. मी प्रत्यक्ष देव असतांना खोटया देवाला खरे मानतेस व कृष्णाने मुख पसरले. तिला त्यामध्ये संपूर्ण ब्रम्हांड दिसू लागले, ज्याच्या पोटांत चंद्र सूर्य, नक्षत्रे तारांगण आहे तो भक्ताकरिता बाळलीला करीत होता. जो सर्व जगाचे जीवन आहे. देवाधी देव आहे. माता पिता म्हणू लागले कृष्णच खरा देव आहे. मग नारायणाने त्याचा गिळलेला देव त्यांना परत दिला व म्हणाला, सर्व देव समजून

माझी उपासना करतात. सर्वोपचाराचा भोक्ता मी आहे. भावाप्रमाणे फळ देणारा मीच एक आहे. मीच खरा देव आहे. (अ 3861)

81.. एका भक्तिभावाने देवाची ओळख होते. दुसऱ्या कोणत्याही साधनाने देवाची प्राप्ती होत नाही. विद्या, सत्ता, धन, सौंदर्य, शक्ति, तारुण्य या योगाने उत्पन्न झाल्यावर देवाची प्राप्त कशी होईल. देवाची प्राप्ती साठी निष्काम बुध्दीने वनवास, एकांत करावा. व्रत, तपे, योग याग करावा ज्याच्या ठिकाणी आपल्याविषयी शुध्द भक्तिभाव असलयाचे हरीला कळत होते. त्याच्याबरोबर तो गोकुळांत खेळत होता. जे सुख वैकुंठीच्या लोकांना दुर्लभ ते त्यांनी भाविक गोपाळांना सहज दिले. (अ 3857)

82.. भगवंत दीनाचा कृपाळू आणि दुष्ट लोकांचा काळ आहे. त्याने सर्व विश्व व्यापले आहे. हा अनंत सर्वाबरोबर बोलतो, हांसतो, पण तो सामान्य नाही. त्याला प्राकृत माणसाप्रमाणे समजू नये. एक भक्तिभाव असेल तर त्याचे स्वरुप कळते. दुसरे कितीही उपाय धुंडाळले तरी सांपडत नाही. श्रुतीना सांपडला नाही. तोच गोपी व गोपाळांची वाट पाहत उभा राहते. अशा अनंताचे वाणीने वर्णन करता येत नाही.(अ 3920)

83.. मुखाने विठ्ठल बोलावा, डोळ्यानी विठ्ठल पहावा. विठ्ठल जीवभावाने प्रिय करावा. असा मोठा सोस मनाला लागला की मन प्रपंचात येतच नाही. हे जग भगवंताचे रुप आहे हा उपदेशाचा मुख्य गाभा आहे प्रथम तुझ्या ठिकाणी असलेल्या ‘मी पणाचा’ नाश केलास तर तुला या परीक्षेत यश प्राप्त होईल. ब्रम्हज्ञानाचे कोठार या वचनात निश्चयाने आहे. तुका म्हणे कार्य आणि त्याचे कारण जेथे नाहीसे होते. त्या अवस्थेला उत्मनी असे म्हणतात. मीच आपल्या उदरी ब्रम्हरुपाने आलो आणि मीच मज व्यालो (जन्मलो) आता सर्व नवस पुरले. आशा निरसून गेली, मी देहबुध्दी गेली आणि सामर्थशाली झालो, मी जसा आहे त्याहून वेगळा नाही. (अ 3944)

84.. भगवंत प्राप्त होण्याची वेद-उपनिषदात सांगितलेली साधने मोठ्या कौशल्याने करावयाची असतात. परंतु तसे मंथन करुन लोणी काढावयाचे, तसे शास्त्रातील सर्व साधनाचे सार हरी आहे. अति उंच ठिकाणी झाडाला फळ असते त्या जागी पक्ष्यास जाण्यास कोणी प्रतिबंध करीत नाही. तो एकदम त्या फळापर्यंत जातो. त्याप्रमाणे श्रीहरीच्या भक्तिने त्याची प्राप्ती एदम होते. त्यांत कमी जास्त

होऊन तूट होत नाही. तुका म्हणे आजपर्यंत पुण्याचा संचय झाला त्याचा लाभ आज मला प्राप्त झाला, त्यायोगे मी समाधानी आहे. (अ 3945)

85.. गोंधळ - परब्रम्ह माझी विठाई प्रत्येकाचे अंत:करणात सूर्य - चंद्राप्रमाणे प्रतिबिंबित होऊन राहिली आहे. हे विठाई तुझ्या चरणी माझे मन लागते. स्थूल सूक्ष्म, कारण, महाकारण या चार देहांचा निरास करुन तुझ्या ठिकाणी माझे मन लागते. तू भीवरेच्या काठी उभा आहेस. तुझ्या गळ्यांत तुळशीच्या माळा आहेत. तुझ्या हातात शंख, चक्र, मिरवीत आहे. तू निर्गुण निराकार आहेस. वेदाला तुझे स्वरुप कळालेच नाही. श्रुतीला तुझा पार लागला नाही. ही सारंगदेवी पंढरीत प्रकट झाली असून भक्तिभाव पाहून दासीला प्रेमपान्हा पाजीत आहे. (अ 3989)

86.. देवाचे ध्यान - ज्याप्रमाणे कोंदणात बसविलेला हिरा शोभतो त्याप्रमाणें नारायण शोभून दिसत आहे त्याचे मुख सुखाने मंडित झाले आहे पोर्णिमेच्या पूर्ण कलेच्या कोटी चंद्राचे तेज त्या ठिकाणी दिसत आहे. तुका म्हणे ते मुख पाहिल्यानंतर डोळे तृप्त होतात आणि दृष्टी माघारी फिरत नाही. देव रत्नजडित सिंहासनावर बसले आहेत. राही रखुमाई जवळच आहेत. अष्टमहासिध्दी दासी म्हणून राबत आहेत तुका म्हणे मी बंदीजन सेवक आमच्या हातांत पादुका घेऊन उभा राहिलो आहे. वैकंठातील देव आणि मृत्युजगतातील लोक या दोघांचे सबंध राखण्याचे काम मी बिनचूक करत आहे. (अ 4027)

87.. नारायणा तू आपल्या दीनांचा संभाळ कर, या पोटामुळे मी अधीन झालो आहे. त्यासाठी कर्मभ्रष्ट केले आहे. त्यायोगाने तुमच्या प्राप्तीचा मार्ग चुकला आहे. पोटामुहे सतत बडबड करावी लागते. संसारपाशात पोटामुळे बांधला गेलो. क्षणभर विश्रांती मिळत नाही. आपले हित कशांत आहे ते कळत नाही. व्याधी रोग यांच्या पीडेमध्ये सर्व आयुष्य वियोगांत गेले. भोगाची आणि माझी ताटातूट केली तरच माझे हित होणार आहे. मूर्खपणाने प्रपंचात गुंतून मीच माझा शत्रू झालो. मला यातून सोडवा. (अ 4069)

88.. हे भगवंता सर्व प्राणिमात्राचे भूतांचे ठिकाणी तुझी सावळी मुर्ती मी डोळ्यांनी पाहीन. जळी, स्थळी, काष्टी पाषाणी सर्वत्र तुझे रुप मी पाहीन. मी जीव होऊन अनुतापाने स्नान करुन प्रेमाच्या सागरांत बुडी द्यावी अशा प्रकारची कृपा नारायण माझ्यावर करा. मायिक पदार्थाच्या सर्व आशा, आकांक्षा नष्ट व्हाव्यात.

संताचे चरणावर वास्तव्य राहवे. असे भाग्य मला प्राप्त करा. सुख आनंदाचे पूर वाहतील. शांती प्रसन्न होईल. हे पांडुरंगा तुझ्यावाचून कोणतेही कृत्य पूर्ण होणार नाही. (अ 4121)

89.. हे भगवंता माझे एकचित्त होत नाही. पण मन माझे ऐकत नाही. नको ते विचार करते. मला अधोगतीला घालते. माझे मन सैराटपणे वाईट विचार करीत राहते. मन सप्रपाताळ, दशदिशा व आकाश सर्वत्र भ्रमण करते. माझे मन सर्व इंद्रिये उत्तेजित करते तृष्णा, काम, क्रोध वाढविते. माझे मन अनिवार आहे. दुष्ट आहे. हृषिकेशा धांवत येवून माझे रक्षण करा. मन आवरा. (अ 4124)

90.. सहा शास्त्राना जो अगम्य परमात्मा श्रीहरी राम रुपाने दशरथाच्या घरी खेळतो. तोच भगवान शंकराचा ध्यानविषय आहे. वाल्मिकेच्या मनीचे रहस्य आहे. तो भिल्लीणीची उष्टी बोरे खातो. ज्याच्या चरण स्पर्शाने अहिल्या शिळा उध्दरली. जयाच्या नामस्मरणाने गाणिका पावन झाली. तो राम कोळ्याच्या घरी पाहुणचार घेतो. तुका म्हणे, सावळ्या सगुण, योगीयाचे ध्यान राजीवलोचन रामाचे मी चरण वंदितो. (क्षेपक अ 9)

91.. तुझ्या श्रीमुखाला माझी दृष्ट लागू नये म्हणून प्रथम तुझ्या पावलाचे दर्शन घेईन. तुझ्यावरुन ओवाळून टाकण्यासाठी माझी काया देईन. नरदेह व्यर्थ जात आहे. सद्‍गुरुजा शरण जावा. भक्तीने देवाची पूजा करा. मला विद्‍या नको, मुक्तीचे मला वेड नाही. धन, सन्यान नको कांही नको, केवळ मुखी नाम असावे. आयुष्य फार थोडे असल्याने रामकृष्ण नाम घेताना माझा प्राण जावो हेच कृपादान मागतो. (क्षे.अं.226)



92.. गणेशा, सर्वसिध्दीचा दाता, चर्तुभ्ज गौरी बालका, असुराच्या विनाशाचे सामर्थ्य असलेला, ज्याला पाहून विघ्ने दूर पळतात. हे एकदंता प्रथम तुला नमस्कार करतो. माझी कीर्तनकथा रसाळपणांत रंगावी, गोडी प्रबळ असावी. त्यामुळे अज्ञान अंधकार नाहींसा व्हावा. तुझ्या कृपेमुळे कार्यसिध्दी मार्ग सुगम होतात. सर्व कार्यारंभी तुझे नमन सर्वजण करतात. तुला दीनानाथ म्हणतात ते वचन सत्य करावे. तुका म्हणे मी भवसागरी बुडत आहे. तूच माझा तारणहार व्हावे. (क्षे. अ. 244)

93.. ज्याठिकाणी ब्रम्हात्म्याचे ज्ञान आहे तेथे चतुर्भुज नारायण हजर असतो. तेथे पाप नाही, काळाला प्रवेश नाही. हरिनाम कीर्तन हे परोपरी जरूरीचे आहे. तुका म्हणे हाच भाव माझ्या अंत:करणात आहे. ब्रम्हाचे वेद शंखासुराने पळविले त्याकरिता त्याने मत्स्यरुप धारण केले. त्याने आत्मा ब्रम्हांडास नेला नव्हता. ब्रम्हाने धाऊन कृपा केली व तोआणला. देवा माझे संरक्षण करा. (क्षे. अं 294)

94.. पहिली बारा वर्षे बालपाणांच्या अज्ञानांत गेली. त्या पुढील तीस वर्षे तारुण्यांत गेली. बाकी उरली अठ्ठावन्न वर्षेपण त्याकाळांत पांडुरंगाची भक्ति केली नाही. त्यातील तीस वर्षे प्रपंचातील विविध नात्यातील लोकाविषयी प्रेम दाखविण्यात गेली. या काळांत देहाचा विसर पडला. शरीराची गात्रे किंवा अवयव कामवासनेपासूनचा जमा खर्च मांडला. प्रत्यक्षात संसार हा थोडा आहे अखेर अरे बाबा तू परमार्थ केव्हां करणार ? (क्षे. अ. 301)

95.. देवा, माझा सर्व भाव तुला अर्पिला आहे. तेथे आता कोणताही भाव उरला नाही. माझ्या सर्व इंद्रियाव्दारा जे जे कांही कर्म घडत आहे ते सर्व तुझ्याविषयीचे माझे जे धर्म, कर्तव्य आहे ते घडत आहे, ते मी करीत आहे, माझे हित, अहित हे तू पहावयाचे आहे. माझ्या हिताची जबाबदारी तुझ्यावर आहे. माझ्यासाठी जे जे कांही तू करीत आहेस, तो तुझा लौकिक आहे तुझी भक्ति न करणे हा माझा अपमान आहे तुका म्हणे, मी अत्यंत स्थिर आहे कारण तुझे डोक्यावर माझा भार घातला आहे. (क्षे.अं. 311)

96.. तुम्ही संत-सज्जनांना माझी दया यावी म्हणून मी आपल्या चरणी नम्र झालो. मला योगशास्त्राचे ज्ञान नाही. माझी बुध्दी चालत नाही त्याबाबत चालत नाही. तप अनुष्ठानापेक्षाही भाव श्रध्दायुक्त भक्ति करणे मी पसंत करतो. श्री

सतत हरिकीर्तन करतो. मला ब्रम्हज्ञान समजत नाही. मला ध्यानधारणा करता येत नाही केवळ एका नारायणखेरीज मी कांही जाणत नाही. तुका म्हणे, माझ्या जीवनाची व प्रपंचाची जबाबदारी विठ्ठलावर आहे सर्व काही तोच जाणतो करतो. (क्षे अ. 318)

97. भगवंताची निष्काम सेवा ही अत्यंत आनंददायी असते. आई आपल्या लेकराचे कोड-कौतुक करते. बाळ जे जे मागेल ते आई देते. कौतुक करते, त्यास खेळवते मातेला अत्यंत आनंद होतो. भगवंताचे सामर्थ्य ज्यास प्रापत झालेतो चालता-बोलता पुरुषार्थच होय. ज्याच्या ठिकाणी भगवंताचे बळ आहे तो काळावर मात करतो. ज्याला ईश्वराचे साहाय्य आहे तो कोणतेही कार्य करु शकतो. तुका म्हणे, खात्रीने ज्याच्याकडे सत्ता आहे त्यास कोणाचेही भय नाही (क्षे अ. 331)

98. एकाद्या रोग्याला रुचकर अन्न किंवा माकडाला चंदनाचा लेप काय कामाचे, ज्याला नाक नाही त्याला आरसा आवडत नाही. किंवा मूर्खाला शास्त्रबोध काय कामाचा ? प्रपंच भ्रम आहे. वांझ स्त्रीस संतती शक्य आहे काय? प्रपंच सूर्यबिंब दिसताच अंधार टिकेल काय ? हा सर्व परिणाम प्रकाशाचा आहे. भोग आणि भोक्ता नष्ट होत नाही. तुका म्हणे प्रपंचाचे बंड पहावत नाही आम्ही ब्रम्हनंदी निरपेक्ष बुध्दीने स्थिर आहोत (क्षे.अ.356)

99. हे वासूदेवा, गरीबाच्या नाथा, ज्याचे डोळे कमळाप्रमाणे डोळे आहेस अशा अच्युता, आपल्या भक्तास सौख्य देणाऱ्या भगवंता तुझ्यासारखे कांहीच असू शकत नाही. हे विठ्ठला, हे विराटस्वरुपा वामनमूर्ती, तू ब्रह्मादी कर्ता आहेस, वेदांनासुध्दा तुझे वर्णन करणे अशक्य आहे भक्तांचे भय बंधन तोडणाऱ्या परमपुरषा पांडुरंगा अनादि, संग-असंगा तू वेगळाच आहेस. तुझे विराटस्वरुप भोळ्या भक्तास अगम्य आहे. (क्षे.अ 363)

100. आरती तुकारामाची

आरती तुकारामा। स्वामी सद्‌गुरुधामा ।।
सच्चिदानंदमूर्ती । पाय दाखवी आम्हा ।।ध्रु ।।
राघवे सागरांत । पाषाण तारीले ।।
तैसे हे तुकोबाचे । अभंग उदकी रक्षीले।।1 ।।आरती तुका.
तुकितां तुळणेसी ।ब्रम्ह तुकासि आले ।।
म्हणुनी रामेश्वर।चरणी मस्तक ठेविले ।।2।।आरती तुका.




# 2. तुका म्हणे

101. तुका म्हणे - थोड्या कारणाने रागवणारा माणूस स्वत:चा घात करुन घेतो तो जणू कांही कुत्रा आहे. दुष्ट मुलामुळे आईवडिलास आनंद होत नाही. तो दुराचारी, चांडाळ आहे त्याचा स्पर्श निषिध्द असे. (अ 52)

102.. अशक्य गोष्टी सतत प्रयत्नाने अभ्यासाने शक्य होतात. दगडाच्या नांवेत दगड घालून पैलतिरी कसे जाणार. ढोंगी साधू भवसागर कसे पार

करणार. मुलाचे बाहुलीच्या लग्नाने त्याच्यात सोयरीक होत नाही. तुका म्हणे बध्दता, मुक्तता हे शब्द आत्म्याच्या ठिकाणी व्यर्थ शीण आहे. (अ 161)

103. तुका म्हणे - या मृत्युलोकांत आम्हांस हरीनामाखेरीज इतर काहीही प्रकार, मार्ग आवडत नाहीत. माझे मन प्रपंचाविषयी विटले आहे. ओकारीप्रमाणे मनांत बसले आहे. आम्हांस सोने रुपे माती समान. हिरे माणिके दगडासमान आणि भुलविणाऱ्या सुंदर स्त्रिया अस्वलीसारख्या दिसतात (अ 224)

104. बहुरुप्याने अनेक खैळ केले तरी तो स्वत:स मी कोण हे जाणत असतो. त्याप्रमाणे आम्ही संसाराचा खेळ मांडलेला आहे तरी आमचे स्वरुप काय आहे ते जाणतो. तुका म्हणजे आमचे स्वरुप काय आहे ते जाणतो. तुका म्हणे आम्ही स्वात्मबोधाने अनावेगळे होऊन शांतपणे भजन कीर्तन करु. (अ 259)

105. मी सर्व चांगल्या वाईट प्रसंगी सर्व काळी देवच साक्षी केला आहे. भोजनादिकाच्या वेळी बालकाबरोबर भोजन करणारा, तोच खरा प्रेमळ पिता आहे. तुका म्हणे चांगली वाईट कर्मे जेथे जळाली, असे प्रौढ आत्मपद माझ्या ठिकाणी उरले आहे. (अ 294)

106. योगीजनास समाधीमध्ये जे देवाचे रुप दिसते ते आम्हास विटेवर दिसतो. त्या देवाचे निर्गुण रुप सकळांचे अंत:करण व्यापून निर्विकारपणे वेगळे राहिलेले आहे. ज्या स्वरुपाला रुप रेखा, नाम अशा रुपाचे ध्यान भगवान शंकर चित्तात करतात. तुका म्हणे निर्गुण निराकार रुप भक्तासाठी साकार प्रकट झाले. (अ 320)

107. कांदे खाणारा माणूस कस्तुरीचा विचार काय करणार ? त्याचे मुख्य काय समजणार ? ते स्वत:च भिकारी आहेत. ते मला विनाकारण त्रास देतात तुका म्हणे अशा लोकाची वाचा बंद होवो, असत्य, वादखोर, भांडखोर लोकांशी मी काय बोलू ? (अ 404)

108. डुकरास विष्ठा खाणे आवडते. सकस राजस त्यास काय चव असणार ? त्याप्रमाणे नास्तिकास परमार्थ आवडणार नाही. पक्वान्नाचे भोजन सोडून कुत्र्याचे लक्ष हाडावर असते. सापाला दुध पाजले त्याने उलटी केली तरी विष बाहेर पडते. काविळ झाली आहे त्याला चंद्र पिवळा दिसतो. दारुड्यास लोण्याची गोडी लागत नाही. तुका म्हणे आता मंगळाचा सदैव विचार करु त्यायोगे सर्व काळ सुखाचा जातो. (अ 417)

109. बाळाचे सुख दु:ख आईच जाणते. आंधळा डोळसाचे मदतीने मार्ग-आडमार्ग जाणतो व सुरक्षित जातो. पुरातून नदीपलीकडे जाणाऱ्याने पोहणाऱ्याची कास धरावी. आपले जीवन विठ्ठलाच्या हात दिल्यावर सर्व परिस्थिती तोच जाणत आहे. तुका म्हणे बोलणाऱ्याचा राग धरु नका कारण कडुलिंबाचाप्रमाणे कडू काढा दिल्यावाचून आंतली व्याधी दूर होत नाही. (अ 420)

110. तुका म्हणे - विठ्ठलाने माझे सर्व शरीर व्यापले आहे. माझ्या छायेत मला विठ्ठलच दिसत आहे. माझी जिव्हा सदैव विठ्ठलाचे स्मरण करत आहे. सर्व इंद्रियामध्ये मन हे प्रमुख पण ते देखील आपली चंचलता टाकून विठ्ठलचे स्मरण करत आहे. विठ्ठलाला मला क्षणभर विसरता येणार नाही. (अ 463)

111. तुका म्हणे - विरक्ती, शांती, दया, क्षमा मी कांही जाणत नाही. आम्ही विठ्ठलाच जाणतो त्याच्या मेळ्यांत आम्ही आनंदाने नाचतो. अमृत सागरांत राहून मी देहाविषयी उदास कशाकरता राहू ? वनांत एकांववासात का राहू ? लोकामध्ये राहून मला आनंद आहे. तोच माझा सांभाळ करतो. (अ 472)

112. योग-याग यासारखी आवघड साधने कशाकरता करु आम्हास हरी भजनाचे सोपे वर्म सापडले आहे. देवा तुझे स्वरुप अनंत काळापासून घटलेले आणि बाढलेली नाही. तू जसा होता तसा आजही आहे. तुका म्हणे देवा, माझा तुम्ही अंगीकार केला तर तुम्हांस फार ओझे होइल काय ? (अ 525)

113. तुका म्हणे - तुझे पाय अंत:करणात धरणे हे भवदु:ख निवृत्तीचे आणि सुखप्राप्तीचे खरे गौप्य माझ्या हाती लागले आहे. हरी व जीव यांच्यातील भेदभावाचा भ्रम माझ्यातून गेला आहे. विठ्ठल नाम अमृतासमान आहे. (अ 533)

114. तुका म्हणे - मला परमार्थ करण्याकरिता चांगला देह प्रापत झालेला आहे. विठ्ठल हे नामधन अंत:काळचे परम जीवन आहे. क्षुद्र धनसंचय धनधान्य संग्रह करण्याचा उत्तम व्यापर करुया. (अ 538)

115.भगवंत भक्ताच्या चित्रात जसा भाव असेल तसे तो त्याचे काम करतो. खोटया सोनयाची लबाडी सोनारास कळते, दुध पाणी मिसळून एक झाले तरी त्याची गोडी जाणणारा भेसळ ओळखतो. तुका म्हणे जो स्वत: खोटा आहे त्याची मोठी संभावना होइल अपमान होइल. (अ 545)

116. तुका म्हणे - भगवंत चिंतनाने चिंतारहित अशा आत्मस्वरुपाच्या ठिकाणी स्थिर झालो आहे. यामुळे आता मौन करावे अशी माझी अवस्था आहे. आत्मविषयक विचार करुन आत्मज्ञानात संशय दुर केला आहे. देह, स्त्री, पुत्र संपत्ती याचा मोह नष्ट झाला आहे. देवा तुमच्यापासून आम्ही निर्माण झालो आहोत तर वेगळे कसे असु. (अ 555)

117. देवा आपणाकडे काही मागण्याची इच्छा नाही. मनांत काही अपेक्षा धरुन मी खोटयाची स्तुती करणार नाही. परमार्थकडून मिळेल तेवढे घ्यावे. या ठिकाणी स्वामी सेवा कशासाठी ? तुका म्हणे माझ्या कंठात हरीचे नाम असून अंगात हरीचे प्रेम भरलेले आहे. (अ 563)

118. आमच्या पाठीमागे लागलेला काळ आम्हास जिंकत आहे. केवळ पोट भरण्यासाठी दांभिक परमार्थाचा पसारा वाढविल्याने उलट मुद्दलात तूट येत आहे. तुका म्हणे भगवंता तुमच्या अभय वरद हस्ताने माझ्या मनाला जागविले तर बरे होईल. (अ 572)

119. भगवंता तुम्ही आपल्या दासाना विसरता. हे तुमचे वागणे अयोग्य आहे. तुमच्याजवळ नीती आहे. बाळाचा जीव जाईपर्यंत आईकडून तयाचा त्याग व्हावा हे मोठे आश्चर्य आहे. तुका म्हणे अहो देवा आम्हांला चिंतेच्या डोहांत बुडविताना तुम्हाला लाज वाटत नाही. ? (अ 573)

120. देवा तुमच्या स्वरुपामध्ये मी जीवाभावाने मिळून जावे. देवा तुम्ही स्वामी व्हावे. मी सेवक व्हावे, सर्व एकत्र आल्यावर काय उपयोग ? पाणी पाण्याला पीत नाही. वृक्ष फळे खात नाही त्याहून जो वेगळ भोक्ता असतो तोच त्याची गोडी अनुभवतो. तुका म्हणे मी सेवक वेगळे राहण्यातच मला आनंद आहे. मी मुक्त होणार नाही असा माझा निश्चय झालेला आहे. (अ 595)

121. मला प्रपंच लेकरेबाळे आठवत नाही. मला स्वकीय परकीय समान झाले आहेत. तुका म्हणे पंढरीनाथा योग क्षेमाचे माझे ओझे तुझ्या डोक्यावर ठेवल्यामुळे मला कोणत्याही प्रकारची चिंता राहिली नाही. (अ 619)

122. सारे जग परमेश्वर आहे तर लोकाच्या पाया पडावे, परंतु त्याच्या स्वभावाशी कर्तव्य ठेवू नये. थंडीपासून संरक्षण व्हावे एवढ्यासाठी अग्नीचे सौजन्य असावे. त्याला पदरात बांधून घेण्याचा वेडेपणा करु नये तुका म्हणे -

साप, विंचू नारायण स्वरुप आहेत म्हणून त्याना दुरुन नमस्कार करावा. परंतु स्पर्श करु नये. (अ 637)

123. गारुडी फासा टाकून पुंगी वाजवून साप पकडतात. कोळी गळाला खाद्यपदार्थ लावून मासे पकडतात. पारधी जाळे टाकून पक्षी पकडतात. गुळावर माशी बसते व तेथेच तिच पाय चिकटतात तुका म्हणे संसाराच्या आशेने माझा प्राण घेतला आहे. पंढरीनाथा तू मला मुक्त कर. (अ 639)

124. हरीची खरी उपासना ही ब्रम्हरुपी प्रस्थान ठेवल्याने होते. यज्ञामुळे नाही. जीवात्माचे ब्रम्हाशी अभेद तत्वाने ऐक्य होण्याने साध्य होते याला ज्ञानोत्तर उपासना म्हणतात. एकच ईश्वराचे स्वरुप पण ते बीज अज्ञान व फळ स्थूल सूक्षात्मक जगत रुपाने वाटले गेले. या बीजफळाचे आदि अंती असणारे कारण श्रीहरीचे स्वरुप आहे. त्याला जाणणे आवश्यक आहे. बाकी सर्व व्यर्थ आहे. तुका म्हणे पांडुरंग कृपेने वेदाचे ज्ञान जाणून बोलत आहे. (अ778)

125. मानवी जीवनाचे परमोच्च साध्य हरिप्रातीची साधने करण्याकरिता देहाचे रक्षण करा. आपल्या आईचे स्तन फाडणाऱ्यास काय लाभ आहे. वेदाची टिंगल करणारा अंत्यज नीच आहे. ज्याने आपल्या घरास आग लावण्यास राहण्यास जागा कोठे आहे. तुका म्हणे सर्वांना भ्रम नाचवीत आहे आणि वेदाचे वर्म मात्र मी जाणत आहे. (अ 793)

126. मोक्षप्राप्ती आम्हास अवघड नाही. तो गाठोड्यातील वस्तूप्रमाणे आमच्या हातात आहे. मोक्ष हा आमचा अलंकार आहे. ते आमचे स्वरुप आहे तो आमचाच आम्हास देणे. यांत तुमचे काय आहे ? तरीपण आम्ही त्यात आनंदाने हित मानून घेतो तुका म्हणे देवा मोक्षपदापेक्षा तुझ्या भक्तिसुखाची गोडी अनुभवण्यासाठी आम्हांस पुन:पुन्हा जन्म दे. (अ 896)

127.भक्त ज्या रुपाचे ध्यान करतो ते रुप श्रीहरी घेतो सगुण - निर्गुणाचे अधिष्ठान असलेले दोन चरण विटेवर सम रुपाने ठेवले आहेत. साखरेचे सर्व अंग गोड असते. त्यात भेद असत नाही उणेपणा निवडता येत नाही तसे हरीच्या पारमार्थिक स्वरुपात सगुण-निर्गुण असा न्यून अधिक भाग दाखविता येणार नाही. कर्म धर्माच्या आचरणात भगवंताविषयी प्रेम नसेल त्यांच्याकडे देव पाहात देखील नाही. जे यज्ञात मंत्रयुक्त हवन करतात तेथे देव उदास असतो. तुका म्हणे हरी योग्यांना देखील फसवितो. (अ 902)

128. भगवंताची भेट घेण्यास इतर साधनाची गरज नाही केवळ अंत:करणात प्रेम पाहिजे काम क्रोध, मोह, माया या सर्वांना बाहेर घालवून भगवंताची भेट घेतली पाहिजे. तुका म्हणे - ज्याच्या अंत:करणातील संसाराची उर्मी कायमची नाहीशी झाली आहे अशाच्या ह्रदयांत देव वास्तव्य करतो. (अ 907)

129. ब्रम्हरुप झालेली कर्मे करतात. ती सहज होत जातात. ती पूर्वसंकल्पानुसार नसतात. म्हणून ती कर्मे ब्रम्हरुपच आहेत. स्पटिक ज्या रंगापाशी ठेवल तसा त्या रंगाचा दिसतो. लहान मुले आपल्या आईस लगेच ओळखते. आत्मज्ञानी मुगध संत ब्रम्हाखेरीज कोणास ओळखत नाही. तुका म्हणे खऱ्या अनुभवी आत्मज्ञानी लोकांना मी नमस्कार करतो. (अ 962)

130. पतिव्रतेचे अंत:करणात फक्त पतीच असतो. त्याच्यावरच श्रध्दा असते. अन्य व्यक्तिची स्तुती करत नाही. भगवंता माझ्या मनाची स्थिती तशीच झाली आहे. माझ्या मनाला विठ्ठला वाचून दुसरे काही आवडत नाही. वेद म्हणतात सर्व भूत-मात्र एक ब्रम्ह आहे. वेद घोकणारा पंडीताला वेदाचा अर्थ पूर्णपणे जाणत नसेल तर त्यास दुराचारी म्हणावे, तुका म्हणे जीव-शिव एकरुप मानावे असे वेद सांगतात त्याचा अनुभव मला आला आहे. (अ 1025)

131. भगवंता वाचून कोणाची स्तुती करु नका. प्रारब्धाप्रमाणे आपणांस अन्नवस्त्र मिळत असते. टाळ, दिंडी व वीणा घेऊन मुखाने विठ्ठल नामाचा उच्चार करा. वीणा विठ्ठलरुप माना. आपणास उच्चार करा. वीणा विठ्ठलरुपा माना. आपणास विठ्ठलाचा छंद लागू द्या. तुका म्हणे सुख दु:खाचे वेळी मी विठ्ठलाला आठवतो. माझ्या मुखांत सर्वकाळ विठ्ठल आहे. (अ 1028)

132. देवा सारा संसार च निष्फळ आहे हे जाणून संताच्या संगतीविषयी माझी इच्छा प्रेम श्रध्दा आहे. पांडुरंग मला भेटण्यास वेळ देऊ नको. मोकळ्या अंतकरणाने मला अलिंगन द्यावे. तुझ्या शाश्वत सुखाची प्राप्ती होईल. अशीच कृपा करा. मायिक पदार्थाची मला मुळीच इच्छा नाही. (अ 1071)

133. तुका म्हणे - आम्हास मुक्ती देतो म्हटले तरी आम्हास ती नको. आमच्या चित्तात विठ्ठलाशिवाय दुसरे काही नाही भेद आणि अभेद दोन्ही मालवले आहे. सर्वत्र एकच देवाची प्रचिती येत आहे. देहबुध्दीकडून मायेच्या

पलीकडील आत्मस्वरुप भाव चोरला गेल्यामुळे देहास रडत बसावे लागले. देहामुळे मी आणि माझे सतत बोंब मारीत आहे. मी कोण आहे हे तु विसला आहेस (अ 1106)

134. तुका म्हणे - संतातर्फे मी पंढरपुरास पांडुरंगास निरोप देईन. तुमच्या महाव्दारात मला केरसुनी समजा. तुमच्या पायाचा जोडा मला समजा तुमची पीकदाणी माझे मुख समजा. मला तुमच्या पायाची रजधूळ समजा. तुमच्या दैनंदिन भोगवस्तु प्रमाणे मला समजा. (अ 1123)

135. प्रपंचात धनाचे मागे लागून जिवाची अखेर होईल. शरीर आणि प्रपंच मायेचे कार्य आहे. काम-क्रोध. स्त्री पुत्र बाहेरचे शत्रु आहेत. आयुष्य वाया जात आहे. स्वहिताचा काही उपाय कर. ज्या शरीरात पाण्याचा अंश आहे त्याला पाण्याने स्वच्छ करुन पातके नाहीसे होणार नाहीत. यास्तव मी पाप-पुण्य निर्माण करणारी वासना मुळासकट तुला अर्पण केली आहे. तुका म्हणे मी तुला माझा जीवित देह अर्पण करुन निष्काळजी झालो आहे. (अ 1183)

136.आम्ही हरीप्राप्तीसाठी प्राण अर्पण करण्याचे धाडस करु. लाभाची योग्य वेळ आल्यास आम्ही भय बाळकणार नाही. तुका म्हणे परमार्थातील रहस्य नियम आम्हास समजतात. हरीभजनाची लाज टाकली म्हणून आमचे परमार्थ कार्य साधले. भवसागराच्या पैलतिरी सुखाने नाचत आहोत. सर्व साधनाचे सार चिंतन सतत घडावे. चिंतन करताना मनच मनाला ग्वाही देते. मनापासून केलेली सेवा देवाला पावते. (अ 1377)

137. देहावरील अहंभाव नष्ट झालातर बोलावयास कांही शिल्लक राहत नाही. देहाभिमान ठेवून ज्ञानासंबंधी बोलणे हे शब्दजाल असून रस परिपोष होण्यापुरताच त्याचा उपयोग होतो. जो जातीचा असेल त्या संस्काराला अनुसरुन चित्त आवडीच्या विषयाकडे ओढ घेते. लोण्याचे कढणे तुप झाल्यावर बंद पडते. अहंभावाचा निरास झाला म्हणजे जाती आणि चित्ताची ओढ राहत नाही. तुका म्हणे माझ्या कांही दोष आहेत की नाही माझा स्वामी श्री पांडुरंगच जाणतो. जाणत्याकरुन खरे खोटे जाणता येते. विनाकारण वाद नको.(अ 1489)

138. मोठे संकट आले तर दासानी हरीचे स्मरण करावे भक्तासाठी पांडुरंग पंढरीत आला असे त्याला बाहय खाऊपणाचे उपचार त्याला आवडत नाहीत त्याचे विटेवर समचरण उभे आहेत. ज्याच्या मुखात विठोबाचे नाम आहे

त्याला सर्व व्रतनियम पाळल्याचे पुण्य मिळेल नामामुळे वैकुंठातील सुख-सोहळ्याचे फळ प्राप्त होते तुका म्हणे - नामस्मरणाच्या सहज स्वभावानुसार मनुष्य देवरुप होतो. (अ 1629)

139. तुका म्हणे पंढरीत वारकरी झाले असता मोक्ष प्राप्तीचा लाभ सहज होतो. हे माझ्या अनुभवास आलेले आहे. मी वारकरी आहे. योग्य काळाचे महत्तव ओळखा. शुभकार्याप्रसंगी अशुभ न बोलता, शुभ बोला. विंचवास नांगीत विषामुळे मरावे लागते. ज्याच्या अंगी जे दोष असतात ते त्याच्या दु:खाला कारणीभुत होतात. मनच शत्रु आहे आणि मित्रही आहे याचा विचार केला पाहिजे. (अ 1655)

140. उंबरात असणाऱ्या किड्याला उंबर हेच ब्रम्हांड वाढते. आम्हाला एकच ब्रम्हांड वाटते परंतु अशी असंख्य ब्रम्हांडे आहे. कोटी कोटी ब्रम्हांडे ज्याच्या पोटात साठविली आहेत. तो नंदाचा बालमुकूंद आहे तो परमानंद असून स्वत:ला तान्हा म्हणवितो. तुका म्हणे -अशी भगवंताची अगम्य लिला आहे. ती ब्रम्हानंदाचा अनुभव आल्यामुळे कळली.

141. वृक्षवल्ली, सुस्वर गाणारे पक्षी आमचे सखे सोयरे आहेत त्याच्यात एकांतात राहणे मला आवडते, त्यात कोणताही गुणदोष लागत नाही. आकाशाचा मंडप आणि पृथ्वीचे आसन असते तेथे माझे मन रमते. हरिकथेचे रुचकर भोजन आहे. तुका म्हणे तेथे मनाशी, संवाद होतो. आपला आपणाशी वाद विवाद होतो. भगवंता पाण्यात मीठ विरघळते तसा तुझ्याशी मी एकरुप झालो. अग्नी कापराचा संबंध येताच काही शिल्लक राहत नाही. तुझी आणि माझी स्वरुपस्थिती एकच होती आता अनात्म पदार्थाचा निरास होतात. पूर्ववत एक झाली आहे. (अ 10723)

142. तुका म्हणे - हे अनंता, माय बाप्पा तुझ्या भेटीसाठी केलेल्या उपदेशाचा आज तेरावा दिवस आहे. तू अद्याप प्राप्त झालेला नाही. तुझ्यासाठी मी आता प्राण देइल ती हत्या तुझ्या माथी येईल. आतां मी माझ्या जीवाचा नाश करतो. हे नारायणा इंद्रियांनी आम्हांस दीन केले आहे. त्यामुळे देव व संसारही नाही. जमिन पीक देत नाही आणि मला भीक वाढत नाही. माझी विनवणी तुम्ही ऐकत नाही. आम्ही तुमचे दास म्हणवितो परंतु आमचा होणे योग्य आहे काय ?

143. लबाडाच्या भाषणाला गोडी नसते. तत्व नसते. त्यामुळे ते कोणास पटत नाही. त्याच्या अंगी मोठे अवगुण असतात. तो अविचाराने काम करतो. ते परमार्थास अपात्र आहेत त्याची स्तुती करु नये. लौकिक संभाळाऱ्याला परमार्थ साधन नाही. तुका म्हणे - तुझ्याशी सव्यत्व जोडणे हे माझ्या हाती आहे. जो कोणी प्रेम करतो त्यावर तू ऋणी होतोस. (अ 1831)

144. इतर देवाची सेवा शरीराने करावी लागते. येथे केवळ बोलण्याने (नामस्मरणाने) ती होते. असा हा पांडुरंग सोपा आहे. इतराच्या देण्याने काही काळच पोट भरते पांडुरंगाचे देणे कल्पातही सरत नाही. पांडुरंग हा आपल्या सेवकाला आपल्यासारखे करतो. प्रसंगी जीव देण्याइतका प्रयत्न केला तर कोणतीही गोष्ट साध्य होते. शूर योध्दा युध्द करताना मेला तर स्वर्गाला जातो व जिंकून आला तर समाजात मान मिळवितो असे तुकाराम महाराज म्हणतात. (अ 1912)

145. नामघोषाने माझी वाणी गोड झालेली आहे. प्रपंचातील भय संपले मृत्यूची भेट होण्याची वेळ आली आहे. ही गुप्त गोष्ट कानाजवळील पांढऱ्या केसानी सांगितली आहे. हे माझ्या मना सावध हो. ओंकारस्वरुप पांडुरंगाचे चिंतनाने जाण्याची निश्चित वेळ ठरव, प्रत्येक क्षण हरि चिंतनात घालव तुका म्हणे स्त्री पुत्रादि रडण्याचा गोंगाट न ऐकता भगवत् चिंतनात आपल्या कुलदैवताचे अंतकाळी स्मरण कर. (अ 1914)

146. सर्व प्राणीमात्रांच्या ठिकाणी भगवंत आहे. हा भाव ठेवून एक निरंजन ब्रह्म आहे. त्याचे नांव अव्दैत आहे. अशा निर्वाला अठरा पुराणे, वेद उपनिषदे देव आहेत. संत महात्मे अनुभवव्दारा तीच गर्जना करत आहे. माझे आणि तुझे व्देताभ्रम नष्ट होताच एक अव्दैत परमात्माच अविशिष्ट राहतो. तुका म्हणे ब्रम्हाशिवाय कांहीच नाही मी देह या संकल्पनेने हे व्दैत आपोआप वाढते. ((अ 2001)

147.कानांत मंत्र देणे मी जाणत नाही. एकांतात उपदेश करण्याचे तंत्रज्ञान मला नाही. एकांतात देव दाखवू शकत नाही. कारण तो डोळ्यांनी दिसत नाही. तुका म्हणे मी आपले चिंतन करीत असतो त्या चिंतन - आनंदात संसारातील दु:खे मला स्पर्श करत नाहीत. प्रपंचाचे बीज असलेल्या अहंकाराचा

त्याग करा. आपले मन राग व्देषरहित व आत्मनिष्ट बनविले पाहिजे. (अ 2003)

148. गाढवास राजहंस नांव ठेवून काय उपयोग मान प्राप्त होण्यासाठी पात्रता अंगी असावी लागते. घरचे स्त्री-पुत्र बंधू सर्व स्वार्थी कपटी असतात. इतर मित्र, सोयरे, सर्व दुसऱ्याचा नाश करतात. हरीचे नामस्मरण केले असता प्रपंचाचे बंधन तुटते तुका म्हणे नामस्मरणाशिवाय राहू नका. (अ 2008)

149. जोपर्यंत कोल्हाने वाघ पाहिला नाही तोपर्यत त्याच्या गर्जना चालतात. जोपर्यत समुद्राने अगस्ती ब्राम्हणास पाहिले नसते तोपर्यंत सागराची गर्जना चालते. जोपर्यत सौदर्यवती स्त्री पाहत नाही तोपर्यंत वैराग्याच्या गोष्टी चालतात. जोपर्यंत तुझे दर्शन झाले नाही तोपर्यंत मळ, मुद्रा ही भूषणे मिरवावी असे तुकाराम महाराज म्हणतात. (अ 2011)

150. पतंगाची दोरी आपल्या हातांत असते. पतंग आकाशाने उडत असतो. आपल्याजवळील दोरी ओढताच पतंग जवळ ओढता येतो. जो आपल्या मालाचे रक्षण करतो त्याचा माल चोरीला जात नाही. कर्जाच्या धनापेक्षा अधिक किंमती वस्तु गहाण ठेवून जो कर्ज पुरवतो त्याचे पैसे बुडत नाही. बी शेतात पेरले तर अंकुर फटणार. त्या अंकुरास पाणी घालून रक्षण केल्यास पिकाचा आर्थिक लाभ होतो. तुका म्हणे - माझी सेवा समाधानाचा लाभ देणारी आहे. मी निश्चित होऊन सेवा करतो. त्यात देवाला वेगळे उरु दिले नाही. (अ 2029)

151. भक्त उच्च जातीचा का नीच जातीचा देव पाहत नाही भगवंत त्याच्या अंत:करणातील खरा भाव पाहून उभा राहतो. दासीपुत्र विदुराच्या घरचा कण्या खाल्या, दैत्यातील प्रल्हादाचे रक्षण केले, कबिराचे शेले विणले, सावता माळ्याबरोबर माळीचे काम केले. नरहरी सोनाराबरोबर भट्टी फुंकली नामदेवाच्या जनीच्या गोवऱ्या लावल्या. ज्ञान देवाची भिंत चालविली. तुका म्हणे आता कृपा करा तुमचे समचरण दाखवा. (अ 2052)

152. प्रेम ही देवाची देणगी आहे. देह काळाची शुध्दी मनांत राहत नाही असे हे प्रेम देवाचे देणे. देव पाहिला आहे असे जो सांगतो तो लबाड आहे. देवाचा खरा अनुभव पाहिजे. केवळ शब्दाचे गौरव उपयोगी नाहीत विष्णुची पूजा का करावी तर त्यांचे चरणरज प्रत्यक्ष भगवान शंकरानी आपल्या मस्तकावर धारण केलेले आहेत. देव हा वैष्णवांचा अंकित आहे. देव हा

वैष्णवासाठी साकार होतो. तुका म्हणे - माझे बोल सिध्दांत आहेत. माझ्या अनुभवाचे साक्ष आहेत. (अ 2067)

153.रामनाम मुखी असल्याने आम्हास महत्तव आहे. नाही तर पशुपक्षी व आपणात काय फरक आहे. धनाच्या आधारे मिळालेले भाग्य क्षणिक आहे. ते नष्ट होते. योग्य ठिकाण आणि उचित काळवेळ न पाहता, विचार न करता बोलणे गाढवासारखेच ओरडणे आहे. या विचारी कृत्यासाठी शासन मिळते. अविचारी कोणत्याही वेळी भांडण काढतो. तुका म्हणे धर्मनीतीपूर्वक आचरण, व्यवहार कर्तव्य करा. स्वहित करा. (अ 2131)

154.तुका म्हणे - दुर्वर्तनाते बायकोने नवऱ्याला (मनुष्य असून) गाढव, पशू करुन त्याचा आयुष्याचा नाश केला. त्याचे आयुष्य मेंढ्या - गाढवाच्या जन्माप्रमाणे आणि कुत्र्याच्या प्रमाणे समजावे. ज्याची वाणी हरीचे नाम घेत नाही तो दोन बापाचा पुत्र आहे. अभक्ताला ओळखण्याची हीच चिन्हे आहे. पांडुरंगा तुमची बहीण द्रोपदी पंक्तित वाढत असताना चोळीची गाठ सुटली तेव्हां देवानी, दोन्ही हात वाढण्यांत गुंतले असल्याने गांठ बांधणे शक्य होईला. म्हणून आणखी दोन हात गांठ बांधण्यास तिला दिले आपल्यासारखे चतुर्भज केले. मनाने तुला शरण आलो आहे. माझे पाप नाहीसे कर. (अ 2193)

155. गाढवीण पुष्कळ दूध देणारी झाली म्हणजे तिला गाईची बरोबरी येईल काय ? कावळ्यास फुलाच्या माळा घातल्या तो राजहंसासारखे शोभून दिसेल काय ? तुका म्हणे एखादा ब्राम्हण चुकून कर्मभ्रष्ट झाला तरीसुध्दा तो श्रेष्ठ आहे. भक्ताला धन दिले तर त्याला अभिमान निर्माण होईल म्हणून देव त्याला दरिद्री ठेवतो. स्वरुप बायको दिली तर तो तिच्या मोहात गुंतून पडेल म्हणून त्यास क्रर्कश बायको देतो. तुका म्हणे मला याचा अनुभव आला आहे. (अ 2224)

156. जग आणि देव या दोन्ही पक्षांत दक्षतेने राहावे स्वामीनी जी आज्ञा केली आहे त्या नीतीनुसार आचरण करु तुका म्हणे - पूर्वी ज्या ठिकाणी होतो. (निर्गुणवस्था) व आताही आहे त्या ठिकाणाला (आत्मस्वरुपाला) सगुण हरिला नमस्कार करतो. देवा माझा उध्दार करण्याचे बळ मला द्या. मी माझे तू या भेदभावाने आणि अज्ञानाने मी फार दु:खी होतो. तू माझ्या जवळ होतास परंतु मला ते कळले नाही. (अ 2307)

157. संतसेवेमुळे 'सर्वाभूती भगवान आहे' असा अनुभव आला तर तो फलदायी होते. नाहीतर परमार्थचे घेतलेले सोंग वाया जाते. देह हे मृत्यूचे खाद्य आहे हे सहज कळून येण्यासारखे आहे. धीर धरुन परमार्थ शेवटपर्यंत करणाऱ्या भक्तांची देव उपेक्षा करीत नाही. जे तापले आहे त्यास शीतल करावे.(आपण तप्त न होता) असा चंदनास गुण आहे. उत्तम जातीचे माणसे पदार्थ आपले सद्गुण सोडत नाहीत. शत्रू शरण आला त्याने मान पुढे केली ती कापू नये त्याचे रक्षण करावे. तुका म्हणे, यश, किर्ती सन्मान जतन केला तर देवाची प्राप्ती होते. (अ 2330)

158. संसारातील कार्यकारणभाव कधी संपत नाही. एका कार्याची समाप्ती दुसऱ्या कामाचे कारण होते. तृष्णा, श्रम वाढविणे खोटा संग उपयोगी नही. देवाच्या रुपाची आवड नसली की विषयाची हाव वाढत राहते त्यामुळे व्यर्थ त्रास होतो. तुका म्हणे - देहाभिमानाचा आणि संसाराचा त्याग केला आहे. हरिकथा सुखाची समाधी आहे. संसारदु:खाचे भान राहत नाही. (अ 2374)

159. आनंदाचे डोहांत आनंदाच्या लाटा येतात कारण आनंदच अंग आनंदाच असते मला जे सुख मिळाले ते कांहीच्या बाही आहे, मी त्याचे काय वर्णन करु कारण त्याच्या आवडीमुळे संसाराची हाव संपली. पोटीच्या गर्भाचा स्वभाव तेथे प्रकट होतो. तुका म्हणे - माझ्या हृदयात जसा अनुभव आला(ब्रम्हानंदाच्या) तोच माझ्या मुखातून प्रकट झाला. (अ 2398)

160. भगवंताचे नाम हेच प्रमाण मला मान्य आहे. आम्ही वेद उपनिषदाचे हेच सार काढले आहे आणि योग-यागादी साधने वेगळी काढली आहेत. व्दारकाधीश भगवान श्रीकृष्ण पंढरीत आल्याने स्वस्त सहज सोपा झाला आहे. भक्तिरस सर्व रसात गोड आहे. त्याचाच हेवा करा आणि सोस धरा. पंढरीला जाण्यासाठी एक पाऊल खर्च केले तरी प्रपंचाची चिंता राहत नाही आणि हरीप्राप्तीला अडथळा येत नाही. तुका म्हणे - एखादा संचितात कच्चा असेल तर पंढरीत त्याला मोक्ष मिळतो. (अ 2450)

161.साधकाची राहणी उदास असावी आंत बाहेर कोणतीच उपाधी (काम, क्रोध, लोभ, मोह, मत्सर स्त्री पुत्र) नसावी. आसक्ती किंवा हावरेपणा नसावा निद्रेला जिंकावे. भोजन मोजके असावे. एकांती स्त्रियाबरोबर भाषण करु नये. तुका म्हणे - अविद्येची निवृत्ती झाली. अंतर ज्योत प्रकाशमान झाली मी आनंद

अव्दयरुप हरी आहे. असा अपरोक्ष अनुभव मला प्राप्त झाला. तेथील आनंद आता ब्रम्हांण्डात मावत नाही जे निर्गुण होते त्याचे पुंडलिकाच्या भक्तीने मंथन केले तेच साकार होऊन विटेवर उभे आहे. (अ 2069)

162. तुम्ही आपले मन, राग, लोभ, व्देश, मत्सररहित करुन नारायणाचे स्मरण करावे तरच भवसिंधू तराल आणि प्रपंचाचे पाश तुटतील. अंत:करणातील भाव शुध्द असणे हेच खरे परमार्थाचे बीज आहे. पाण्यांत जसे मिठाचा खडा पडताच तदरुप होतो तसे नारायणाचे स्मरणात तदरुप व्हा. तुका म्हणे - मी विष्णूला शरण आलो नामभक्तिचा स्वीकार केला आहे. विष्णु भक्ताचा नाश होत नाही. असे पुराणे गर्जून सांगत आहेत. (अ 2473)

163.भगवंता आता फार चांगले झाले माझी चूक कळून आली. संसार खोटा आहे. या जीवाची संसारात पूर्ण राख झाल्यावर मागाहून त्याला शहाणपण येते तुका म्हणे-जे धर्म मी प्रतिपादन केले ते स्वत:च्या अनुभवाचे आहेत. या धर्माचे अनुष्ठान करणाऱ्यास नामसंकीर्तनाचा अलंकार घालू आणि शुध्द धर्मबीजाची पेरणी करु. रामकृष्ण नांव अत्यंत गोड आहे. (अ 2476)

164.शेवटचा गोड घासाने जेवण चांगले झाले असे म्हणतात शेवटपर्यंत परमार्थ विषयक सद्बुध्दीमध्ये अंतर पडता कामा नये नाही, तर सर्व प्रयत्न व्यर्थ जातात. रहस्य समजून न घेता जो स्वयंपाक (काम) करतो त्याच्या बुध्दीला अवकळा प्राप्त होते. तो मूर्ख ठरतो. देवाच्या रुपात समरस झाल्यामुळे आंता व्दैतभाव उरला नाही काम, क्रोध, मद, मत्सर, अहंकार, निंदा विकार फार वाढले आहेत. त्यांना आवरण्याचे चातुर्य तुझ्याजवळ आहे. तुका महणे माझ्यासारख्या क्षुद्र प्राण्याला तुला अशक्य आहे काय ? (अ 2520)

165. सर्वांना देणारा तो माझ्याजवळ आहे. इंद्राचे पद मागावे ते शाश्वत नाही. स्वर्ग मागावा तर पुण्य संपताच मृत्यूलोकी जन्म घ्यावा लागतो. दीघार्यू अमर व्हावे तर जिवाला स्वभावत: मरण नाही. देवा मी ऐक्यस्थिती मागतो कारण ऐक्याचा कधी नाश होत नाही. पंढरीतील पांडुरंग सर्व देवाचा देव आहे. वेद ज्याचे वर्णन करतात. श्रुति नेति नेति म्हणून माघारी परतात. तुका म्हणे आपले बीजतत्व हेच पांडुरंग स्वरुप आहे. (अ 2522)

166. भगवान शंकर या पंढरी निवासी हरीचे ध्यान करतात. तामसी उपासना वेदबाहय आहे त्याचा अंगारा व्यर्थ आहे. भोळ्या लोकांना भूतबाधा काढतो

म्हणून फसवितात. त्याचा देव तामसी आहे त्याच्यापुढे प्राण्याचा बळी देतात. यांचे जगणे व्यर्थ आहे. अंधारामुळे दिव्याला आणि सोन्याच्या कोंदणाने रत्नाला शोभा आणलेली असते. विष मारक म्हणून सोन्याला मोल चढते तुका म्हणे आम्ही पतित आहोत म्हणून तुझा देवत्वाला शोभा आहे. (अ 2427)

167. आमच्या घरी हरिरुपाच्या वर्णनाची अभंगरुपी शब्दाचीच धन व रत्ने आहेत. लौकिक धन हे शब्दच आमचे शास्त्र आहे त्याचा आम्ही सांभाळ करतो. आम्हांला व्यवहारात आणि परमार्थात जगण्यासाठी शब्द एकमेव उपाय आहे या शब्दानेच आम्ही जगांतील लोकांना ज्ञान भक्ति धन वाटतो. शब्दच देव आहेत. शब्दाच्या गौरवाने आम्ही त्याची पूजा करु विष्णुदास आणि संताच्या दारी ब्रम्हज्ञान घ्या म्हणून येते. परंतु त्याना हरिभक्तिमुळे ब्रम्हज्ञानाची गोडी वाटत नाही. संत त्याला दूर पिटाळतात तुका म्हणे ब्रम्हज्ञान मोठ्या कष्टाने प्राप्त होत नाही. जे कोणी उदास आहेत त्याच्या गळ्यात पडते. (अ 2535)

168. दरिद्री, दुर्बल मनुष्य भाग्यवंताकडे बघून म्हणतो दुसरा कधी दरिद्री होईल ? मूर्ख पंडिताचे सभेत गेला तर पंडिताचा घात केव्हां होईल असे मनांत म्हणतो. अरे तू दुसऱ्याचा व्देष करु नकोस एका देवास शरण जा. ज्यामुळे देवाची प्राप्ती होईल तेच करा. त्यासंबंधी विचार करताना कोणाच्या राग-लोभाची पर्वा काय म्हणून करु तुका म्हणे - व्यवहारातले सुख नाशवंत असून वरपांगी व ढोंगी आहे. (अ 2540)

169. माकाडाला नारळाचे आंतले खोबरे आहे ते समजत नही. पण शहाणे लोक कवटीचा त्याग करुन आंतील खोबरे घेतात. एकाच्या मुखांत रस पडतो. तर एकाच्या तोंडात माती पडते. जयाच्या त्याच्या ज्ञानकर्माप्रमाणे वाटा त्याला मिळतो. दगड भोपळ्याला तारू शकत नाही. भोपळा दगडाला तारु शकतो. तुका म्हणे - मला लोखंडासारखे करुन तुम्ही परिसाप्रमाणे माझे सोने करा (अ 2557)

170. दगडावर डोके आपटले तर डोकेच फुटेल पण दगडास दुःख होणार नाही. अविचाराने विस्तवाला किंवा विंचवाला जवळ घेतल्यास सुख मिळणार का ? विषारी सर्पास प्रेमाने कुरवाळले तर तो आपला स्वभाव सोडणार नाही मूर्ख रुसला ते आकाशाबरोबर अबोला धरण्यासारखे आहे. रुसणाऱ्याचेच नुकसान होईल आमचे नाही. लोकात गोष्टी सांगतो परंतु प्रत्यक्षात आचरणात

आपण नाही व भलतेच करतो, तुका म्हणे भावहीन मनुष्याच्या पदरात शीण येतो. (अ 2592)

171. माझे इंद्रिये परस्परामध्ये भांडण करु लागले हरीचे गुण ऐकून व गाऊन कान आणि जिव्हा तृप्त झाली आहेत हात, पाय कपाळ हे तर पूजा वंदन करण्यासाठी तळमळत आहेत. वाणी हरीचे गुण गात आहे कान हरीचे गुणगान ऐकातात त्यायोगे करुन बाकीचे इंद्रिये सुख मिळत नाही म्हणून खंत करतात, ज्या इंद्रियाचा जो भोग असेल तोच ते इंद्रिय घेईल. भोगून संतुष्ट होऊल. तुका म्हणे - नारायणा आता दर्शन दिल्याशिवाय इंद्रियाचे भांडण मिटायचे नाही. (अ 2593)

172. छळून, बलात्कार करुन चित्तरुपी द्रव्याचे गाठोडे, देवरुपी चोराने पळवून नेले. हा चोररुपी देव घरचाच होता आणि त्याला घरचीच ज्ञानेद्रिंये सहभागी झाली. हा चोर फार काळापासून माझे अंत:करणात लपून बसला होता. देवा मी तुझ्यावर विश्वास ठेवून बसलो होतो. पण तुझे कपट कळाले नाही. तुका म्हणे चित्तरुपी धन माझे हातून नेलेस आणि मला तू उघडे-नागडे केलेस. (अ 2618)

173. चांगल्या बियाची फळेदेखील चांगली असतात आणि ती फळे ही पहिल्या बियासारखी चांगली बीजे आपल्या पोटात धारण करतात. शुध्द वस्तु प्राप्त झाल्याने आत्मा संतुष्ट होतो व चित्त मागे परतण्याचे जाणत नाही. तुका म्हणे मला सत्याची आवड आहे म्हणून मला उतावीळपणा करता येत नाही. तसेच माझ्या ठिकाणी भक्ति प्रेमाचा झरा आहे. (अ 2635)

174. जो संताचा उपहास करतो, देवाच्या अस्तित्वार विश्वास नाही. तो नीच होय. जो शास्त्रातील चार अक्षरे पाठ करुन वाद, छळ करीत असतो, अश्रध्द पुरुष देवास दगडाची मूर्ती मानतो. अभक्ताच्या गावांत साधूची योग्यता कशी कळणार. कसायाच्या गल्लीत बैलाची शपथ घालून काय उपयोग. मोत्याची किंमत भाजी विक्यास काय कळणार. केळी आणि बोरी कितीही एकत्र राहिल्या तरी त्याच्यांत सारखेपणा येईल काय ? तुका म्हणे कडू कारल्याची खीर केली तरी गोड लागेल का ?

175. अलंकार वितळून त्याची सोन्याची लगड तयार केली. अलंकारची नांवे नाहीशी होऊन त्याला सोने हे नाव उरले. आगीत तापून, सुलाखून जे निघाले ते

उत्तम सोने कसाला उतरते. या संसारात काहीही केले तरी समाधान नसते. पुण्यकर्म समजून करायला गेले तर ते पाप घडते. तुका म्हणे - ह्याकरिता पांडुरंग शांतपणे तुझे चिंतन करीत राहणे चांगले आहे.(अ 2744)

176. आपल्या अपेक्षित फळाकडे दृष्टी असल्यानंतर त्यांच्या मनांत भय निर्माण होतच नाही, तो धाडसाने ते फळ प्राप्त करुन घेतो. शूराला रणभूमीवर लढताना मरण प्रापत झाले तर, संतोष वाटतो. कोणतेही चांगले काय शेवटास नेण्यास तळमळ पाहिजे तेथे सामर्थ्याची काय उणीव आहे. ? तुका म्हणे जीव अर्पण करण्याइतके औदार्य असेल तर तेथे मनाचा कमीपणा काय असणार, खोट्या प्रपंचाच्या सहवासाने अंगाला दोषच अधिक लागतात. पाण्यात पडलेल्या प्रतिबिंबावर माकडाने उडी टाकली, काय होणार त्याचे डोक फुटणार (अ 2847)

177. आम्हाला रात्रंदिवस युध्द करण्याचा प्रसंग आहे. देहांत मनाला आवरण्यासाठी त्याच्याशी झगडावे लागते. तर बाह्य जगांत उपद्रवी लोकाबरोबर युध्द करावे लागते. मनापासून पापाचे आणि जगापासून छळाचे फार मोठे आघात जीवावर येऊन पउतात. त्यामुळे त्याचा नित्य प्रतिकार करावा लागतो. तुका म्हणे मी तुझ्या नामाचे सामर्थ्याने सर्वांची तोंडे काळी केली आहेत. (अ 3140)

178. ज्याच्यामुळे मनाला प्रसननता येते त्याची संगत करणे आवडते आणि ज्याच्यामुळे मन अशांत होते त्यांना दूर ठेवणे हेच चांगले. जे सत्य आहे तेच पाळावे अन्यथा असेल ते करु नये. वस्तू पारख करण्याची आपली कसोटी. चांगली असावी त्यामुळे आपली फसवणूक होत नाही. सोने हिणकस असले तरी अग्नीपूढे ते अधिक शुध्द आणि सुशोभित होते खरे लपवून ठेवता येत नाही. खोटे सोंग उघड पडते तुका म्हणे लोकाची निंदा-स्तुती दोन्ही उपयोगी नाही. आपला अंतरातील भाव येतो तोच मुख आहे तोच फळाला येतो.

179. वेदनीती खरी आहे. त्याप्रमाणे आचरण केले असता केले असता आपला उत्कर्ष होतो. श्रवण मनन कीर्तनाने साक्षात्कार होतो. हे पण खरे आहे. ते लोक खरे आहेत त्याच्या ठिकाणी खरी श्रध्दा आहे. कांही लोकाचे संगतीनेशीण, कष्ट वाढतात तर कांहीची संगत केल्याने भजनवृत्ती वाढते. परंतु संगतीने संशय निर्माण होतो. शब्दज्ञानी पंडीताना आपले हित समजत नाही.

त्यांना सहवास आवडत नाही. तुका म्हणे एकांतात राहून भजन करणे आवडते. (अ 3170)

180.तुका म्हणे - जात वर्ण धर्म पाळत नाही. जत-वन वेगळे राहिले नाहींत जेव्हा मी हा देह देवाला अर्पण केला तेव्हांच विश्वात्मक देवाची पूजा झाली. जो सतत करुणा भाकतो त्याला भगवंत कसा दूर राहील. जो देवाला आळवतो त्याला दुसरा आधार लागत नाही. भवसागरांतून तरुन नेतो. विठ्ठलावर भरवसा ठेवून संसारातून वेगळा झालो आहे. माझी विठूमाऊली मला कांही कमी पडू देत नाही. (अ 3173)

181. अनेक भिन्न मताचा अभ्यास केल्याने अनेक प्रक्रिया कळतात. व्याकरण अभ्यासाने शब्द रुपे कळतात आणि पाठांतराने माणसे वाचाळ होतात. यज्ञ, याग, जऩ-तप ध्यान-धारणा या योगाने विठ्ठलाची प्राप्ती होत नाही. चित्ताला प्रपंचाचा विषयी पूर्ण विसर पडतो त्यावेळी विठोबाचे प्रेम निर्माण होते व त्या प्रेमाने विठोबाची प्राप्ती होते. शाब्दिकांना वर्म सांपडत नाही. तो दूर राहतो तंत्रमंत्राने हा अनुभव येत नाही. तुका म्हणे देहाभिमानाचा निरास केल्यानेच हरीचे सुख प्राप्त होते आत्मरुपाने अभेद चिंतनाने त्याशी तद्रुप होता येते. (अ 3254)

182. देवाने मला ब्रम्हसामस्याचा अभिषेक केला, तेव्हां वृत्तीशुन्य स्थिती ज्यात आहे अशी उत्पन्नाची पताका फडकू लागली अनाहताचा डंका वाजू लागला तो ध्वनी चिदाकाशांत दुमदमू लागला तुका म्हणे पांडुरंगाने मला दासाला मोठ्या ऐश्वर्यात, थाटामाटाळ उत्साहाने आणि प्रेमाने आपल्या सामुज्य पदावर बसविले आहे. (अ 3255)

183. प्रवृत्ती आणि निवृत्ती हे दोन्ही भाग वितळवून उत्तम रसायन तयार केले. आत्मसिध्दी प्राप्त व्हावी म्हणून ज्ञानाग्नीने हे रसायन कढ येईपर्यंत तापविले. ब्रम्हरसाचा जो पाक तयार झाला, त्याचा अनुभव घेत सुखाने त्याची चव घेतली. घासाघासाला साधने करुन निजध्यास घेतला. तेथील अनुभवाच्या योगाने मी त्याच्याशी समरस झालो तुका महणे माझ्या ठिकाणचा रोग जाऊन अष्ठांग आरोग्य प्राप्त झाले, निजात्म रंगात मी रंगून सुशोभित झालो.

184. स्वत:ला भगवंतादी ग्रंथाचे पुराणिक म्हणून घेतात त्यात सांगितलेली आचारसंहिता न करता निशिध्द कर्म करतात. कांदे खातात. अगस्तीचे मलमूत्र असलेल्या समुद्राचे मीठ त्या कांद्याला लावून त्यास (कोशिंबीर) असले नांव देता. काद्यांत शंख, चक्र, गदा या आयुधाच्या आकृती आहेत. त्यामुळे तो पवित्र आहे, असे कांदा खाण्याचे समर्थन करतात. ब्राम्हण वर्णन श्रेष्ठ पण त्याचा शुद्र स्त्रीचा सहवास सुटत नाही. तुका म्हणे मी कठोर शब्दानी अधमाचे दांत पाडीत आहे. (अ 3275)




185. माझ्या कुटुंबाचा फार तुमच्यावर घातला आहे. तुका म्हणे प्रपंच-उद्योग मी करीत असताना सर्व काळ तुझे नांव हृदयांत धरीन. एक ब्रम्हचारी कामवासने आतुर होऊन गाढवीणीच्या मागे लागला. त्याला लाथ मारून गाढवी पळून गेली. त्यायोगे नैष्ठिक ब्रम्हचार्य गेले आणि गाढवहि गेले समाजात तोंड काळे झाले तुका म्हणे स्वार्थ नापरमार्थ असे हे ब्रम्हचार्य वाया गेले.(अ 3278 वैचारिक अभंग संचळे)

186. देवा मला ब्रम्हज्ञान नको, मीच देव या भावनेने राहले नको- मी भक्त तू देव असा व्दैच भाव राहू दे तूझे सुख रुप दाखव तुझ्या चरणावर माथा ठेवू दे मी तुझे श्रीमुख पाहिन, माझा जीव तुझ्यावरून लिंबलोन म्हनून उतरून टाकीन एकातांत बसून तूला अलिंगन देईन, तुझ्याबरोबर सुखाच्या गोष्टी सांगेन तुका म्हणे - देवा माझी भावना जानून असे करण्यास विलंब लावू नकोस. (अ 3308)

187. श्री ज्ञानेश्वर माहराज- तुका म्हणे - ज्ञानदेवाच्या ठिकाणी मोठा समुदाय व्हावा, तेथे मी येऊन त्याच्या पायांना वंदन करीन. आपण ज्ञानी लोकांचे राजे, श्रेष्ठ गुरु आहात. तुम्हास ज्ञानदेव म्हणतात, मला पामराला मोठेपण कशाला देता ? मी तुमच्या पायातील वाहाण होऊन राहणे बरे, ब्रम्हादिक देव जेथे तुमच्या सेवा करण्याकरिता येतात. तुमच्या ज्ञानसामर्थ्याची खोली मी अजमावू शकत नाही. आपल्या चरणी नतमस्तक होत आहे. महाराज आपण सिध्द आहात. मी अधिकाराचा विचार न करता बोललो त्या माझ्या अपराधाची क्षमा करा. या दासाला जवळ ठेवा व त्याचे रक्षण करा. (अ 3373)

188.श्री ज्ञानेश्वर महाराज - तुका म्हणे - ज्ञानदेवाच्या दारांत सोन्याचा पिंपळ आहे. त्या ज्ञानदेवांच्या जवळ एवढे प्रचंड सामर्थ्य आहे की ते रेड्याच्या मुखांतून वेद वदवू शकतात. त्यांनी मोक्षाचे अन्नछत्र घातले व वैष्णवाचा संघ एकत्र केला. ज्ञानदेवीजवळ काय कमी आहे ? मनांत आणले तर काय करु शकणार नाही ? सर्व सुख त्याच्या चरणी लोळत आहेत साधका तू त्याच्या जवळच राहा. (अ 3379)

189. शिवाजी महाराजास - तुका महणे - हे शिवराया तुम्ही आम्हाला असा कोणता ठेवा दिला आहे. कारण आम्हाला याची गरज नाही. आम्हाला विठ्ठलच पाहिजे आहे. तुम्ही उदार आहात तुमचे उदारपण चांगले दिसून आले. आम्हाला तुमचे धन गोमांसासारखे त्याज्य आहे. तुम्ही तोंडाने केवळ विठ्ठल म्हणा. म्हणजे आम्ही सुखी होऊ. तुमचे इतर धन संपत्ती सर्व मला मातीसारखे आहे. गळ्यांत तुळशीमाळा मिरवा आणि एकादशी व्रत करा. (अ 3395)

190.मंबाजीने तुकोबास मारले असताना - तुका म्हणे विठ्ठला, तू फार चांगले केलेस. माझ्यातील सहनशीलतेचा अंत पाहिलास. मुंबाजीकडून मला काठ्या-लाठ्या मार दिलास. ज्याला कांही लागतच नाही अशी शिवीगाळ त्याने

मला केली. माझी विटंबना केली. पण तू मात्र क्रोधाच्या तडाख्यातून सोडवलेस, राग येवू दिला नाहीस, मुंबाजीने मला दूर नेऊन मारले. जे व्हावयाचे होते ते होऊन गेले आता खंत कशाला करु ? सख्या रुक्मिणीकांता मला या त्रासातून सोडवा. (अ 3425)

191. देवानी वह्या रक्षण केल्या - तुका म्हणे - देवा, माझ्याकडून मोठा अन्याय घडला. लोक म्हणलो परिश्रम केलेल्या वह्या बुडविल्या. ह्याने संसारही बुडविला. माझी चित्तवृत्ती क्षुब्ध झाली. मी तुमची परीक्षा घेतली. तेरा दिवस इंद्रायणी काठी उपवास केला. मी हीन जातीचा आहे. मला अधिकार नाही. असे असताना तुम्ही तहानभुक निवारण्यांतही कष्ट दिले. त्यामुळे आमचा योगक्षेमाचा भारही तुमच्यावर घतला. आपण वह्या पाण्यामध्ये कोरडया स्थितीत ठेवून त्याचे रक्षण केलेस व लोकापवाद दूर करुन, आपले दीनवत्सल ब्रीद सार्थ केलेस. (अ 3523)

192. निर्याणाचे अभंग -तुका म्हणे - मन तुमच्या वाटेकडे एकाग्रतेने पाहत आहे. कोणासही माहेराचा वृत्तांत विचारीत आहे. या जन्मातील अनुभवावरुन मनाला असे कळून आले की पांडुरंग आणि मी आमच्यांत एकजीव, एकच चैतन्य आहे. म्हणून त्याना माझी दया असली पाहिजे. भूकच भुकेला खाऊन तृप्त झाली आहे. आतां अन्नाविषयी वासना राहिली नाही. मला देवाचे सगुण-निगुर्ण रुपाचे दर्शन सुख झाले, आता खरोखर हरी इकडे येताना दिसत आहे. त्याच्या हातात शंख, चक्र शोभत आहे. गरुडाच्या पंखाचा फडत्कार ऐकू येत आहे. त्यावर चार हस्त असून गळ्यांत वैजंयतीमाळ आहे. पितांबर तेजाने झळकत आहे. तो वैकुंठपीठाधीस माझ्या घरी पाहून मी संतुष्ट झालो आहे. (अ 3606)

193. सत्वर शुध्द भाव ठेवा, मोक्ष प्राप्तीचा कंटाळा करु नका आपण स्वत:च बध्द आहोत की मुक्त आहोत हे अनुभवाने ठरवा. प्रत्येक वेळी कृष्णाचे चिंतन करा. तुमचा जय होऊन त्याचे दर्शन होईल. हरिनामाचा घोष करण्यांत भक्ती रसांत मोठा आनंद आहे. तो भाग्यवान आहे. त्याच्या वाट्याला हा आनंद येईल. त्यासाठी अनेक जन्माची पूर्वपूण्याई लागाते. नाम-छंदात नाचा. संकोच नको - तुका म्हणे - हरीचे सगुण दर्शनाचे सुख अंत:करणांत ठसेल. (अ 3699)

194. प्रपंचाशी फुगडी खेळशील तर जरावस्थेत तुझे हात पाय शिथिल होतील. तुझ्याखाली भागास काम क्रोधाची माती लागेल. हे पोरी, पंचप्राण, पंचज्ञानेंद्रिये, मन-बुध्दी या साता, पांचाना जिंकल्याशिवाय तू माझ्या बरोबरीच्या पारमार्थिक फुगडीमध्ये काय टिकणार आहेस ? प्रपंची फुगडी खेळताना दम संपला आहे. पाय पांगळे झाले आहेत. तुझी वाईट अवस्था झाली आहे. तुका म्हणे - अगं ए गधडे अजून तरी मी सांगतो त्याप्रमाणे करा. (अ 3707)

195. कांडण - हे साजणी कांडण करताना समत्वाचा एक घाळ म्हणजे मी तुला मिळेल. स्थूल देहाला पाखडून आत्म्याहून वेगळे कर. नंतर लिंगदेहाला निवड त्यानंतर कारण देहाला मात्र ‘मी ब्रम्ह आहे’ अशी वृत्तीदेखील शिल्लक न ठेवता चांगल्या पध्दतीने सडून टाक. सखे कांडण संपले आहे. आता ब्रम्हरसाचा स्वयंपाक कर, त्यात प्रेमरुपी दुध आणि भक्तिरुपी साखर मिसळून पक्वाने तयार कर, उध्दव व अक्रुर हे दोन भाऊ जेवणास येणार आहे. बाप नारायण त्याच्या सोबत आहेच तुका म्हणे - मला माहेरची फार आवड आहे. (अ 3711)

196. कांडण - आहो नारायण. ओवी गा आणि कांडण करा त्यांतील अनात्मरुपी भूस आणि आत्मरुपी सार कण याची स्वत: निवड करा. विवेकाचे मुसळ घट्ट धर. मन बुध्दी स्थिर करुन वैराग्याचे सतत घाव घाला. अनाहत नादाची कंकणे वाजत आहेत त्या तंद्रीत माहेराला गाणे म्हणत जाऊ. तुझा माझापणा बाजूला राहील तोपर्यंत हे कांडण कांडताना शीण होणार नाही. तुका महणे - ज्याप्रमाणे आपले रुप आरशांत उमटते. त्याप्रमाे या कांडण्याबरोबर पाकसिध्दी झाली. (3712)

197. आई-बाप अथवा बंधु-मित्र शेवट झाला नाही तोवरच उपयोगी पडतील. गोपाळ व कृष्ण खेळत असताना चेंडू यमुनेत पडला. तेथे डोह मोठा होता. कृष्णाने चेंडू आणण्यासाठी डोहांत उडी घेतली. अकस्मांत डोहातून कालीया सर्प बाहेर आला. कृष्ण कालिया युध्द झाले. कालियाला पायाखाली तुडवले चेंडू हातांत घेऊन कालियावर कृष्ण बसले. चेंडू आपल्या गोपाळांना दिला. सर्व आनंदीत झाले. तुका म्हणे देवाला माय-बाप, परके लोक असा भेदभाव नाही त्याला सर्व सारखेच आहेत. (अ 3882)

198. साधकाना भवसागारांतून तरुन जाण्यासाठी रामकृष्ण हा मंत्र सर्वात उत्तम आहे. देवाने भक्तासाठी गर्भवासाचे फेरे सोसले. दैत्यांच्या नाशकरिता हातांत शस्त्र धारण केले. शस्त्रांचे भार वागविले. नारायण आपल्या भक्तांना काळाच्या स्वाधीन करीत नाही. जो पर्यंत भक्ताच्या मनांत मी भक्त तू देव असा भेदभाव होता, तोपर्यंत त्यांना सगुणरुप झाले. भेदभाव जाताच भक्त देव झाले त्याच्यांत तत्वत: भेद राहिला नाही. तुका म्हणे -नारायण निजधामाला जाताना कोणालाही नेण्याचे विसरला नाही तो आमच्यासह वैकुंठास गेला. (अ 3932)

199. तुका म्हणे - मी स्वप्नात असताना विठ्ठला बरोबर नामदेव आले आणि त्यांनी मला जागे केले. अभंग रचना करण्याचे कार्य कर. उगाच काही अडचण सांगू नकोस असे त्यांनी मला सांगितले. अभंगाच्या संख्येचा निर्देशही दिला होता. पांडुरंगाने मला सावध केले. सर्व अभंगाची संख्या शंभर कोटी सांगितली होती. आणि नामदेवाकडून रचलेले अभंग सोडून जे करावयाचे शिल्लक उरले ते रचण्याचे काम मी पूर्ण केले. (अ 3937)

200. तुका म्हणे नारायण माझ्या भागाला आला हा माझ्या प्रारब्धाचा परिणाम आहे. भ्रमात पडलेले जीव विविध मार्गांनी चालतात, पण विठ्ठलाचे प्रवेशव्दार एकच आहे. विठ्ठलाची पावले अंत:करणांत धरावीत हे मुख्य सार आहे. त्यास कधीही विसरु नये. कलियुगांत सर्वांना तारण्याचे, जगण्याचे हेच साधन आहे असे म्हणून गुरु करुन कान फुंकून घेणे वैगेरे कांही नको. हे पाय सर्व जगाच्या विस्ताराचे मूळ बीज आहे. येथे सर्व इच्छा पूर्ण होतात. (अ 3948)

### 3. नामस्मरण भजन, कीर्तन, संचित

201. तुका म्हणे - माझी निंदा वा स्तुती करो. मला त्याचे काहीं नाही या भ्रामक कल्पनापासून मी वेगळा आहे. प्रारब्धामुळे होणारी सुखदु:खे ठीक आहेत. ती माझीच न मानता संचितामुळे प्राप्त होतात असे मी मानले (अ 23)

202.विचारपूर्वक विषयभोग भोगिले असता त्याग होतो व अविचाराने विषयभोगाचा त्याग केला असता तो त्याग न घडता भोग घडतो, कारण ज्यामुळे देव भक्तामध्ये अंतर येते ती चांगली असली तरी ते पापच आहे. चित्तातील खोट्या संकल्पाचा नाश करा. एखादी गोष्ट अविधीने करणे वाईट आहे. चांगल्या, शुध्द विचाराने भिडेचा त्याग करण्यात लाभ आहे. (अ 68)

203. कठोर तपश्चर्या, अग्नि, देह अर्पण या मार्गाला आम्ही कधीही जाणार नाही. आम्हांस एका भगवंताच्या भजनावाचून इतर छंद निंद्य आहेत. कोणतीही गोष्ट परिणामकारी होण्यासाठी अपार कष्ट घ्यावे लागतात. यांत थोडी चूकले तरी सर्वनाश होतो. संताच्या संगतीने परमार्थ तर घडेल त्याच्या पंगतीने सात्विक भोजन मिळेल.(अ 218)

204. कंबरेस घट्ट कांचा मारुन कळिकाळाच्या मस्तकारवर पाय ठेवून मी स्थिर उभा आहे व भवसारगर पार करण्यासाठी नामसाधनेची सोपी वाट तयार केली आहे. तुम्ही लहान थोर कोणत्याही जातीचे असो सर्वांनी शंका चिंता, काळजी न करता नामसाधनेच्या मार्गाने जा. हा शिक्का मी वैकुंठावरुन आणला आहे. (अ 221)

205. सामान्य माणूस स्वैराचारी झाला आहे. आड मार्गास गेला आहे. ऋषी मुनी संताचा परमार्थ मार्गाचा अवलंब करु. कळिकाळाला भीती वाटेल असा सर्वजण हरिनामाचा मार्ग स्विकारा सर्व शक्तिमान भगवंताचे सेवक पाईक झाल्याने आम्ही शक्तिमान झाले आहोत. जन, द्रव्य, शरीर, तृणसमान करुन टाकले आहे. आम्ही मुक्तिच्या शिखरावर आहोत. (अ 223)

206. नामसाधनेत आम्ही समाधानी आहोत, तुमचे ब्रम्हज्ञान आम्हांस नको तर सगुण दर्शन पुरेसे आहे. कमलांतील सुगंध भमरच जाणतो. तुझ्या नामातील गोडी, जादू तुम्हास माहीत नाही. त्याचे रहस्य आम्हीच जाणतो. गायच्या दुधाची गोडी गाईस नसून तिच्या पाडसास आहे. ज्याची कमाई त्याच्या कामास येत नाही. तुझे चरणसुख आम्हीच लक्ष्मीच जाणतो. (अ 234)

207. भाव म्हणजेच देव, देहांत अखंड भगवंताची वस्ती ठेवावी हे उत्तम, जेवताना, चालताना, झोपले असतां देवाची संगत घडेल. जो भगवंताची निष्काम श्रध्दायुक्त आणि निर्दंभ खरी सेवा करितो त्याच्या जीवाला भय कसले ? नामसाधना सर्वात चांगली आहे. (अ 291)

208.कामक्रोधदी विकार नाहीसे करुन मनाचे मुंडन केले. प्रपंच करण्याचे पापासाठी हरिनामाचेप्रायश्चित घेतले. अहंकाराचा दोष काढला नाम संकीर्तनने सर्व दोष जातात. (अ 291)

209.नामामुळे भाव बंधने तुटतात. कीर्ती होते. नामस्मरण करणारा भोळा असला तरी कळिकाळाला जिंकण्याचे तंत्र त्याला माहित असते. त्याच्या

सत्यतेबदल विकल्प निर्माण झाला तर भाव उडतो. देवाचे चिंतन हेच सर्वांत उत्तम आहे. देवाचे ध्यासाने मन व्यापून जाणे यास मनच कारण आहे. (अ 336)

210. देवाचे प्रेम हृदयांत नसुदे वाणीमध्ये नामस्मरण असावे. विठोबाच्या नामामुळे भवरोगाचा, संचित कर्माने होणाऱ्या भोगाचाही नाश होते. विविध तापही नष्ट होतात. नाम घेणाऱ्या भक्तांची माया दासी होते. भ्रम नष्ट होतात. (अ 344)

211.सेवेत शुध्द प्रेमाभावाची आवश्यकता आहे. इंद्रियनिग्रह न केल्यास प्रदीर्घ तपाची याताहात होते धर्मपालनासाठी सत्वगुण आवश्यक आहे. लहान, मोठा भेद भूतदयेला बाधक आहे. भक्ताने नामस्मरणात तल्लीन राहते व देवाने भक्तांची सर्व कामे करावीत विठ्ठल भोळा आहे. कृपाळू आहे. (अ 348)

212.देव घ्या, देव घ्या. कोणी विकत घेत नाही. कारण देव साठविण्यासाठी अंत:करणात जागा नाही. सर्व विषयानी भरलेली आहे. शेवटी फुकट देव देण्यास कोणी तयार नाही. मोक्ष ज्ञानाव्दारे कठीण देहाभिमान दूर करुन अभिमानाचा नाश करणेची साधना आहे परमार्थ गुह्य भजन केल्याने सांपडते. (अ 608)

213.दुध, दही, लाभासाठी गाई म्हशीचे पालन करतात कारण तुपाची प्राप्ती व्हावी म्हणून भक्तानी हृदयामध्ये राम साठविला आहे. लोखंड, गारगोटी आणि कापसाच्या साहय्याने अग्नी पडण्यास उपयुक्त असल्याने त्या संग्रही ठेवतात. तुका म्हणे भाविक नामस्मरणाने सुख प्राप्त करुन घेतात. नामस्मरणाचा अधिकार सर्वास आहे. (अ 669)

214. तुझ्या नामस्मरणामुळे तुझ्या सहवासात राहण्याऱ्याचा उध्दार होईल. तुला परोपकाराचे पुण्य लाभेल. इहलोकात प्रतिष्ठा वाढेल तुका म्हणे प्रथम संसार छंदाचा त्याग कर म्हणजे तुला परमानंद प्राप्त होईल. (अ 670)

215. स्वादिष्ट पदार्थाची रुची जिभेच्या अग्रभागी असते. पोट भरल्यावर पदार्थाची रुची कळत नाही इंद्रियाचे भोग देखील चिरंतन स्वरुपाने जवळ राहत नाहीत. ते अनित्य आहे. नाशवंत प्रंपचाकरता तू देवापासून दूर का जातोस. आपल्या देहावर विठ्ठल नामाचा अलंकार धारण कर तू विठ्ठलस्वरुप होशील. (अ 672)

216.देवाच्या नामस्मरणाची ज्याला प्रीती आहे तो देवच आहे असे जाणा जा नाम जप करतो त्यास मुक्त होण्यासाठी अन्य साधनाची जरुरी नाही देवाची प्राप्ती होण्यास अधर्म घडत असला तर तो करावा परंतु ज्यामुळे देव दुरावतो असे कर्म करु नये. (अ 660)

217. तुम्ही 'माझा' 'मीपणाचा' अभिमान जाळा. नाहीतर तो घात करील. सेवन केलेले अन्न पचले तरच ते देहास उपयोगी होते ओकले तर निरोगी देहास पीडा होते. ज्ञानाभिमानामुळेपरमार्थाचे नुकसान होते. मिळविलेल्या संपत्तीचा उपभोग घेणे हितकारक नाहीतर मृत्यूनंतर तिचा काय उपयोग. तुका म्हणे मी सेवक अडाणी बरा माझा उध्दार करा. (अ 690)

218.एखादा मेला तर त्यासाठी रडणारा तोही मरतो. या खोट्या संसारात मी आणि माझे काय ? संसाराकडे मत न देता हरिनाम घेतले तर सर्व काही लाभ होईल. तुका म्हणे देहाविषयी आसक्ती वासनेचा संग मला आवडत नाही. मनापासून तिटकारा आहे यामुळे देव दुरावतो, दु:ख वाढते. ( अ 696)

219. मी मान, दंभ, वृत्ती थुंकून टाकून कीर्तन करतो. मी खऱ्या अर्थाने दे, द्रव्य पुत्र धर्मपत्नी यापासून तत्वत: आत्मरुपाने वेगळा झालो आहे. देवाच्या चिंतनाविषयी निष्काळजीपणा दाखविल्यास देव अंतरतो. तुका म्हणे मी देवावाचून सर्व वैभव कनिष्ठ मानतो. (अ 769)

220. हरिनाम घेण्यामुळे मन शांत होते. नाम घेतल्याने भोजन झाल्यासारखे आहे. वासना नष्ट होतात. पळापळाने आयुष्य वाढत जात आहे म्हणून हरीचिंतनाची त्वरा केली पाहिजे तुका म्हणे नाम वाणीला सांपडले त्यामुळे भक्ति सुखाला ब्रम्हसुख भेटावयास आले. आनंदास सीमा नाही. हरीनामाविषयी उदास राहू नका. आळस हिताच्या आड येतो. (अ 832)

221. देवाचे भजन करण्यावाचून या शरीरास दुसरे काय काय आहे. नारायणास हाक देइन त्यामुळे संसार बंधनात पडणार नाही. माझा पंढरीचा राजा धावून आलेला आहे. त्याच्याच मुळे सुखदु:ख भोगतो. उत्तम मनुष्य देह मिळालेला आहे. नाम घेण्यासाठी देश, काळ याचे बंधन नाही. हरी चिंतनाने शरीर शुध्द होते. शरीर देवाचे निवास स्थान होते. (अ 864)

222. देवा भक्तिसुखाचा अनुभव आला नाही तोपर्यत ब्रम्हज्ञान घेऊन काय करु ? शुध्द ओव्याव्दारा मी विठ्ठलाची पूजा करत आहे. जग काळाने

ग्रासले आहे. हरीचे नामच काळाच्या हातून सुटलेले आहे. संसारातील सर्व लोक पाप पुण्याच्या कर्जापायी जन्म मृत्यूच्या कारागृहात ओढली आहेत ते देवाला भजतील तर त्याची बंधने सुटतील. (अ 872)

223. दया, क्षमा, शांती तेथे देवाची वस्ती. नाम घेतल्याने देवाची पूजा होते व देवाची भेटही होते. देहादिकाविषयी जो अनासक्त आहे त्याचे ब्रम्हज्ञान खरे असते भक्ताचे महत्व भक्तच जाणतात इतरांना ती स्थिती कळणार नाही. हरीचिंतनात जो काळ जातो तो शुभ काळ होय. देव आणि भक्त यामध्ये भेद दाखविला आहे पण वस्तुत: दोघेही एकच आहेत. (अ 895)

224. आदिनाथाचे मुखामध्ये तुझे नाम हाच श्रेष्ठ मंत्र पठण करतात. यात सर्वांचे सार आहे. वेदानी सांगितलेली सर्व कर्मे एका तुझ्या नामसाधनेमुळे सफळ होतात. राजा परिक्षिताचा मृत्यू नामसाधनेमुळे दूर झाला. वाल्मिकी राम नामामुळे कोळीचा ऋषि झाला. वेद सगुण व निर्गुण दोन रुपे मानतात पण तुमच्या नांवामध्ये कोणताही भेद नाही. (अ 903)

225. श्रुतीला देखील निर्गुनाचे रुप कळाले नाही ते आम्हास नामस्मरणाने सांपडले. भगवंताच्या कृपेने हाच देवाचा देवाचा प्रसाद आहे ह्या आनंदाने आनंदच वाढवावा. दिलेला शब्द, वचन बलणारे लोक अधम होय. अशा प्रकारचा नारायण नाही. नारायणाने माझ्या अंगीदार केला. संसार देवाचे कृपेने पूर्ण झाला आता आम्ही त्याचीच कीर्ती गावू दुसरे संकल्प करणार नाही. (अ 925)

226. तुका म्हणे मी पोकळ संन्यासी नाही खरा क्षेत्रधारी संन्यासी आहे. कर्मकांड, उपासनाकांड ज्ञानकांड हे वेदविभाग आहेत. त्यांतील चांगले विभाग तेच मी निवडून घेतो जसेदह्यांतून लोणी बाहेर काढतात तसा वेदाचा अस्सल भाग मी निवडून घेतो. आम्ही जसे आहोत तसे तुमचेच शरणागत म्हणवितो, देह नाशवंत आहे नामसाधनेने असंख्य लोक तरले अहेत नामासारखे साधन नाही. रामनाम वेदाहून श्रेष्ठ आहे ते अनायासे फुकट मिळते. (अ 935)

227. कलियुगात भगवंताचे नाम गाणे, आवडीने नाचणे आणि टाळी वाजविणे. ही भगवंत प्राप्तीची उत्तम सोपी साधने आहेत. नामरुपी नौकेत बसून भवसागर तरुन असंख्य लोक गेले आहेत. विठोबाचे नाम घेणाऱ्यास अल्प साधनांचे सायास करण्याचे कारण नाही. तुका म्हणे अखेरीस सकंट काळी हरीचे

नाम हेच एक खरे निर्वाणीचे शस्त्र आहे. ढोंगी भक्तास माळा, मुद्रा धारण करण्याने देव प्राप्त होणार नाही. (अ 960)

228. ज्या मनावर वासना विकार होतात. मन हरी चरणी लीन झाले असल्याने वासनेला आश्रयासाठी जागा नाही. रामकृष्ण नामाचा निरंतर उच्चार करा. तुमच्यातील पापाचा पूर्ण नाश होईल. अभ्यासाने मनास छंद लावा ब्रम्हरसासकधीही नाश नाही. जन्मप्रत्याची फेर चुकतील परमार्थी व्यक्तिस व्यवहारी नाते जोडू नये. परमार्थात मुलासही लहान समजू नये. त्याची अवहेलना करु नये. भक्तिज्ञानाच्या योगाने त्याचा अधिकार वाढलेला असतो. (अ 977)

229. जो उभा राहून नामसंकीर्तन करतो. त्याचे पुढे गोविंद अनेक छंदानी नाचतो. तर बसून नाम साधना व कीर्तन करीत असता प्रेमाने डोलतो. मार्गाने जात असता तोंडाने नामोच्चार होत असेल तर चक्रपाणी हरी मागेपुढे रक्षण करण्याकरिता सज्ज असतो. हरीच्या नामाच्या सुखापुढे रिध्दी सिध्दी तुच्छ आहेत तर संसाराला कोण किंमत देतो. (अ 1033)

230. समाजात पापी, पवित्र, शहाणा, मूर्ख आम्ही त्याच्या अवगुणाकडे लक्ष्य देत नाही. सर्व भूते तुझी रुपे आहेत. त्यामुळे मी त्याना वंदन करीत. यथायोग्य सेवा करीत. मला भक्तिची गरज आहे. हा दगड, सोने, लहान मोठा भेद जाणीत नाही. तुझ्यासाठी विषही अमृत म्हणून घेईन. तुझयासंबंधी ज्ञानाची इच्छा नाही विवेक वैराग्य जाणत नाही. माझा उध्दार तुझ्यावरच आहे. हरीनामावाचून माझ्या मनात काही नाही. 'हरी हरी' म्हणत आहे. (अ 1089)

231. यत्नामुळे परत नवीन शरीर प्राप्त होते विषयानी बांधून टाकले आहे. सकाम कर्मे करा, फळाची इच्छा न करता तीर्थव्रते करा. मुक्ति मिळवा. एका हरीनामाने संध्या, जप, तप अनुष्ठानाचे पुण्य मिळते. ते नाम फुकटचे आहे. नामचिंतन सदादीत, श्रध्दापूर्वक केले तर देव जवळ येऊन राहतो. भावार्थाने राम नामाचा महिमा अगाध आहे. (अ 1126)

232. दुष्टांना उपदेश म्हणजे पालथ्या घागरीवर पाणी घालण्याप्रमाणे होय. त्याची संगती न करणेच चांगले होय. हे केशवा ते उदक तुमचे स्वरुप आहे पुष्पाचा सुगंध तूच आहे. फळ, तांदुळ, अक्षता ही तुझीच स्वरुपे आहेत आणि त्याचा दाता तूच आहे. दक्षिणा धातू नारायण आणि नैवेध अन्न, ब्रम्हरुप तूच

आहे. ही सर्व पूजा केवळ 'रामकृष्ण हरी' या नामात आहे हेच भांडवल माझे आहे. (अ 1128)

233. ज्योतिषी भूत, भविष्य आणि वर्तमान जाणतात. तरी संचित कर्मापासून होणारे दु:ख त्याना टाळता येत नाही. कारण तो देखील कर्मभोगाचा दास आहे. त्याचा देह भोगाधीन आहे. पण त्याने देखील वाणीने देवाचे नाव घेतले तर त्याच्या कर्मभोगाचा नाश होतो. तपस्वी लोकांना देखील कर्मभोग चुकत नाही. तुका म्हणे आम्ही आमच्या दुकानांतून हरिनामाची संपत्ती देवू. (अ 1146)

234. वेदाचे ठिकाणी जाणिवेचा अहंभाव आहे आणि ओकाराचे मुळस्थान मायेने व्यापले आहे. म्हणून तेथे श्रध्दा बसत नाही. सर्व काबाडकष्ट टाकून मी विश्वासने नामास कंठी धरले. तुमची सेवा करण्यास सर्वकाळ जन्म द्या. प्रपंचाला बळी देऊन विठ्ठलास प्राप्त केले आहे. काम, क्रोध, मद, मत्सर, दंभ, अहंकार सहा दुर्जनास खूप मार दिला आहे. नाम घेणारा प्रारंभी महापातकी, पतित असला तरीसुध्दा तत्काळ कल्याण होते. (अ 1176)

235. तुम्ही बसले असता, विश्रांती घेत असता नारायणाचे चिंतन करा. जेवत असता इतर भोग भोगीत असता 'नारायण नारायण' म्हणा. कोणत्याही जातीचे असा स्त्री किंवा पुरुष असो एकाचित्ताने नारायणाचे गुण ऐकावेत. तुमच्या दोघांत शरीरात उपाधी भिन्न असली तरी तरी तुम्हा दोघांची रुपे एकच होईल. या करिता एक चित्ताने हरीचे भजन करा. (अ 1233)

236.नामबीजापासून पापनिवृत्ती,पुण्यप्राप्ती, चित्तशुध्दी संतसंगती आत्मत्वाने हरीचा साक्षात्कार असा विस्तार होऊन नामाचे फळ प्रापत होते व मधला विस्तार नष्ट होतो. सुखाचे पेठेत परमार्थ दुकान मांडले त्यात नामरुपी माल ठेविला आहे. हे नाम सुखदायी विनामोल मिळणारे असून सर्वांचे सार उच्चप्रतीचे आहे. भवसिंधु पार करण्याचे सुलभ साधन आहे. यात खोटेपणा नाही. त्यामुळे घातपात होणार नाही. हा माल घेण्यासाठी शुध्दचित्त आवश्यक आहे. (अ 1319)

237.पाऊस सर्वत्र सारख पडतो, परंतु प्रत्येकाचे दैवानुसार जमिनीत पीक येते. जसे बीज पेरावे फळ तसे प्रापत होते. लाभ हानी प्रारब्धानुसार होते. दिव्याच्या अंगी मालक चोर, सज्जन साठी वेगवेगळा भाव नसतो. सर्वास सारखाच प्रकाश देतो. कावळे मेलेल्याचे मांस खातात. तितिर पक्षी खडे खातात, राजहंस

मोत्याचा चारा खातो. जशी आवड तसे नारायण देतो. जयांनी रामनामाचा विश्वास धरला त्याचे संसारपाश देवानी तोडले. भाविकाने नामसंकिर्तन करुन कळिकाळास नम्रपणे ठेंगणे केले. (अ 1322)

238. एकाचे पाहून दुसरा गुरु करतो खरे मर्म कोणास कळत नाही. वेद, शास्त्र, कला सर्वकाही शिकता येते. भगवंताविषयी प्रेम निर्माण होणे कोणाच्या हाती नाही जे भक्त पंढरीनाथास शरण गेले ते भाग्यवान होत. पंढरीनाथाच्या नामाने पूर्वी पुष्कळ भक्त तरले. भविष्यासतही तरतील. भोळ्या भाविकांना नाम संकिर्तन हे एक भोग. मोक्ष प्राप्त होण्याचे पवित्र क्षेत्र आहे. देव नाही म्हणतात त्याना देव दूर आहे. जे आहे म्हणतात त्याच्या अंतर्यामी साक्षीभूत देव जवळ आहे. (अ 1424)

239. ज्याच्या पायात चप्पल नाही परंतु राजाशी वैर करतो त्याच्या कर्तव्याला आग लागो. विठ्ठल नगरीत दु:खाच्या बदली सुख मिळते तेथे अनाथाचे द्रारिद्रय भूक नष्ट होते. ज्याच्या अंत:करणांत एकनिष्ठा भाव आहे असे भोळे लोक भगवंतास आवडतात देवा तुझे नाम उच्चारताना अशुध्द अबध्द याचा विचार करीत नाही. मनाला चांगला काळ स्थळ असावे लागत नाही. वेदाचे पंडिताचे आम्हास भय नाही कारण नाम सर्वतोपरी निर्दोषच आहे. हरी जो वेदाना कळत नाही त्याचे सुलभ रीतीने ज्ञान होइल, अशी नावे त्या अनंताला ठेवू. (अ 1431)

240. भविष्यात माझ्या कल्याणाचा उपाय म्हणून तू मला नामसाधना दिली आहेस. त्याचे पुढे क्षेम असू दे. नाम हेच परमार्थ मुक्तिचे मूळ आहे. तेच भक्तिचे बीज आहे तसे फळही आहे. धनच धनाचे जतन करते वाढविते. पांडुरंगा तुला आळवू लागले की गोडी उत्पन्न होते, तुझी खरी जोड होते. भोजन तृप्ती ढेकर आल्याचे कळते. तुकोबाराय म्हणतात. एकदा तृप्ती झाली तर समाधानच समाधान. (अ 1472)

241. भगवंताचे नाम घेतले असता कंठ, शरीर शीतल होते. इंद्रियाना आपल्या व्यवहाराचा विसर पडतो. भगवंताचे नाम गोड आहे. अमृतापेक्षा श्रेष्ठ आहे. माझ्या अंत:करणाने नामात रस घेतला. माझे शरीर नामाने पुष्ट, तेजस्वी झाले आहे. नामाने विविध ताप नष्ट होतात, हीत होते. सेवा, गुरुभक्ति, वडिलाची आज्ञा विष्णूची महापूजा, खरे बोलणे, दुसऱ्याच्या दु:खांत सहभागी होणे. सेवेच्या मागे निश्चयाचे बळ असले म्हणजे त्याप्रमाणे फळ प्राप्त होते. माझे चित्र

तुला दिल्यावर तू मला काय देणार ? मला रिध्दीसिध्दी, मोक्षाची गरज नाही. मला तुझ्या भक्तिविषयी प्रेम दे फक्त. (अ 1545)

242. डोळ्यांत एक रज कण देखील सहन होत नाही. त्याप्रमाणे तुम्ही आपले हित साधा. अनेक विषय वासनामुळे मन बाटवू नका. मोक्ष मिळविण्यासाठी संन्यास घेण्याची, भस्म लावण्याची दंड हातात घेण्याची गरज नाही. तीर्थयात्रा करण्याची गरज नाही. तुका म्हणे नाम साधनेने पापादिकाची निवृत्ती झाल्यामुळे देवाच्या सगुण रुपाची भेट होण्यास व आत्मत्वाने ज्ञान होण्यास कोणतीही अडचण राहत नाही. (अ 1578)

243.मुखातून हरीनाम येत नसेल तर धनसंपत्ती उत्तम कुळ जळोन जावो. मला कितीही दारिद्रय आले तरी चालेल पण अंत:करणात पांडुरंग राहो. आता यापुढे मी स्त्री, पुत्र, देहाला माझे म्हणणार नाही. तूच मला तारणारा आणि मारणारा आहेस हे मला पूर्णपणे समजले आहे. सर्व जगत तूच जर्नादन आहेस असे संत म्हणतात. माझे म्हणणार नाही. तूच मला तारणारा आणि मारणारा आहेस हे मला पूर्णपणे समजले आहे. सर्व जगत तूच जर्नादन आहेस असे संत म्हणतात. माझे म्हणून या जगांत काही नाही तर जगाचे ओझे मी का घेऊ ? पृथ्वीचे जरी दान केले तरी हरीनामा चिंतनाची बरोबरी होत नाही. अहो रात्र ‘राम राम’ म्हणा (अ 1581)

244. तुला नांव नाही. माझे तरी नांव दाखव, तुला जर रुप नाही तर माझे रुप दाखव, देवा तू जरा निर्गुण रुपाने खरा पण सगुण रुपाने खोटा आहेस, त्याप्रमाणे मी ही तसाच आहे. वेद मंत्र उच्चारताना स्वर चुकले तर वेड लागते. परंतु नाममंत्र अशुध्द म्हटले तरी जनलोक तारले जातात. वेदमंत्रात असुचिता आडवी येते. त्या अवस्थेत मंत्र म्हणता येत नाही. परंतु नाम पडून झोपून कोणत्याही परिस्थिती घेता येतात मनुष्य भवसागर तरुन जातो. (अ 1587)

245. गेलेला दिवस पुन्हा येत नाही. पुढील आयुष्याची शाश्वती नाही. माझी निंदा स्तुती चालु आहे त्यामुळे चित्र व्याकुळ झाले आहे. तुझ्याशिवाय कोणाचा आधार दिसत नाही, तू तर सर्व ब्रम्हांडाचा जीव आहेस. तुझ्या प्रापतीचे वर्म तुझे नामस्मरण आहे ते करण्यांत आमचे हित आहे. तुम्ही आपले चित्त शुध्द करुन भक्तिभावाने हरिनाम गीत गावे. कोणाचे गुणदोष कानी पडू देऊ नये

व मनातसुध्दा येऊ देऊ नये. ज्यामुळे चित्तास प्रसन्नता होईल असे बोल बोलावे. संत चरणी मस्तक ठेवावे. देव सहज मिळेल.(अ 1679)

246. वैष्णवाना तीर्थयात्रेला जावे अशी इच्छा नसते. सर्व जग हरिहरात्मक आहे अशी त्याची धारा असते. देवामुळे सर्व जीव आमचे आत्म स्वकीय झाले आहे. आम्ही भगवंताचे सेवक आहोत आमचेवर आमची त्रिभूवतावर सत्ता आहे. देव क्षणभर आम्हास विसरत नाही. आम्हास हरिनाम आवडते. परमपित्यालाही त्यापासून संतोष होतो. पांडुरंगाने सर्वांग शांत केले आहे. (अ 1858)

247. जगाचे पालन विष्णु करतो आणि संहार शंकर करतो पण दोन्ही रुपे एकच आहेत. तुका म्हणे मला दोन रुपांत दर्शन घडले. मी दोन्ही देवाला शरण आलो आहे. जो तापस्वी तंबाखू, भांग, गांजा मादक पदार्थाचे सेवन करतात. सर्वकाळ भ्रांतीत असतात त्यांना परमार्थ कसा मिळणार ? विठ्ठलाचे आत्मदर्शन झाले की मानवी जीवनाची कृत्यता झाली जाणावे. तुमच्या नामस्मरणाने असंख्य दुराचारी तरुन गेले. (अ 2017)

248. जो कोणाजवळ मागत नाही तोच देवाला आवडतो त्याला देव मानावे, आणि त्याच्या ठिकाणी नम्र व्हावे. ज्याच्या अंत:करणात सर्व प्राणीमात्राविषयी प्रेम, दया असते त्याच्या हृदयात आणि घरांत भगवंत राहतो त्याच्यासारखा श्रेष्ठ कोण नाही. देव उभा आहे असा विचार करुन नामचिंतन करावे सर्व साधनाचे सार नाम आहे. मनांत आपण हरिरुप आहोत अशी भावना करुन भगवंताचे सगुण रुप डोळ्यांनी पहावे. (अ 2021)

249. माझे अवगुण मला कळतात. माझे मन आवरत नाही विषयाकडे जाते. मी इंद्रियाधीन झालो आहे. देवा मी तुझा दास आहे. माझी निराशा करु नको. माझी उपेक्षा करु नको. जो शाश्वत आहे त्या नारायणाचे विठोबाचे ध्यान घ्याल तर तुम्ही जन्ममरणेच्या व्यथेपासून कायमचे सुटाल. फकिराप्रमाणे दरिद्री ठेव परंतु रात्रंदिवस भगवंताचे नामस्मरण होईल असे भाग्य दे. (अ 2084)

250. सिंहराशीला गुरु येताच गोदावरी तीरावरील पर्वणी येते आणि भटांची चंगळ उडते. अंत:करणावर कोट्यावधी पापाचे थर आहेत असे असताना वरवरचे दाढी-डोकी मुंडण्याने काय होणार. तुझ्यातील अवगुण आहे तसेच आहेत. भगवंता आम्ही छोट्या संपुटयात ठेवून पूजा करतो. तथपि तुझ्या उदरात चौदा भुवने

आहेत इतका तू व्यापक आहेस. आता तू मर्यादीत आकारास येऊन माझ्या हिताचा विचार कर. हरी नामाने चार मुक्ति प्राप्त होतात असे ग्रंथात व संतानी सांगितले आहे. (अ 2095)

251.माझ्या पोषणाचा भार पांडुरंगावर आहे. जगाशी मला काय कर्तव्य आहे. माझे एकमेव साधन म्हणजे नामसंकीर्तन करणे नामसंकीर्तनाने परमार्थ लाभ होतो. व्यवहारांत हानीचे भय नसते. मोठ्या स्वराने रामनाम घेतले तर पापे जळून जातात. जे देवाला शरण गेले आहेत त्याच्या ह्दयांत देवाच्या स्वरुपाचे चिन्हे उमटतात त्याचे ठायी ब्रम्हानुभव दिसतो. आपले मन स्वस्थ, समाधानी, शांत ठेवा. (अ 2107)

252. नाम महापापाचे दहन करते आणि निजसुखाचे रहस्य दाखविते. आता तपासारखे कष्टपूर्ण मार्ग वनवास जाणे आवश्यता नाही, विठ्ठल विठ्ठल या छंदाने ब्रम्हानंदात गर्जावे. विठ्ठल नामाच्या नादात टाळ किंवा हाताने टाळी वाजवावी. त्यामुळे सर्व संकटाची होळी होते. कोणत्याही कामाचे आरंभी व शेवटी विठ्ठलाचे नाम घ्यावे. (अ 2216)

253. विठ्ठल नामाने सुक्ष्म दूर असलेले सुध्दा दिसू लागते अवघड असलेले वेद सहज बोलता येतात. चिंतनाने न भेटणारा देव आपोआप भेटतो संसाराच्या ठिकाणी आसक्त असणाऱ्या जीवानी काया, वाचा अंत:करणे विठ्ठलनाम चिंतन केल्यास ते भवसागर तरुन जातील. (अ 2220)

254. अंत:करणात साधुत्व, शुचित नसेल तर बाह्यात्कारी साधूचे सोंगास काय पेटवावयचे काय ? वाईटास चांगले म्हटल्याने आपले इच्छित कार्य दुरावते. कांही कामे घाई केल्याने नाश पावतात कच्चे पिक काढल्यास नाश होते. कांही कामे घाई केल्यास लाभ होतो पाऊस पडून वापसा येताचे पेरणी करणे (गडबड) जरुरीचे आहे. नाम चिंतनाने पोटात विश्व साठविले जाते. देवाचा लाभ घर बसल्या होतो. (अ 2286)

255. स्तुती किंवा निंदा करावयाची असेलत तर ती केवळ भगवंताचीच करावी. देवाची निंदा करणे देखील हे देखील पुण्य कर्म आहे. वाणीचा व्यर्थ उपयोग करणारा अधम आहे. संतोपदेश ऐकून जे दुर्लक्ष करतात त्याना दु:ख प्रापती होते. पैसेहि खर्च होतात गारगोटीवर कापूस ठेवून लोखंडाच्या तुकड्याने

घर्षण केल्यावर अग्नी दिसतो. चित्त एका जागी स्थिर झाले म्हणजे तुम्हाला त्याचा अनुभव येतो. नाम सेवनाचा हाच उत्तम उपाय असे. (अ 2301)

256. लोक आपापल्या पूर्व कर्मानुसार जाती, गुण रंग आकाराने भिन्न भिन्न देही जन्माला आले आहेत. एकजण दुसऱ्यासारखा नाही. कांही शुध्द तर कांही अशुध्द आहेत. पंचमहाभूताच्या एकाच तत्वाची भौतिक शरीरे आहे. जन्मकर्मानुसार जात व स्वभाव असतो. तर्कशास्त्राच्या वादाने तर्क-वितर्क निर्माण होतात ते आम्ही करणार नाही. सुख-दु:ख, रोग, व्याधी हे ज्यांचे त्याचे भोग आहेत. तो (शरीर) ते भोगील. मी भक्तिसुखाने सजलो आहे आता मुखाने नाममृताचे सेवन करु. ब्रम्हानंद आम्हाला पृथ्वीवरच मिळेल. (अ 2396)

257.भगवंतास कांही न मागणे हेच तुमचे हित आहे तुम्ही त्यास शरण जाताच त्याने तुम्हावर करुणा केली अशी समजा त्यावेळी तुम्ही कोणत्याही कामांत नसावे. तुम्ही एकनिष्ठेने तुमचा जीवभाव भगवंताच्या सेवेसाठी ठेवला तर तो पांडुरंग वैकुंठपदी पोहोचवील वैष्णवांच्या सामर्थ्यापुढे कळिकाळ बापुडा आहे. आपण त्यास जिंकू. नामाची आवड धरा. नवविधा भक्तिची भगवंतास आवड आहे. देव आणि भक्त यांत निवड केली तर पातक घडते. (अ 2415)

258.मनासारखी प्रचंड साठवणीची जागा आहे आणि भविष्यात घ्यावयाचे हरिनाम पुष्कळच आहे मग आता संकोच कशाचा? विठ्ठल या तीन अक्षरानी माझे जीवनकार्य सफल झाले आहे. ज्याचे धन पांडुरंग आहे त्या वैष्णवाच्या चरणाची धूळ मी आपल्या कपाळाला लावीन. इंद्रपदाचे भाग्य त्याच्या चरणावरून ओवाळून टाकीन वैष्णवाच घरी देव राहतो, असा माझा विश्वास ओ. हरिनामासाठी पुन:पुन्हा जन्मून मेलो तरीपण मला बरे वाटते. विठ्ठलनाम मुखाला रुचने व पोटाला पचने. (अ 2484)

259. अंगावरचे वस्त्र फाडून नग्र झाली तरच ती स्त्री वेडी ठरते. आंत एक आणि बाहेर एक भाव असणारास. संत म्हणता येत नाही. मृग जळाने तहान भागत नाही. दुराग्रह धरणे पाप आहे. तुम्ही मनोनिग्रहाचा मार्ग धरा, वासनेचे डोके फोडा. आमचा बीजमंत्र पांडुरंग आहे. त्याच्या नामाशिवाय शास्त्राध्ययन आणि वेदमंत्राचा घोष करत नाही. नामाचेच चिंतन करतो. त्यामुळे समाधान होते तीच समाधी आहे. सर्व पापे विठ्ठलनामाने भस्म होतात. नाम सर्व महापापाना जाळून टाकते. (अ 2553)

260. लोक आपल्यापुरते करुन हित का साधत नाहीत ? निरर्थक कामासाठी वाणी का खर्च करीतात ? त्यापेक्षा हरिनाम का घेत नाहीत. हळुहळु तुझे कान, केश, दोन डोळे तुला सोडून चालले आहेत. जीभ दु:खाने भ्रमित होऊन बडबडत आहे. या इंद्रियानी तुला घालविण्याची तयारीच केली आहे. या करिता तू वेळेवर सावध हो. विठोबाचे रुप पहा आणि त्याचे नाम घ्या. भक्ताच्या कैवार घेणारे रुप चांगले आहे. (अ 2563)

261.आता मला प्रपंच गोड वाटत नाही. सर्व अंग ब्रह्मरसाने भरुन गेले आहे. पूर्वीची देहनादात्म्यता, विषयगोडी रंग बदलून गेली आहे. माझ्या जिव्हेला आता नारायणाच्या नामाखेरीज कांही आवडत नाही. नारायण नामाने रसना शांत झालेली आहे प्रपंच आणि परमार्थ नैराश्य भावन तुझ्या दर्शनाने दूर होऊन समाधान होईल. तू त्वरेने यावे. (अ 2624)

262.नारायण नामाचे उत्तम औषध सेवन करण्याचे कोणासही समजत नाही या औषधाने भय रोग जातो आणि दु:क्ष पुन्हा प्राप्त होत नाही. या औषधाकरिता कोणतेही कष्ट नाही आणि पथ्य पाळावे लागत नाही व त्याची बाधाही होत नाही. या औषधाने गुरुची कृपा व मोक्ष मिळतो. दोषी लोक हरिनामाने शुध्द होतात. आरशातील प्रतिबिंब व्यर्थ त्याप्रमाणे हरिनामावाचून आयुष्य व्यर्थ जाणे नको आपला अधिकारी नसता एकदम पाटावर बसतो तो कावळ्यासारखा मूर्ख असतो. (अ 2688)

263. दह्रयाचे मंथन केल्यानंतर सारभूत नवनीत आपल्याला खाण्यास मिळते आणि ताक दुसऱ्याला देता येते त्यामुळे परोपकार घडतो. चांगल्या प्रयत्नाने श्रमाने चांगलाच लाभ होतो.जयाला याचा अनुभव येतो, त्यालाच अनुभवाची गोडी माहीत असते. स्वयंपाक तयार झाल्यावर त्याला गोडी येते. पाकसिध्दी विना रुची कशी प्रापत होईल ? हरिनाम चिंतनाची सोबत सदा व्हावी त्याचा लाभ क्षणोक्षणी व्हावा. माझे चित्त विषयाकडे जाईल, तेव्हां देवा तेथे मनाला थांबवा. मी हरिनाम चिंतनाच्या आनंदनेलाज सोडून नाचेन. (अ 2855)

264.वेळोवेळी ज्या दुर्जनांच्यामुळे आपल्या चित्ताची शांतता नष्ट होते. अशा दुर्जन माणसाशी स्नेह कधीही करु नये. सर्प शांत दिसत असला तरी त्यास शांत आणि चांगला कधी म्हणू नये. किंचीत डिवचले, तरी तो चावतो. दुर्जनास दूर ठेवावे. विठ्ठलाचे नामसंकीर्तन हेच माझे जीवन आहे. हे कृपासागर भगवंता तुझी

कृपा दृष्टी झाली म्हणजे माझ्यातील ज्ञानांकुरविस्तार होऊन वाढीस लागेल. (अ 2863)

265. गैरमार्गाने चालला आहांत म्हणून भगवंत दुरावला असे भासते. परत मागे सरा म्हणजे तुमच्या मागची भीती उरणार नाही. मुख्य म्हणजे भेद बुध्दीचा प्रतिबंध नसावा. शेवट गोड झालयाचा अनुभव यावा आणि आशा आकांक्षा नष्ट झाल्यावर दु:ख कसे प्राप्त होईल ? प्रपंचातील पहिला अभ्यास होतोच (कोणतेही काम करण्याचा) आता परमार्थाचा अभ्यास चिकाटीने करा म्हणजे झाले. अनुताप होऊन दोष नाहीसे होतील. बुध्दीसहाय्य करुन घ्या नामस्मरणाने देव भेटेल. (अ 2875)

266. अव्दैतात मनाला समाधान होत नाही. तुझी चरणसेवाच गोड वाटते. नामसंकीर्तन आवडते. हे जग तुझेच रुप आहे. तुझे नामसंकीर्तन हेच माझे अनुष्ठान, तीर्थ, व्रत, योग, जप आणि ध्यान, कुळाचार आहे. भक्तिमार्गात विठ्ठल सेव्य आणि सेवक यामध्ये देव-भक्त एकमेकाबरोबरच राहतात. सकळ मंगळाचे मंगळ असा भगवंत तू आहेस तुझे दर्शन केव्हां होईल तू धावत येतो याची आम्हास खात्री आहे. (अ 2893)

267.जन्मताच देवानी तुझी अन्न-पाण्याची सोय केलेली आहे. चातकासाठी मेघ वर्षाव करतो. भक्ताचा सांभाळ हा तुझ्या प्रेमाचा विषय आहे. भक्तासाठी सगुण रुप धारण करतो. गणिका वेश्येचा उध्दार केला. तुझ्याखेरीज मला कोणाचाही आधार नाही. सर्व जीवभावे तुझ्यावर ओझे टाकले आहे. देवा माझा भाव पाहून ‘आपला’ म्हण माझी उपेक्षा करु नको, नामसाधनेत तुझे प्रेम सुख दे. (अ 3016)

268. नारायणाची प्राप्ती होण्यासाठी तुम्ही सर्वकाळ आवडीने रामकृष्णाचे ध्यान करा आणि नारायणाची प्राप्ती करुन घ्या. कलियुगात नामसाधना हाच सोप्पा, साधा मार्ग असून या योगाने लाभ होईल. वाणीने जप करा. अभ्यास आणि ध्यास धरावा, सतत नाम घ्यावे. तप, तीर्थ करण्याची जरुरी नाही. मनाचा निग्रह करुन,(एकचित्त करुन) हरीची प्राप्ती होते. नामाने नारायणची जोड होते.(अ 3016)

269. पूर्वपुण्याने हा नरदेह मिळतो ते जतन करण्यासाठी हरिनाम घ्या. अन्य पर्याय नाही. पंढरीनाथ नामकीर्तनाने सुखी होऊन आपल्या दासाच्या समावेत

असतो. जेथे हरिकीर्तन तेथे हा भ्रमण करत असतो. सदैव धीर धरुन चित्तात समाधान असू द्यावे म्हणजे नारायण आपल्या जवळच राहतो. विठ्ठल विश्वव्यापी आहे. तो माझा सखा झाला आहे. (अ 3028)

270. आम्ही संताच्या संगतीत हरि नामाचे गीत गाऊ भजन करु. योगाभ्यास करण्यासाठी प्रपंचाचा त्याग करुन वनांत जाण्याची आमची तयारी नाही. कारण तेवढे वैराग्य आमच्या अंगी नाही. त्याने इंद्रियांचा कोंडमारा करण्यापेक्षा या नामसाधनेत त्याला भिजऊन टाकू. एकनिष्ठ श्रध्देने नामसाधनेच्या ठिकाणी विश्वास ठेवावा हा वैष्णवाचा कुळधर्म आहे. अगोदर मन नि:स्पृह करावे. तरच आम्हाला हरीचे दास म्हणवून घेण्यात मोठेपणा वाटेल. आम्ही तुला भोग किंवा मोक्ष मागणार नाही. आमच्या मनात सगुण निर्गुणाची एकच आवड आहे. चित्ताने चिदानंदात बुडी मारली आहे वृत्तीसहित प्रेममोहात बुडी दिली. देहभाव विसरला. (अ 3108)

271. देवा माझे संचित, कर्म व पुण्य तूच आहेस. माझे प्रारब्ध तुच आहेस. माझा नित्यधर्म नियम तूच आहेस. हिऱ्याच्या अंगी स्वत: सिध्द प्रकाश असतो. चंदन सुवासाने ओळखला जातो चंदन आणि सुगंध यांच्यात भेद पाहतो तो मुर्खच म्हणावा ज्याच्या ठिकाणी हरी नामाची मुद्रा प्रगटली आहे तो तरुन जातो. हरीनामाने साधक वंदनीय होतो. (अ 3214)

272.हरिनामाचा आनंद ‘आम्ही कोठे आहोत याची आठवण देखील देत नाहीत. देहांत असून देहाकार-वृत्ती नसल्याने विदेह अवस्था होते. तुका म्हणे हरीचे आत्मत्वाने ज्ञान झाल्यामुळे आम्ही अग्निरुप झालो आहोत. अग्नीला जसा विटाळ नाही त्याप्रमाणे शरीराला पाप-पुण्याचा स्पर्श होत नाही. (अ 3229)

273.जनाबाईच्या ओव्या. पहिली - सारे त्रैलोक्य विठ्ठलरुप आहे त्याला. दुसरी - सर्वत्र विठ्ठलच दिसत आहे त्याला. तिसरी - जनी वनी तोच भरला आहे त्याला. चौथी - जगावे वैरण करुन दळण करताना त्याचे नामाला. पांचवी - पांडुरंगाचे गीत अखंड गाताना. सहावी - सहा शास्त्रा विचारांत पांडुरंग भेटला त्याला. सातवी - पांडुरंग माझ्या डोळ्यांत बसला त्याला. आठवी - भीमेच्या काठी अठ्ठावीस युगे उभा असलेल्या विठ्ठलास. नववी - दळण संपले व जन्म मरणाच्या उपाधी संपल्याबदल. दहावी - दहा अवतार मी गात आहे पुन्हा जन्मास यावे लागणार नाही म्हणून ही ओवी आहे. (अ 3260)

274. अनेक ग्रंथ अभ्यासले आणि आवड उत्पन्न झाली हरिकीर्तन केले ते त्या ग्रंथ अध्यायन अभ्यासाचे फळ समजावे नाहीतर तोंडपिटी होते. मनांत अभिमानाची उर्मी शेवटी राहतेच. पंडीत वेद शिकले पण तेच पंडीत विठ्ठलासी भजले, तर खऱ्या अर्थाने पंडीत झाले. हरिनामाचे ठिकाणी बुध्दी स्थिर होते. तेव्हाच तीर्थाटनाची कार्यसिध्दी होते. यज्ञ, याग, दान-धर्म अनुष्ठाने केल्याचे फळ कोणते ? तर कंठांत हरिनाम असणे हेच होय (अ 3368)

275. टिपरी - दोन टिपऱ्यांच्या आघातापासून एकच नाद निर्माण होतो. त्याप्रमाणे हरीच्या निर्गुण - सगुण या दोन्ही स्वरुपांत तत्वत: भेद नाही. कलाकार अनेक अंककौशल्याने कला दाखवितो. शेवटी ती कलाच असते. अरे काहीच व्यर्थ जात नाही. सर्वाचा एकच देव आहे. श्रेष्ठ देवाला जाणून त्यास सम विषय भेद होऊ देऊ नये. एकाच भावाने खेळा. वेताळ टिपऱ्याचा खेळ वाया जाईल लाज सोडा, कोणताही संकोच न राखता खेळा. विठ्ठल नामस्मरणाने अनेक नेणती नेणती त्याच्या ठिकाणी मान पावली. (अ 3736)

276.स्फटिकाची शिळा सर्व रंगाप्रमाणे दिसुनसुध्दा सर्वापासून अलिप्त आहे. त्याप्रमाणे देव सर्व कर्मे करुन त्यापासून अलिप्त आहे. भक्तांनी भक्तिभावाने देवाला जसे केले तसे तो भक्ताच्या मनोस्थपूर्तीसाठी क्षणाक्षणाला पालटतो. कृष्ण गोपाळ, गौळिणी, आई-बाप या सर्वांच्या इच्छापूर्तीसाठी गोकुळात आला. त्याने कंस चाणुरादिक दैत्याचा नाश करुन, आई-बापांना मुक्त केले. तो शत्रु अथवा मित्रास समान पद देतो, हे पुतनेचा वध करुन दाखवून दिले. पापी कंस मामालाही मुक्त केले. भक्तिने भयाने, व्देषाने, स्नेहाने कोणत्याही भावनेने हरीचे स्मरण करा. कंठामध्ये नामधरण केले असता धावून येतो. (अ 3839)

277. ओव्यारुपी अभंग - (3936) तुका म्हणे मी प्रथम पांडुरंगास नमस्कार करतो. दुसरा नमस्कार संतचरणांना करतो. बाबाजी माझे सद्‌गुरु आहेत त्याच्या कृपेनेच कथाविस्तार देव आहे. माझ्या चित्ताला हरिनामाचा छंद आणि गोंविदाला गाण्याची आवड लागो. प्रपंच्या खटपटीत मला फार श्रम झाले परंतु नामसाधनमुळे माझे शरीर शीतल झाले. निर्विकार देव सगुण झाल्यामुळे जे मला सुख झाले त्याला उपमा नाही. हरीचे गुणसत्वर गावेत. त्याशिवाय इतर मार्ग दु:खकारक आहेत. नामसाधनेची निंदा करणारा देवाला अंतरतो. (अ 3936/10)

278.वीणा पताका घेऊन रामकृष्णाची कथा करणे हा वैकुंठाला जाण्याचा सोपा मार्ग आहे. ज्याचे मन मुलगा, बायको, भाऊ यांत गुंतले आहे तो कशा मार्गाने त्यातून सुटेल बरे ? ज्ञानी, अज्ञानी, दोन्ही लोकांनी कथा करावी तुम्ही भवसागर तरुन जाल हे माझे भविष्य आहे. माझा स्वत:चा आलेला अनुभव आहे. माझ्यासारखा दुसरा कोणी पतित असणार नाही. कोणी कांही परमार्थ साधने केली असतली तरी मी या कीर्तनाशिवाय दुसरे साधन केलेले नाही. ज्याने सागरांतील पाषाण तारले त्या माझ्या स्वामिचे अंत:करणात ध्यान करा. नित्य वाचेने विठोबाचे नाम घ्यावे हाच माझा नित्य धर्म आहे. (अ 3936/24)

279. चित्तात श्रीहरीला बळकट धरा म्हणजे तो मायबाप तारुन नेईल. भाविक भक्ताचा हा कृपाळु बाप आहे भावाशिवाय त्याची प्राप्ती नाही असा पुराणाचा निर्वाळा आहे. जयाला देवाची गोष्ट आवडते. त्याला गर्भवासाला यावे लागत नाही. जेथे भक्त निर्मळ नामघोष करतात तेथे देव सदासर्व काळ राहतो. पुन्हा मनुष्ययोनीत येण्याला फार काळ जाईल म्हणून अंत:करणात देव धरा. तुम्ही संतचरण अंत:करणात धरा. देवाचा आणि त्याचा वियोग नाही. देवाला नामाचीच आवड आहे. भवसागरातून तरुन जाण्यासाठी भक्ति हेच सार साधन आहे असे व्यासानी सांगितले आहे. ज्याच्या मुखांत हरीनाम आहे त्याला भगवंत अपार सुख देतो. (अ 3936/60)

280. रामनाम ही दोन अक्षरे आहेत. शंकरानी भवानीला त्याचा उपदेश केला. आणि काशीमध्ये मरतो तेव्हा विश्वनाथ हे त्याच्या कानांत या नामाचा उपदेश करतात. अखेरीस जरी राम म्हटले तरी यमपुरीत दु:ख भोगावयास जावे लागत नाही. साही कर्मात पूर्ण झालेला पण वाद करणाऱ्या त्या निंदकाला देवाचे दर्शन होणार नाही. षटकर्म केली नाहीत पण राम नाम कंठात आहे त्याला देवाची भेट होते, हे सत्य आहे. भोळा भाविक तो चांडाळ असला तरी देवाना आवडते. तुका म्हणे हे माझे बोलणे उधारीचे नाही मी नाम घेतले त्याचा थोडा अनुभव आहे. (अ 3936/81)

281. मरणाने सर्व संसारी लोकास गिळले आहेत. ते गर्भवासाची फळे भोगतात. वासना नष्ट केल्यावाचून काही प्राप्त होत नाही. प्रारब्धावर काही घालू नये. आपला देह बळेच काट्यावर घालू नये. सापाला हाती धरले तर चावेल, जीव जाईल. ज्याचे हित त्याच्याच हातात असते. ज्याच्या चरणस्पार्शने पाषाण तरले

त्याच्या चिंतनाने भक्ति करा. सतत नाम साधना करावी, संतसुख घ्यावे. देव दुर नाही. सर्व शरीर व्यापून आहे. नाम घेताना मन शुध्द असावे. सर्व प्राणीमात्र संकिताचे अंकित आहेत. देहाभिमान टाकून जागे व्हा. भगवंताची कृपा होणारच. (अ 3936/99)

282. भगवंता आता माझी बुध्दी या विषयांतून काढून शुध्द करा मी कालप्रवाहात अडकलो आहे तेथून आपण मला सोडवावे. देव तुम्ही मोहरीचा डोंगर आणि डोंगराची मोहरी करु शकता. आपल्या करुणेची सावली मजवर मजवर करा. हे पुरुषोत्तमा मी जे अपराध केले व होतील त्याची क्षमा करुन नामाचे प्रेम मला द्या आणि या प्रपंच भ्रमातून मला सोडवा.(अ 4070)

283. विषयासक्तीने जीव भुलले आहेत. नरदेह असून नारायणाविषयी भाव त्यांच्या अंत:करणात निर्माण होत नाहीत. प्रपंचात कोणते सुख धरुन जीव बसलेले आहेत ? ते काळाच्या आहारी पडलेले आहेत. वेळ संपताच काळ त्यांना ओढून नेणार. मागे असंख्य जीव भोग आत पुढे असंख्य जन्माची भेट होईल. बैलाच्या डोळ्यावर ढापणे बांधून घाण्याला जुपतात. मागे जोडी व आरी, त्यामुळे तो पळतो किती फेरे झाले त्याला कळत नाही. तहान भुकेने तो व्याकुळ होतो. तशी या प्रपंचातील जीवाची स्थिती आहे. प्रारब्ध, संचित, क्रियमाण हे त्याचे देहाचे निमित्त आहे. देह अतित्य मानून नित्य नामस्मरण का करत नाहीत ? (अ 4075)

284. माझा जीव तुझ्या चरणी स्थिर पावला आहे. सर्व सुखाचा हाच ठाव आहे. माझा निश्चय झाला आहे. माझे एकमेव भांडवल म्हणजे तुझ्या ठिकाणी असलेला विश्वास होय. निश्चय केल्याने तुझा भक्त झालो आहे. मागील प्रपंचाकडे मी आता पाहात नाही. आता सेवा करण्या सोस (ध्यास) राहिला आहे. मी माझा अहंभाव, गर्व मोडून टाकला. व्यवहारात अनंताशी व्यवहार करावयाचा याशिवाय दुसरे जाणत नाही. मन समाधानी झाले. संसाराची आसक्ती नाही. नामसाधनेला अंत:करणात थारा दिल्याने सर्व संकटे दूर झाली. (अ 4094)

285. सगुण स्वरुपाची भक्ती करणे हीच मुख्य उपासना आहे. यामुळे चित्त शुध्दीपासून मुक्तीपर्यत सर्व अवस्था प्राप्त होतात. चित्तशुध्दी आणि भक्ती यामुळे नारायण चित्तात प्रकट होतात. योगापेक्षा, श्रवणापेक्षा नामसाधना श्रेष्ठ आहे. कारण, हरिप्राप्तीचे सुरुवातीचे साधन नाम आहे आणि हरिप्राप्ती

झालयानंतर जीवनमुक्ति काळांत आवडीने नाम घेण्याशिवाय काही कर्तव्य उरत नाही. म्हणून सध्याही तेच आहे. बीज आणि फळ हरीचे नामच आहे. हरीला पुण्यजनक, सर्वधर्मरुप आहे. सर्व धर्माचे आचरण केल्यासारखे आहे. सर्व शहाणपणाचे वर्ण नाम आहे. नारायण, आत्मा, रामकृष्ण विठ्ठल सर्व एकत्र आहे. (अ 4098)

286. हे जनार्दन या विश्वात तू व्यापक आहेस. तुझे स्वरुप पूर्ण आनंदरुप अविनाशी आहे. सर्वकाळ, मंगलदायक असून सहज स्वरुपी आहेस. सगुण निर्गुण देवा तू सर्व विश्वाचा पालक आहे. जगाचा जीवनदाता आहेस. आमच्या जवळ भक्ति, ज्ञान वैराग्याचे सामर्थ्य असल्याने भगवंत आमच्या जवळ आहे. त्याच्या स्वरुपाचे ज्ञान कोणासही झालेले नाही त्या आम्ही अंत:करणात साठविले आहे. नाम साधनेने पंढरीरायाला भुलविले आहे. संतसमागम केलेला आहे. भक्तिचे वर्म आमच्या हाती आहे. तेच दर्शनाचे वर्म आहे. (अ 4100)

287. हरी जसा आहे तसे हरीचे दास आहेत. त्याना मोह चिंता याचा त्रास नाही. भक्तीची बळकट कास धरुन जे देहावर उदास होऊन राहतात. हरी चरण धरुन घरातील लोकाचा त्याग करतात. त्याना मानाची उपेक्षा नाही. धन हे मातीप्रमाणे मानतात. त्याना अन्य काही लागत नाही. त्याच्या कंठात नामामृताचे पान आहे. ते इतके सामर्थ्यवान आहेत की ते काळाला नागवतात. प्रपंच त्याचा दास आहे. मोक्ष त्यांची प्रतीक्षा करीत आहे. जन्म-मृत्यू नाही. आपले परके भेद नाही. त्याची वाणीत पंचामृत आहे. (अ 4106)

288. देवा प्रपंचात त्रासलो आहे. चौऱ्याऐंशी योनीतून फिरणारा मी भिकारी याचक आहे. माझे जीवन दुसऱ्याच्या हातात आहे. संचित, प्रारब्ध, कर्म आणि क्रियामाण कर्म हे माझ्याबरोबर असून मला आपल्या सत्तेने मिरवीत आहेत. ज्वारी भाजण्याच्या कढईत लाही जशी तडफडते त्याप्रमाणे माझ्या जीवाची स्थिती झाली आहे. हे माझे दु:ख कोण दुर करेल ? देवा, तुझे नामचिंतन संसारातुन तारणारे आहे. मज गरीबा करिता धाव घ्या. गुण व अवगुणाचा विचार करु नका. (अ 4107)

289.देवा, तुझे नांव गोड आहे. चांगले आहे. तुझ्या नामाने पापाचे हरण होते, रुपाने डोळ्याचे पारणे फिरते. विठ्ठल विठ्ठल हा मंत्र सोपा आणि सारभूत आहे. विठ्ठल हे नामशास्त्र आणि मंत्र शास्त्र आहे. हा शेवटचा बाण आहे. अंत:काळी या

नामाचा उपयोग करावा त्यावेळी नारायणाचे चिंतन केले असता तो दु:खाचा नाश करतो. अनुभवसिध्द लोकाचे मत आहे की नामाने सिध्दी प्रापत होतात आणि अनंताचीही प्राप्ती होते. नामाला शरण जावे कलीयुगांत सर्वमान्य, योग्य साधन आहे. (अ 4110)

290. विठ्ठलाविषयी शुध्द भाव नसेल तर सर्व उपचार व्यर्थ आहेत. अंत:करणातील प्रेमभावाचा परिचय झालाशिवाय त्याच्या रसाळ बोलण्याला अर्थ नसतो. तू सर्वोत्तम सर्व गुणी मानेप्रमाणे उदार आहेस. तुझ्याविषयी माझ्या मनांत प्रेम राहो. माझे अपराध अगणित असले तरी नामसमरणामुळे ते नष्ट होतील वरपांगी धाव दाखविणाऱ्या दुर्जनाचे मुखदर्शन आम्हाला दाखवू नको असे तुकाराम महाराज म्हणतात. (क्षेपक अ 8)

291. वाचेने रामनाम म्हणा, हाताने टाळी वाजवून ताल धरा यासाठी फार कष्ट पडत नाहीत, हानी होत नाही. यज्ञादिक साधनेने गती प्रापत होत नाही. भोजनाच्या समयी काम करताना, ध्यान-समाधीमध्ये रामनाम मंत्राचा नित्य जप करा. कोणत्याही जातीवर्णाचा असो. वेळोवेळी रामनाम घेण्यास चुकू नका. तुका म्हणे रामा तुझी आणि माझी गती एकच आहे. (क्षे.अ.55)

292. तुळशी वृंदावनात कांदा उगवला तर देवाला आवडत नाही. मानवातील भक्तिहीन माणसे गोविंदास आवडत नाहीत. केवड्यातील निर्गंध कणसाप्रमाणे ही भक्तिहीन माणसे जशी चंदनातील अळी ज्याप्रमाणे देवापर्यंत जात नाही हरीच्या नामस्मरणाने मायापाश तुटतात. कलियुगामध्ये भक्तिशिवाय इतर साधने उपयोगी नाहीत. वेद, शास्त्र पाठ करु नका केवळ नामाचे प्रबंध पाठ करा. योग करु नका, वैराग्य धरु नका संताच्या संगतीत भक्तीचे भाग्य साधा. ब्रम्हज्ञानासाठी आटापिटा अनुष्ठान करु नका. मोक्षमार्गाचा सोपान असणारी कृष्णकथा श्रवण करा. संतानी भक्तिचे रहस्य सांगितले तेच विश्रांतिस्थान आहे. अन्य नाही. (क्षे.अ.84)

293.नामाचे सामर्थ्य व्यर्थ घालवू नकोस त्याचा महिमा विसरु नकोस. प्रल्हादाच्या देहावर असंख्य शस्त्राचे निष्ठूर प्रहार केले तरी त्याला टोचले नाहीत नित्य नामस्करण करा, नामाचा प्रचार करा. नामामुळे कर्मे नाश पावतात. वैकुंठात राहणारा श्रीपती सतत आपल्या जवळ राहतो. नामामुळे अजामिळ, गजेंद्र यांचा उध्दार झाला. तुका म्हणे नामामुळे मुक्ति आहे. त्याने सर्व आपल्या अंकीत केले आहे. (क्षे.अ. 216)

294. महापावन नामासारखे पवित्र कोण आहे. भगवान शंकराने विष प्राशन केले. त्यामुळे दाह झालेल्या त्यांच्या शरीराला नामानेच शीतल केले. शिवाला नामाचा आधार असल्याने प्रत्यक्ष काळालाही त्यांनी दास केले. काशीत मरण आले तरी तेथे नामामुळेच उध्दार होतो. महापुरातमरण आले तरी तेथे नामामुळेच उध्दार होतो. महापुरात तारणारी नाव ब्राम्हण असो अंत्यज सर्वांना मृत्यू आहे. परंतु नामामृत हे साधन जीवाला मात्र उध्दरुन नेते. (क्षे.अ. 218)

295. ब्राम्हणास आपले वर्म कळत नाही. केवळ एका नामसाधनेने देव प्रापत होतो. मी लहान-थोरांना एकच प्रार्थना करतो की त्यानी निश्चयाने भगवंत अंत:करणात धरावा हीच सर्वाजवळ माझी विनंती आहे. आपल्या अंत:करणात हरी आठवावा. केशव-नारायण या नावाने जे आचरण करावा. ते संध्या-स्नान करण्यासारखेच आहे. नाम घेऊन भोजन, भजन करा. यातच ब्रम्हकर्म केल्याचे श्रेय आहे. ते सत्वर वेगाने स्मरा. (क्षे.अ. 292)

296. संसाराचे ओझो वाहता कष्टलो. गीता सांगते की भक्ताचा योग क्षेम भगवंत करतात. तेच भगवान अर्जुनाचे रथाचे सारथ्य करतात. प्रपंचात असताना हरिनामाने तुझ्या पूर्वजांचा उध्दार होईल. तुझी सर्व इंद्रिये तुझ्या कामास येणार नाहीत म्हणूनच तू तुझ्या जिभेने हरिनामाचा उच्चार वेगाने कर. तुका म्हणे सर्व सार हरिनाम आहे बाकी सर्व येरझार आहे. (क्षे. अ. 323)

297. माझ्या विठ्ठलासारखी कृपाळू आई कोण आहे सांगा तुका म्हणे माझी माऊली माझ्या मुखांत ब्रम्हरसाचा घास घालते अरे विठ्ठला मी पतित पतित पतित असे तीन वेळा सांगलेय. तू आपल्या सत्तेने मला कृतार्थ करावेत. माझे चित्त शुध्द नाही. मन तुझ्या चरणी स्थिर नाही. आयुष्य कमी झाले तरी चालेल पण माझी कीर्तनाची गोडी कायम राखावी कीर्तन सेवा न होणे माझी मोठी हानी आहे. तुका म्हणे - नारायणाचे चिंतनाने भजनाने ब्रम्हरसाचे भोजन गोड झाले. पोट भरले.(अ 4024)

298. संतानी आपल्या समर्थ शब्दानी मला अभयदान दिले त्यामुळे माझ्या चित्तास समाधान झाले. नारायणा आता हा प्रमरस खंडीत होणार नाही असे कृपादान मला द्यावे. तुका म्हणे मी बोबड्या बोलानी गीत गाऊन तुमचे पूजन करीत आहे. भगवंता मी केलेले पूजा मंत्रहीन, क्रियाहीन आहे आणि आमच्या त्या आचाराचा विचार करु नका. आम्ही केलेली पूजा क्रिया जमा करुन घ्या आणि

आमच्यावर कृपा करा. ठावठिकाणांचा विचार केला आणि येथेच भाव ठेवला आहे. (अ 4032)

299. देवा तूच आमची आई, बाप, भाऊ, सखा जिवाचा जीवलग आप्त आहेस आणि सर्व वित्तही तूच आहेस आता तूजवाचून मला दुसरे कांही प्रमाण नाही. म्हणून माझ्या प्रपंचाचा भार तूजवर घातला आहे. क्रिया, कर्म, धर्म व कुलदैवत तूच आहेस. तुका म्हणे - देवा तूच भाव भक्ति, पूजा नमस्कारादि सर्व आहेस. देवा तुझ्या नामाचे चिंतन करीत त्यावेळी सादरपणाने माझ्या हातून तुझी सेवा घडावी. (तुम्ही सेवा घ्यावी)(अ 4037)

300. अहो पांडुरंगा स्वयंपाक तयार करुन रखुमाई वाट पहात आहे. देवा तुम्हास भोजनास उशीर झाला म्हणून लवकर उठावे, तुम्हास आचमत देण्यासाठी गोपिका पाण्याचा कळश घेऊन उभ्या आहेत. उध्दव, अक्रुर बोलावयास आले आहेत. नाना तऱ्हेचे रत्नदीप लावेले आहेत. सुगंधी विडे ठेवले आहे. तुका म्हणे मी विनंती करीत आहे. सर्वांनी सेवेसाठी सावध असावे तुम्ही आपापले सुख दु:ख देवाला सांगून ज्याला जे कांही आवडत असेल ते देवाजवळ मागावे. (अ 4044)



# 4. भक्ति, उपदेश

301 ज्याच्या अंत:करणांत भगवंताविषयी प्रेम नाही परंतु भक्तिचा देखावा करतात त्याला भगवंताची प्रापती नाही. योगी इंद्रियाचे दमण करतो. त्याचा देव सोयरा होतो. शेतात मेहनत केल्याशिवाय उत्तम पीक येत नाही. योग्य ते स्विकारा नाही तर व्यर्थ श्रम होतील. (अ 56)

302 सतत नामस्मरणाने हरिदर्शन घडते. वनांत जाण्याचे कारण नाही. लौकिक व्यवहार सोडण्याची जरूरी नाही. एका भगवंताच्या नांवावाचून इतर सर्व उपाय अपूर्ण आहेत. वेदांचा योग्य विचार करुन त्याप्रमाणे वागावे. जे देहास ब्रम्ह समजतात त्याना नारायणाची भेट कधीही होणार नाही. (अ 73)

303 नामस्मरणाने पाप जवळ राहत नाही. विठ्ठल नामाने क्षणांत भस्म होतात. भक्ताने देवाचे नांव वेडेवाकडे घेतले तरी देवाला ते प्रिय वाटतात. अन्नांत मीठ नसेल ते बेचव वाटते तसे चित्तामध्ये सद् भाव नसेल तर सर्व निरस वाटते. (अ 108)

304 उपदेश करणाऱ्याची योग्यता न पाहता उपदेश तेवढा घ्यावा. पोटांत अन्न नसेल तर देहावरील शृंगार व्यर्थ आहे. तसे हरिकथेवाचून पांडित्य रुचिहीन आहे. भक्तिचे मर्म साधूलाच कळते. लोकापवादाची पर्वा न करता हरिभक्ति करा.(अ 124)

305 वेदमार्गाचा उच्छेद झाला आहे. आता नामाशिवायतरणोपाय नाही. शास्त्रानुसार विषयाचे सेवन केले तर ते विषय त्यागासमान आहेत. हरीचे, चिंतन हा मुख्य धर्म आहे. भजनावर तर्क केल्यास इतर मार्काकडे भर करत जाल. त्याचेवर श्रध्दा ठेवली तर हरी कृपाच करील. (अ 170)

306 माझा जीव तुम्हास अर्पण करावा तर तोहि तुमचाच आहे. विचार करुन पाहता तुम्हास अर्पण करण्यासारखे माझ्याजवळ माझे काहीच नाही तुमचे उपकार फेडण्यासाठी माझे स्वत:चे कांहीच नाही. विपत्ती येवो पंरतु माझ्या हृदयांत भगवंत राहो. प्रपंच नाशवंत आहे. सदैव आपली आठवण ठेवणे यांतच हित आहे. (अ 247)

307 विठ्ठला तू उदाराचा राव आहे. सर्व जगाचा जीव आहे. तू औदार्याची मूर्ती आहेस. तुझ्या जवळ सर्व सिध्दी आहेत. तुझे नांव गोड आहे. तुझे ध्यान

मला लागले आहे. तुझे नाम रसाळ आहे. तुझा मला ध्यास लागला आहे लवकर ये. (अ 297)

308 मी बुध्दी आणि गनाने केलेली कर्मे तुला समर्पित करितो. सर्वांच्या ठायी आत्मरुपाने तू असतोस, त्यामुळे माझ्यात तुझयात भेद नाही. आम्ही दुसऱ्यास जाणत नाही आमच्या मनाला याविषयी मनच साक्षी आहे. तुझे रुप अमर्याद आहे. निश्चित अशा प्रकारचे निर्गुण, आनंदरुप आहे. (अ 316)

309 ब्रम्ह कर्म-अकर्माच्या मलाने लिप्त न होता वेगळे राहते. ज्ञानी अनुभवाने ते जाणतो. ब्रम्हाच्या ठायी पापपुण्याला थारा नाही. अंत:करण भक्तिने पवित्र नसेल तर वर कितीही राख लावली तरी त्याचा काय उपयोग ? लोककीर्तीचा आशापाश तुटणे हितकारक आहे. (अ 325)

310 मनी भक्ति असे तो दैववान असे भक्ति नसे तो पंडीत असा पण दैववान नसे. नऊ भक्ति जाणे तो शुध्द मनी असे. अदैताच्या पोकळ गोष्टी मला आवड नाहीत तुका म्हणे 'मी ब्रम्ह आहे' असा भ्रम मी भक्तिमार्गात येऊ देत नाही. (अ 353)

311 शुध्द आचरण ही संताची पूजा आहे या पूजेला द्रव्य पुष्प लागत नाही. सगुण भक्तिमार्गाने गेले असता भगवंताचे सगुणरुप भक्ताला शोधीत येते तो नामघोष करणाऱ्या भक्ताच्या जवळ येतो. आपले मन स्वहिताच्या मार्गावर लावा. (अ 438)

आपली अंधारातील वस्तु पाहण्यासाठी दिपाचा आश्रय घ्यावा मी आजवर अनन्य भक्तिचा प्रयत्न केला. त्या भक्तिने विठ्ठल धन्याची पारमार्थिक ऐश्वर्य मला दाखविले. विषयाची हाव नष्ट झाली. त्या भक्तिने आणि श्रध्देने धन्याची सर्व शक्ति, सत्ता माझ्या अंगात आली. (अ 430)

312 पांडुरंगाची प्राप्ती आणि महती श्रध्देशिवाय होणार नाही. ज्ञान-विज्ञानाचे मापाने कितीही मोजले तरी त्याचे ज्ञानाचे माप रिकामे, उलट श्रम मात्र होतील, जोपर्यंत तुला पंढरीचा राजा ठाऊक नाही तोपर्यंत तुझे ज्ञानविषयक बोलके व्यर्थ, कोरडे ब्रम्हज्ञान कोण मानतो. तुम्हास विठोबा पाहिजे तर तुमचे जाणतेपण एका बाजूस ठेवा. विठोबा पायी चित्त ठेवू. (अ 476)

313 वेद-उनिषदाने अनेक असार साधानातून हरिनाम रुपी लोणी निवडून दिले आहे. ज्याच्या पदरी पुण्याचा साठा आहे ते लोण्याचा स्वाद घेतील.

जगण्याचा आधार हरिनाम आहे. विवेक नसेल तर त्याचे महत्तव कळणारे नाही. या लोण्याचा लाभ ज्याला मिळतो त्यासच हरीचा लाभ होतो. (अ 491)

314 आपल्या घराला स्वत:च आग लावून आपण सावध असता पळणार नाही तो कधीही वाचणार नाही. भक्ति करता येईल अशी सर्व इंद्रिये कायक्षण असताना संसार दु:खाची आग लागली असताना अशा परिस्थितीत आपला हितासंबंधी जागे रहा. (अ 511)

315 तुझी सालंकृत पूजा करण्यासाठी माझेकडे पूजासाहित्य नाही. मी असमर्थ असल्यामुळे योगक्षेमाचा सर्वभार वाहणारा तूच आहेस नारायणा माझे मंगल हीत तुम्हीच जाणता मी तुम्हाला देहभाव अर्पण करीत आहे. (अ 531)

316 द्रव्य आणि संततीमुळे दु:खाचे भागीदार व्हावे लागते. कोणाची निंदा अगर स्तुती ऐकू नये. आशा-आकांक्षा, इच्छा मोह याच्यांत अडकल्याने देव प्राप्त होत नाही. देव आत-बाहेर सर्वत्र सारखा आहे. तो व्यापक आहे असा अंतकरणाचा भाव असणे हाच खरा भाव आहे. मनातील भाव नविद्या भक्तिस प्रकट होते. (अ 550)

317 मन निर्मळ, वाणीमध्ये माधुर्य नम्रता अशा गुणानी संपन्न असणे यालाच खरी लक्ष्मी म्हणतात ज्यानी मिळविली तो खरा भाग्यवंत होय. काव्य वाणी माझी नाही हे सर्व हरीच्या कृपेमुळेच होते. जसे ज्ञान भाव असेल तसे त्यानी निसंकोचपणे भक्ति, गीत गायन करावे. गीतातील भक्तिभावच महत्वाचा असतो. कथा ऐकणेच मिळते ते दैववान होत. (अ 606)

318 माझ्या चित्तात काम, क्रोध जीवंत आहे. बाह्यात्कारी मी लोकाशी गोड बोलत आहे. माझे चित्त शुध्द नाही. देवा मी तुमचा शक्तिहीन सेवक आहे. मला सांभाळा ‘राम कृष्ण हरी’ या मंत्राची व विठोबाच्या चरणाची आवड फक्त माझ्या मनात आहे. मी तुमचे उच्छिष्टाचे सेवन करत आहे मला क्षमा करा. (अ 630)

319 देवा तू मोठा उदार आहे. तुझ्या पायाशी काया, वाचा मनाने जे एकनिष्ठ आहेत त्याचा सर्व भार स्वत: वाहतोस. धावा केल्याबरोबर जवळ येऊन उभा राहातोस हट्ट पूर्ण करतोस तुका म्हणे देवा तुमच्या भक्तात कसलीच काळजी नाही तू सर्वभावाने त्यांचा आधा झाला आहेस. (अ 659)

320 सुबुध्दी देणारा आणि लक्ष्मीचा पती असा जो विष्णू त्याची अंत:करणात आठवण केल्यावर कोणती गोष्ट प्राप्त होणार नाही. वैष्णावाच्या मेळाव्यात आम्ही भक्तीने नाचू. भवसागर मिथ्या आहे. आम्हास माहित आहे मोक्ष व बंध अवस्था खऱ्या नाहीत. आम्ही नामाचे बळाने चिंताविर हीत झालो आहोत. (अ 704)

321 हे देवा कायेने वाचने, मनाने सर्व भावाने मी तुलाच शरण आलो. तुझ्याशिवाय माझ्या मनात काही येत नाही. माझी वासना तुझ्या चरणी रहिली आहे. आम्ही तुझे दास आहोत व तू आमचा ऋण आहे. त्याचा हिशोब करण्यासाठी मला भेट दिलीच पाहिजेस. (अ 718)

322 आपण संसारात इतके गुंतलो की आपण कोण याचे भान नाही असे घातक संसार व्रत पाहून माझे मन हरीकडे परतले. जनामध्ये इंद्रियाचा गोंधळ चालू आहे. अहंकार वासनेने बहुताचे वाटोळे झाले आहे. जो या संसार मोहातून सुटका करुन भगवंताकडे धाव घेईल त्यास मोक्ष मिळेल. आपले हृदय देवाच्या चिंतनाने भरून टाकावे याच भक्तिच्या जोरावर पांडुरंगास पुष्कळ दिवस विटेवर उभे केले आहे. (अ 743)

323 अखेरचा दिवस चांगला जावा म्हणजे अंत:काळी हरीच्या स्मरणांत चिंतनात देहाचा अखेर व्हावा एवढयासाठीच भगवद् भक्तीचा खटाटोप केला होता. आता चिंतारहीत विश्रांत झालो. अपेक्षाची धांव नाहीशी झाली. भगवंताच्या मंगलनामात आयुष्य घालविले याचे कौतुक वाटते. तुका म्हणे मी जीवनमुक्तीशी लग्र लावले तिच्याच योगात, खेळण्यात चार दिवस घालवित आहे. (अ 787)

324 भक्ति साधनेत ज्ञान-वैराग्याच्या खाणी आहेत, ब्रम्हाचा ठेवा जो मोक्ष व सर्व भोगदेखील भक्तिसाधनेच्या पोटांत आहे. भक्तिमागे ज्ञान, वैराग्य, धर्म, मोक्ष इत्यादीची रांग चालत आहे. तुका म्हणे - भक्तिभावाच्या बळाने 'मी ब्रह्म आहे या साक्षात्कारी अवस्थेत आलो. सर्व वैषम्य नष्ट करुन सर्व जगाला एकदम देव करुन टाकले आहे. (अ 788)

325 देवा माझ्या वाट्याला आलेला व्यवसाय मी करीन परंतु तुझ्या चरणी निष्ठा असु दे. संसाराचा भाट वाहिल्यानंतरच विसावा मिळणार आहे.

तुझा विसर न पडू दे विठ्ठलाचे पाय म्हणजे विठ्ठलाची सगुण-निगुर्ण रुपे. जगाचे कारण आणि अधिष्ठान आहेत आनंदाने आनंदीत झालो आहे. (अ 874)

326 भगवद् चिंतनासाठी शुध्द काळ वेळची आवश्यकता नाही. ते सर्वकाळ निरंतन करावे. ज्याच्या मुखांत निरंतर नामस्मरण आहे ते मुख मंगल आहे अंत:करणात भगवंताविषयी अपार श्रध्दा प्रेम आहे व बाकी सर्व व्यर्थ पसारा आहे. दोरीचा साप भासतो सर्व भ्रम अविद्येसहित मनामुळे होतात विठ्ठल विश्वंभराची व्याप्ती आहे ह्या स्थितीनेच आम्ही राहू. (अ 898)

327 देवा, माझी विनंती ऐका मला मोक्षापेक्षा सर्वात श्रेष्ठ भक्तिसुख मला पाहिजे. आम्हाला वैकुठांत स्वर्गात वास्तव्य नको आहे कारण काही काळाने त्या सुखाचा नाश होतो. कीर्तनकाळी हरिनाम-चिंतनात आनंद कांही अपूर्व आहे. हे मेघश्यामा तुमच्या नामाचा महिमा तुम्हास कळत नाही. आम्ही त्याचे सुख पूर्णपणे घेत आहोत. याकरिता आम्हास जन्म घेणे चांगले वाटते. (अ 910)

328 परीस हीन लोखंडास स्विकारतो ओढे, नाळेचा गलिच्छ पणा गंगा स्वीकारते. कस्तुरीच्या संगतीने मातीला सुगंध येतो त्याप्रमाणे पांडुरंगा माझे गुणदोष मानू नकोस. आम्ही देहक्षेत्रातील संन्यासी आहोत आजचा देह श्रीहरीच्या स्वरुप बोधाने भरलेला आहे. आम्ही आपल्या आशा, कामना अंत:करणातून हद्दपार केल्या आहेत. श्री पांडुरंग सर्व काही देणार आहे. (अ 932)

329 भक्ति वाटते तशी सोपी नाही. ती सुळावरील पोळीप्रमाणे आहे. पाया कच्चा असलेल्या भिंती टिकत नाही, दिखाऊ भक्ति पोकळ असते. नाटकी भक्ति उपयोगाची नाही. मेहनत आणि मन लावून केलेल्या स्वैपाकास गोडी येते. हत्तीस ताळ्यावर आणण्यासाठी अंकुशाचा मार पाहिजे. सात्विक भक्तिसाठी आपल्या मनास नित्यनवीन प्रत्येक दिवशी नव्या विचारजागृतीचा अकुंश पाहिजे. (अ 985)

330 जे कोणी विठ्ठलाच्या ठिकाणी काया, वाचा मनात अनुसरले आहेत. त्याचे दास्यत्व भगवंत करतो. त्यास देव क्षणभर विसरत नाही. देवा आता तुम्हाला पाहिल्यावाचून माझ्या इंद्रियाचे समाधान होत नाही. सहस्त्रभुजांनी युक्त तुझे रुप पाहण्याची शक्ति माझ्याकडे नाही तर तुम्ही चतुर्भज होऊन अनंताच्या गरुडावर बसून माझ्याकरिता धांवून यावे तुम्ही सर्व जीवाचे जीव आणि सर्व देवांत श्रेष्ठ देव आहांत. (अ 996)

331 जो संताची निंदा करतो तो जिवंतपणीच नरक भोगतो असे समजावे. भगवंताच्या मनांत जे करावयाचे असेल तेथे इतराचे काय चालत नाही. ते होणारच. देव साह्यकर्ता असताना त्याना वनवास घडविला. तुका म्हणे, जन हो तुम्ही शांत रहा, वृत्तीने स्थिर रहा भगवंताच्या इच्छेने जे जे घडेल ते ते निर्विकार मनाने साक्षीरुपाने पाहा. पण निष्कारण अस्वस्थ होऊ नका. (अ 1031)

332 माझी तहानभूक हरपली आहे. कारण माझ्या मनाला गोविंदाची गोडी लागलेली आहे. त्याची सेवा तृपती होईपर्यंत करीन. या सेवेच्या कामापुढे देहनिर्वाहाची व देह धर्माची कामे राहिली तर चालेल. हरीची सेवा हीच नरदेह धारण केल्याचे फळ आहे. शिवाय सेवेत जाणारा काळही धन्य होय. हरीला जीव अर्पण करुन त्याच्या पाठीशी लागेन. (अ 1060)

334 भगवंताशी जो जो भांडावे तो आपले योग्य हित कळून येते. त्याच्याविषयी कल्पित भेद आहेत ते आपले वादाचे भांडवल आहे. वाद थांबवू नये. रात्रीच्या वेळी सारस पक्ष्यांना वियोग झाला तरी शब्दाने भेट होते याकरिता आळस न करिता देवाशी बोलत रहा. आळसाने कोणत्याही कामाचा नाश होतो. देवा तुमची वादाचे रुपाने सेवा करु. पंचमहाभुताचा देह ज्याचा त्याग द्यावयाचा आहे. तुझ्यावाचून अन्य आप्त नाही. तू सर्वस्व आहेस. (अ 1083)

335 कोणत्याही कुळात जन्मो मी तुझ्या भक्तिचा मार्ग सोडणार नाही तुला आमच्या पुण्याने व तुझ्या भाग्याने वीट मिळाली आहे हे लक्षात ठेवा. तुझ्या भेटीवाचून कोरडे ब्रम्हज्ञान घेऊन काय करु ? ते मायेचे रिकामे माप आहे. भेटीवाचून व्यर्थ आहे. तुझे चतुर्भज स्वरुप मी अधीर झालो आहे. मला ऋध्दी, अष्टमहासिध्दी नको आहे. तुका म्हणे देवा तू मला चरण दर्शन द्यावे हीच तळमळ आहे. (अ 1161)

336 योगाभ्यासाने हृदयांत एकसारखा अनाहत ध्वनी होत असेल तरी रामनाम तोंडात नसेल, तर तो कसा तरुन जाईल ? सर्व जीवामध्ये देव आहे, तरी आपणाशी तो अभिन्न आहे, हे ज्ञान आल्याशिवाय, अभेदाने साक्षात्कार झाल्याखेरीज तरावयाचा नाही. परंतु सगुण भक्तिशिवाय ते ज्ञान ब्रम्हज्ञान होत नाही, झाले तरी ते ब्रम्हस्वरुप होत नाही. वृत्तीरुप राहते. उन्मनीचा दीप हृदयांत उजळ्याखेरीज तो कसा तरेल ?चार्वाक मनाने भगवंताची प्राप्ती होणार नाही. (अ 1187)

337 विष्णुसहस्त्र नामाप्रमाणे तुझी हजार नांवे आहेत. तुझ्या नावांत ताळमेळ नाही. तुझा सर्व पसारा खोटा आहे. भक्ताकडून पुष्कळ सेवारुपी कर्ज घेतले व त्या कर्जापायी तू पूर्ण बुडाला आहेस. पुष्कळाचे तुझ्याकडे घेणे-देणे राहिले आहे. तू आतापर्यंत पुष्कळांना आशा लावून नाश केला आहेस. देवा तुला लाज नाही. तु कोठे आहे. तुला जागा, झोपलेला, जेवलेला अथवा भुकेला असे काही म्हणता येत नाही. तुझ्या वेदगीतादी वचनांनी कोणाला न विचारतादेखील लोकाचे कल्याण होते. (अ 1211)

338 श्री विठ्ठलाचे अनन्य साधारण चरण हीच आमचे साधसंपत्ती आहे. पंढरीची वाट ही माझ्या माहेरची वाट आहे. ती सरळ, सोपी, साधी शांत आहे. 'राम' नामाचे गीत हेच आमचे अलंकार आहेत. आम्हास भवनदी हेच आमचे अलंकार आहेत. आम्हास भवनदी कधीच आडवी आलेली नाही. माझे माय-बाप पंढरीत आहेत. पंढरीला जावून केव्हा कळसाचे दर्शन घेइन असे मला झाले आहे. (अ 1231)

339 माझे मत माझ्या सत्तारुपी अंकुशाने वागते. माझ्या मनाला मायिक पदार्थाकडे न जाण्यासाठी विठ्ठलाची शपथ दिली आहे. भजन बिन तक्रार करते मनाला खरे खोटे कळू लागले आहे. आता संचितातील प्रारब्ध भोगून संपवावे व कोणत्याही क्रियमाण कर्माचे कर्ज घेऊ नये. ब्रह्मस्थितीमध्ये स्वसथ चित्ताने राहू. संसारात समाधान झाले नाही. गावांत लोकाशी प्रेमाने वागावे. जी कांही संपत्ती मिळविली असेल ती भोगावी. त्यात अडथळा येत नाही. भोळा निष्ठावान भक्त असतो तो बदलत नाही त्याच्या स्थितीचा नाश होत नाही यासाठी विठोबाचे सत्य व चांगले नामच कारण आहे. (अ 1292)

340 भक्तिच्या अभिलाषेने भाविक मोक्षाला विसरले. हरी सवभावे भक्तांबरोबर राहतो त्याची सर्व कामे न सांगता करतो. नामरुपी प्रेमामृताने भक्तांची रसना ओलावलेली असते. मनाची वृत्ती हरीच्या पायी असते येथे सर्व मंगलाचा लाभ होतो आणि आनंदजलाची वृष्टी होते. सर्व इंद्रिये ब्रम्हरुप झाली आहेत. ज्याठिकाणी असे भक्त तेथे देव नांदतो. (अ 1344)

341 टाकीचे घाव सहन करुन दगडाचा देव झाला आहे. सतीला सती जाताना अग्नीची परवा नसते. त्याप्रमाणे तू आपले मन दृढ कर. शरीर देवार्पण केले आहे. मला जगाची पर्वा नाही. भय, मोह लाज शंका याचे निरसन झाले आहे.

जळलेल्या वस्त्राची घडी बाहेरुन चांगली दिसते परंतु त्याचा काय उपयोग. माझी इंद्रिये तशी आहे. त्यास ज्ञानाची बाधा झालेली आहे. आशा, तृष्णा, माया सुख दु:ख नाहीसे झालेली आहेत देवा तुझ्यावाचून मला कोणी नाही. (अ 1349)

342 देवा, तुम्ही लक्ष्मीपती आहात मी तर दीन आणि हीन जातीचा आहे. मी अपवित्र ओहोळ, तू पवित्र गंगा आहे. तुझ्या पोटात आश्रय मिळावा आणि माझी वासना आहे ती पूर्ण करावी मी मस्तक तुझ्या चरणावर ठेवले आहे. मी तुमच्या आधारावरच वाटेल तिथे खेळत आहे देवा आम्ही तुमचे नाम घ्यावे आणि तुम्ही आम्हास प्रेम द्यावे असा आपला ठराव झालेला आहे. (अ 1370)

343 भगवंत सर्व ठिकाणी आहे. मी मानसपूजा करीत समाधाने राहीन. ज्यायोगे प्रपंच बंधन राहणार नाही असे साधन करु. पुंडलिका तुझी सेवा धन्य आहे. आई-वडीलांची सेवा केलीस हरीला विटेवर उभे करुन सर्व दीन दुबळ्यांना तारलेस. कांही मागितले नाही. निष्काम भक्तिमार्ग सुरु केला. भगवंताना जे कांही मागत नाही त्याची सेवा करण्यास देव येतो. ज्या भक्ताचे ऋण् झालेले असते. ज्याच्या ठिकाणी एकनिष्ठ भाव आहे तो भक्त देवाचाही देव होतो. (अ 1412)

344 गेलेला काळ कोणता आणि आत्ताचा कोणता हे न जाणता माणूस कसातरी वागू लागला तर त्याची फजिती होते. शहाणी माणसे जो बोध करतील तो मनांत धरावा. सर्व काळात सारखे वागण्याच्या हट्टास बळी पडू नये. जेवणाच्या वेळी मागील ओकलेली आठवण करतो तो मूर्ख होय. एकवेळ देव साहयकर्ता झाला तर अपूर्ण कार्य तो पूर्ण करतो. सतत देवाचे रुपाचेच ध्यान करावे. असे समर्पित हरिभक्तांना वाटते त्याच्या ठिकाणी भगवंताचे वास्तव्य असते. भक्त जगाचे गुणदोष विसरुन जातो. (अ 1571)

345 नामाचा माल आणि नारायणरुपी धन किंमत न देता तुम्ही फुकट घ्या. मन शुध्द करा. निष्काळाजी होण्यासाठी नारायणधनाचा संग्रह करा. दात्याचा थोरपणा याचकावर अवलंबुन असतो. आम्ही तुमचे भक्त नसतो तर तुम्हाला एकट्याला थोरपणा कसा आला असता ? माझ्या सर्व संकटांचा भार तुमच्यावर आहे. मी तुमच्या दासाचा दास आहे. संसाराचे दु:ख संपले आहे. तुझे नाम गातो आणि तुम्ही सांगितले काम करतो हीच सेवा आहे. (अ 1754)

346 देवा मी तुमचा सेवक झालो आहे. तुम्हास देह अर्पण करुन मी देहेंद्रियाच्या कर्जातुन मुक्त झालो आहे. आता माझा हिशोब करा. माझ्या मागची पापे बंद करा. आजपर्यंत स्त्री-पुत्रादिकांच्या सुखाला जीव लावून बसलो. संसार केला. परंतु आता ज्ञानदृष्टीच्या संतानी संसाराचा आणि संसार सुखाचा भ्रमनिरास करुन परमात्म्याच्या शाश्वत सुखाची विश्रांती प्राप्त करुन दिली. (अ 1772)

347 ताकातुन घुसळून काढलेले लोणी सर्वहित करणारे असते. मागे कोणतेही कसर न ठेवता दंडाप्रमाणे साष्टांग नमस्कार करणे हेच तुझ्या प्राप्तीचे सार आहे. संतानी मला समचरणाची खूण सांगितली त्या खुणेला धरुन मी बसलो आहे. माझे चंचल मन स्थिर झाले त्या समचरणापासून हलेनासे झाले. जे समचरणात्मक रुप विटेवर उभे आहे तेच माझा संवयीचे झाले आहे. हरीच्या ठिकाणी एकनिष्ठ भाव जडला आहे. (अ 1778)

348 अनंता तुम्हीच माझे माय-बाप असल्याने प्रपंचाची व जन्ममरणाची चिंता विसरलो आहे. मी काया, वाचा मनाचा विसर देवाला देऊन, आत्माज्ञानरुपी माल घेतला आहे. आत्मसुखाचे धन जतन करण्याकरिता तो आम्हास आणि आम्ही त्याला कधीहि विसर देत नाही. (अ 1876)

349 आपल्या बापाला जीवंतपणी भूक लागली असता भोजन देत नाही. मेल्यावर मात्र पिंडदान देतो. ही शुध्द फसवणूक आहे. ते तयार रुचकर अन्न स्वत: खातो. नांव देवाचे पक्वान्न आपले पोटाचे. देवा मी नित्य करुणा भाकित आहे तुझ्या नामाविषयी विश्वास आहे आणि तोच आधार वाटतो. पंढरीनाथा माझ्याविषयी भेदभाव नसावा वाटतो. पंढरीनाथा माझ्याविषयी भेदभाव नसावा. (अ 1952)

350 पंढरीचा राजा भगवंत आपल्या निर्गुणपणाचा कंटाळा आल्याने सुंदर, कोवळे रुप धारण केले आहे. तो येथे उभा आहे. या सगुण रुपाचे कितीही सेवन केले तरी अंत:करण अवृप्रच राहते. मुक्तिचा घास गोड असला तो या सगुण सुखापुढे कांही नाही. (अ 1993)

351 जे वैष्णव गळ्यांत तुळशीच्या माळा घालतात, अखंड हरिनाम घेतात तेच भवनदी तरुन जातात. केवळ हरिनाम खरे आहे प्रपंच खोटा आहे सर्व शरीर-इंद्रिये हरीविना व्यर्थ आहेत. ज्याच्या अंत:करणात हरीचे चिंतन नाही तो

माणूस जिवंत प्रेत आहे. जर मुखात हरी नाम धारण करशील तर निश्चित वैकुंठास जाशील. जो पैसा, प्राण, जीव देह गोष्टीचा त्याग करतो तो मोह, माया, ममता, चिंता, विषय सर्व जाळून टाकतो तोच हरीला जिंकतो. (अ 1998)

352 अन्न चांगले शिजले की नाही याची ग्वाही हात व दांत देतात. जिभेने कळणार नाही. कस लावला म्हणजे शुध्द, मंद, हीन हे प्रकार कळून येतात. प्रपंचावरील प्रेम परमेश्वराला अर्पण करावे हीच थोर भक्ति भगवंताला आवडते. अनंत आपणास ज्या स्थितीत ठेवतो त्याप्रमाणे राहावे. मनांत समाधान ठेवावे ते बिघडणार नाही याची काळजी घ्यावी सर्व पूर्व संचिताचे फळ आहे. त्यामुळे प्रत्येक प्राणिमात्रास जन्मास यावे लागते देवावर रागावून काय उपयोग भगवंताच्या नामस्मरणाने जन्म-मरणाचे दु:ख विसरुन जावे. (अ 2099)

353 संचित (साठवलेले), प्रारब्ध (भोगतो ते) क्रियमाण (करतो ते) हे सर्व नारायणच झाला आहे. एका देवानेच व्दैत, अव्दैत सर्व व्यापले आहे. विठ्ठलाला रुप नाही, नाम नाही. विठ्ठलाने सर्व चराचर व्यापले आहे. सगुण नाही निर्गुण नाही त्याचे स्वरुप कोण जाणणार ? त्याच्यावर दृढ निष्ठा असल्याशिवाय त्याचे मन आपल्याकडे वळत नाही कळसुत्रि बाहुल्याशिवाय त्याचे मन आपल्याकडे वळत नाही. कळसुत्रि बाहुल्याप्रमाणे तो आपणास नाचवितो. (अ 2149)

354 देवाला जाणण्याचे गुपित (वर्ण) माहित नाही. पण प्रत्यक्ष अनुभव कळत नाही. मैथुनाचे सुख वर्णन करुन कळत नाही. त्याच्या अनुभवानेच कळते. पोकळ शाब्दिक ज्ञानाला आग लागो. विठोाबाच्या सखानुभवाची खूण एखाद्यालाच कळते. देवा तुझ्या प्राप्तीचे गुपित संतानी माझ्या हाती दिलेले आहे. मुखाने तुझे नाम कंठात धारण करीन संपूर्ण माझ्या पोटांत साठवीन भक्तिमुळे आम्ही फार बलशाही आहोत. कलिकाळ आमच्या पाया पडतो. (अ 2174)

355 कस्तुरीचे रुप बाहेरुन मातीसारखे हीन दिसते त्याप्रमाणे भक्ताच्या भक्तीचे मोल आहे ज्याचे मुखी हरिनाम आहे तो धन्य आहे. त्याच्या जातीचा आणि दिसण्याचा संबंध नाही. परमेश्वर दिसतो तसा लहान नाही तो सर्व दिशा व्यापून राहिला आहे तो उत्पत्ती, स्थिती, लय याचा खेळ खेळण्यांत चतुर आहे. त्याची भेट झाली म्हणजे पुन्हा संसाराकडे वळत नाही. (अ 2197)

356 लहानपण विटी-दांडू, चेंडू, लगोऱ्या, जंगी भोवरे खेळण्यात बारा वर्षे गेली. तारण्याच्यागर्वात, बैलाच्या मस्तीत मुसमुसत गेले. कुत्र्याप्रमाणे दारोदार

हिंडण्यात, परस्त्रीकडे पापी दृष्टीने पाहत टवाळी निंदा करण्यात आयुष्य गेले. वृध्दपण निरनिराळे रोग घेऊन आले. म्हातारा मेला का ? म्हणून विचाराला कोणी आले नाही याचा विचार करुन प्रत्येक क्षणी 'राम राम' असे स्मरण चिंतन करा. (अ 2255)

357 अज्ञाने देहाच्या अहंकारामुळे मी बंदीत आलो आहे. हा देह भगवंताचे पायी देऊन संचिताची होळी करुन टाकू मला सर्व लोक देवस्वरुप भासत आहेत. त्यामुळे माझी गुणदोष दृष्टीह नाहीशी झाली आहे. माझे मन देवाच्या लाभाने तृप्त झाले आहे. आहोळ आणि समुद्र भेट झाल्यावर तो वेगळा म्हणून राहत नाही. आमचे सोयरे हरिभक्त आहेत. ते सदैव दरिद्री असतात. ही फार भाग्याची गोष्ट आहे. पांडुरंगावर श्रध्दा असते. भूक तहान विसरुन भगवंताचे चिंतन करतात. (अ 2283)

358 ज्याचे आईबाप सत्ताधीश आहेत म्हणून त्याच्या मुलांना सर्व दिशा खेळण्यास मोकळ्या आहेत, मीसुध्दा तुमच्यापायी सेवा अर्पण केली आहे. मी अभंग रचनेचा खेळ खेळत आहे तो विठ्ठलाच्या चरणाच्या प्रसादाने होय. माझा खेळ नाशवंत नाही. माझा मायबाप विटेवर उभा आहे तो मला कृपादान करतो माझी प्रासादिक वचने निरनिराळी मते त्याचीच आहेत. (अ 2316)

359 भूक पोटापुरतीच असते परंतु त्यासाठी साठवण करतो. त्यामुळे संसाराचा भार वाढून फजिती होते. विहीत कर्माचे विधीपूर्वक सेवन करावे. कारणापुरते काम करावे चित्त वाटू देऊ नये त्यामुळे अधर्माचा त्याग होतो. मनांत भय धरुन शास्त्रवचनाची आज्ञा पाळावी हीच सेवा आहे. पूर्णकर्माचा ठेवा आहे त्याचे रक्षण होते. सर्व भूतमात्राच्या जीवांत श्रीहरी निवास करतो. तो सर्वांचा स्वामी अहे. विश्वास ठेवून जागे रहा. त्याचे चिंतन करणे हेच सर्व धर्माचे गुपित आहे. (अ 2363)

360 जो नदीच्या अलीकडे उभा आहे त्याने अविचाराने एकदम पाण्यात उडी घालू नये. आपल्यापूर्वी ज्या साधनाने काहीजण पाण्यांतून पैलतीरी गेले आहेत. तेच साधन करावे. नसते साहस करु नये. या कामी आळसाची धाड पडली तर तुम्ही वाया जाल मनामध्ये जसा भाव असतो. तसचा देव प्राप्त होतते. असे तुम्ही समजून घ्या. आपण जो छंद लावून घेतो. मनाला त्याचा नाद लागतो. (अ 2372)

361 कळसूत्री बाहुल्याचा सूत्रदार तो जसा नाचवितो तशा त्या नाचतात. तसा मीसुध्दा देवाधित झालो आहे. एकदा अर्पण केल्याचा संकल्प झाल्यावर पुन: परत घेण्याचा विकल्प कसा होईल मी माझा देह देवाला अर्पण केला आहे. आता त्याकडून काय व्हायचे ते होवो ज्या देहाची मी आशा धरली तिच्यामुळे मला फार दु:खसोसावे लागले. ती आशा नष्ट झाली आहे. देहाच्या पोषणाचा भारही आता नाहीसा झाला आहे. चिंता दूर झाली. (अ 2380)

362 तीर्थक्षेत्री देव आणि इतरत्र नाही त्याच्या ज्ञानांत देवाची सर्व व्यापकत्व न कळण्याचा दोष आहे. त्याच्या प्रारब्धामुळे विघ्ने निर्माण होतात. जन्म मृत्यूची परंपरा चालू आहे. मन ज्याच्या हातांत आले आहे. अशा व्यक्तिवर उपदेशाचा परिणाम होतो. आपणच आपले रक्षण करावे इतरांचा संकोच करणे व्यर्थ आहे. अमृता अव्हेर करुन व्यसनाधीन माणसे अफू, गांजा जीवनावाश्यक पदार्थ मानतो. जो खरा आहे त्याचे आचरण खरेपणाचे असते. खोटयाना खरेपणाची सवय लागेल काय ? आम्ही देवावर श्रध्दा ठेवली. त्याने आमच्यावर विश्वास ठेवून भांडार मोकळे केले. (अ 2386)

363 हे सर्व जग विठ्ठल स्वरुप आहे असे जाणलयामुळे माझे मन शांत झाले. तो माझा प्रेमीजन आहे. तो संताचे विसाव्याचे स्थान आहे. तो माझा बाप आहे. त्याला मी माझे दु:ख कष्ट सांगेन माझ्या माहेरी सुखाला काय कमी आहे. बगळा माझासाठी ध्यान लावून बसतो. तसा तू माणसाच्या ठिकाणी लोभ धरतो तसा देवाला शरण जाण्यासाठी का लावत नाही ? पुत्राप्रमाणे देवाच्या ठिकाणी स्नेहभाव का ठेवत नाही. मातापित्याची सेवा करतो तशी देवाची का करत नाही. आयुष्य भक्ति न केल्याने वाया चालले आहे. (अ 2511)

364 माझे माय बाप कृपावंत आहेत परंतु देहाला मी देहासंबंधी ‘माझे’ या भ्रमाने त्याच्या पारमार्थिक स्वरुपाला अंतरलो आहे. परंतु माझी पुर्वपुण्याई दृढ असल्यामुळे माझा भक्तिचा मार्ग चुकू दिला नाही. माझ्याबरोबर मार्गदर्शक योजिला आहे देवाला आपल्या उध्दाराची फार काळजी असल्यामुळे तो अखंड उभा राहतो कधी खाली बसत नाही. (अ 2755)

365 योग्य वेळ साधण्याकरिता माणसाने प्रसंगी आपल्या बुध्दीचे बळ खर्च केले पाहिजे. केव्हा लाभ होईल याचा भरवसा नाही. लाभ होणाऱ्या गोष्टीचेच नियोजन करावे. योग्य वेळी, योग्य नियोजन योग्य प्रयत्नाने लाभ होतो. जसे

हुशार शेतकरी करतो. योग्य वेळी नांगरणे, पाणी घालणे, पाऊस पडल्यानंतर तिफणीने पेरणी करतो. तण काढून पिकाचे रक्षण करतो. भरपूर धान्य निर्माण करतो. (अ 2811)

366 माझा मालक, पालक, चालक जो देव त्याचे हाती पडलो आहे. आता माझ्या पार्थिव देहाची माती चुकली आहे. गाढवासारखे कष्ट प्रपंचात उपासनारा मी संताकडून रक्षिलो गेला आहे. आता प्रपंचाचे ओझे नाही संत दरबारात मी खेळतो. त्यामुळे दुष्ट गोमाश्या गेल्या आहेत. (विकाराच्या) हरीचे दास जेथे राहतात तो गांव धन्य आहे. भक्तिभाग्य त्याठिकाणी आहे, घरोघरी त्या ठिकाणी ब्रम्हज्ञान असते. तेथे हरीनामसंकीर्तन चालते तेथे पापाला, कळीकालाला प्रवेश नाही. (अ 2872)

367 संताच्या दृष्टीने सापाला मारु नये, कारण ईश्वर सापांतही आहे. त्याचे अंत:करण व्यथित होते. अंगावरचा केस उपटला असता सर्व अंग कापते त्याप्रमाणे जीव आणि शिव एकच आहे. कोण्याही जीवाला कोणत्याही स्वरुपाचे दु:ख झालेले त्याना सहन होत नाही सर्वभुते साम्यावस्थेला आलेली असतात. वेद सांगतात कोणत्याही व्यक्तीचा व्देष न करणे यालाच ‘सर्वेश्वराची पूजा म्हणतात. देही बुध्दीच्या भावनेमुळे आपणास भय वाटते. देहबुध्दी नष्ट झाल्यावर श्रीहरीने आम्हास पाठीशी घातल्यावर कशाची चिंता राहील. (अ 2874)

368 साखर कितीही अडचणीत ठेवली तरी मुंगी त्याठिकाणी जाते त्याप्रमाणे अत्यंत अडचणीत भक्तिरसाचे सेवन करु हा आमचा निर्धार आहे. आपणच आपले मोठेपण मिरवणे बरे दिसत नाही. ताक खाते ते मांजर हे त्याच्या हावरेपणावरुन कळते. कोरड्या बोलण्याचा उपयोग नाही. मुळात जिव्हाळ्याची चांगली ओल पाहिजे. शुध्द आचरणापासून आणि आचारापासून न ढळणे चांगले कारण खऱ्यालाच खरे म्हणतात नारायण तयाचा त्राता आहे. (अ 2902)

369 देवा काय जाणावे (शिकावे) काय जाणू नये (शिकू नये) हे मला समजत नाही. याकरिता चित्रांत तुझे पाय साठवावेत, त्यांचे ध्यान करावे. हेच खरे परमार्थाचे वर्म आहे असे मला जाणवते. याकरिता चित्रात प्रेम ठेवून तुझे गुणगान करावे हेच योग्य आहे आणि भाबळाने अंत:करणांत तुला कोंडावे हेच मला बरे वाटते. प्रत्येक जन्मात हीच सेवा मी तुला मागत आहे. (अ 3072)

370 योग, याग, श्रवण, मनन साधने करण्यांत मला भय वाटते. कारण साधने चुकली तर पाप लागते. त्यापेक्षा भाव धरुन जर मुखाने भजन केले तर बसल्या ठिकाणी सर्व हित प्राप्त होते. जे हरीचे दास झाले त्याना गरीबीमुळे दान-धर्म घडत नाही. नामसाधना केल्याने मन स्थिर निश्चल होते. पांडव चौदा वर्षे वनवासी होते पण ते सतत भगवान श्रीकृष्णाचा धांवा करत होते. दारिद्रयाने पछाडलेला सुदाम ब्राम्हण पांडूरंगास विसरला नव्हता. तुझे नांव मुखांत असल्यावर भय कोणाचे असणार ? (अ 3085)

370 तीन लोकांत भगवंताला भक्तापेक्षा दुसरे कोणी आवडत नाही. आपत्याच्या दासाचे अंत:करणात तो राहतो. भक्ताने सर्व भावाने दिलेले सर्व काही त्याला आवडते. तुळशीच्या पानाचे तो सेवन करतो. तो स्वत:ला पूर्णपणाने 'दासांचा' म्हणवून घेतो. जणू भगवान भक्ताला विकला गेला आहे. भक्ताची कामे लक्ष्यपूर्वक करतो. विठ्ठल भक्ति सुखाने बांधला गेला आहे. त्याला भक्ताशिवाय दुसरा धर्म नाही. जे कर्म नारायणाला उद्देशून केले जाते तेच एक शुध्द पुण्य आहे. (अ 3096)

372 बोलल्याप्रमाणे अनुभव नसेल तर त्या ज्ञानाचा काय उपयोग आहे ? संसारातून तरुन जावयाचे असेल तर युक्त आहार चरित्र चांगले असणे जरुरचे आहे. अंगी वैराग्य हवे. नौका पाण्यात सोडली वारा प्रतिकूल असेल तर तो तिच्यावर घाला घालतो त्याचप्रमाणे गर्व माणसाचा प्रपंच बुडवितो. जो आपली बुध्दी स्वाधीन ठेवतो त्यालाच नारायण प्राप्त होतो. पुष्कळ ग्रंथाचे पाठांतर केले हरिप्राप्ती दुरच राहिली आहे. विवेक - वैराग्यविना केलेले श्रम व्यर्थ आहेत. (अ 3156)

373 देहादिक मंथनाचा खटाटोप केवळ लोण्यासाठीच धर्म-अधर्माचे पालन करावे लागते ते केवळ हरि प्राप्तीसाठी धर्माधर्माच्या परिपालनाने हरिप्राप्ती करुन घ्यावी, हरीपासून दूर जाऊ नये हे वर्म लक्षात ठेवावे. आई-बाप स्वत:च्या अपत्याचा घात करत नाही. देवा तूच माझा मायबाप असल्यावर मला संसाराची चिंता नाही. भगवंत तुम्ही कृपाळू आहेस हे मला कळाले आहे. (अ 3163)

374 मी आपले प्राण, शरीर हरिभक्ताला विकले आहे आणि त्यांच्या घरचा आज्ञाधारक झालो आहे ते जे काय सांगतील ते त्वरेने करीन त्याचे उच्छिष्ट आपण होऊन दिले तरच घेईन त्या हरिभक्ताच्या मागून मी चालत जाईन त्याची

पायधुळ मी अंगावर घेईन प्रपंचाची काळजी सोडून प्रेमपूर्वक भक्ति केली त्यामुळे हरीचे अनन्यसाधारण सुख प्राप्त झाले. आम्ही फार सुखी आहोत काळजी आम्हास सोडून गेली. (अ 3180)

375 माझ्या अंत:करणात विठ्ठल जागृतीत, स्वप्नांत सुषुप्रीत राहावा अन्य कांही राज्य, धन, संपत्ती मागण्याची इच्छा नाही. जिभेने तुझे स्मरण करताना माझ्या देहाला सुख व्हावे. तुझे रुप सर्वत्र मला दिसेल असे काही प्रेम मला दे. तुझ्यापायी चित्त राहिल्याचा अनुभव मिळावा. जन्म मरणाची बाधा समूळ तुटून वाणीला हरिगोविंद हाच छंद लागावा दर्शनाने काया पालटते. चैतन्य सर्वत्र कोंदादून भरते. जीव-शीव व्दैताचे खंण्डन होते चिंतनाने भक्त तरून जातो. (अ 3209)

376 'गोविंद गोविंद' असा मनाला छंद लागला तर देह गोविंदरुप होतो. ज्याला जया गोष्टीचे ध्यान लागलेले असते त्याप्रमाणे त्याचे मत होते. म्हणून सर्व गोष्टी बाजूला सारा आणि केवळ एकमेव पांडूरंग मनांत धरा. समचरण विटेवर ठेवून विठ्ठल उभा आहे. तो विश्वात्म आहे. ही त्याची खुण लक्षात ठेवा. तुका म्हणे - तो आकाशापेक्षा मोठा आणि परिमाणूचा गाभा आहे. त्या पांडुरंगाचे ध्यान करा. (अ 3367)

377 सुखा समाधानाने अन्न खावे, पण अंतरी भगवंताचे चिंतन ठेवावे, त्यानेच जीवन जगण्यासाठी दिलेले अन्न त्यास अर्पण करुन आपणास फळ प्राप्त होईल. भगवंत हा विश्वाचा आधार आहे. विश्वाचे भरण पोषण तोच करतो म्हणून याला विश्वंभर म्हणतात. देह म्हणजे मी असा संकोच करु तू लहान झाला. सर्व ब्रम्हांडाचे आपोशन करुन पोटांत साठव, संसाराचे नांवे हात धुवून टाक आणि पारणे फेडून टाक आधीच विलंब झाला आहे अधिक विलंब लावू नकोस. देहाचे घरकुलात असल्यामुळे तुझा जीव कासावीस झाला. बापाने भक्तिचा खाऊ दिला तो आनंदाने खेळत खा. (अ 3370)

378 बीजाच्या पोटांत फळ असते. तसेच ते झाडाला येते. स्वामीनी केलेले आज्ञेप्रमाणे सेवकाने वागावे. तेथे टाळाटाळ आणि तिरस्कार करु नये, आपले चित्त भंगले देऊ नये पुन्हा जोडता येत नाही. काजवा आपल्या प्रकाशाने सूर्याला कशी वाट दाखवेल त्याने आपल्या मार्गाने जावे, तुका म्हणे - ज्ञानीने सांगितलेली

हरिभक्ती व अव्दैत तत्वज्ञान साधकाने ऐकावे परंतु भेदरुपी वळीवाच्या पावसाने हरिभक्तीचा सुगंध भिजू देऊ नये. (अ 3378)

379 अरे माणसा, तू आपल्या जीवनांत असे कर की राम तुझ्या घरी येईल. तू तुझा धंदा विषय वासना सर्व सोडून दे. तू आपल्या निजस्वरुपास विसरला नसलास तर जन्म-मरणाचे असंख्य फेरे करावे लागले नसते. तुझ्या आंत एक भावना आणि वाणीत भाव वेगळाच असेल ते लोकाना समजत नाही. अंतर्यामी राम सर्व जाणतो. प्रभुराम विश्वांत सर्वत्र भरला आहे. त्यावाचून कोणतीही जागा शिल्लक नाही. ज्याचे मन रामाकडे लागले आहे त्याच्या पायांच्या ठिकाणी माझे मन आहे. (अ 3470)

380 जन हो तुम्ही 'राम राम' म्हणा हे नाम जप तुमच्या जीवनाचे खरे फळ आहे. यासाठी रामभजनाला विलंब लावू नका, कोणाचे घर, कोणाची झोपडी, एका रामावाचून सर्व फुकट आहे. कोणाचा देह, कोणाचे संतान, स्त्री एका रामावाचून सर्व नष्ट होणार आहे. एका रामावाचून सर्व सत्य काही नाही, इतर सर्व जाणार आहे. अरे बाबा, मानवी जीवनाला घातक अशा धन, संपत्तीला कां बरे भुललास ? अरे बाबा, राम नाम गा आणि तेच ऐक.(अ 3476)

381 अंतर भगवे झाले नाही तोपर्यंत बाहेरचे भगवे वस्त्र घेऊन काय करायचे ? अंत:काळापर्यंत शरीर बाहेरुन धुतले, तरी देखील अंत:करणातील मळ कसा जाईल ? मना त राम नाम म्हण दुसऱ्याचे यांत काही काम नाही. लोभ माणसाचे प्रेम धनावर असते. आईच्या चित्तात मुलाचे ध्यान असते. तुकोबा रायाच्या चित्तात राम राहतो. (अ 3483)

382 वाटेवरुन चालताना 'रामनाम' घेतो त्याला प्रत्येक पावलाबरोबर यज्ञ केल्याचे पुण्य प्राप्त होते. त्याचे शरीर तीर्थव्रते याचे माहेरघर आहे. जो उद्योगधंदा करीत असताना राम नामाचा उच्चार करील त्याला अखंड सुखाची समाधी प्राप्त होते. जेवणाच्या प्रत्येक घासाबरोबर 'श्रीराम' म्हणतो तो जेवूनसुध्दा उपवासी समजावा. विषय भोगतना किंवा त्याग करताना 'श्री राम नाम' म्हणतो त्याला कर्माचा लेप लागत नाही. जो अखंड जप करतो तो जीवंतपणीच मुक्त आहे. (अ 3667)

383 वनवासातील रामाचे सतत चिंतन करणाऱ्या कौशल्या माऊलीस श्रीरामानी रामरुप केले. ज्ञानांत, ध्यानांत, स्मरणांत राम असेल तर तो निश्चितच

रामरुप होतो यांत संशय नाही. अयोध्येतील प्रजाजनांना रामाचा ध्यास होता. त्यांना रामाने भेटीच्या समयी रामरुप केले. लंकेतील रावणाशी सर्व राक्षस भीतीने रामाचे ध्यान करीत होते म्हणून ते रामरुप झाले. (अ 3675)

384 हरिभक्तीसाठी अर्धी दमडीदेखील द्रव्य खर्च करावे लागत नाही. केवळ भक्तिभावाची गरज आहे. नारायण हा अनन्य भक्तांची इच्छा धरतो. तो रंक असला तरी त्याला आपल्यासारखे ब्रम्हरुप करतो. वेदनिषिध्द आचरण करणारे सार्वभौम राजे असले तरी यमाच्या घरी शिक्षा भोगून रंक होतात. अभिमानाचा तिळाएवढा दोष असला तरी हरीची प्राप्ती होत नाही. भक्ताच्या मनांत तिळमात्र अभिमान असला तरी देवाला तो मेरु पर्वताएवढा भारभूत वाटतो. दुष्ट, दुराचारी लोक देवाला जड वाटतात. जे श्रध्दा, भक्तिमुक्त प्रेमाने भजन करत नाहीत त्यांना यमधर्म शासन करतो. तुका म्हणे जे नाम संकीर्तन करतात त्याना वैकुंठात निवास्थान मिळते. (अ 3841)

385 एका पांडुरंगाशिवाय कांही जाणू नये याबाबत धरलो असता तो जन्म मरणाच्या आपणास फेऱ्यात अडकलो आणि त्याला भ्रम होतात. जो नारायणाची आपणास आठवण करुन देतो तोच दाता आहे असे समजावे. मागणाराची मागाण्याची हाव संपत नाही. अशी नाशवंत वस्तु घेऊन काय करावयाचे आहे ? जे सुपंथ दाखवितात, त्याच्यापुढे काकुळती करावी. ज्याच्या देण्यामुळे अंत:करणात वासना राहत नाहीत त्याचे उपकार खरे आहेत. (अ 3950)

386 सोऱ्या (स्वैरिणी) बायांनो, डोळ्यांत ज्ञानाचे काजळ घाला. हरिविषयक स्नेहरुपी तेल लावा. पश्तापाच्या कंगव्याने अंत:करणातील विकार विंचरुन बुध्दीची वेणी चांगली बांधा आणि पंढरीच्या पारमार्थिक बाजारात नाचायलास चला. आतांच संतरुपी दिवाण दारी येऊन गेले आणि ते पारावर बसले आहेत. त्याच्यापुढे निर्लज्जपणाने नाचू या. साहेबाचे आपल्यावर ज्ञानदानाचे कर्ज आहे. आपला धनी पांडुरंग याचेपुढे सर्वजणी नाचुया, सेवा करुया, चिंता माया तोडूया त्याला सांगून मुळ ठिकाणी जाऊया. (अ 4013)

387 आशीर्वाद - प्रार्थना - जीवावर उदार होऊन प्रयत्न करावयाचा त्यालाच बळकट प्रयत्न म्हणतात असा बळकट प्रयत्न असेल तर भवनदीच्या पैलतीरावर जाण्यांत कांही संदेश उरणार नाही. श्री पांडुरंगावर विश्वास ठेवणाऱ्याची जाती धन्य होय, तेथे भगवंताची वस्ती असते. खरोखर देव भोळ्या भक्तांच्या स्वाधीन

(अंकित) असतो. ज्याच्याजवळ भक्तिधन आहे त्या भाग्यवान जीवांना नमस्कार असो. (अ 4029)

388 शब्दांच्या रत्नाचे अलंकार करुन त्यांनी विश्वभराची पूजा केली. पूजेसाठी भक्ति, ज्ञान, वैराग्य व्याकरण शब्दाची सुमने चरणी वाहिली नवविधा भक्तिभावाच्या उपचाराचे भोजन करुन नारायणास जेवू घातले. हात धुण्यासाठी संसाराचे पाणी त्याच्या हातावर घातले. मुखशुध्दीकरता सात्विक मन दिले. हरीच्या रंगाने रंगलेली इंद्रिये देवाला सुगंधी विडे म्हणून दिले. डोक्यावर तुळसी दल अर्पण केले ऐक्य भावाच्या दीपाचे निरांजन केले आणि भगवंतास देहाचे आसन दिले. देवाला हृदयाच्या माजघरात झोपवले. (अ 4053)

389 आजपर्यंत सर्व जन्म विषयसुखाचीच आशा करण्यांत गेला. एक क्षणदेखील मोक्षाकरितां प्रयत्न केला नाही अनेक योनीत फिरुन माझा जीव दमून गेला आहे, कारण माझ्या जीवाला अनादि मायेने ग्रासले आहे. माझे हित कोणीच जाणत नाही. माझ्यावाचून इतर कोणी काही करु शकत नाही. माझे प्रारब्ध कोणालाच समजत नाही. हे नारायणा, गर्भातील यातना भोगताना मला किती यातना होत आहेत म्हणून सांगू ? येथे घाणीशिवाय काहीच नसते. तेथे क्षणाक्षणाला तुला आठवत होतो, केशवा तुझी चरणसेवा मजकडून घडेल असे कर. (अ 4068)

390 देवा, आम्ही भक्ति कशी करावी ? कारण सर्वत्र तु आहेस, तर तुला काय अर्पण करावे ? शब्द, स्पर्श, गंध, रुप, रस या पंचविषयांत, सर्व खाण्याच्या पदार्थात, सर्‌व जीवांत तुझीच व्याप्ती आहे. तुझ्या प्राप्तीसाठी सर्व इंद्रियाचा निग्रह कसा करु, कोणते व्रत, कोणते अनुष्ठान करु ? कारण सर्वत्र तू भरला आहे. कोणता जप, मंत्र, करु न कळणारा असा तू आहेस. तुका महणे तुझी सहस्त्रनामे घेऊन पूजा, अर्चा, मंत्र, माळ, धुप-दीप नैवेद्‌य फळ, तांबल ही सर्व पुष्पांजली वाहतो. (अ 4112)

391 श्रीहरीचे मुख डोळ्यासमोर उभे राहिले, विविध ताप जातात. भवरोगासारखे दु:ख हरण होते. सुख उत्पन्न होते. तो सखोल कृपेची खाण आहे. त्याचे गुण वर्णन करताना वेद अपुरे पडतात. तो हा समचरणांचा कृपासागर विटेवर उभा आहे. गुणगंभीर, चतुर, ज्ञाता, शूर, वीर उदार असा नारायण आहे. त्रिभुवनाला त्याने व्यापून टाकले आहे. त्याचे लावण्य मन मोहून टाकणारे आहे.

तरी सर्व भक्तांसाठी कमरेवर हात ठेवून तो उभा आहे. त्याची चरणसेवा करा. (अ 4117)

392 देवा, तुझ्या चरणाचा वियोग होऊ नये. कृपा करा. यासाठी इहलोकीचे ऐश्वर्य आणि अष्टसिध्दी याची इच्छा नाही. तशी बुध्दी मला देवू नको. तू माझा धनी व मी तुझा सेवक यांत अंतर आणू नको. हे भगवंता तुला वाटेल त्या कुळांत हव्या ठिकाणी जन्म दे. परंतु माझ्या अंतकरणांतून जाऊ नकोस, तुझ्या दारात सेवक राहीन आणि माझी वाणी तुझे नाम गायन करेल असे तू कर. तू दानशूर आहेस. (अ 4120)

393 सावळे सुंदर रुप दृष्टीसमोर दूर होऊ नये असे कांही तरी माझ्या मना तू कर. विठाईच्या पायी तू तेथे स्थिर रहा. ज्याच्या मनांत पांडुरंग नाही अशा अभक्ताची संगत करु नकोस. पांडुरंगास प्राण सखा करण्याइतकी श्रेष्ठ भक्ति माझ्या मना कर. अरे भक्तिविना स्वत: रिकामा राहिला तर कसे होइल म्हणून रडत राहशील अंगात ज्ञानीपणाचा गर्व असेल तर भक्तिसुखाच्या सागरांत प्रवेश होत नाही. (क्षेपक अ 13)

394 पुराण सांगणाऱ्या पंडिता, तुला स्वत:ची ओळख नाही ढीगभर पोथ्या वाचून काढल्यास परंतु त्यातील मतार्थ जाणत नाही. तुका म्हणे तुका कुणबी शास्त्र जाणीत नाही. परंतु पंढरीनाथाला क्षणभरही विसरत नाही. गुरुच्या मुखातून ब्रम्हज्ञान प्राप्त होईल. परंतु विठोबाच्या प्रेमाची खुण समजायला अंत:करणात भक्तिच पाहिजे. भक्ति धन अपार आहे या धनाला अंतपार नाही. चारही वाणी याच्रा वर्णनास कुंठीत झाल्या आहेत. (क्षे.अ.45)

395 तुझ्या स्वरुपाचे रहस्य संताच्या मुखातून आम्हाला कळले चैतन्यरुपाने व्यापार करणारा तू एकमात्र आहेस बाकी हा मायेचा पसारा व्यर्थ आहे. चित्ताला भ्रमित करणारी देहबुध्दि नाशवंत आहे. तुझे रुप पाहताना माझ्या जीवाला जे सुख झाले आहे देवा, ते काय वाणीने वर्णावे नारायणा खरोखरच ही माझी अनेक जन्माची पुण्याई असावी. योगाचा मी अभ्यास करीत असतानाहि मला तुझ्या रुपाचा निजध्यास होता. आम्ही भक्त हरीच्या कीर्तीचे भक्तगीत गात राहू. (क्षे.अ.86)

396 दहा,वीस,पन्नास,साठ शतक सहस्त्र किंवा लक्ष, कोटी वेळा तुझे नाम घेतले परंतु त्यामध्ये श्रध्दा, भक्ति नसेल तर ते सफल होत नाही.

पंढरीनाथा तुझे नाम भक्तिविना घेणे केवळ भ्रमच आहे हे मानवा तू मृत्युलोकात दोन दिवसाचाच पाहुण आहेस हे विसरुन गर्वानी चालू नकोस किंवा सतत दु:खी राहू नकोस, नारायणची भक्ति कर, जीवन अल्प आहे. तुका महणे यासाठी सत्वर भक्तिमार्गाला लागा. (क्षे.अ.92)

397 आपले म्हणविणारे सोयरे-धायरे हे दिल्याघेतल्याचे आहेस. त्यांचे नाते व्यवहाराचे आहे ते अंत:काळी काही उपयोगाचे नाहीत. सख्या गोत्रातील बहिणीदेखील केवळ सुखाच्या सोबतिणी असतात. एवढेच काय ज्यावर आपले प्रेम आहे. तो देह शरीर आपल्याला पारखे होतो. ते जर आपणापासून वेगळे होत असेल तर त्यात आश्चर्य कोणते. कारण हा देह देणारा वेगळाच आहे. तुका म्हणे या गोष्टी विषयीचे आकर्षण आणि आपलेपणा सोडून दे आणि भगवान पांडुरंगाचे पाय धर. (क्षे.अ.313)

398 संचिताप्रमाणे माणसास बुध्दि होते, मनांत तसे विचार येतात. ज्याचे जसे संचित असेल तो त्याप्रमाणे जीवनांत धावतो. सांगून उपदेश करुन त्यात फरक पडत नाही. आपल्या संचित क्रियाकर्माप्रमाणे गुण-अवगुण निर्माण होतात, संताच्या कृपेमुळेच भागवत धर्माचे मंदीर उभारले गेले या धर्ममंदीराचा पाया ज्ञानदेवाने घातला आणि त्यांनी हे देवालय उभे केले संत नामदेव हा त्याचा किंकर असुन त्याने याचा विस्तार केला संत एकनाथ खंब ध्वजा आहे आणि संत तुकाराम कळस आहे. (क्षे.अ.316)

399 अंतरीची खूण पाहून माझी वृत्ती स्थिरावली आणि प्राण पांगुळला माझे नेत्र पुंजाळले आणि कंठ दाटून आला. आपल्या स्वरुपी मत स्थिरावले ते बाहेर येण्यास तयार होईना. अमृतयोगच आला चंद्र-सूर्याच्या दर्शनाने सर्व गोष्टीमुळे माझ्या अंत:करणात आनंद दाटून आला. तुका म्हणे आनंदाने मी आपल्या ठिकाणी स्थिरावली. (क्षे.अ.324)

हे 400 दवा, तुम्हास राम, कृष्ण, गोविंद, नारायण, हरी नावांनी संबोधतात. तुझ्या नामांत अखंड प्रेम प्राप्त होते. तप, व्रत, दान इत्यादीची आवश्यकता नाही. ज्याचे जसे संचित असेल तसे ते त्याच्या पदरात राम नाम पडेल. ज्याच्या मुखातून रामनाम सदैव येते तो प्रपंचात धन्य आहे. ज्याची वाचा रामनाम घेते त्याच्या अंकीत काळ रहातो तुका म्हणे - रामनामांत आम्ही कृतकर्त्य झालो कृतार्थ झालो.(क्षे.अ.353)



# 5. संत महिमा, उपदेश

401 जीवनांत सुख अत्यंत अल्प आहे. दु:ख मात्र पर्वताएवढे आहे हा अनुभव आहे. तू संताचे वचन प्रमाण मान व आठवण ठेव. आयुष्य झोपण्यांत निम्मे, बालपणात 12 वर्षे, तारण्यात, म्हातारपणांत व रोगांत जातात. देह व्यर्थ जावून जन्म मरणाच्या फेऱ्या सुरु होतात. (अ 63)

402 तीर्थ म्हणजे पाणी आणि देव म्हणजे धोंडा दिसत आहे. संत सज्जन हेच देव. त्याला शरण जावा. देव प्राप्त होईल. निष्पाप होऊन विविध ताप मिटेल. (89)

403 संताचा आदर न करता जो देवपूजा करतो ते व्यर्थ होय. भूकेलेला अन्न देत नाही आणि देवाला पुरणपोळीचा नैवेद्य करतो ते देवाला आवडत नाही. खऱ्या देवाला न समजता भेदबुध्दिने सेवा करणे म्हणजे देवास शासन केल्यासारखे आहे. देवाप्रमाणे भक्ताची पूजा करावे ते देवास आवडते. (अ 145)

404 विश्व ब्रम्हरुप आहे ब्रम्हावाचून एकही स्थान नाही. सर्व प्रकाराच्या देवमूर्तीमध्ये देव का असणार नाही ? संत श्रध्देचे अनुभवाने बोलतात. कांही विरक्तपणे साधुवेश घेतात तर कांही पोटासाठी दोघे सारखे दिसतात पण दोघाना भिन्न प्रकारची फळे मिळतात. (अ 167)

405 समाधानी वृत्ती ही साधुत्वाची ओळख आहे नीतिने वागणाऱ्या साधूच्या पायावर माझे डोके असावे. ब्रम्हस्थलावर गरीब श्रीमंत असा भेदभव नाही. भ्रमित अवस्थेतून संतानी मला जागे केले. (अ 192)

406 समाधानी वृत्ती ही साधुत्वाची ओळख आहे. साधुत्वाने वागण्याचीही नीती आहे. सहजपणाने प्रसंग घडतात तसे तुम्ही वागले पाहिजे. ब्रम्ह स्थानावर गरीब श्रीमंत भेदभाव नाही. अविद्येतून जागे झाल्यावर ज्ञानाचे डोळे उघडतात, भ्रम अवस्थेतून संतजन जागे करतात. (अ 196)

407 सतत समबुध्दी, आस्तिक्य बुध्दी, भूतदया भेदबुध्दी नसणे. शत्रू मित्र, पुत्र आणि बंधू याच्या बद्दल समभावना काया, वाचा, मन, बुध्दी यांत शुध्दता असावी. मान-अपमान, मोह, आसक्ती हे सर्व खोटे मानावे. आहे त्या परिस्थितीत समाधान मानावे. अशा लोकाना साधू सर्वकाळ भेटतात. (अ 199)

408 जो प्रपंच्या त्रासाने दु:खी आहेत पिडलेले आहेत, सुखी आहेत, याना जो आपले मानतो. त्या ठिकाणी साधुत्व आहे. देव आहे असे मानतो. जो निराधारास आपल्या अंत:करणांत थारा देतो. सर्वावर दया दाखवितो. तो साक्षात भगवानची मूर्ती समजावी. (अ 201)

409 जे द्रव्य, राज्य, मान मिळविण्यासाठी दांभिक कार्य करतात ते संत नव्हेत. ते ब्रम्हज्ञानाविषयी अज्ञान आहेत. शब्दांचा भार वाहणारे ढोंगी आहेत. जे संकट प्रसंगी शांत असतात जयाचे मन अस्थिर होत नाही ते संत होत. (अ 251)

410 मण्यास सूत गुंडाळून अग्नीत टाकला असता त्याच्या सहवासाने सूत जळत नाही. ही प्रसिध्द गोष्ट आहे. भगवंत व भक्त एकरुप झाल्यास त्याचे

स्वरुप नाश पावत नाही. मनुष्य कितीही अधम असला तरी संतसंगती व भक्तिमुळे तरला जातो. (अ 471)

411 विश्वभराचा शोध लागत नाही. तो अणुरेपेक्षांही सुक्ष्म असून त्याच्या स्थूलपणाला उपमा नाही. श्रुतिसुध्दा नेति नेति म्हणून शरण आल्या. अगणित ब्रम्हांडे त्याच्यांत समावली आहेत. आकाश तर एका कीटकासारखे त्याच्यांत आहे. तुम्ही संताना शरण जा त्यामुळे तुम्हाला विश्वंभराचा शोध लागेल मग तुमची जीवदशा कशी राहील. (अ 313)

412 देवाची कथा ऐकतो पण हरीप्रेमाचे नाटक करतो. मनांत पापकर्म करण्याचे असते. भोदु मुद्रा लावतो, सोंग करतो व योगशास्त्रात प्रवीण असल्याचे नाटक करतो. गोसाव्याचे सोंग घेऊन परस्त्री व परधनावर लक्ष्य ठेवतो. कीर्तनात हरिप्रेमचेसाठी रडतो पडतो मायावी ढोंग करतो. त्याच्याजवळ देव कधीच राहत नाही. (अ 403)

413 मनुष्य विषयाच्या दारात भीक मागतो. संतभेटीमुळे विषयाचे खरे स्वरुन कळते. तो त्याचा त्याग करतो. मनुष्य देहामुळे संतदर्शनाचा लाभ झाला समाधान पावला. तुका म्हणे माझ्या भाग्याने संताची भेट झाली मी परमार्थाचा आश्रय घेतला तो सफल झाला. संत प्रसादारने मला समाधान मिळाले त्याला उपमा नाही. (अ 447)

414 माझे भाग्य उदयास आले संपूर्ण चिंता नाहीसी झाली मला पद्‌यनाम विष्णूच्या भेटीचा योग आला तो केवळ संताच्या दर्शनामुळेच. माझ्या ठिकाणी देवरूपी साठा मुळचाच होता. तो अज्ञान होता. संतावरील दृढ विश्वासामुळे मला तो सांपडला. (अ 449)

415 समर्थ संतानी काळाच्या डोक्यावर पाय ठेवून तुझे स्थान मिळविले. असे संत हे सर्व शूरांतील शूर असून धैर्याने केवळ सागरच आहेत. हाच वडीलकीचा वाटा आम्हास मिळावा. त्या स्थानाला आम्हास नेऊन सोडावे. आमचे लाड पूर्ण करावे. (अ 527)

416 देवा आमच्या अंत:करणातील आशा, तृष्णा, मोह चिंता या सर्वांना दूर कर. अशी संत संगत दे की ज्याच्या घरी मी राहिलो असता कळीकाळाचा हात पोहचणार नाही. (अ 535)

417 संतदर्शनामुळे आजचा दिवस धन्य आहे. त्या योगाने ताप आणि त्रिविध ताप नाश झाला व दैन्य तत्क्षणीच गेले. संताच्या चरणाजवळ मन विश्रांती पावल्याने समाधान झाले. तुका म्हणे ज्यादिवशी संत घरी येतात तोच दिवाळी दसरा मानावा. (अ 592)

418 भगवंता तुझी ज्यांना आवड आहे त्याची संगती सर्वकाळ मला दे, संताच्या पायापाशी पडून राहीन संत संगतीमुळे मला आनंद होईल मी तुला काहीही मागणार नाही. तुमचा त्रास वाचेल. माझी उपेक्षा करु नका. (अ 635)

419 निर्गुण ब्रम्हज्ञान समजण्याची माझी योग्यता नाही. तेव्हां संतजनानी देवाच्या सगुण रुपाच्या दर्शनाचा हट्ट पुरवावा कितीही विव्दान शब्दज्ञानी असला तरी त्याला संतमहिमा कळणार नाही. स्वत: संतत्व प्राप्त केल्यावरच संताची महती कळते. तुका महणे जिवाचे ममत्व सोडून हरीला सर्वस्व अर्पण केले तरच संतपण मिळते. (अ 677)

420 हे मना संताचीच भेट घे कारण संताचे सर्व भावनाचा देवच भांडवल आहे. मना संताचीच संगत कर, संताच्याच मेळाव्यात बस दुसरी बुध्दी धरु नकोस. मना संताच्याच गावी जा तेथे निरंतन समाधान मिळेल. (अ 712)

421 संत संगतीचे सुख भगवंताला झाले म्हणून तो त्याची सेवा करतो. निर्गुण देव साकार होऊन संताची पूजा करतो व त्याना नमस्कार करतो अन्य जिवाची पापे नाश केल्यामुळे तीर्थे अपवित्र झाली आहेत ती पवित्र होण्याकरिता संतचरण स्पर्शाची इच्छा करतात असा संताचा अधिकार आहे तुका म्हणे संत बलवानाचे शिरोमणी आहेत. त्याचे विठ्ठचरणी कायम वास्तव्य असते. (अ 714)

422 देव अरुप असूनही रुप धारण करतात हे अनुभवी संत जाणतात. सूर्य, दिवा आणि हिरा हे दृश्य पदार्थ उजेडात आणतात पण सत न पहावयास मिळणारे विठोबाचे दर्शन करुन देतात. चंदन शीतलता आणते पण त्रिगुणाची बाधा दूर करता येत नाही ते संतांच्या वचनाने होते. म्हणून त्यानी बोलविल्याशिवाय श्रध्देने मुद्दाम त्याचेकडे जावे. (अ 722)

423 आपले घर, पैसा व स्वदेह या सर्वांचा वीट मानावा. वनांत झाडाची आणि श्वापदाची भेट घ्यावी, देह मी आणि देहासंबंधीचे नातेवाईक माझे असे शब्दसुध्दा तोडांत येऊ नयेत. अशी ज्याची स्थिती असेल तो खरा संत समजावा. (अ 755)

424 संताची कीर्ती वर्णन करण्यास माझी वाणी अपुरी आहे. परिस मोठेपणा न मानता लोखंडाचे सोने करतो. संत सर्वाचा स्विकार करताना संताचे अवतार लोकाच्या कल्याणासाठी, हीनासाठी असतात. ते आपला देह परोपकारात झिजवतात. भूतदया करणे हे संताचे भांडवल आहे. त्यांना आपल्या देहाचे प्रेम नाही. संत लोकाच्या सुखाने सुखी होतात. त्याची वाणी मधुर व सत्य असते व सतत नामाचा घोष करत असते. (अ 954)

425 जो परद्रव्य चोरतो, परस्त्रीचा भोग घेतो त्याच्या सर्व भाग्याचा ऱ्हास होऊ लागतो. तीन वर्षात त्याचा सर्वनाश होतो. चोरी केली व्यभिचार केला त्याचे वाईट फळ भोगावेच लागणार आपले संचित आहे तसे भोगावे लागणार त्यास उपाय नाही. जो समर्थाच्या विरुध्द बडबड करतो त्याची प्रत्येकाकडून फजिती होते. (अ 1044)

426 हे भगवंता माझे मन अत्यंत चंचल आहे. स्थिर नाही तुम्ही त्याला लगाम घाला. इंद्रिये विषयाकडे ओढ घेतात, माझ्या चित्ताची ओढाताण करतात. हे नारायण त्याला आडविण्याकरिता धांवत ये. कृपा करुन माझ्या मनाचा निग्रह कर. संतच मायबाप आहेत घरी माहेरी यावे हीच सर्वकाळ इच्छा आहे. देवानी माझ्या प्रारब्धाचा प्रतिबंध सारुन संताच्या भेटीची इच्छा पूर्ण करावी. (अ 1139)

427 प्रेमळ आई कोणत्याही लाभाची अपेक्षा न करता बाळावर प्रेम करीत असते. या प्रेमाची जात विलक्षण असते. मुलाच्या योगक्षेमाचे ओझे आईवर असते. लोक आमचा छळ करतात यावरुन असे वाटते की आमचा रक्षक नारायण मेला आहे काय ? आम्ही मुले अनाथ दरिद्री झालेली आहोत याची लाज देवास नाही. तुका म्हणे रक्षण नाही देवापासून सर्व देश ओस झाला आहे असे मला वाटते. कृपाळू संताचे चरण माझ्या अंत:करणात ठेवले आहेत. आता मला कोणाचे भय वाटत नाही. (अ 1142)

428 मनाला बंधनात घातले निग्रह केला ते चडपडते आणि भलत्याच निषिध्द विषयांत रस घेते. मनाला नामसंकीर्तन किंवा श्रवण आवडत नाही. मन अत्यंत चंचल आहे. देवा मनाच्या दोषापासून माझे रक्षण करा. देवालयास घर म्हणू नये. विधिपूर्वक ऋतूकाळी स्वस्त्रिशी गमन करणे यास काम म्हणू नये, निष्काम कर्माला 'कर्म' म्हणू नये संताच्या ठिकाणी निष्ठा ठेवून प्रथम चित्ताची शुध्दी करा. संतावर विश्वास ठेवून देवाला जवळ आणा. (अ 1237)

429 दुसऱ्याचे आणलेले सुवर्ण अलंकार वापरल्याने चेष्टा, उपहासाचा विषय होतो. मागून आणलेल्या संपत्तीने प्रतिष्ठा मिळत नाही. देवा संतामुळेच तुझ्याशी बोलणे शक्य झाले, भक्ताच्या जबाबदारीचा भार संतावर घालतोस, तू लबाड आहेस, परंतु मी व्यापारी आहे. देवा तू आपल्या हाताने देशील तेच खरे आहे. मी तेच उपभोग घेईन. देव फारच उदार आहे. अल्प सेवेत मोबदला विपुल देतो. देव चांगला आहे म्हणून मी त्याच्या चरणी आलो आहे. (अ 1262)

430 मी इतराचे दोष कशाकरिता पांहू ? माझ्याजवळ ते काय कमी आहे मी दुसऱ्याचे पापपुण्य, खोटेपणा, दुष्टपणा कां पाहू तो माझ्याकडे जास्तच आहे. सर्व दोषाचे भांडवल तुझ्या चरणी अर्पण करीत आहे. दुष्ट लोक सज्जनाचे भूषण असतात कारण ते त्यांची निंदा करतात. तेव्हा सज्जनाचे पाप त्याच्याकडे व त्यांचे पुण्य सज्जनाकडे येते अशा दुष्टाचा आदर करावा. (अ 1347)

431 विश्वामध्ये विश्वभर भरुन राहिलेला आहे त्याच्यावाचून मी कोणहि सिध्द साधक, मूर्ख म्हणणार नाही. वर्णाचा अभिमान टाकून सर्वाभूती भगवंत आहे अशा भावनेने तुझे भजन घडावे. माया चिंता आशा याचे पाश तोडून टाक. जे अग्नीत पडते ते अग्नीरुप होऊन जाते. त्या पदार्थाचे नाम गुण उरत नाहीत. नदी, नाले ओघ सर्व गंगेला मिळाल्यावर सर्व गंगारुप होतात. संत सहवासांत श्री हरीच्या प्रेमाचे सेवन घडेल. सर्व दु:खे नष्ट होतील. (अ 1361)

432 संतचरणाचे महत्व काय आहे याचा अनुभव मला आलेला आहे. दु:ख संपले मी सुखी झालो. चरणावरी निर्माल्य तुळशीपत्र व तीर्थ यांच्या सेवनाने श्रेष्ठत्वमला अनुभवास आले आहे. सर्व भक्ताचे कसलेही कामे देव करतो. भक्ताचे हीत करणे हेच त्याचे काम आहे. संकटातून सोडवून मनाचे समाधान करतो. नारायणाच्या नामाने कामक्रोधादी नाहीसे होतात. त्याच्या चिंतनाने प्रपंचातील कष्टाचा निरास होतो ह्या श्रध्दामय मार्गात तर्क वितर्क करु नका. पाडुरंगाचे आम्ही दास असो. चित्तात सदैव पांडुरंग खेरीज कांही नको. (अ 1393)

433 पांडुरंगाच्या चरणी मी माझा जीवभाव अर्पण केलेला आहे. कोणत्याही गोष्टीची चिंता नाही. विठ्ठलाचे नाम संताचे संगतीने वाणीने गाऊ. त्यामुळे चित्तशुध्दी होऊन पुण्याचा लाभ होइल संसार बंधन तुटतील, पांडुरंगाच्या कृपेने दु:खाचे हरण होते व इतर पुष्कळ फळे मिळतात, कथा पाप नष्ट करते. भक्तउध्दारक आहे. मूढ लोकांची समाधी लागते. कथा म्हणजे एक महामंत्राचा

जप आहे. भक्त कथा करीत असताना भगवंताचेही ध्यान समाधी लागते. (अ 1463)

434 संताचे बोलणे हेच आज्ञा असते. तसे वागावे. तोंडात हरीनाम नसणे ते तोंड घाण असे. डोक्याची फुले गुडघ्याला बांधणे मुर्खपणा होय. जो आपल्या वाहनाची पूजा करतो त्यास शहाणे कसे म्हणावे देवाखेरीज इतराची पूजा करणे म्हणजे वेश्येला सुवासिनी म्हणण्यासारखे आहे. कुत्र्यासारखे ज्याचे आयुष्य आहे त्याची संगत करु नये. दुष्टाचे वर्तन कुत्र्याप्रमाणे असते. दुष्ट स्वतःहुन अवगुण त्यागत नाही. पण उपदेश केला तर तो चिडतो. वाळलेल्या झाडास अंकुर फुटत नाही. (अ 1512)

444 माझी इच्छा राक्षसीणच माझ्या मागे लागली आहे. विषयभोगात कितीही आयुष्य गेले तरी वासना जशीच्या तशी जिवंत राहते. भगवंता मला सोडवा तुमच्या स्वरुपात माझे स्वरुप लपवा इच्छेचे पारतंत्र नाहीसे करा म्हणजे तिची बाधा होणार नाही. देवा मला प्रपंचाचे भय वाटते. मी मोहाने बध्द आहे चरफडत आहे. जो वाईट खातो त्यास अमृत आवडत नाही वाईटाचे वाईटच मित्र असतात. सज्जन दुरावला जातात. दुष्ट कर्माची फळे भोगत आहेत. आम्ही देहाची उपेक्षा केली आहे. प्रपंच टाकला आहे. मी आणि माझे बाजूस सारुन देवाचे चिंतन करत आहे. (अ 1521)

445 संतसंगतीत भगवंताचे वास्तव्य असते. संतानी कळिकालावर विजय मिळविलेला असतो. त्याला बाहेर घालून अंतकरणांत भगवंताला स्थान दिलेले असते. संत चंदनाप्रमाणे सुवासाने आपोआप कळून येतात. नाम संकीर्तनाच्या आनंदाने आम्हाला नवे समाधान नित्य नवी तृप्ती झाली आहे. आरंभी आणि शेवटी जे गोड असते तेच खरे गोड असते. परोपकारर्थ जो शरीर, वाणी, मन वेचतो त्याचे रक्षण भगवंत करीत असतो. (अ 1568)

446 कविता केल्यामुळे संत होत नाही संताचे नातेवाईक असल्याने संत होत नाही. नुसता वेश किंवा आडनावाने संत होत नाही. जगाचे डाव, घाव, टिंगल जे सहन करतात तेच संत होऊ शकतात. हातात वीणा धरल्याने, गोंधडी पांघरल्याने संत होत नाही. माळा मुद्रा भस्माचे चंदन लावले म्हणजे संत होत नाही. वेद पठण, तीर्थयात्रा, कथाकिर्तने केल्याने संत होत नाहीत. देहभाव व अहंकार पूर्ण गेला म्हणजे संत होतील नाहीतर संसारी समजावे. (अ 1588)

447 संत हो तुमचे वर्णन करण्याविषयी मीदुबळ, अज्ञानी असताना तुम्ही अभयाचे योगदान दिल्यामुळे माझे समाधान झाले आहे. पाण्यांत बुडणास जो वाचवितो तो धन्य होय. संतानी तर माझा योगक्षेमचा सर्व भार घेतला आहे आणि उध्दाराचे वचन देऊन अभयहस्त डोक्यावर ठेवला आहे. मनाला धीर वाटला. मी तुम्हाला दंडवत घातले पण तुम्ही माझ्या योगक्षेमाचा भार वाहिला. हा मोबदला म्हणजे काचेचा तुकडा देऊन चिंतामणी घेण्यासारखे आहे. (अ 1783)

448 एकजण पालखीत बसतो. एकजण पालखीचा दांडा खांद्यावर घेऊन चालतो. सृष्टीमध्ये एकासारखे दुसरे नाही. जसजसे भूमीचे भाग आहेत तसतसे पीक तेथे तेथे पूर्वीसारखेच येते. मोड उगवला परंतु पाण्याविना तो वाळला तो तर निष्फळ होतो. त्याप्रमाणे ज्याच्याजवळ धीर नाही, त्याची बुध्दी व्यर्थ जाते. संताशिवाय कोणाची सगत करु नये कारण संगतीमुळे चित्र मलिन होते. आपले अहित होते. (अ 1820)

449 अनेक वृत्ती, भावना यांनी जग भरले आहे. त्याकडे लक्ष न देता फक्त सत्य तेवढेच सांभाळावे. सामान्य लोकांनी योगाभ्यासारखे अवघड साधना आग्रह करु नये. संतानी त्यासाठी नामसाधनेची योजना केली आहे. त्यात कल्याण आहे. संसार तरुन जाणे अवघड आहे. ब्रम्हादिका देवाना ते जमले नाही त्यासाठी मी माझे मन तुझ्या पायांचा आधार घेत आहे. या दीनाचा स्वीकार करा. (अ 1852)

450 सर्वोत्तम देवानी सर्व जातीच्या सर्व प्रकारच्या भक्तांना जीवन दिले त्याचा अंत पाहताना लागत नाही. तो इतका व्यापक व सुक्ष्म आहे. तो अणुच्याहि आंत राहतो. पाहिजे तसा आकार धारण करु शकतो. भक्ताच्या इच्छा पूर्ण करु शकतो ब्रम्हानंदानी पोट भरले आहे. भक्तिरुपी जल प्राशन केले आहे. जन्म-मृत्यू नाही. नावेचा भार पाण्यावरच असतो, बसणाऱ्याचे तिला काय ओझे. संतावर आपला भार सोपवावा आम्ही गोविंदाचे गीत गाऊन सतत ब्रम्हानंद करु. (अ 1854)

451 देह प्रारब्धकर्माधीन आहे. सुखदु:खे क्षणभंगूर आहेत. अविनाशी भगवंताच्या पायी भाव ठेवावा. तेथे सर्व विश्रांती आहे. मी संताच्या मार्गावरुन जात आहे. उदार मनाने मला दर्शनाची मी मागणी करीत आहे. उदार मनाने मला दर्शन द्याच. नारायण नित्य नवा लाभदायक माल आहे. खरे टांकसाळीचे नाणे

आहे. संतानी परमार्थाचे दुकान घातले आहे. फुकट परमार्थ सर्वांना देतात. संताचे अंत:करण कधीच रिकामे होत नाही. (अ 1866)

452 जो साधक कायेने वाचेने मनाने विष्णुभक्त झाला आहे त्यास इतर काम-क्रोध विचाराची बाधा होत नाही. धन्याच्या विश्वासाला पात्र झालेल्या सेवकाची मालकावर सत्ता गाजविण्याची स्थिती असते. धन्याचे ऐश्वर्य भोगणारा होतो. संत भेटीत पापे पळून जातात, संसार दु:ख दूर होते. (अ 1982)

453 कांही ज्ञानी, पंडीत मनांत एक भाव ठेवतात व कृती दुसरी करतात त्यांना मी मानत नाही. मनांत शुध्द भाव नाही तर प्रतिमा पूजन काय उपयोग मनांत विषयाचा जप चालला तेथे गळ्यातील माळा काय करतील ? भाव नसताना सेवा करुन काय उपयोग, देव हा भाव आणि श्रध्देचा विषय आहे. श्री रामचे उपाधीमुळे दगड पाण्यावर तरले. सर्व भावे तुझ्या चरणी मस्तक ठेवणे हीच माझी सेवा आहे. (अ 2058)

454 देवा आम्हाला उपदेश देऊन (गीता-वेद) आमच्या सन्मार्गास लावावे. जिवात्म्याची परमार्थाची भेट झाल्यास जीव परत संसाराकडे जात नाही. प्रेम असेल तर आकाशालाहि मिठी मारता येते. आपल्या मनास आपले पाप माहित असते. दहा जणांत एकाला चांगले म्हणले की उरलेल्याची निंदा सहज होते. सहज पाप घडते दिवसांतील आठ प्रहर नाम जपा. संताचे संगतीत प्रेमसुखाचा सुकाळ आहे. (अ 2128)

455 डोळ्यांनी पहावे, कानाने ऐकावे. सुख दु:खाचे भाव कळत असतात. ईश्वराने एकाच देहाच्या ठायी भिन्न इंद्रियांना भिन्न ज्ञान होण्याची क्षमता ठेवली आहे व तो स्वत: सर्वाचे सूत्र हातात धरुन देहाचा पुतळा व्यवहारामध्ये नाचवत राहतो. जीव मुद्दाम द्यावयला नको. वेळ आल्यावर तो जाणारच आहे. समजून घ्या देवापाशी मरण मागतो तो गाढव, चांडाळ आहे तूच माझा आकार आणि मी म्हणतो तो आत्माही तूच आहेस. तू आणि मी एकच आहोत. (अ 2100)

456 देवा जयामुळे तुमची अपकीर्ती होइल असे वर्तन मी प्राण गेला तरी करणार नाही. परस्त्री मला मातेसमान व परधन मला ओकलेल्या अन्नासमान तिरस्करणीय आहे.विठ्ठलाचे नाम वेळोवेळी घेतले असता शरीरातील नाडया शांत होऊन विषय नाहिसे होतात जो कोणी अधर्माने वागत असेल त्याला विरोध

करावा. आडमार्गाने जाणाऱ्या आंधळ्यास योग्य मार्गावर आणावे चोरी करण्यास निघालेल्या चोरास अनुकूल चंद्रबल सांगू नये. (अ 2164)

457 सर्वज्ञानीपणाच्या कल 'मी पणाचा अभिमान तोडून टाका. आकाशापेक्षा व्यापक आणि अणूचा गाभा होऊन तू सर्वत्र भरुन रहावे. सर्वाच्या पोटात विष असते त्याच्या धाकाने लोक त्याला भितात तसे पाहिले तर सर्व जीवाची शरीरे पंचमहाभूताची बनलेली आहेत.त्यात भिन्नता नाही. परंतु उत्तम गुणांनी सुख, वाईट गुणानी दु:ख होते. चंदनाचा सुवास सर्वांना आवडतो. सर्वत्र देव आहे असे आपण म्हणतो. एकास नमस्कार आणि दुसऱ्याची निंदा करतो. ज्या पुरुषाचे चित्त स्वाधीन नाही सर्व कांही व्यर्थ जाते. (अ 2170)

458 कृपासागर विठ्ठलाने पुंडलिकास वर दिला आहे. जे पंढरीची वारी करणारे मुक्त होतील. अमृताच्या वेलीला अमृताचीच फळे लागावयाची. आणि पुढे सुध्दा अमृताच्या बीजाचीच वाढ व्हावयाची हे निश्चित. उत्तम रसाचे सेवन केल्याने घसा थंड होतो, आणि शरीरकांती पुष्ट व तेजोमय होते. चंदनाचे सहवासाने सामान्य वृक्षालाही चंदनाचा वास लागतो. संताच्या संगतीने मनुष्य संतवृत्तीचा होतो. (अ2218)

459 कीर्तन करावे तेथे अन्नग्रहण करु नये. कीर्तनासाठी जे द्रव्य घेतात आणि जे देतात ते दोघेही नरकात जातात. रावणाची सोन्याची लंका होती तो मेला तेव्हां त्याच्याबरोबर एक कवडीसुध्दा गेली नाही. संत रागवले तरी ते संतच राहणार शब्दप्रहाराने संत दुर्जनाला शिक्षा करतात. दुष्टाचा दुष्टभाव नष्ट व्हावा अशी विधायक दुष्टी असते. (अ 2283)

460 देवातुमच्या निर्गुणाच्या मार्गाकडे आम्ही अजिबात येणार नाही. कारण तेथे ब्रम्हज्ञानाच्या खोट्या आभिमानाचा ताबा आहे. अहंकार जो 'मी' तू पणाचा भेदभाव निर्माण करतो तो नष्ट करा. हा अभिमान आत्महत्येचे पाप घडवितो. तो आप्राप्तीची (संत, देव) भेट होऊ देत नाही. ज्याचे पूर्वकर्म वाईट असते ते त्याल दीन करते. भूमात्रावर दया करणे. हाच खरा धर्म आहे. याविषयी संत प्रमाण आहेत. (अ 2346)

461 मी कोणाकडे मंत्राची वंचना केली नाही पांडुरंग जीवाशी धरून ठेवला व सर्वांना सांगितला निष्ठेने विठ्ठलचरणी चित्त ठेवले आणि निरंतर त्याच्या समचरणाचे चिंतन केले. पांडुरंगाचे चरणी बळकट भाव, विश्वास ठेवला त्यामुळे

प्रपंचातून पार पडलो. माणसाला आत्मज्ञान होणे सोपे आहे. एकाग्रमणे श्रवणदायी साधने करण्यास स्वाधीन नसल्याने ते अवघड झाले आहे.प्रतिबिंब अस्सल समजु नका. दोरीचे ज्ञान झाले नाही तोपर्यंत सापाचे भय असते. परमात्म अज्ञानामुळे जग खरे वाटते. साक्षात्कारानंतर सत्य कळते.(अ 2421)

462 जी गोष्ट अंत:करणात असते, व चित्त मनाशी साहारूय झाले म्हणजे पोटांत असलेले ओठांच्या व्दारे बाहेर पडते गर्भाची भूक गर्भवती स्त्रीच्या खाण्या-पिण्यावरुन कळते. कुत्रेच्या भूंकण्याकडे हत्ती लक्ष्य देत नाही. मस्त माकड सिंहाची चेष्टा करते त्यात मरण ओढवून) घेण्यासारखे आहे. दुष्ट साधू संताला पीडा देतात त्यामुळेच त्याचेवर वाईट प्रसंग येतात.(अ 2426)

463 भगवंताच्या नामामुळे ब्रम्हनंदाच्याही वर आनंदाचे भरते आले आहे. सर्व लोकांना वैकुठांत जाण्याची सुखरुप वाट सांपडली आहे द्रव्याने, कुळाने, पारमार्थिक सत्तेने सर्व बाबतीत वैष्णव श्रेष्ठ असतात. ज्या पदरी लक्ष्मी नारायण आहे. विष्णुभक्ताचे कोणतेही वागणे, बोलणे गोड असते व हरिकृपेमुळे त्याची कोणतीही इच्छा पूर्ण होते. जसा पावसाचा वर्षाव योग्य अयोग्य जागा न पाहतो होतो. त्याप्रमाणे मी सर्वांना उपदेश करीतआहे. ज्याची जशी श्रध्दा असेल तशी फलप्राप्ती होईल. (अ 2459)

464 संताच्या संगतीत सर्वकाळ राहू नये, कारण पूवसंस्कारामुळे त्याच्या ठिकाणी एखादा दोष असण्याची शक्यता असते व तो दोष साधकाला जडण्याची शक्यता असते. त्या दोषाचा क्षय होतो. संताना दुरुन नमस्कारा करावा व त्याचे गुण फक्त अंतरी साठवावेत. संत ज्ञानभक्तीचे जेवण करीत असतील तेथे याचक म्हणून जावे ते हरिनामाने पोटभर जेवले असतील तर त्या उच्छिटानेच आपली पोटे भरतील. (अ 2488)

465 देवा या संसार जंगलात सर्व दिशा ओसाड वाटतात. मला कोणी जिवलग देवभक्त भेटत नाही. काम क्रोधरुपी हिंस्त्र श्वापदांचे कळप पाहून भय वाटते धीर धरवत नाही, अज्ञानाचा अंधार असल्याने वाटा दिसत नाही या जंगलात अनेक मताच्या अनेक वाटा आहेत. योग्य मार्ग समजत नाही. सद्‌गुरुनी मला 'रामकृष्ण हरी' या नामभक्तीची वाट दाखविली परंतु पांडुरंग अद्‌याप दूरच आहे. (अ 2504)

466 घणाचे घावाने हिरा फुटत नाही. परंतु ढेकणाच्या संगतीने भंग पावते. वाईट लोकांच्या संगतीने साधु अनाचाराकडे वळतो. विषामुळे गोड पक्वान्नेही कडू लागतात. कुसंगतीने तोच प्रकार होतो. कुसंगतीने चौऱ्याऐंशी लक्ष योनीतून फिरावे लागते याकरिता सर्वभावे संताची संगती करावी. मला मुक्ति नको. संतसंगती द्यावी. (अ 2545)

467 संत जेथे राहतात तेथेच राहणे चांगले. संत अविद्येने झोपे गेलेल्यास त्याला जागे करतात त्याना सावध करुन आत्मवस्तूची प्राप्ती करुन देतात. त्याच्या स्वहितानेच आपले हित कळेल याविषयी एकमेकाचे चित्त त्याला साक्ष देते. त्याच्या ठिकाणी व्देषभावाचा कांही एक विरोध होत नाही. संत घरी येतील तर फार चांगले. (अ 2589)

468 जो हरीनाम घेत नाही त्याच्या देहांत कामक्रोधाचा घाला पडला असे जाणावे. विषयांत जे रंगात त्याच्या आयुष्य परमार्थ, धन यमदूत घेऊन जातो. याकरिता हरिकथेत बसून फुकट पुण्याचा लाभ घ्या, दुष्ट वासनेने होणारे पाप टाकून द्या. तू जसे बीज पेरशील त्याप्रमाणे पुढे तुला फळ मिळेल. सज्जन हे चंदनासारखे आहेत म्हणून त्याचा सहवास मिळावा आणि दुर्जनाचा त्याग व्हावा. (अ 2600)

469 देवा आपण भाग्यशाली आई आहांत आणि आम्ही भाग्यवान लेकरु आहोत. आधी आपला मार्ग स्वच्छ करावा, म्हणजे चालताना अडथळा येणार नाही. निवृत्तीमार्गात पापाचा आणि सकाम पुण्याचा व्यवहार प्रतिबंध करणारा आहे. संसारातील देहादी, उपाधीचे घोंगडे विचाराने बाजूला टाकून पळा नाहीतर जन्म-मरण तुमचा पाठलाग करील. या निवृत्तीमार्गात जो वैराग्यसंपन्न शूर आहे तोच या बंधनातून बाहेर पडतो बाकीचे अडकतात.(अ 2676)

470 साधक बाधक पध्दतीने ब्रम्हज्ञान सांगतो पण त्याप्रमाणे आचरण करीत नाही. वरपांगी हरिकथा सांगतो परंतु मनामध्ये भक्ति नसते. पुष्कळ द्रव्य खर्चून बापाचे थडगे बांधतो पण दारांत तुळशीवृंदावन बांधत नाही. व्याही-जावई याचा सत्कार करतो पण इतर अतिथीकडे पाठ फिरवितो अशा दुष्टाच्या जीवनाचा धिक्कार असो त्याचे जगणे केवळ भार असे. (अ 2702)

471 शब्दाला शब्द जोडून काव्य करावे, वरुन वैराग्य निष्कामना लोकाना दाखवावे, असा वर मी तुम्हाला मागितला नव्हता. कारण सत्यावाचून

दांभिकपणाची लांबण लावणे व्यर्थ आहे. जी वाणी सफल असते तीच खरी, इतर वाणी भुशाप्रमाणे निरर्थक आहे. पुण्यकर्म करण्याचा मनाचा संकल्प अश्रध्देने आवरल्यास पुण्य न घडता पाप घडते. यालाच संकल्याचे विलक्प होणे म्हणतात. अन्न शिजून तयार झाल्यावर जाळ लावून कडू आणणे खोटे आहे. (अ 2728)

472 मला धन सन्मान नको माझ्या सांबाळ कर लोकांमध्ये सर्व काळ तुझे नामस्मरण करुन राहावे. संत मला धर्म, भक्ति, ज्ञान वैगरक्यविषयी नित्य जागरुक ठेवतात. त्याचे उपकार कसे फेडावे, मी माझा जीव त्याच्यापायी ठेवला तरी त्याची किंमत अल्पच आहे. त्याच्या सहज बोलण्यांत हितोपदश असतो. आणि कष्ट सोसून हित शिकवात. देव सात्विक सर्वज्ञ, ज्ञानरुप आहे. तयाची सत्ता सर्वत्र आहे. पंचमहाभूतांचे देह कातड्याच्या मोटा आहेत. तेथे थोरपणा, खऱ्या खोट्याचा निर्णय कसा होईल ? (अ 2789)

473 समाजात बहिरी मुकी माणसे चालतील, पण ज्ञानाभिमानाने नटलेली माणसे केवळ पशूच वाटतात. असे दुर्दैवी असतात. एका परीने वेडी माणसे बरी परंतु वेद, देव, संत यांचे कुतर्क करणारी माणसे फार वाईट असतात. जो दुर्गंधीत राहतो त्याला अमृताची गोडी कशी कळणार ? त्याप्रमाणे वेदानी सांगितलेल्या व देवाच्या भक्तिज्ञानाची गोडी अभिमान्याला काय कळणार ? पचनी पडेल असते ते वेळोवेळी आवडते. समाजाचा मला वीट आला आहे. एकांत वास सुखाचा वाटतो. (अ 2810)

474 नकटे आरशास पाहून लाजते. त्यापुढे तोंड लपविते. ज्याच्या मनांत जो दोष असतो. तोच त्यास पीडा करतो. चोरट्यास अंधेरी रात्र आवडते. चंद्रोदयाचा त्रास होतो. भगवंत करुणावंत आहे त्याचं नांव अनंत आहे. सर्व जीवाची सत्ता त्याचे हातांत आहे. तो जगाचा चालक आहे. जो दुसऱ्याचा अपमान करतो तो स्वभावे दुष्ट आहे. दुष्टाना दान देणारा आणि घेणारा दोघेही नरकात जातील. ज्ञान, शहाणपण, आचार-विचार, कीर्ती मान या सर्वांना आग लागो माझ्या चित्ताला विठ्ठलाचे ध्यान लागो. (अ 2935)

475 हे मना देवाच्या चरणी पूर्णत्वाने राहा. उगाच इंद्रियाच्या संगतीने विषयाकडे जाऊ नकोस. जी सुखे कधीही संपणार नाहीत. अशी अविनाशी सुखे भगवंताच्या चरणी आहेत. जन्म-मरण व विषयभोग थांबेल. परधन परस्त्री विषयतुल्य समाज. मना पांडुरंग चरणी स्थिर रहा. विषयावरील इंद्रियाची धाव

मोडून काढा. आम्ही काळाला जिंकून निवांत होऊन राहिलो आहोत. अन्यायाने वागणारास जर राजा दंड देणार नसेल तर ते अन्यायी लोक प्रजेला उपद्रव करतील अनीतीने वागणारास दंड करणे पातक नाही. (अ 2942)

476 आपल्या चित्ताभोवती स्वत:च विचार करण्याचा संकोच करावा आणि मनाला समाधानाची मुरड घालावी की ज्यामुळे अनेकांना सुख होईल. सर्व प्राणीमात्राचे समानतेने पालनपोषण करणे ही भगवंताची पूजा आहे आणि अनेकांचा व्देष मत्सर करणे म्हणजे देवाला शीण देणे होय. इतरापासून त्रास, दु:ख झाले तर आपण आपल्यावर रागवावे, रुसावे, फुगावे आणि दुसऱ्याचा व्देष करुन नये, व्देष करण्याला दुसरा कोठे आहे ? सर्वत्र हरी भरला आहे. सर्वाचा आत्मा आपणच आहे. (अ 2972)

477 कांही लोक भगवी वस्त्रे वापरतात, तो कांही हरिप्राप्तीचा अनुभवाचा मार्ग आहे काय ? भगव्या रंगाची कुत्री नसतात काय? जटा वाढवून कांही लोक फिरतात. कोल्हाचा तो नैसर्गिक वेश असतो. शरीराला काष्ट का द्यावेत ? संतदर्शन झाले. दारिद्राचा शीण आला होता तो दारिद्र दोष नष्ट झाला त्याचवेळी देह पवित्र झाला. (अ 2984)

478 प्राणी मात्राचा व्देष करणे, अंत:करणाने निष्ठूर असणे, आणि वाचाळवाद घालणे, ही तीन असंतत्वाची लक्षणे आहेत. माणसाच्या अंत:करणातील जे भाव असतात तेच बाहेर प्रकट होतात. जो सदैव संतुष्ट आत-बाहेर निर्मळ, ज्याचे अंत:करण रागव्देषरहित आणि ज्यांना प्रसंग परिस्थितीचे ज्ञान आहे त्यांना संत म्हणतात या विश्वात विठ्ठलच खरा आहे. बाकीचा फापटपसारा आहे. (अ 2996)

479 विद्यार्थ्यासाठी शिक्षक हातात पाटी धरतो आणि शिकवतो. त्याप्रमाणे संत जगात सत्कमे करुन दाखवितात. लहान लेकराची शक्ति आणि वृत्ती लक्षांत घेऊन आई त्याच्यासाठी हळूहळू चालते.लोकांना वाचविण्यासाठी नौका पाण्यात राहते. सार काय आणि असार काय आहे याचा विचार करुन विठ्ठलाचे नांव हृदयात धरा. त्याच्या चिंतनाने संकट दूर होईल. वाणीने रामाचे स्मरण करतो हाच नियम रात्रंदिवस करतो. श्रध्दा ठेवून विठ्ठलाचे नाम गाईले तर त्याची अनंत कुळे पवित्र होतात. (अ 3137)

480 संताचा आठव केला असता सुख प्रापत होते की ज्या सुखात सुखप्राप्तीचे भय राहत नाही आणि ज्या सुखाचा शेवट होत नाही. मी सर्व संत जनांच्या पायातील वहाणा होईल मी पाणी सांडण्याची पायरी होईल म्हणजे त्यावरुन संत चालतील. नाराणानी आमच्यासाठी प्रेमसुध्दा निर्माण केले आहे. त्या सुखाला लाथ मारणारा कोण दुर्दैवी प्राणी आहे. ? तुका म्हणे मला सायुज्य मोक्ष नको मी आपला संत संगतीत राहीन. (अ 3142)

481 विचा (ज्ञानाचा) ठोंबा उभा केला म्हणून त्याला विठोबा म्हणतात. विदू म्हणजे ज्ञान आणि सत्ता याचा ठोबा म्हणजे सगुण साकार ज्याने धारण केला तो विठोबा 'वि' म्हणजे गरुड जयाचा बसण्याचा ठोबा (आधार) आहे. तो भगवान विष्णू म्हणजे विठोबा. काळाच्या माथ्यावर त्याची सत्ता चालते चोराला चंदाचे चांदणे संतसंगत नको वाटते. केवळ पुण्य पुण्याईमुळेच संत संगत मिळते. (अ 3160)

482 हरिभजन करावे, कीर्तनव्दारा भगवंताचे गुण गावेत त्यायोगे काम क्रोधाची बाधा होत नाही. ते शांतीचे शस्त्र हातात आहे तो काळालाही जिंकू शकतो. चित्ताच्या ठिकाणी उपरती झाली नाही ते श्रम व्यर्थ जातील. भगवंताने कृपा केली तर आपले वास्तव आत्मस्वरुप कळते आणि सर्व जग आत्मस्वरुपाचे होते. (अ 3165)

483 संत कृपेचे सागर आहेत संतानी आपल्या चरणाचा आश्रय दिला म्हणून मला आत्मसुखाची प्राप्ती झाली. माझे मन एका ठिकाणी स्थिर झाले आहे. 'भिऊ नकोस' असे दोनदां सांगितले. त्या योगाने माझे कल्याण झाले आहे. ज्याच्या हाती भक्तिचे वर्म प्राप्त झाले आहे. त्याच्या वृत्तीत ब्रहचैतन्याचा वास झालेला असतो आणि त्याचे चित्त सर्वकाळ संतुष्ट असते. त्रिगुणाची हळहळ संपलेली असते. देव त्याचा योगक्षेम (भार) चालवितो.(अ 3138)

484 जेथे हरीचे दस जन्मतात ते घर-कुळ पवित्र आहे. नारायण हाच त्याचा कर्मधर्म झाला त्यामुळे तिन्ही लोक पावन झाले. अंत्यजादी योनी हरीभजनाने तरुन गेल्या त्याचे वर्णन करण्यासाठी पुराणे भाट झाली. तुळणारा वाणी वैश्य व गोरा कुंभार, धागा शिवणारा रोहिदास चांभार होता. कबीर, मोमीन, लतीफ हे मुस्लिम होते सेना हा विष्णुदास न्हावी होता, कान्होपात्रा वेश्यकन्या होती.

चोखमेळा, बंका हे हरिजन होते व हरीने त्यांना निर्गुणाशी एकरुप केले. या सर्वांना धर्म नाहीत तर ते तरुन कसे गेले. (अ 3241)

485 संत नामदेव तीर्थ यात्रेला गेले औंढ्या गांवी त्याच्यासाठी देवाने देवळाचे तोंड फिरविले व त्याच्या हातुन विठ्ठलाने दूध प्राशन केले. ही गोष्ट प्रसिध्द आहे. देवाने नरसिंह मेहताची हुंडी भरली. धन्याजी चाट्याने पेरण्याचे बी संतजनात वाटले. देवाने तयाचे शेत पेरले. मीराबाईसाठी विष प्राशन केले. देव कबिराचे शेले विणत होता. गोरा कुंभाराचे मेलेले मुल जीवंत केले. आमचा अहंकार गेला आम्ही शुध्द झालो. (अ 3250)

486 मी अणुरेणूपेक्षांही सुक्ष्म आहे आणि आकाशाएवढा मोठा आहे. ज्ञानाने संसार भ्रमाचा आकार गिळून त्याचा बांध करुन त्याबरोबरच देहतादात्मयही सोडून दिले आहे. ज्ञाता-ज्ञान-क्षेयादि त्रिपुरी सोडून दिली आणि अंत:करणरुपी घरांत ज्ञानदीप उजळला. तुका म्हणे - मला कर्तव्यभा स्थिती प्राप्त झाली असली तरी मी या मृत्यूलोकांत व या देहांत आता लोकोपकार करण्याकरिता राहिलो आहे. पायरी, देवाची मूर्ती एकाच पाषाणाची असते पण पायरीपेक्षा मूर्तीचे महत्व वेगळे आहे. संत आणि सामान्य माणसेच असतात पण संताची गुणवत्ता आणि योग्यता वेगळीच असते. (अ 3341)

487 पुष्कळ दिवसांपासून मी देहरुपी काळे घोंगडे पांघरले होते. परंतु आता मात्र आत्म अनात्म विचाराच्या सामर्थ्याने टाकून दिले आहे. मी काळाला चुकवून लपून राहिलो होतो. आता देहरुपी घोंगडी टाकून दिली. त्या काळाला माझा पत्ता नाही. सर्व उपाधीपलीकडे दूरच्या स्वरुप स्थितीत मी लपलो आहे. काळाने मला धरण्याचा प्रयत्न केला. त्याच्या मार्गात हरिसेवेचा अडसर लावला आहे व त्याला दूर थांबविले आहे. (अ 3680)

488 देहरुपी घोंगड्या पंचमहाभूतांपासून निर्माण झालेल्या असल्यामुळे त्या सर्व एका जातीच्या एकाच राशीच्या आहेत. त्याच ठिकाणी देहरुपी घोंगडी होती. देवा आता या घोंगडीच्या अभिमानरुपी बंधनातून मुक्त होण्याचा उपाय सांगा. त्या योगाने देहादी संसाराचा निर्वंश होईल अशी मी शपथ घेतो हे देवा त्या देहरूपी घोंगडीमुळे लहान-मोठेपणाचा अभिमान निर्माण झाला त्यातून मला सोडवा. (अ 3683)

489 हे गोपाळा माझी घोंगडी तू घेतलीस. चोराने देहमयरुपी घोंगड्यावर मिठी घातली आहे. मी त्याला अंत:करणाच्या हातांत प्रतिबिंबरुपाने धरले आहे. दिवसा अविद्यारुपी दीपाचा प्रकाश केला आहे. तरीपण तो चोर मला ओळखता येत नाही. चोर चोरी करताना मालक श्रीमंत आहे का गरीब याचा तो विचार करत नाही. घरांतल्या (हृदयातल्या) चोराने ते लुटून नेले, देवरुपी चोराने घोंगडे नेऊन मला जगापासून व उपाधीतून मुक्त केले. माझे हित झाले. पूर्वीचे फाटके (पंचमहाभुताचे) घोंगडे घेऊन देवानी मला ब्रम्हरुप देहाचे घोंगडे दिले. (अ 3691)

490 मनात भक्तिभाव ठेवून देवाचे स्मरण करा. देवाच्या पायी चित्त ठेवून त्याचे स्वाधीन राहा. तो हरी जगाचा पिता असून भोग मोक्ष देणारा आहे. देहादी संसाराचा भार आपल्यावर घेऊ नका. देह विनाशी आहे शाश्वत असे येथे काही नाही. जो हरिकीर्तन नामात राहतो तो भाग्यवान. अंत:करणांतील अभिमान घालवितो याला आत्मदया म्हणतात. परोपकाराकडे तन, मन, धनाचा उपयोग करा आणि दुसऱ्याची निंदा करण्याचे टाळा. वाचेने गोविंदाचे नाम घेणे हाच छंद असावा. तुम्ही दुजेपणा नाहीसा करा तर तुमच्या तेजाने सूर्य लोपेल. (अ 3694)

491 जीवात्म मुलामध्ये निष्क्रिय, निर्गुण, नि:संग आहे. वाईट कर्माचे त्याने हाव धरल्याने त्यास लबाड म्हणतात. वासनेच्या आहारी गेल्यास जन्म-मृत्यूच्या बंधनात पडाल. नारायणाचे नाम सारभूत आहे. तारक आहे. सावधगिरीचे उपयोग करा नाहीतर पुढील जन्म गाढव किंवा कुत्र्याचा असेल. पडीक जमीन मेहनतीने नांगरल्यास पिकाचा लाभ होतो. स्वहीत साधनेसाठी श्रमाने हरीची प्राप्ती करा. तुझे हित तुझ्या हातांत आहे. ते तू स्वसामर्थ्याने कर. गळ्यात तुळशीमाळ, मुद्रा लावणे हेच अलंकार घालून मिरवावे. विठ्ठलाचे दास व्हा. (अ 3694)

492 फुगड्या - संसाराची फुगडी घालताना (प्रापंचिक क्रिया करताना) मोकळी, उघडी राहा. सर्व लाज सोडून एकांत असणाऱ्या एकालाच पहा. सर्व संसाराची फुगडी फू करुन मोडून टाका. जर संसार तोडला तर खेळांत खरी गोडी आहे. मागे मातेच्या उदरांत असताना जे शिकलास ते आठवून त्याचा उच्चार कर. तुझ्या पाठीवर त्रिगुणात्मक वृत्तीरुपी वेणी उडत आहे. (हृदयात उठत आहे) ती साठवून धरा आणि तिची मूळ बंधाच्या ठिकाणी गाठ घाला. पुढे पाऊल टाकीत एकेक भूमिका जिंकीत जा, मान मिळेल. तुझ्या-माझ्यात एकच भाव आहे. समस्थितीचा छंद घेऊन उच्च ठिकाणास पोहोचू. (अ 3706)

493 ज्याच्या मनात अंत:करणांत भीती आहे. त्यानी कितीही शास्त्र तत्वज्ञान यांच्या गप्पा केल्या तरी पण त्या व्यर्थ आहेत. बोलणेदेखील निरर्थक आहेत. ज्ञानाने कंसाच्या मनांतील भय आणि भेद गेला आणि तो मीपणाला ओळखत नव्हता तेव्हां त्याला नारायणाची आत्मत्याने भेट झाली. भय भावाने केलेल्या ध्यानामुळे त्यास सगुण दर्शन घडले. कंस-कृष्ण भेट झाली असता, त्याच्यात व्यवहारीक दृष्टीने युध्द झाले व त्या प्रसंगी देवाने कंसाच्या मानेवर शस्त्रास्त्राने घाव घातले. अनंत हा सर्वज्ञानी, सर्व सत्ताधीश असल्याने कंसाच्या मरणाचे वर्म कशांत आहे हे त्याला पूर्ण माहित होते. (अ 3917)

494 नारायणाने कंसाचा वध केला आणि उग्रसेनाला राज्याला बसविले. उग्रसेन शरण आला होता. त्याची राज्यावर स्थापना केली आणि अभक्तांची अखेर करुन टाकली भगवंतानी आपल्या हाताने सर्व कार्य केले. सर्वांना आज्ञाधारक भक्त म्हणून वश केले कृष्ण मथुरेत राहिला. सर्व राज्य एक झाले. आई-वडीलाची सुटका केली. नारायण भक्ताचे सदैव संरक्षण करीत असतो. (अ 3918)

495 देवकी, वसुदेव, नंद-यशोदा या दोघावर कृष्णाची श्रध्दा होती. एक जन्मदाते होते तर दुसरे पालन पोषण करणारे आई-वडील होते. म्हणून भगवान नारायणाने त्याच्याविषयी सारखाच भाव ठेवला होता. वस्तुत: हा नारायण स्वत:च जन्माला आला. स्वत:च वाढला आणि आई-वडिलाचे निमित्त केले. नारायण जगाचा आई आणि बाप आहे. दुसरा कोण याचा सांभाळ करील ? याच्या अंतकरातील भाव कोण ओळख शकेल ? देव आपली किमया समजू देत नाही. (अ 3919)

496 तुकारामास वैराग्य कसे आले - तुका म्हणे - मी जातीने शुद्र आहे. प्रपंचातील दु:खाने अतिदु:खी झालो आहे. आई-बाप इहलोक सोडून गेले आहेत. दुष्काळात द्रव्य संपले, मान गेला. एक स्त्री अन्न अन्न करुन मेली, या दु:खाने मला लाज वाटली. जीव त्रासून गेला. देवाचे देऊळ भंगले होते. ते व्यवस्थित बांधून काढले. मनांत आले कीर्तन करु लागलो. संताच्या वचनावर विश्वास ठेवून ती आदराने पाठ केली. ते पुढे गात मी चित्त शुध्द करुन आणि भाव धरुन त्याचे ध्रुवपदी म्हणत असे. प्रपंचा पूर्व वीट आला होता. माझ्या मनाला पटले ते केले स्वप्नांतील गुरुपदेश मानला, आणि नामाच्या ठिकाणी दृढ विश्वास धरला यानंतर मनांत कवित्वाची स्फुर्ती झाली चित्ताने विठोबाचे पाय धरले. नारायणाने येऊन

माझे समाधान केले. पांडुरंग हेच माझे भांडवल आहे. त्यानेच हे बोल माझ्या मुखातून बोलविले आहेत. (अ 3939/21)

497 तुका म्हणे - प्रपंच भागेना परमार्थाच्या विचाराने स्वस्थ झालो. होते द्रव्य ब्राम्हणांनी देऊन संसाराचा बायका, मुले भाऊ यांचा संबंध तोडला, भाग्यहीन, मतिमंद एकांतात जावून बसलो. पोटाचे त्रासाने पीडित झालो. पण चांगलेच झाले लोकाची लाज धरली नाही. पांडूरंगास शरण आलो. कीर्तन करु लागलो. विषयाच्या बंधनाच्या गाठी सुटल्या. देह विठ्ठलाने भरल्यामुळे काम, क्रोध पळून गेले. (अ 3942)

498 स्फुट अभंग - देव आणि संत एकच आहेत. त्यांच्या प्रतिमा भक्तिच्या निमित्ताने वेगळ्या आहेत. मी तर पूर्ण श्रध्दा ठेवून सर्वांना माहीत असावे म्हणून सांगत आहे. निराकार ब्रम्हाच्या ठिकाणी अत्यंताभाव असल्याने सर्व दिशा ओसाड आहेत म्हणून तेथे कोणतीच इच्छा पूर्ण होत नाही. पण संतांजवळ साधकाची इच्छा पूर्ण होते. येथे रोकडा माल आहे तो सेवन करताच तृप्ती होते. (अ 3993)

499 ज्ञानदेवानी जन्म घेतल्याबरोबर त्याच्या वंशातील पाप नष्ट झाले. त्याच्या पुण्याईने सगळा वंश मोक्षपदी गेला. असा ज्ञानदेव आमचा पिता महाज्ञानी, पुण्यवंत असल्यामुळे आम्ही देवाचे ध्यानांत रमलो. तुका म्हणे - ज्ञानदेवा मी तुमचे बाळ आहे म्हणून माझा हट्ट पुरवा देवा तुझे नाम गाण्याला मर्यादा नाही. प्रेमाने, अतितेने आवडी नामकीर्ती गाऊ. (क्षे.अ.59)

500 तीर्थक्षेत्री स्नान केले तर कालांतराने फळ मिळते परंतु संताच्या पायाच्या दर्शनाने तत्काळ फलप्राप्ती होते. ते वैष्णवाचे पाय आहेत त्यामुळे अंत:करणातील भीती नाहीशी होते. मुखाने कितीही काळ तप केले, तरी त्याचे समाधान होत नाही. याला दुसरी उपमा नाही संताच्या संगतीत दु:खाचा नाश होतो म्हणून मी येथे राहिलो. डोळ्याचे भाग्य म्हणून विठ्ठल दर्शन झाले. माझे मीपण विरुन गेले आणि विठ्ठलरुप झालो. (क्षे.अ. 73)

501 तुम्ही साधू-संत कैवल्यसागर आहांत. तुमच्या घरी मोक्षाचे आगर आहे. तुमचे कोटीसूर्याचे रुप त्यापुढे मी नगण्य काजवा आहे. तुम्ही चिंतामणी, कल्पतरुचे वन आहांत मी चिलटासारखा क्षुद्र आहे. तुम्ही वाराणशीची गंगा मी कोकणांतील ओहोळ, आकाशावर सावली कोण करणार सिंहापुढे कोल्हा डरकाळी

फोडील काय ? संत मंडळी तुम्ही शुध्द, भरीव ज्ञानसंपन्न आहात तेथे माझी काय योग्यता. संत मंडळी तुम्ही माझे माय बाप आहात. (क्षे. अ.79)

502 निंदक परोपकारी असतो. तो परीटाहून थोर आहे. कारण तो आपले दोष फुकट धुतो. त्याच्या मुखरुपी धुणे धुणाच्या मोठ्या पारीत जिभेचे साबण लावून शुध्द करतो. यम त्याला शासन करतात. ज्याला आपले म्हटले आहे. त्याच्या हातून अजाणतेपणी चुका झाल्या तर त्याच्यावर रागवू नये. तुका म्हणे मी पापी आहे. परंतु संताच्या साहाय्याने काळवरही मात करतो. (क्षे.अ. 273)

503 हिरा काळ्या कोळशात ठेवला महणून त्याचे मोल कमी होत नाही. तसे संत लोक श्री हरीच्या चरणी शोभले आहेत. अशा हरीभक्ताची लोक निंदा करतात देवा, याचवेळी (माझ्या वेळी) तू मागे घेऊ नकोस आता तूझ्याखेरीज मी कोणाला शरण जाणार. तुझ्याशिवाय आम्हास कोण आहे ? सतत तुझे स्मरण आम्ही करतो देवा किती काकुळती यावे, तुझ्या मनांत आमच्याविषयी प्रेम येऊ दे. (क्षे.अ.337)

504 कुत्रे जसे लोळण घेते, त्याप्रमाणे तुझ्या दारात मी लोळण घेत आहे. आम्ही तोंडाने तुझे नाम गाऊ, नाम घेताना, उठताना, बसताना, तुझ्या चरणाजवळ लोळण घेत आहे देवा आम्हांस हे वर्म सांपडले आहे. आम्ही जे तुझे प्रेमसुख मागतो ते तुम्ही आम्हास द्यावे. संत उपदेशाचे शब्द देतात. संताच्या माध्यमातून तू भक्तांना हो म्हणतोस तुका म्हणे देवा, असे आहे तर आमही संताचा उच्चार करु त्याचे स्मरण करु. (क्षे.अ.345)

505 या प्रपंचात येवून काय हित साधले ? आयुष्य इंद्रियाच्या सहवासात घालविले. विषयाचे सेवनाने कोण समाधानी झाले ? मृगजळ पाहून जे भांबावले ते वेडेच, विचारी लोकाची तू सोय का पाहत नाहीस ? तुका म्हणे देवा तुझा मोठेपण अनन्यसाधारण आहे. तू सर्वांच्या अंत:करणात आहेस. (क्षे.अ.349)

506 लोखंड परिसावर रुसले आणि ते सोनेपणास मुकले. ज्याचे त्याने नुकसान करुन घेतले. आळशाच्या घरांत गंगा आली ती पाहून तो लांब जाऊ लागला. मी भगवंताचा दास आहे. सेवा करत नाही. तू वर्णाश्रमाप्रमाणे वागशील तर तु उत्तम गती प्राप्त होइल तथापि तुला ते ठाऊक नाही की ज्यामुळे अंगी ब्रमभाव येतो. तू पंडीत होशील. पूजातंत्र जाणशील तुका म्हणे संत याच देही - विदेही जाहले. (क्षे.अ.360)

507 आता मी सर्व सुखाना प्राप्त होईल. मी माहेरी आलो आहे. तेथे सर्व नात्याची गंगोत्री आहे परके मला कोणी नाही. संपूर्ण विश्वांत माझी सत्ता पसरली आहे. पराधीनता नष्ट झालेली आहे. आता सर्वच आपले झाले आहे. माझी सत्ता हवी तशी चालते, तिला करावे त्याप्रमाणे करते. चुकल्याचे ती भीड धरत नाही. अनेक दिवस अनेकांचा सासुवास भोगला. आता आपल्या वृत्तीवर उदास झालो आहे. तुका म्हणे. माझे आई बाप पांडुरंग माझे लाडाने कौतुक करतात. (अ 4067)

508 अहो पांडूरंगा आम्ही अनन्य भक्तीने तुझी सेवा केली आणि त्या बदल्यांत तू आमचा उध्दार केलास, तर त्यात काय मोठे पुण्य आहे. सत् पात्री दान दिले पण ज्याला कांहीच घेण्याची ईच्छा नाही, त्याला ते देण्यात काय अर्थ आहे. तुका म्हणे - नारायणा तू मला तारलेस तर तुझे मोठेपण खरे. तुझे पतितपावन हे तुझेच ब्रीद आहे. ते फक्त तु खरे करुन दाखविलेस. (अ 4109)

509 हे भगवंता प्रपंचा हा पांढरा विषारी साप आहे. संसाराने अनेक योनीत फिरावे लागते. देव गोड आहे. त्याचे नाव गोड आहे. तो दयाळू आहे सर्व प्राणीमात्राचे रक्षण करतो. तो सज्जन आहे भक्तांना श्रम पडू देत नाही. देव, इतका श्रीमंत आहे. लक्ष्मी त्याची दासी आहे. देव जीवांत लपतो पण ते जीवाला कळत नाही. पकडावयावयास गेला तर सांपडत नाही सामान्य भक्तिभावानेसुध्दा आज्ञाधारक दास होते. सर्वात उंच, लहान म्हणाल तर सर्वात लहान आहे. हे मी सत्य सांगत आहे. अशाप्रमाणे वर्णन रुपाने वाङमयी मी पूजा केली. (अ 4111)



# 6.वैष्णव धर्म्, ज्ञान

510 सर्व भगवंताचे आहे न समजल्यामुळे माणसाचे मन मी व माझे अशा संभ्रमात असते. अहंकारामुळे पंचमहाभूताचा त्रास होतो. जन्म मरण प्राप्त होते. काळाने गळा दाबला तरी जीव मी, माझे, मला करत असतो. (अ 29)

511 तुका म्हणे - दुर्जन नास्तिक माणसाचा संबंध येऊ नये, मनांत सुध्दा नको. जे भगवंतास विसरुन संताची निंदा करतात त्याची संगत मला नको. भांडखोरांचा संपर्क नको. जे यज्ञ करतात कर्मकांड करतात परंतु ते क्रुर, आसक्ती इच्छा बाळगतात. मान सन्मान दंभ व केवळ पोटासाठी ग्रंथाध्यायन करतात अहंकारी असतात हे सर्व अधर्मी आहेत. (अ 65)

512 दारु पिण्याऱ्याच्या घरचे मिष्टान्न सेवन करु नये. दुर्जनाची संगत टाळा. ज्याच्या जीवनांत परमार्थिक आचार संहिता नाही. नित्यनियम पाळत नाही. तो कुत्रा, बैल समजावा. संत सेवा करत नाही. तो यमाचा पाहुणा होय. ( 97)

513 सालंकृत कन्यादान पृथ्वीदानाइतके पुण्यकर्म आहे. स्वधर्म पालनामुळे उदारनिर्वाह होतो व धर्म घडतो. सत्यधर्माच्या आचरणास देव साहाय्य करतो. तू सत्याने वागावे. अन्न कीर्ती द्रव्य नशिबाने मिळतात त्यासाठी अधर्म करु नका. कोणत्याही गोष्टीचा हव्यास दु:खकारक आहे. त्याचा शेवट नाश आहे. (अ 133)

514 देवाने दिले असेल तेच गोड असते. त्यांत समाधान वृत्तीने राहिले तर त्यात गोडी व आदर असतो. शेतांत राबून मिळविलेले धान्य दान करणे आणि भीक मागून आणलेले धान्य दान करणे यामध्ये फरक आहे. उतावळे पणाने मान मिळत नाही. सात्विकतेने धर्माचरण करुन, धैर्य राखण्याऱ्यालाच हिऱ्याचे मोल प्राप्त होते. (अ 138)

515 सोन्याची पायातील बेडी देखील दु:खकारकच असते. ज्ञानीसुध्दा गर्वाने नरकात जातो. पंडीताना पुस्तकी ज्ञानाने ब्रम्हसुख मिळेल असे नाही. पूर्व कर्मातील भोगास आरंभ होणे ते प्रारब्ध होय. पूर्वीचे पापपुण्याचा साठा त्यास क्रियमाण म्हणतात. देव व भक्त यांच्या स्वरुपदृष्टया कांही भेद नाही. (अ 155)

516 अंगात विवेक वैराग्य नसेल तर साधूत्व खोटे होय. जे लोक निष्कारण वाद घालतात आणि निंदा करतात त्यांचा धिक्कार असो. अविद्येच्या

निद्रेत असणाऱ्यास राम कसा जागा करणार ? विषयभोगाची आसक्ती, दुराचारी, संतनिंदा करणे सर्व अविद्याच होय. राम नामाचा छंद लावून घे जन्म सफल होईल. (अ 165)

517 कोणत्याही गोष्टीचा शोक करण्याने दु:ख वाढते. धैर्यवान व्हा, धैर्य धरा. भित्रेपणा खोटा आहे. मानवी जीवनात परमार्थ कांही क्षण घडला तरी पुरेसाआहे. ज्याची श्रध्दा आणि प्रेम देवाखेरीज इतर कोणत्याही वस्तूवर नाही तो खरा विष्णुभक्त होय. मग त्याची कोणतीही जात असेना. (अ 214)

518 ज्याला धन आणि परस्त्री विषयी आसक्ती नाही. संसारास विन्मुख झालेला आहे. चांगली आणि वाईट संकल्पनाविषयी मनांत आनंद अथवा दु:ख नाही. देह बुध्दी असून चित्तात विषय-लोभ आहे. त्याने असत् कर्म केल्यास तो दु:खी होइल. खरे सुख पाहिजे असल्यास त्याने धर्माने वागले पाहिजे. (अ 240)

519 समुद्रात पडलेल्या पाण्याचे ठेबाचे वेगळेपण काढता येत नाही त्याप्रमाणे आत्मा आणि जीवाचे वेगळेपण करता येणार नाही. हातून घडलेल्या वाईट कर्माचा अनुताप झाला तर क्षणांत त्याचा दोष निघून जातो. पश्चाताप टिकणे हितकारक आहे. पश्चातापाने शुध्द झालेल्याना पाप स्पर्श करीत नाही. (अ 346)

520 पुजा करावा अशा योग्यतेचे हरीभक्त हरीकथा करतात. ज्या देवाचे गुणगाण गातात तो देव त्याच्यांमध्ये वास करत असतो. देहभान विस्मरुन ते केवळ आनंदातच असतात. त्याचा अभिमान नष्ट झालेला असतो. लाज सन्मानाची काळजी करत नाही. शोक, मोह, चिंता याचा त्याना विसर पडलेला असतो.हरिभक्त विठोबाचे सखे असून केवळ विठोबासारखेच आहेत. (अ 364)

521 वाफशाच्या वेळी शेतकरी घरात मढे (प्रेत) ठेवून शेतात पेरणीसाठी जातो. अति दक्ष असतो. सहज नरदेह प्राप्त झाल्याने संसारातील सर्व गोष्टी बाजूस ठेवून खरोखर आपले हित ज्यात आहे असा परमार्थ करण्याची त्वरा करावी. काळ कोणत्याही वेळी येऊ शकतो. निर्धार करा त्वरीत स्वहित करा. संसारी पाशातून सुटका करा तोच शहाणा पुरुष होय. (अ 423)

522 अंतरीचे प्रेम आग्रहाने निर्माण होत नाही ते अनुभवानेच कळून येते. प्रेमाच्या गोष्टीचा आग्रह धरावा लागत नाही. एक भगवंताशी संबंध जोडला म्हणजे संपूर्ण विश्वाशी त्याचा सोईरसंबंध होतो. सर्वाच्या अंतर्यामी तो एकच आहे. हे

स्नेह मैत्री वरवरची नसते. जीव जो आत्माराम त्या ठिकाणी सामावले जातात असे समजा. एकमेकाचे सुख-दु:ख एकमेकाच्या प्रेम धाग्यानी बांधली जातात. सर्वात्म शुध्द भाव (ब्रहत) निष्ठयाच्याच अंतकरणात ठसला जातो. त्यामुळे त्याची शोभा वाढते. (अ 426)

523 खरे ब्रम्हज्ञान संताजवळ असते इतरास जन्म मरणाचे भय असते. ब्रम्ह अणूपेक्षाही सुक्ष्म आहे. तरीपण स्वप्रकाशाने सर्वत्र भरले आहे. ज्याने इंद्रियाना आधीन ठेवले असेल तोच वर्म समजून घेऊ शकतो. नास्तिकाचे तर्क कुतर्क, सांख्य-विकानी केलेल्या चर्चा परमार्थाची हानी करणारे आहे तुका म्हणे - डोळ्यांत विवेकाचे चांगले अंजन घालावे तेव्हा ब्रह्माचे ज्ञान होते. (अ 495)

524  चित्त शुध्द होऊन बुध्दी भगवंताच्या चरणी स्थिर होणे हाच धर्म श्रेष्ठ व योग्य आहे असे जाणावे चंचल मनाच्या मागे धावू नये. संताच्या वचनावर श्रध्दा आणि आवड ठेवावी. दुर्जनाचा स्नेह टाळावा. थोडेसे विषाने अन्न विषारी होते. ज्यात आपले स्वहित आहे तीच गोष्ट धर्मनीतीचा विचार करु करा. (अ 546)

525 आम्ही विष्णुदास मेणाहून मऊ तर वज्राप्रमणे कठीण सुध्दा आहोत. आम्ही देहबुध्दीने मरुन आत्मस्थितीने जिवंत आहोत. जो जे मागेल ते त्यास देऊ. आम्ही आहोत भले तरी देऊ लंगोटी, नाठाळ्याचे - माथी काठी देऊ. आम्ही आई-वडीलापेक्षा जादा माया करणारे, शत्रूपेक्षाही अधिक घातपाती आहोत. आम्ही पूर्ण चांगले आहोत. जशी इच्छा असेल तशी ती पूर्ण होइल. (अ 586)

526 व्दारकेचा श्रीकृष्णरुपी माल पंढरीस आला असे पुंडलीक सांगत आहे. विष्णुभक्त माप करणारे आहेत. कोणी माघारी गेले नाही. ज्यानी माल घेतला त्याला लाभ झाला. त्यानी इहपरलोकांत मालाची साठवण केली. तुका म्हणे-विश्वासाने संताजवळ राहिलो. मनामध्ये श्रीकृष्णरुपी माल वाहाण्याचे श्रम केले. म्हणून त्याच्याकडून मला ज्ञानरुपी मजुरी मिळाली. (अ 652)

527 ज्याची बुध्दी वाईट आहे तो ब्राम्हण नव्हे ज्याला कीर्तनाची आवड नाही तो जन्माने ब्राम्हण असला तरी ब्राम्हण नाही. जो जातीने हरीजन असला आचार-विचाराने पवित्र असला तरी तो खरा ब्राम्हण आहे. जो रामकृष्णाचा जप करतो श्रीहरीचे रुप मनांत साठवितो तो हरिजन असूनहि तो वृत्तीने ब्राम्हण आहे.

काम, क्रोध, मद,मत्सर, दंभ व अहंकार सोडलेल्या व्यक्तिस ब्राम्हण म्हणावे. (अ 707)

528 ज्याला दोन बायका आहेत त्याचे घर म्हणजे पापाचे आगरच होय. खोटे बोलणे म्हणजे पापच. जो खरे बोलतो तो सुखाचा सागर समजावा हरी चिंतनाने संचित कर्म जळून जाते आणि माणसाच्या हातून कोणतेच पाप कर्म घडू देत नाही. विठोबाच्या नामचिंतनाने विविध तापातून मुक्तता होते. (अ 710)

529 कलीयुगात सर्वत्र ब्रम्हज्ञान बोकाळले आहे. कोणाजवळ ब्रम्हज्ञान असेल तर मला एक कणभर द्या. सर्वत्र आशा आकांशा तृष्णा व माया या दोषानी भरलेले दिसत आहे. दंभ आहे. तसेच काम, क्रोध लोभरुपी विष मिसळलेले दिसत आहे. निंदा, अहंकार दोषानी ब्रम्हज्ञान माखले आहे. तुका म्हणे अशा प्रकारच्या ज्ञानांत काय प्राप्त होत नाही. (अ 750)

530 तसे पाहता वाघ आणि गाय एकाच लाकडाची बनविलेली आहे. सर्व जग तुमचेच स्वरुप आहे. हे आम्हांला कळले आहे. तुम्ही आपल्या अभेद स्वरुपाने जगाचा खेळ मांडिला आहे. आरशामध्ये प्रतिबिंब स्वरुप नाही. तथापि दुजेपणाचा भास आहे. म्हणून समाधान आहे. जो परोपकरी, सत्कार्यी, श्रमिक आहे. आपल्या जिवासारखे इतराचे जीव जाणतो. तुका म्हणे देव अशा पुरुषाच्या अंकित होतो. (अ 825)

531 मनामध्ये भक्ति नसताना कोरडे ब्रम्हज्ञान सांगतो अल्पबुध्दी पंडीताचे ज्ञान सत्वहीन, फोल आहे. प्रपंचाच्या हव्यासाने दोष वाढतात. एकदा का हव्यासाचा निरास झाला की आत्मस्वरुपांत बदल होत नाही. सर्व कर्ता नारायण आहे असे म्हणणे बरे. सर्व प्रारब्धाने होते. चित्तामध्ये शांती ठेवली तर सर्व सुखे प्राप्त होतात. (अ 862

532 दुधाची खीर ही फार गोड आहे पण तिला आधार साखरेचा आहे. त्याप्रमाणे भक्तिविरहित असलेले ब्रम्हज्ञान साखर विरहीत दुधाप्रमाणे आहे. ज्या अन्नांत मीठ नाही ते अन्न रुचकर लागत नाही. आंधळ्यास जे परिश्रमाने शिकवावे ते तो नावापुरते जाणतो. ब्रम्हज्ञानी माणसास भक्तीची मैत्री असणे हितकारक आणि मोठेपणाचे लक्षण आहे. (अ 927)

533 हे शरीर मरणारे आहे.बायका मुले पैशाच्या प्रेमात अडकलेले आहे. नरदेह व्यर्थ घालवीत आहेत. ते राम, कृष्णाचे चिंतन का करीत नाहीत ? जगात

केवळ विष्णुदासच प्रपंचाशी युध्द करणारे खरे योध्दे आहेत त्यांना पाप-पुण्याची बाधा होत नाही. त्याच्या मुखांत सतत हरीचे नामाप्रत आहे. (अ 945)

534 कोणतयाही सुगंधाची स्वतंत्रपणे लावणी किंवा पेरणी करावी लागत नाही. चंदन गुलाब ह्याच्या बरोबर सुगंधाची उत्पत्ती होत असते. तसेच मानवी मनाच्या शुध्दतेतेच सद्गुणाचे बीजारोपण होते. फुलातील सुगंध वाऱ्यामुळे सर्वत्र पसरतो. सज्जनाच्या सद्गुणाचा प्रसार नारायणाच्या मुखाने होतो. तुका म्हणे खऱ्याकरिता पयत्न करणे चांगले. जसा अमृताचा नाश नाही तसा सत्याचा नाश नाही. (अ 963)

535 आम्ही वैष्णव दांडपट्टा खेळणारे सैनिक आहोत. पाप-पुण्याचा भार लागू देणार नाही. आमचा योगक्षेम भगवंतावर आहे. 'राम' दोन अक्षरे सोडून इतर निरंतर जप आम्ही वैष्णव करतो. जग विष्णुमय असे वेद सांगतात. मला तुजवाचून अन्य ध्यान नाही. हरीचिंतनाने प्रपंचाचा नाश केला त्याच्या सामर्थ्याने आम्ही त्रैलोकात श्रेष्ठ आहोत. (अ 968)

536 वैष्णवांची चरणरज आपणास प्राप्त व्हावी अशी भगवंत इच्छा करतो. वैष्णवात आम्ही देवात वेगळेपणा उरला नाही. गंगा, यमुनाचे संगम मध्ये सरस्वतीचा संगम गुप्त असतो. तीर्थे तप, दान, व्रता यांच्या ठिकाणी वैष्णवाच्या सामर्थ्याप्रमाणे (पापे, दारिद्र तास्काळ नाश करण्याचे) सामर्थ्य नाही. जे नामसंकीर्तनामध्ये आनंदाने नाचतात त्याचे चरण-रजास शंकर वंदन करतो. (अ 990)

537 वैष्णवांना मुक्तीचे दारिद्रय नाही. संसार दु:ख कसे असते ते त्यांना माहित नाही. अंत:करणात गोविंद कायमचा बसलेला असतो. सर्व वेळ गोविंदाचेच स्मरण करतात सर्व भोग नारायणास अर्पण करतात. अभोक्ते राहतात. परोपकारी, प्रेमळ असतात. दयाळू असतात. हरिभक्त देवच होतो. (अ 1066)

538 हे रुक्मिणी कांता तू माझापिता माता आहेस, देवा तुमच्याजवळ माझा मूळचा जो आत्मस्वरुपा ठेवा ठेवला आहे त्याच्यावर माझा हक्क आहे. 'मी आणि माझे' यांचे कांहीतरी ओझे डोक्यावर आले म्हणून हृदयांतील आत्मबोधाचा विसर पडला. तुम्ही स्वामी मी सेवक हा काल्पनिक भेद होता. परंतु सतानी निर्णय दिल्याने तुझ्यांत माझयात भेद नाही. (अ 1076)

539 देवा वाद करण्यांत तू माझ्यासमोर टिकणार नाही. आपल्या वाद संवादात सुख आहे. म्हणून मी वाद करतो. तुझ्यात थोरपणा कोणत्या कारणाने आला ? चरणावाचून मस्तक उपयोगी पडेल काय ? तुझ्या सेवाचा भार आम्ही अपार कष्टाने वाहत आहोत. देवा तुमच्या आमच्यांत भेद नाही आता वाद करुच लका. (अ 1078)

540 आपले परमहित पाहिजे तर दंभास दुर ठेवा आणि शुध्द चित्ताने भगवंताची सेवा करा. विठ्ठलाचे नाम मोठ्या प्रेमाने एकभावाने एकांतात बसून घ्या. आपणास लाभ तुमच्या घरी चालून येतील देवावाचून इतर गोष्टीना अंत:करणात थारा देऊ नका. वासनाचा समुळ नाश करावा. तुका म्हणे प्रपंच यशस्वी होण्याकरिता विठ्ठल चिंतन करा. त्याला विसरुन वाणीचा व्यर्थ उपयोग करु नका. (अ 1093)

541 ज्याचे कुलदैवत पांडुरंग आहे त्याच्या घरी मी त्याचा दासीपुत्र होइन. देवा शुध्द जातीची मला इच्छा नाही. पाहिजे त्या ठिकाणी जन्मास घाला, परंतु मला आपला सेवक करा. पंढरीच्या वारकरीच्या घरी मी पशू होऊन राहीन. ज्या विठ्ठल चिंतनाचा ध्यास आहे त्याच्या चरणांतील जोडासुध्दा होईन ज्याच्या अंगणात तुळशी वृंदावन आहे त्याचा घरी केरसुणी होऊन राहीन. तुका म्हणे याच भावना माझ्या अंतकरणात आहेत. (अ 1154)

542 आकाश सर्व व्यापी असून सर्वाहून अलिप्त आहे. तसे संतजण जगाच्या गुणदोषानी लिप्त होत नाही. शरीररुपी खोपट केव्हांतरी जावयाचे आहे. मग त्याच्या रक्षणाची भोगसुखासाठी एवढी खटपट का करावयाची प्रपंचासाठी केलेले कपट परिणामी निष्फळ होते. सर्व प्रकारचे अलंकार आटविले असता त्याचे नाम-रुपे नष्ट होतात, आणि केवळ सोने राहते. त्याचप्रमाणे भेद नष्ट केल्यावर तू मी एकच आहे. (अ1205)

543 आमच्या पोटांत असंख्य (कोटी) आनंद साठवलेला आहे. हरिप्रेमाचा प्रवाह जलद गतीने वाहत आहे. हरिनामाच्या आनंदाचा पूर वाहात आहे. सापामुळे एकास मृत्यू येतो तर दुर्जनामुळे सर्वांचा प्राणांतिक घात करतो. विंचु केवळ नांगीच मारतो पण दुर्जन माणुस दुसऱ्याच्या अंगात दाह निर्माण करतो. जे दुष्ट स्वभावाचे असतात ते नरकाचे धनी होत. खडीसाखर व पिठीसाखर मध्ये केवळ नामभेद आहे तसेच पांडुरंग आणि जीवांत आहे. (अ 1299)

544 पेरताना बी जातील अशी भावना होती, परंतु भरघोस पिक आले. पण खरा लाभ पेरण्यांतच असतो. अंकूर फुटल्यापासून कणीस येईपर्यंत प्रथम पाल्याचे रक्षण करावे. तेव्हां अखेरीस पोटऱ्यातून कणसे बाहेर पडलेली दिसतात. झाडाच्या आळ्याला पाणी दिले म्हणजे फळाचा लाभ होतो. मध्यान्हाला सूर्य असता आपण डोळे झाकले तर तो असून नसल्यासारखे होते. आपल्या अल्पज्ञानामुळे अतिगडद अज्ञान आडवे आलेले असते. त्यामुळे सत्याचे दर्शन होत नाही. अज्ञान दूर जाताच सत्य दिसते हृदयांतील ब्रम्हरुप सत्य अज्ञानाने जाते. (अ 1396)

545 प्रपंचाच्या बाजारात नुकसान होइल दिखाऊ माल भरु नका. त्याची वरघडी फसविणारी असते. तो माल घेण्यात वासनेचा पदर अडकला तर तो पुन्हा निघणार नाही. आधी विसार देऊन गुंतवणे खोटे आहे. हातांतील रोकडा माल खरा देऊन तो ध्यावा. संत सज्जनाचे मार्गदर्शन घ्यावे भक्ति मार्ग धरावा पूर्वजाच्या मार्गावरुन पाहात पाहत चालावे परमार्थी आयुष्यांत किती दोष गेले व गुण किती आले याचा हिशोब करुन आत्मपरीक्षण आणि निरीक्षण करावे म्हणजे आत्मपरीक्षा आणि निरीक्षण करावे म्हणजे आत्मविश्वास वाढतो. बोलण्याप्रमाणे वागावे. हे परमार्थ साधकाचे लक्षण आहे. (अ 1399)

546 योगी समाधीमध्ये कोणत्या तरी प्रकाशाचा भास पाहून आम्ही देव आहेत असे म्हणतात, तो भाव खरा नाही असे म्हणावे. आम्ही बहुश्रुत, सर्वज्ञ, जाणते अशी निष्कारण समजून करु नका. यज्ञ, तप, चित्तशुध्दी गुरुशरणागति, श्रवण, आत्मसाक्षात्कार, मोक्ष असे आहे. परंतु येवढ्याने भागत नाही. नित्य-नैमित्तिक कर्माचे आचरण हे वर्णाश्रमाला स्वाभाविक असून विहीत आहे. हे न केल्यास दोष आहे. केल्यास लोक निष्काम होतील स्वत: राम होतील. सगुण रामास पाहून राममय होतील. (अ 1405)

547 जिवाभावाने अनन्य शरण जावे. कोणतेहि मायिक पदार्थ न मागितल्यास मोक्ष प्राप्त होतो. भगवंता तुझे दास म्हणून घेताना भय चिंता, अपेक्षा मुळीच नसते. नामस्मरणाचे वर्म जाणून तुझे नाम मुखात धारण केले आहे. आम्ही माता विठ्ठल असल्यावर आम्हास सुखास काय कमी. जन्म-मरणाचे दु:ख विसरलो आहे. आम्ही वैष्णवाच्या समुहात खेळू आणि आनंदाच्या पाण्यात स्नान करु, विठ्ठल आई आमच्यावर नेहमी लक्ष ठेवते. (अ 1417)

548 विषयासक्त माणूस धर्माचरण करीत नाही म्हणून त्यास भगवंताची प्राप्ती होत नाही. द्रव्य-संपत्ती विषय वासना, सर्व नाशवंत असल्याने त्यास शाश्वत सुख मिळत नाही. यमदुताकश नरकांत जातो. ज्याच्या वाणीला विठ्ठल नाम नाही तो जीवंत माणूस प्रेताप्रमाणे समजावा. कितीही शहाणा पंडित असला तरी सुध्दा हरिभक्त नसेल तर त्याच्या पांडित्याला आग लागो भगवंत हा भक्ताच्या रक्षणाकरिता अजन्म असून जन्म घेतो. अनाम असूनहि नाम धारण करतो. त्याचे कारणाने निराकार असून आकारहि धारण करतो अवतार घेतो. (अ1438)

549 देव भक्ताच्या अधीन होतो तो कौतुकाने भक्तिचा व्यवहार वाढवितो. आम्ही आमच्या मनाला विषयवासनेपासून वळवून कल्याण मार्गावर आणीत आहोत संसाराच्या भीतीमुळे आयुष्य आहे तोपर्यत कोणत्याही मार्गाने मोक्ष गाठावा. भगवंता आम्ही गुढ वेदार्थ किंवा प्रक्रीया जाणत नाही. आमच्या अंतकरणातील तुझ्या रुपाचे चिंतन अखंडपणे करतो. आम्हास वेदाचा अधिकार, पात्रता नाही. आम्ही रानटी आहोत. आम्ही इंद्रियाधीन दीन आहोत. अवहेलना करु नका, उध्दार करा. (अ 1444)

550 ज्यास वेद, शास्त्र पुराणे मान्य नाहीत त्याचे तोंड पाहू नका. ज्याचे वागणे वेदबाहय आहे त्याचे बोलणे फिके असते. अग्निस्पर्शाने कोणतीही लाकडे अग्नीरुप होतात. ओढा-नदी समुद्ररुप होतात. माझी अभेदस्थिती प्राप्त होण्यास वेदशास्त्र, पुराणे, गुरुवचन यांच्यावरील दृढ विश्वासच कारण आहे. भक्ति म्हणजे सर्वांना नमस्कार करणे, वैराग्य म्हणजे त्याग आणि काया ब्रम्ह होऊन ब्रम्हाचा भोग घेणे याला ज्ञान म्हणतात काया माझी नाही म्हणताच देहाचा निरास होतो व ज्ञान मिळते. (अ 1497)

551 वेदाचा खरा अर्थ आम्हासच ठाऊक आहे. वेदाचे पठण करणारे पंडित केवळ भारवाहक आहे. खाण्याच्या रुचीचा अनुभव ते हुंडावाहकास नाही तर ते खाणाऱ्यांस येतो. विश्वाच्या उत्पती-स्थिती लयास कारण असलेला पांडुरंग आहे. त्याने आत्मत्वाने हस्तगत केले त्यालाच वेदाचा अर्थ समजतो. ज्याच्या हातात मूळ आहे त्याच्या हातात फळ आपोआपच येते. वेदाचे कारण असलेला विठ्ठल आम्हांस सापडलेला आहे. त्यामुळे वेदरुपी फळ आमचे हाती आले आहे. (अ 1549)

552 तीर्थयात्रा करण्यापेक्षा परोपकारी हरिभक्ताची संगत करावी. आम्हास कोणत्याही प्रकारच्या भयाची चिंता नाही. आम्ही भगवंतास समर्पित झालेले आहोत. समर्थ शक्तिचा वादविवाद करु नये. मनुष्याने अहंकाराचा नाश करुन आपण कोण आहोत याचा विचार करावा बाकीची बडबड मायेचा अहंकार आहे ते बोलणे अज्ञानातील आहे. फळ तेच बीज, बीज तेच फळ. मूळ नांवाने ते बदलत नाही. मूळ परमात्मस्वरुपात बदल होत नाही. (अ 1667)

553 मी केवळ शुध्द आत्माच आहे. शब्दाचे बोलणे शब्दापुरतेच राहते. तुमचे ब्रम्हज्ञान आता पुरे झाले. आम्हाला तुमचे पाय सोडवत नाही. विरोधात विरोध वाढत जातो अंतकाळीच्या वासनेप्रमाणे पुढचा गर्भवास येतो. मी करावे, करणार नाही या शब्दामुळे पाप-पुण्य उत्पन्न होते याला संकव्याचे (मी व माझा भ्रम) बंधन म्हणतात. हरिचिंतनाची व संतसंगतीची सत्वर त्वरा करा. हृदयांनी वाईट भावना दूर होतात संसाराचा मोहपाश राहत नाही. (अ 1673)

554 अतिशय भाविक भक्ताची सर्व कामे देव स्वत: करतात. धर्मराजाच्या घरी उष्टी काढली, शबरीचे उष्टी बोरे आवडीने खाल्ली, अर्जुनाची घोडी धुतली मोहमाया पाश तोडण्यास गुरु आणि देव यांचे साहय्य असले पाहिजे. वाणी आणि मन आवरता येत नाही, हर्ष व व्देष नाहीसे होत नाही तोपर्यंत संसारी लोक नाना प्रकारची सोंग ढोंग करतात. मी तोंडाने मुक्त म्हणतात तरी दु:खाने बांधलेला असतो. (अ 1701)

555 लेकरु मोठे झाले की आई त्याला दूर करते. विठाई माझे आई मला दूर करु नकोस. ताकापासून लोणी करतात पुन्हा ताक होत नाही. ज्या पाण्यापासून मोती जन्मतात त्याचे पुन्हा पाणी होत नाही. निर्गुण रुपाचे ज्ञान झाल्यावर सगुण हे असार आहे असे करु नकोस. नारायण तुझ्याखेरीज मी कोणाला शरण जावू. (अ 1706)

556 सर्व लोक मला ब्रम्हरुप दिसतील, असे भाग्य प्राप्त झाले तर माझ्या सुखाला मर्यादा राहणार नाही. कामवासनेचा संबंध दूर होईल आणि दया, क्षमा, शांती गुण माझ्या ठिकाणी प्रत्यक्षात दिसतील धगधगीत अग्नीप्रमाणे विविक,वैराग्याचे बळ असावे.तसे चित्तशुध्दिपूर्वक नवविधा भक्ति माझ्या ठायी असावी. मोक्ष तरी पंढरीत फुकट मिळतो. नामसंकीर्तनाचा पाठपुरावा करावा अपेक्षित लाभ होइल. (अ 1708)

557 काया-वाचा-मनाने केलेली कर्मे भगवंतास सहज अर्पण होत असताना 'मी' या कर्माचा कर्ता आहे या विपरीत समजुतीने ती कर्मे परत आपणाकडे आणतात व जन्म-मरण भोगतात. काम-क्रोधांनी देह मलिन असता होम हवन, मंत्रपूर्वक अर्चन करण्याने कोणते पुण्य मिळणार सर्व साधनापेक्षा भक्तीचा मार्ग सोपा उपाय आहे आणि तो म्हणजे विठोबाचे ध्यान होय. असलेला देहाभिमान व आत्मरुपाचे अज्ञान सर्वाचा त्याग करुन हरीला अभेदाने शरण जाणे चांगले. (अ 1718)

558 ज्या कामामुळे बदनामी वाढते त्या कामाचा त्याग करावा जगांत खरे बोलणे, खरे वागणे चांगले असल्याने लोकांना प्रिय होते. असत्याचा त्याग करावा. सर्व रुपा, नामाने आपणच एक आहोत. अशी जगात हरीची प्रसिध्दी आहे व्देवभावाने पाहिल्यास आपली छाया देखील वेगळी आहे. असे पाहता येणार नाही. सर्वत्र नारायणाची व्याप्ती असल्याने व्दैताचा अभाव आहे. (अ 1793)

559 जेवण आपल्या कष्टाचे मालकीचे असेल तर ते भूकेच्या वेळी मिळते व रुचकर होते. त्याप्रमाणे मला परमार्थाचा वर्म सांपडला. संसार सत्याचा भ्रम गेला. सर्व विश्व भगवंतमय झाले असून हृदयात असणाऱ्या हरीशी ऐक झाले. हरीच्या व्यापक कोथळीत माझे संचित जमा झाले. हरीच्या ज्ञानाने संचित नाहिसे झाले. प्रारब्धाचे धन भोगत आहे. तुका म्हणे - मी आता समर्थ आहे जे करीन ते होऊ शकते असी सत्ता आहे. (अ 1795)

560 मी व माझे या पासून निराळा होऊन व्यवहार साक्षी भावाने पाहिन. मस्तकावर कोणत्याही नातेसंबंधाचा भार घेणार नाही व त्यासंबंधी कांही बोलणार नाही. देवापाशी एकनिष्ठ भाव राखावा. देवावर भार घालण्याने देव उदास (निष्क्रिय) होत नाही. हरि चिंतनाने सर्वांचे कल्याण होणार आहे. असा माझा विश्वास आहे. (अ 1810)

561 आपले आयुष्य आणि शरीर जाणारे आहे. आणि सर्व विषय पोकळ ढगाच्या आकृतिप्रमाणे क्षणिक आहे. उत्पत्ति व विनाश याचे अखंड दळण काळ करीत आहे. त्यातून पाकनिर्मिती, भोजन होते. नंतर निर्मितीचे बीज होते. देवाला शरण जावू जन्म मरणाचे भय राहणार नाही. गंगेचा पाण्याचा ओघ वाहत आहे. भाग्यवान सेवन करतील. नास्तिक मात्र परमार्थाकडे तोंड

फिरवतात. तुका म्हणे मी मात्र आपल्या मनाच्या प्रीतीने देवाची पूजा करतो, भक्ति करतो. (अ 1827)

562 काम क्रोधाची शांती करुन सर्व प्राणिमात्रांविषयी प्रेम बाळगणे ही भक्ती आहे श्रुतीचा मुख्य अर्थ हरी आहे. सर्व जाणून तुम्ही हरीला का प्राप्त करुन घेत नाही ? शरीराचा भाव प्रेतरुप झाल्याने त्याला स्मशानांत जागा आहे. शरीराला वैराग्याच्या गोवऱ्या लागल्या, ब्रम्हाचा ज्ञानाग्नी लावून ब्रम्हरुप केले. कुळाला, रुपाला, नामाला तिलांजली दिली. शरीर पंचमहाभूतांचे झाले. शरीराची राख झाले. देहाचा घट फुटला. आता फक्त एकाच नामाशी संबंध राहिला. (अ 1898)

563 अभिमानाचे तोंड काळे असते कारण अभिमानाने आत्मस्वरुपाच्या ठिकाणी बळेच अंधार केलेला आहे. या देहाभिमाच्या योगाने परमात्म स्फुर्ती नाहीशी झाली आह. अभिमानाने तोंडात दु:खाची माती पडते. आत्मसुखाचा लाभ जातो. अभिमानी माणसाच्या पाठीमागे लाज लागलेली असते. तो संतास शरण जात नाही. ती लाज मोक्षाच्या आड येते. त्याच्या मनांत पाप करण्याची वासना असते. तो जन्म मरणामध्ये अडकतो. (अ 1938)

564असत्य गोष्टीचा कंटाळा केला तर तो कांही मत्सर नसतो. आणि ब्रम्ह हे विकाररहित आहे धान्य शिजलेले आणि हिरवे असलेले सर्वांना 'धान्य' एकच संज्ञा आहे परंतु भोजनासाठी शिजवलेले धान्य निवडले जाते त्याप्रमाणे समाजात चांगल्याचा स्विकार आणि वाईटाचा धिक्कार अनादि काळापासून आहे. सर्व भूतामध्ये नारायण साक्षीरूपाने समान आहे. हे सत्य आहे. दुष्ट दुर्गुणी आहेत. ते शिक्षेस पात्र आहेत. सद्गुणी अभिनंदास पात्र आहेत. ज्याचे सर्व भेद नष्ट झाले तो देव होतो. (अ 1964)

565 अंत:करणात ज्याचे सखोल चिंतन आहे. त्या चिंतनाचे अनुभव घेऊन जो उपदेश करतो, त्याला अनन्य साधारण महत्व आहे. अनुभवज्ञान शब्दज्ञान यात फार मोठे अंतर आहे. गायीच्या चीकात (सुवातीचे दुध) व नंतरचे दुधात फार अंतर आहे. जशी जात तसे गुणधर्म असतात. अनेक जाती आणि गुणधर्मास 'जग' असे म्हणतात. अनुभवातून आलेले शब्दज्ञान तोकडे असते. (अ 2018)

566 हरिस्मरण करीत करीत भोजन पवित्र होते. व तृप्त होते. प्रारब्धामुळे पीडा घडते. कधी घागरीत पाणी भरावे तर कधी पलंगाव निजावे. ज्याप्रमाणे वेळ येईल त्याप्रमाणे वागावे. कधी विमानाने प्रवास तर कधी पायी चालावे लागते. कधी उत्तम वस्त्रे, कधी साधी वस्त्रे मिळतात. कधी सज्जनाची तर कधी दुर्जनाची संगती मिळते. सुख दु:ख समान समजावे. (अ 2046)

567 दुर्जनांचे संगतीने क्षणक्षणाला मन:शांती बिघडते त्यामुळे त्याची संगती मला देऊ नकोस, संचित प्रारब्ध आणि क्रियमाण हे भोगल्यावाचून सरायचे नाही. पण तुझ्या सामर्थ्याने ते एका क्षणांत बदलून जातात. सूत्रधारी देव प्रारब्धाच्या सूत्राप्रमाणे देहरुपी पुतळ्यास हलवतो. तो बोलवितो तसा मी बोलतो, पापपुण्य त्याचीच आहेत. तोच सर्व जाणतो. आम्ही देहाहून वेगळे झालो आहोत. (अ 2160)

568 गायत्री मंत्राची विक्री करुन जे लोक पोट भरतात त्याना यमलोकास जावे लागते. जे कोणी आपल्या कन्येची विक्री करतात त्यांना भयंकर यातना भोगाव्या लागतात. क्षुद्र भोगासाठी राम नामाला कां विसरलास ? नारायणा माझ्या अंत:करणात दुष्ट वासना उत्पन्न होऊ देऊ नकोस. मला तुझ्या पायाशी ठेव, बीजापासून झाड आणि झाडापासून बीज जन्माला येते. याप्रमाणे देवा तुमचे आणि माझे झाले आहे. पाण्यावरील तरंग पाण्याचेच अंश असतात बिंब आणि प्रतिबिंबाप्रमाणे भगवंता तुम्ही आम्ही आहोत. (अ 2242)

569 माझे तुझे अभिमानाचे ओझे खाली उतरले की तो माणूस कृतकृत्य होतो. त्यासाठी कांही टाकावे, घ्यावे लागत नाही. मनुष्य स्वभात:च ब्रम्ह रुपाने शुध्द आहे. आशा आकांक्षा मोह, माया याचा फास गळ्यास लागला लाभ, नुकसान अपमान हे हे समान मानावे. सुखदु:ख समान मानावे सर्वकाही एक नारायण कर्ता आहे. विपुल धनधान्य संपणारे आहे. विठ्ठलरुपी धान्य कितीही खाल्ले तरी संपत नाही. विठ्ठल हाच परमार्थ. (अ 2274)

570 जो विषय भोगाला भुलला त्याचा देह रोगजर्जर होतो. भोजन करताना वाढलेले पदार्थ आळणी, बेचव आहेत. त्याविषयी कांही न बोलता खाणे हा चांगला उपाय आहे. देहाभिमान विवर्जित निवड न करता अन्नग्रहण करतात परंतु देहाभिमानी मात्र आवड निवड ठेवतात. चित्त आणि त्याचे

चलनवलन करणारा देव, दोघाचे सूत्र एकच आहे व ते देवाचे हाती आहे. जीव देवाच्या इच्छेने नाचतात. (अ 2335)

571 आता देवाकछे न जाता, देवच तुमचे घरांत सर्व काळ राहिले असे करा. जे तीर्थयात्रा करतात ते भटकंतीमध्ये सुखाची अभिलाषा धरतात, त्यामुळे ईश्वरप्राप्तीचा साधनेत अडथळा येतो, म्हणून आपल्या ठिकाणी वृत्ति स्थिर करुन निश्चल राहावे. सकल्यामुळे (तीर्थ, व्रते, योग) जीवन पराधीन होते इच्छेला हजारो मुख आहेत. एक इच्छा होताच लगेच जिरवून टाकावी तरच अंत:करणास आत्मसुख प्राप्त होते इच्छाच्या आणि यशाच्या धुंदीमुळे पराङ्.मुख होऊन अंध होऊ नका. (अ 2339)

572 प्रेमपूर्वक अंत:करणाने एकरुप होऊन सलगी करणे हीच त्याची पूजा आहे. त्याच्याविषयी दूजाभाव मोल धरल्याने विषमता प्राप्त होते. देवाचे समाधानासाठी मोल द्यावे लागत नाही. त्याला प्रीतीचे बोलसुध्दा संतुष्ट करतात. पदार्थ शिजून तयार झाल्यावर जाळ कमी न करता तो तसाच ठेवला तर वाया जातो. अशाप्रकारे निर्रथक श्रम करु नये. कामाचा अतिरेक कष्टदायक होतो. योग्य वेळी योग्य काम करण्याचे तंत्र कळले पाहिजे. प्रत्येक कार्याच्या वेळी योग्य गोष्टी लक्षात ठेवाव्यात. (अ2370)

573 मरणाची आठवण तुम्ही ठेवली नाही काय की, ज्या कारणाने अधाशीपणाने धन मिळवून त्याचा संचय करतोस ? देहाचे भय तू धरतोस, तर ते काळाचे भातुके (खेळणे) आहे. तुका म्हणे डोळे उघडा, जागे असताना आंधळ्यासारखे वागू नका. अनुकरण करताना विचार करणे जरुरीचे आहे. हीच रुढी रुढ करु नये. गळावरील अमिठाने माशासारखी स्थिती होईल. घोडा त्याच्या चालीवरुन, बसण्यावरुन कळते. तसा हिताचा रोकडा निवाडा करा. (अ 2626)

574 देह सर्व विकाररहित केला व पांडुरंगास देऊन टाकला. आता या देहाची पालनपोषणाची आवश्यकता नाही. इतर भोगाची तर आवश्यकता काय ? माझ्या देहात पांडूरंगाचे वास्तव्य मी माझेपणा हयांच्या मरणातून आला. जे वृत्तीने एकचित्त झाले आहे ते आमचे सोबती आहेत. मी हाक मारताच हांक ऐकण्याबरोबर ते येतात. आपण दोघे एकच आहोत असे

म्हणतात त्यांनी आपली वाणी भगवंताखेरीज इतर कोठेही गुंतविलेली नाही. (अ 2640)

575 काळ पाठलाग करत येत आहे. तेव्हा मी आणि माझे स्वस्थ बसणे उपयोगी नाही. देह प्रपंच, स्त्री पुत्र याचेमागे धांवण्यास आग लागो. देवा तू एकटाच माझा सोयरा आहेस, जो पर्यंत मला सत्याचे दर्शन झाले नाही, तोपर्यत मी 'मी' पणाचा खोटा भार डोक्यावर वागवीत आहे.

576 सत्यभावाने देवाचा आठव केला की भय पळून जाते. तो सर्व सत्ताधारी सत्यभावाच्या रुपाने तुमच्या घरी अस त्यामुळे कांहीही चिंता करावी लागत नाही. देवाच्या पायी प्रेमपूर्वक श्रध्देने भाव ठेवल्यास देव त्याचेजवळ राहतो. श्रीकृष्णाच्या नामाचा उच्चार केला तर काया, वाचा, मन या सर्वांना समाधान प्राप्त होते. विवेक आणि वैराग्य नसलेल्या दीनदुबळ्यांना हरिकथा सुख देणारी आहे. भवसागरांतून तरून नेणारी नाव यामध्ये बसण्याचा सर्वांना अधिकार आहे. उच्च-नीच भेदभाव नाही. हरिकथा करणारा आणि ऐकणारा दोघेही हरीकृपेस प्राप्त आहेत. (अ 2771)

577 सत्याची माप वाढते. असत्याची चाल अडकून पडते. जे खऱ्या कसाला उतरते तेच सर्व देशात पसरते घरात बसून राजा होत नाही त्याला राज्यभिषेक व्हावा लागतो तुका म्हणे-आरशातील प्रतिबिंब खरे असते काय ? तत्वभारी तू विठ्ठल आहेस. आता मला साहजिक बोलावयास नको सर्व व्यवहारात धीर धरावयाचा तो आमच्यात आहे. प्रतिपक्षाबरोबर गोड भाषण करुन वाद वाढवू नये. (अ 2808)

578 मी आता शरीराचा त्याग कशाकरिता करु कारण पंचमहाभूतांचे हे उसने आपलेले शरीर त्याचे त्याला द्यावे लागेल तोपर्यत त्याचा उपयोग करुन घ्यावा. मी केलेल्या सेवेबद्दल तुम्ही कांही दिले पाहिजे असा आग्रह नाही मी देहावर अनासक्त झालो आहे. त्यामुळे चित्तात सर्वकाळे समाधान आहे. विठ्ठलाच्या सत्तेने प्रेमलक्षण भक्तिचे रहस्य हाती येते. पुढे पुढे विवेक वैराग्य याच्या लाभाने साक्षात्कारासारखे विशेष लाभ होतो. (अ 2818)

579 पोपटाला आपण शिकवेल तसा तो बोलता त्याला शब्दाचे अर्थ समजण्याचे सामर्थ्य तयाचे अंगी नसते. स्वप्नातील ऐश्वर्य भोगल्याने कोणी राजा होऊ शकत नाही. तसे माझे परमार्थच्या बाबतीत आहे. कवित्याचे

अहंकारामुळे हरिचरणाला अंतर पडल्याचे दिसते. आरशातील धनाची अपेक्षा केली तर काळच घोटीत बसावे लागेल. गुराखी दुसऱ्याची गुरे आपली म्हणून सांगतो पण त्याचा लाभ त्याला होत नाही. (अ 2850)

580 नारायण एकविध आहे असे अव्दैत पहावे. तेथे थोडादेखील भावना बदलू नये. अव्दैतास बदल करु नये. संसार बाजूस सारावा. नारायण हे आनंदाचे स्थळ आहे. त्याठिकाणी तेवढे एकांतात राहावे. काया, वाचा मनाने एक हरिच्याच्या स्वरुपाचे अनुसंधान ठेवावे. आळस आणि झोप त्यागून अंगी शांतता धरावी. नारायणाची प्रचिती सर्वत्र येते व त्या अनुभवाने 'मी' 'माझे' हे मिथ्या धर्म घालविले आहेत. संताच्या कृपासामर्थ्याने माझा योगक्षेम चालला आहे. मला कशाचीही चिंता नाही. (अ 2869)

581 बायको, मुलगा हे सर्व लोभी कपटी आहेत. अंत:काळी यापैकी कोणी उपयोगी पडतनाही. हे सर्वजण माणूस मेल्यावर त्याचे प्रेम यमाच्या हाती बांधून देतात. अंगावरचे अलंकार काढून घेतात. देहाचा सावकार काळ आहे हे धन काळरुपी कुबेराचे आहे, माझे म्हणण्यासारखे मनुष्याच्या मालकीचे या मृत्यूलोकांत काय बरे आहे ? देणारा, देवविणारा, नेणारा, नेवविणारा एकच देवच आहे. देवाने प्रत्येक प्राण्याला निमित्त मात्र मालक केले आहे. (अ 3058)

582 गर्भवतीला स्त्रीला आमंत्रपणाने तिच्या पोटांतील गर्भ तृप्त होतो. वैष्णवांच्या पूजेने देव आनंदी होतो. पुत्राच्या जयाने बापाला आनंद होतो. सर्वस्व भगवंताला अर्पण केल्यानेच देवाची भेट होते. नाहीतर ज्याची जशी इच्छा असेल त्याप्रमाणे तो भोग त्याला भोगण्यास लावतो. जसे तुम्ही द्याल तसे घ्याल. म्हणूनच जीव देवाला द्यावा. (अ 3062)

583 मीच सर्व पापाची राशी आहे पण मला पावन करणारा तू तर सर्व बाजूनी सर्वोत्तम आहे. मी आता जसा आहे तसा तू माझा अंगीकार केला पाहिजेत, माझा सर्व भार चालविला पाहिजेस. शरण आलेल्या भगवद् भक्ताला देव पुन्हा प्रपंचात जाऊ देत नाही. देव सर्व व्यापक आहे तो कर्माचा आणि मनाचा दृष्टा आहे. त्या योगाने ज्याचे जसे कर्म, जसा भाव, त्याप्रमाणे फळ देतो. मागे केलेल्या कर्माचे परिणाम सुखदु:खाचा भोग आहे. (अ 3092)

584 द्रव्य लोभाने हरिकथा सांगणारा हरिदास आणि त्याला भेटणारा दोघे नरकात जातात. कारण हरिकथा आईपेक्षा थोर आहे. तिच्यावर पैसे मिळविणे योग्य नाही. पांडुरंगाचे गुणाचे गीत गाताना वैराग्य येऊन संसाराचा त्याग केला. इंद्रियाच्या जाचातून सुटका झाली. मन निश्चल करुन ठेवले. आता कशाची तळमळ चिंता नाही. माझा सर्व भार विठ्ठलाने घेतला आहे. त्यामुळे सामर्थ्यशाली झालो. (अ 3106)

585 ताब्यांचे नाणे चांदी सोन्याच्या मोलाने चालणार नाही. श्रुति-स्मृतीचे अर्थ जाणून त्याप्रमाणे ज्याचे आचार आहे असे संताच्या मताला मान्यता देण्यास हरकत नाही. ते खरे असतात. शिरगोळा हिरासारखा दिसतो परंतु रत्नपारखी बरोबर ओळखतात. कृतिम मोल्याला परीक्षक हातात धरणार नाही. परमार्थाचे सोंग काय कामाचे आपण शुध्द भावाने परमार्थ करतो की अशुध्द भावाने करतो आपले मनच सांगते साक्ष असते. (अ 3146)

586 वाळुक पिकल्यावर त्यांतील कडूपणा नष्ट होतो. त्याप्रमाणे देवाने आमची जीवनदशा घालवून आम्हास ब्रम्हरुप केले आहे. आमच्यातील काम, क्रोध जागीच संपले. सर्व जग आनंदमय झाले आहे. प्रपंचाची आठवण गेली. भाव-अभाव दोन्ही गेले. पांडुरंग स्वत: सर्व झाला. आमचा देह प्रत्यक्ष देव झाला आहे. त्यामुळे पुन्हा जन्म-मरणाचा आकार तो कसला आहे ? उसाची एकदा साखर झालयावर पुन्हा ऊस होत नाही त्याप्रमाणे आम्हास गर्भवास कोठून असणार ? (अ 3244)

587 तांबडा, पांढरा, काळा, पिवळा हे रंगाचे भिन्न भिन्न प्रकार आहेत. परमात्म्याने हे सर्व चिन्मय माझ्या डोळ्यांत आहेत. त्याने माझी दृष्टी दिव्य झाली. देशकाळ वस्तु याचा भेद नष्ट झाला. आत्मविश्वाकाराने सोज्वह झाला, प्रपंच झालाच नाही. एक परब्रम्ह आहे. मी ब्रहत आहे. याची मला जाण झाली 'तत्वमसी' या विद्येमुळे संपूर्ण ब्रम्हानंद मिळाले आणि तोच मी अंगाने झालो आहे आम्ही सुख दु:खाहून अलिप्त आहोत. (अ 3249)

588 यम लोकांत यमधर्म हरिदासाची रोज वाट पाहतात कारण त्यांचे दर्शन आनंदप्रेम असते. म्हणून ते हात जोडून उभे असतात. विटेवरील विठ्ठल विश्वात्मक देव आहे. तो विश्वाचे पालनपोषण करतो. त्याच्यापासून स्थावर जंगमादी जग निर्माण झाले आहे. सर्वाचे आकर्षक आणि

प्रमुख ठिकाण पंढरपुरच आहे. हयाच्यापासून देव-देवी उत्पन्न झाले आहेत. आम्ही वैष्णवांचे व परंपरागत वतनदारीचे गांव पंढरी आहे. पांडुरंग आमचा पिता व रुक्मिणी माता आहे. (अ 3264)

589 देव अवतार घेतात तर भक्ताच्या जन्माला संसार म्हणतात पण दोघाचे कार्य एकच आहे. आणि ते म्हणजे धर्म रक्षण होय भगवंतामुळे भक्तांना सुख सोहळे भोगता येतात. भगवंतही भक्ताच्या संगतीत सुख भोगतो. देवाने भक्ताला रुप आकार दिला आहे आणि भक्तानी त्याचा अगाध महिमा वर्णन केला आहे. एकाच नाण्याच्या ठिकाणी दोन बाजू निर्माण झाल्या आहेत. एक भाग देव स्वामी म्हणून झाला आहे. दुसरा भाग भक्त होऊन देवाची सेवा करीत आहे. येथे दोघांत भिन्न भाव नाही. भक्त तोच देव आणि देव तोच भक्त आहे. (अ 3324)

590 जे कोणी भाविक असतील वेद, शास्त्र, पुराणे यांच्यावर श्रध्दा ठेवणारे जे कोणी असतील त्यानी जरुर ऐकावे. तार्किकाची (वेदनिरपेक्ष) संगती सोडून द्या. आणि श्रध्देने पांडुरंगाचे स्मरण करा. लाकडांत अग्नी व्यापून वास्तव्य करतो त्याप्रमाणे सर्व जीवांना व्यापून नांदतो. सूर्याचे प्रतिबिंब घरातील पाण्यावर असते घरातील पाणी नष्ट झाले तरी सूर्याचा नाश होत नाही. जीवाचा नाश झाला तरी आत्मा नाश पावत नाही. (अ 3354)

591 कलीयुगाचे महत्तव - लोक असत्याच्या नादी लागतील पापकर्माला मान्यता देतील, संताची कुचेष्ठा करतील अधर्माच्या शक्तिने लोक फसविले जातील. वर्णश्रेष्ठ ब्राम्हण ब्रहतकर्म टाकून दावलापिराची पूजा करतील परमार्थ बुडेल. भय, नीती नाहीशी होऊन अधर्मरुपी भूत अनीतीच्या रुपाने पुढे येईल. शांती, दया, धर्म नष्ट होईल. सर्व लोक नाटके, तमाशा पहावयास धांवतील. पुराण, कथा, कीर्तन लोकांना आवडणार नाही. विषयभोगासाठी वाटेल तेवढा खर्च करतील पण धर्मकार्यास कांही देणार नाहीत. मुले बापाकडून काम करुन घेतील. सासवा सुनाच्या दासी होतील. स्त्रिया नवऱ्याला मूर्ख ठरवतील. उच्चवर्णीयसुध्दा अभक्ष, अपेय करुन कोणी कोणाचा विटाळ मानणार नाहीत. व्यभिचार वाढेल. संताना तीर्थाना अपमानीत करतील. पाप वाढल्याने पाऊस कमी पडेल. दुष्काळ वाढेल, चातुर वर्ण, अठरा जाती हे सर्व मिसळे जातील. सर्व लोक गांजतील. देवा तू त्याना सोडव. (अ 3692)

592 एका भक्तिभावाने देवाची ओळख होते. दुसऱ्या कोणत्याही साधनाने देवाची प्राप्ती होत नाही. विद्या, सत्ता, धन, सौंदर्य, शक्ति, तारूण्य या योगाने उन्मत्त झाल्यावर देवाची प्राप्ती कशी होईल. देवाच्या प्राप्तीसाठी निष्काम बुध्दीने वनवास, एकांत करावा. व्रत, तपे, योग याग करावा असल्याचे हरीला कळत होते. त्याच्याबरोबर तो गोकुळांत खेळत होता. जे सुख वैकुंठीच्या लोकांना दुर्लभ ते त्यानी भाविक गोपाळांना सहज दिले. (अ 3857)

593 नाटाचे अभंग - विठ्ठल आमचे जीवन आहे. वेदशास्त्राचे उत्पतिस्थान आहे. विठ्ठल सर्व सिध्दांताचे एकमेव साधन आहे. आम्ही त्याचे ध्यान करतो. तो आमचा विसावा आहे. विठ्ठल कुळातले दैवत आहे. विठ्ठल धन-गोत असून आमचे चित्त त्याच्या ठिकाणी आहे. विठ्ठल म्हणजे पुण्य पुरषार्थ, विठ्ठलकथा सर्वांना आवडतात. सातही पाताळ, त्रैलोक्य, मुनीजनात, वनांत विठ्ठल विस्तार पावला आहे. तो प्रेमाचा पुतळा आमचा बाप, आई, चुलता बहीण-बंधू आहे. मला विठ्ठलावाचून अन्य कोणी नाही. (अ 4064)

594 तुम्ही मनुष्य देहाला आला आहात, चर्चा न करता हळूच मोक्षाचा मार्ग धरा. नाहीतर तुम्हाला शिक्षा करणार आहे. देहातून प्राण काढताना यमाला करुणा येत नाही. तेव्हा यातना फार होतात. तुम्हांला ओढून नेतील. अग्नीच्या खांबाला बांधतील पाण्यात बुडवतील वरुन दंण्डाने मारतील. अनेक दिवस उपाशी ठेवतील. तप्त भूमीवरील ज्वालांत लोळवतील फक्त श्रीहरीचा जयघोष करा म्हणजे यमाच्या यातनातून सुटका होईल. (अ 4076)

595 भगवंता प्रपंचात कोणते सुख पाहू ? सर्व विषय नाशवंत आहेत त्याचे मागे लागल्यास तू दूर जाशील आईच्या गर्भात नऊ महिने रात्रंदिवसात भोगले, नंतर जन्मास आलो, बालपण अज्ञानांत गेले. तारूण्य विषयासक्तीत गेले. म्हातारणपण चिंतेत गेले. मरणानंतर पुन्हा तेच जन्म-मरण खेळ चालू होतो. माझ्या नांवाला अभिमानाला आग लागो. देवा हा खटाटोप पुरा करा तुझ्या दारांत मी रंक, हरीदास आहे. कृपा कर. (अ 4081)

596 भगवंता संतसगतीत मला कळून आले की या जगांत माझे कोणीच नाही. असा माझा निश्चय झाला आहे. आजपर्यंत संसार करुन असंख्य लोक मेले, व्यर्थ गेले व पुढेही मरतील. देवा, कृपया मला भजनवृत्तीला धैर्य द्या. लोकानी निंदा केली तरी चालेल. तू भगवंता जगाचे

परमकारण आहे. याचसाठी तुझ्या चरणाची प्राप्ती करुन घेईन. जीवनात प्रेमाचा जिव्हाळा राखला आहे. मी देहापासून वेगळा झालो आहे. तुका म्हणे तुझा दास झाल्याने आनंदरुप झालो. आता पाप-पुण्याचा स्पर्श कुठला, व्दैत गेले. (अ 4097)

597 भगवंताचे सावळे रुप डोळ्यांनी नीट पहावे, सहा शास्त्रे अठरा पुराणे, चार वेद भगवंताचेच वर्णन करतात. खळांचा स्पर्श होऊ देऊ नको. विष्णुसहस्त्र नामाचे पठण कर. आपल्या स्वरुपस्थितीच्या घराबाहेर निघू नकोस, बाहय विषयाचा वारा लागू देऊ नकोस, अधिक बोलणे बंद कर, देहाचे तादात्म्य सोडून दे. आपले मन भगवंतास देत जावे. केलेल्या पापांचा पश्चाताप करा. तीर्थस्थान करा. - हे सर्व एक काम, क्रोध, लोभ, मद, मत्सर, दंभ षटवर्गाचाही नाश करते. (अ 4103)

598 कोणतेही व्यंग विरहित उत्तम आयुष्य लाभलेला नरदेहरुपी संपत्तीचा साठा मिळाला आहे. येथे उत्तम भोग व परलोकांत उत्तम गती प्राप्त करता येते. आणि एकदा याच जन्मी देवहि होऊ शकतो. आपण असेच. तुका म्हणे क्षणभर मन स्थिर करा डोळे उघडून सावध व्हा. वेद, पुराणे काय म्हणतात याचा विचार करा. गर्भवासात दु:ख भयंकर आहे. जन्माला येऊन संशयाच्या भ्रमात माया मोहांत सापडशील. (अ 4104)

599 भगवंत भक्ताची सेवा करतो. भक्ताला काही कमी पडलेले देवाला सहन होत नाही. त्याचे कार्य करण्याची देवाला घाई असते की समोरील भोजन ताट बाजूला सारुन तो त्याच्याकडे धांवतो. असा तो कृपासागर आहे. तो विटेवर उभा राहून त्याने कमरेवर हात ठेवले आहेत. सर्वस्व देणारा असा तो उदार असून भक्ताच्या प्रेमापोटी प्रगट होतो. विठ्ठलाच्या छातीवर असलेले भृगलांछन (श्री वत्सनामक चिन्ह) एक प्रकारचे भक्ताचे प्रेमभूषण म्हणून तो सर्वत्र मिरवीत असतो. त्याविषयी त्याला दु:ख नसून उलट त्याचे तो सुख मानतो. पुंडलिकासाठी उभा आहे. (अ 4105)

600 प्रत्येक घासाबरोबर देवाचे स्मरण केले तर देवांत आणि तुझ्यांत अंतर उरणार नाही. अन्य साधानाच्या नादी लागलास तर अंतरीचा देव दुरावेल. भक्तिपर्ण अंतरी सेवा कर. गुळातील गोडी, मिठातील रुची आणि मानव जन्मामध्ये परमार्थ असे सारभूत तेवढे द्यावे. साखरेपासून पुन्हा ऊस होत

नाही. तुका म्हणे आम्हांला पुन्हा गर्भवास नाही, देहाची पर्वा नाही. आम्हाला सर्व जग पांडुरंग भासते. (क्षे.अ. 38)

601 गुरुच्या मुखातून ब्रम्हज्ञान प्राप्त होईल परंतु विठोबाच्या प्रेमाची खुण समजावयाला अंत:करणात भक्तिच पाहिजे. वेदात, पुराणांत शोधा विठोबाच्या प्रेमाचे सुख अनुभवास येईल. भक्तिचे मर्म जाणणाऱ्या संताना शरण जावा आपल्या आवडीप्रमाणे आणि भावाप्रमाणे दर्शन देऊन देव त्याच मनीची इच्छा ओळखून त्याचे समाधान करतो. साक्षात प्रकट होऊन कृपेची छाया करतो. ब्रम्हज्ञान प्राप्त होते. हे समजायला अंत:करणात भक्तीच पाहिजे. (क्षे.अ.42)

602 दुध, दही, तूप, लोणी यामध्ये दूध हा एकच पदार्थ असतो. सोन्याचे अलंकार केले, तरी त्यातले सोने एकच त्याचप्रमाणे मातीचे कितीही घडे केले तरी माती एकच असते. त्याचप्रमाणे सर्व प्राणीमात्राच्या ठिकाणी नारायण एकच स्वरुप आहे. अनीतिने वागणाऱ्याचे अहित होते. ज्याला वंदावे त्याला निंदितो. संतसंगत सोडून हीन दुर्जनाचा संग करतो. करायच्या अगोदर पराक्रमाच्या गोष्टी करतो संप्रणित असतो. तुका म्हणे चित्तात काहीहि नियम धरुन पाळत नाही. तो अधम आहे. यम त्याला शासन करतो. (क्षे.अ.270)

603 भक्तियुक्त हृदयाने बोधरुपी काकडाज्योतीने माझे पंचप्राणरुपी निरांजन लावून मी माझ्या पंढरीनाथाला ओवाळतो आणि नमस्कार घालतो कोटयावधी ब्रम्हहत्येचे पातक त्याच्या श्रीमुख दर्शनाने नष्ट होते. सर्व भक्ताची सांकडी समस्या भगवंत सोडवतात. देव त्याच्याजवळ सदैव असतो. ज्याठिकाणी वैष्णव कीर्तन करतात तेथे हा श्रीपती उभा असतो. सर्वत्र पांडुरंग भरून उरला आहे. (क्षे.अ. 291)

604 देवा, तु सुंदर श्यामल वर्णाचा, चार हातांचा, गळ्यांत तुळशीच्या माळा रुळत आहेत. तुझ्या कपाळी चंदनाची टिळा शोभत आहे. हातात शंख, चक्र, गदा आणि वैजयंतीच्या माळा शोभत आहे. दोन्ही कानांत कुंडले तळपत आहेत. प्रपंचात भगवंताखेरीज जीवन जगणे व्यर्थ आहे. केवळ अलंकार घालून मिरविणे म्हणजे प्रेतच, देवाशिवाय बोलणे व्यर्थच आहे भगवंताशिवाय आचार धर्म करणे म्हणजे सर्पाच्या ठिकाणी नभ्रता दया पाहण्यासारखेच आहे. तुका म्हणे जो भक्तिशिवाय फार बोलतो तो अभागी माणूस होय. (क्षे.अ.333)

605 हे भगवंता, तू आम्हास जवळ केले आहेस याची तुला जाणीव असु दे. देवा मी दुर्बळ आहे. अमंगळ आहे परंतु तू दयाळू आहेस, लहान बालक कसेही असले तरी ते आईस आवडते. भगवंत शंकराच्या कृपेने हिरण्याक्ष दैत्य माजला होता. त्याने इंद्राचे पद हिसकावून घेतले. इंद्राने देवाचा धावा केला, त्यावेळी देवा तू अवतार घेऊन त्याचा वध केला. तुका म्हणे - ज्याचे राज्य त्याला दिलेस, पांडुरंगा तू कृपावंत आहेस. (क्षे.अ.335)

606 हे देवा, तू माझ्या भोगाचा भोगिता हो. तू सतत शुभ आहेस, तुझे पाय आठवून राहिलो. माझ्या देहाचे ठिकाणी कांही चंचलता येऊ देऊ नकोस देहाला जे हरिभक्तीचे वळण पडले आहे त्यात स्थिरता असू दे. आता एकच ते तुझे कीर्तन करीन. संबोधुन चित्तात समाधान आले. तुझे गुण गाऊन मन स्थिरावले. नाम रत्नाची आभूषणे परिधान केली तुळशीमाळा अलंकार म्हणून तू मला दिलीस तुका म्हणे आता निरामय झालो, नामांत पूर्णपणे स्थिरावलो. (क्षे.अ.341)

607 हे महादेवा, महाकाळ मर्दना, तू थोर तप आरंभलेस वाघाचे कातडे पांघरुन चितेतील भस्म धारण केले स्मशान हे तुमचे नांवाने हाका मारतात. तुम्ही संहारकर्ते म्हणून प्रसिध्द आहात. तुम्ही भोळ्या भाविकाचे भोळे शंकर आहात. बेल, पाणी तुला अर्पिल्यास तू भक्तावर कृपा करतोस, प्रसन्न होऊन आपले पद भक्तास देतोस, तू त्रैलोक्यव्यापक आहेस, विराट स्वरुप वेद वर्णितात. तुमच्या उपदेशात पाप जळून जाते. तुका म्हणे - तुमचे चरणी माझे चित्त राहो. (क्षे.अ.377)

608 दिसते ते सर्व मायाजाळ आहे सर्व खोटे आहे. सर्व खरे भासते पण अखेरीस कांही उरत नाही भगवंता या सर्व गोष्टीचे आता मला फार दु:ख वाटते याला कांही उपाय सांग. पुढे काय होणार ते कळत नाही. तुझ्या चरणावर मी माझा माथा ठेवला आहे. आतां तू मला खऱ्या अर्थाने सुखी कर. निश्चयाने मी तुला अलिंगले आहे. माझे हित कशात ते मला समजत नाही. तूच माझे सर्व कांही आहे असे तुकाराम महाराज म्हणतात. (क्षे.अ.392)

609 शिवशक्ती, सूर्य, गणपती हे विषणूसह एकच आहेत असे सांगतात. हिरा गारगोटी सारखेच आहेत असे सांगतात. परंतु असे सांगणे म्हणजे भजन करणे व्यर्थ आहे असे सांगितल्यासारखेच होय. व तमोगुणी जीवन

श्रेष्ठ आहे असे म्हणणे ही निरर्थक आहे. देवाला भजतात ते सात्विक राजस आहेत ते मोक्षपदास लायक आहेत तुका म्हणे मोक्ष कोणाजवळ नाही. केवळ एका गोविंदास शरण जा. (क्षे.अ.398)

# 7. उपासना, व्रते, जप, शरण

610 देवाची भक्ति करुन जमीन, वतनदारी, सूभेदारी मिळवितो. त्यास देव भेटत नाही. विषयाची आशा धरुन पूजा करणे म्हणजे पाषाणाने पाषाणाची पूजा करणे होय. अगदी आदराने केलेली कर्मे ही वैश्येच्या विभ्रमाप्रमाणे होय. (अ 42)

612 देव देव्हाऱ्यातच ठेवला पाहिजे. पूजा केली पाहिजे राजा परिक्षितीला हरिस्मरणमुळे सात दिवसात मोक्ष प्राप्त झाला. नळीवर बसलेला पोपट उलटा होतो. पडणार या भीतीने उडून जात नाही. भ्रमामुळे पकडला जातो. (अ 194)

613 पाषाणाची मूर्ति करुन सामान्य लोक पूजा करतात. देव ती स्वीकारतो. पूजेनंतर आम्ही पाषाणाच्या रुपानेच राहतो. पाषाण पाषाणाच्या अवस्थेत राहतो. धातू आहे त्या रुपांतच राहतो. (अ 127)

614 सतत समबुध्दी, काया, वाचा, मन बुध्दी याची शुध्दता असावी. भेदभाव वृत्ती नसावी. विनम्र भाव असावा. आहे त्या परिस्थितीमध्ये समाधानी साधू सर्वकाळ दर्शन देतात. (अ 199)

615 गळाला लावलेल्या खाद्यपदार्थाच्या लोभाने मासा गळ गिळतो आणि मरतो. संसारी माणसे सुखाच्या लोभाने संसार करीतच तळमळून मरतात. अंतकाळी देवाची आठवण करणाऱ्या पारमार्थिक सुखाला परिवार नाही. त्याचा उध्दार होईल. (अ 304

616 ध्यान, उपदेश करणे परमार्थ नाही. वृत्तीचा त्याग करून सहजपणे भक्ति करणे हेच भक्ति मार्गाचे खरे साधन होय. विठोबाचे नांव घेणे व संताच्या

पायावर डोके ठेवणे हीच माझी उपासना. भक्ताच्या मनाला मोक्षाची आवड नसते. सगुण भक्तिमध्ये भाव असतो. निर्गुण रुपाचे ज्ञान भावभक्तिला ठाव देत नाही. (अ 331)

617 वाचेने विठोबाचे गोड नांव घ्या, डोळ्याने विठोबाचे मुख पहा. दृष्टि सुख भोगा, कानाने विठोबाचेच गुणगान एका. मनाने सतत विठोबाच्या चरणाजवळ रहा. जीवा विठोबास विसरु नका. हरीचे रुपात शुभसंकेत ऋध्दि-सिध्दी, अमर्याद सुख, अनंतकाळ आहे. (अ 373)

618 इतर देहापेक्षा हा देह महत्तवाचा आहे. येथे साधनश्रेष्ठ हरिनाम हे सर्व सुखाचा आधार आहे. जेव्हा व्दैतबुध्दिचा निरास होतो. ब्रम्हसाक्षात्कार होऊन देह ब्रम्हरुप होतो. अनेक लोक याग, तपे, व्रते करतात. फळाची अपेक्षा करतात. सर्वाचा गर्व करतात ते पुण्यापासून दूर जातात. स्त्री, पुत्र धन यापासून सुख मिळेल हे भ्रामक आहे. नाम साधनेत सर्व सुख आहे. (अ 409)

619 विठ्ठला तुझे स्वरुप काया, वाचा आणि मन हया तत्वापलिकडचे आहे. देवा तू देशकाल परिच्छेदशून्य असा अनंत आणि अगम्य आहे तरीपण मी भक्तिसाधनेच्या मापाने तुझे मोजमाप करितो अन्य साधनाने शक्य नाही. योग, याग, तप, दान अथवा विज्ञानाने तू सांपडणार नाही. आम्ही श्रध्देने तुझी सेवा करीत आहोत तू तिचा स्वीकार कर. (अ 411)

620 तहान लागलेल्या माणसाला गंगेची खोलीशी गरज नाही. ती न कळता तहान भागविली जाते. आम्हा साधकाला निर्गुणाचा विचार करण्याची गरज नाही. विठ्ठमूर्ती अत्यंत देखणी, सुकुमार व सुशोभित आहे. ती आपल्या अंत:करणात निरंतन ठेवू. नामस्मरण करु नाचू गाऊ. आनंद सोहळा करु. आम्हास परलोकाची इचछा नाही. (अ 483)

621 तुका म्हणे, मी इंद्रिये देवाच्या स्वाधीन करुन सांभळण्याचा भार देवावर टाकला आहे. पोटासाठी चिंता नको. परमार्थवर चित्त एकाग्र केले. मरणानंतर आपल्याबरोबर काहीच येणार नाही. संसाराची चिंता आहे तोपर्यत आपण दुबळे राहू. नावेत बसलो आहे पैलतीर जाणार आता फक्त हरिनामाचाच जप करणे. (अ487)

622 मन:पूर्वक हरीचे ध्यान करुन त्यामध्ये समाधानी राहा तोंडाने बडबड काय करता ? जो पर्यत भगवंताच्या सुखानुभावाची गोडी लागत नाही. तोपर्यत

अंतर्बाहय ते तत्व जसेच्या तसेच आहे तुम्ही आपले चित्त स्थिर करुन वाणी मौन करा. हीच तुमच्या साधनेची सिध्दी आहे. वाद करुन वाया जाल. (अ 5160

623 प्रभु सर्वव्यापक मोठा आहे पण भक्ताच्या भावामुळे अति लहान हृदयांतही राहतो. भगवंत केवळ एक पळीभर पाणी आणि तुळशीपान मागतो, तो नामरुपात्मक सगुण स्वरुपात आला आहे. चरण चिंतन करु. जन्म मृत्यूच्या खेपा नाहिश करु. (अ 540)

624 भूक लागली म्हणून विषारी अन्न खावून चालणार नाही जे योग्य मार्गाने आपण पुढे चालणारे आहेत त्याच्याच मार्गाने आपण जावे. वाकड्या वाटेने जाणारे फसतात लोककल्याणार्थ भक्ति, ज्ञान, वैराग्य परमार्थाचे मार्ग आहेत. ज्या योगाने निरंतर देवाची आठवण होईल असा उपाय आपण करावा. भक्तिभावाने देव मिळेल परंतु शब्दज्ञानाने कांही कळणार नाही. (अ 548)

625 मनुष्याने तहान आणि भूक साठी पाणी अन्न देह निर्वाहापुरतेच घ्यावे, आणि नामचिंतन करावे. अंत:करणात सदैव समाधान असणे ही नारायण प्राप्तीची प्रचिती आहे. अंत:करणाचे समाधान कसे होईल याचा सर्वकाळ विचार करावा. यासाठी आत्मा विषय त्याग करुन वृत्ती अंतर्मुख होइल तशी आत्मस्वरुप समजू लागेल. (अ 552)

626 देवा तुमची तुम्ही गुंतागुंत केली आता चुकावाचुकवी कां करता ? तुमच्या सबबी पुऱ्या होणार नाहीत. तुम्ही आम्हास शहाणे कशाकरिता केलेत. तुम्ही नावारुपाला आलात माझी भक्ती भावमुक्त असून ती एकनिष्ठ आहे निश्चयात्मक स्थिर भावाची आहे. देवा तुम्ही पाय जुळवून आमच्यापुढे उगाच उभे राहा. (अ 583)

627 संसाराची पीडा पाहून त्याचे मला भय वाटते कांही उपाय केले तरी संसार सुटत नाही. मोठ्या पेचात आहे. माझे मन माझ्या हातात नाही. बुध्दी काम करत नाही. पांडुरंगा ये मला उचलून घे. संसार पाशातून मला मुक्त कर विठाई माऊली माझ्या वरील प्रेमाने माझा हट्ट पुरवत आहे. ती मनाने अतिशय कोवळी आहे. तुका म्हणे ती मला ब्रम्हरसाचा घांस घालीत आहे. (अ 645)

628 हरी हरी म्हणा मायाजळाचा शेवट होइल हरी चिंतनाने तुमची फसवणूक होणार नाही. हरीस भावार्थाने तुळशीचे पान व पळीभर पाणी अर्पण

करुन हात जोडा व मी पतित आहे असे वेळोवेळी म्हण. हरी कृपेचा सागर आहे तो भक्ताचा भवसागर पार करतो. (अ 723)

629 देवा आमचा तुझ्यावर पूर्ण प्रेमाचा अधिकार असून तुजकडे काही मागणे आहे. त्वरीत चरणजोड, हलु नकोस आसन सोडू नकोस. तुका म्हणे मला फक्त तुझ्या दर्शनाचीच अभिलाषा आहे. एकाला दिले त्याप्रमाणे दुसऱ्यास द्यावे ही तुमची ही पध्दत कां नसावी. आमच्याजवळ धीर, संयम आहे त्याचे आम्ही जतन करु. (अ 735)

630 देवा, विषणुसहस्त्र नामावली आहे तिच्या उच्चाराने महापातके जळून जातात. सोपी अमृतापेक्षा गोड आहे. हरी नामचिंतनाने नाचावे हे सोपे वर्म संतानी सांगितले आहे. या ब्रम्हरसाचे सेवन झाल्याने आम्ही तृप्त आहोत. चारी मुक्ती हरीच्या दासी आहेत यात तिळमात्र शंका नाही. यामुळे मनास विश्रांती मिळून त्रिविध ताप नष्ट होतात. (अ 766)

631 जर भ्रतार अनुकूल राहून भोग घेत असेल तरच त्या स्त्रीने परिधान केलेले अलंकार शोभून दिसतात. मानवी जीवन नियम निर्धाराने शोभते. त्याखेरीज जगणे लज्जस्पद आहे हे भगवंता मान आणि अपमान हया तुझ्या क्षुल्लक संपत्ती आहेत. नारायण विश्वपिता, जगाचा अधिष्ठाता आहे मानवी जीवनांत येऊन नारायणाशी संबंध जोडण्याने खरे कार्य सिध्द होते. (अ 777)

632 सर्व भोकर्त्याच्या मागे सर्व कांही काळाने व्यापले आहे. कर्ता-कर्म कारण, भोक्ता भोग आणि भोगाचे साधन विश्व अनेक त्रिपुरीने युक्त आहे. सुटका नाही. देवाच्या नामाचा गजर केल्याने भक्ताला काळापासून सोडवितो. अन्न पाहणे, अन्नाची कथा ऐकणे आणि अन्नाचे सेवन करणे यात फारच अंतर आहे. जसा भाव तशी फलप्राप्ती होते. भगवंताच्या ठिकाणी जसा भाव तसे त्यास फळ मिळते. (अ 782)

633 देवाच्या ठिकाणी वासना ठेवून ब्रम्हज्ञान आम्ही तुच्छ मानतो. आम्ही मुले देवाचे प्रेमसुखाची हट्ट करणारी आहोत. उत्तम नरदेह प्राप्त झाला असता. परमार्थ सोडून संसार करणे वेडेपणाचे आहे. स्वहितासाठी अंत:करणांत प्रेमामृताच्या धारेचा जिव्हाळा पाहिजे. देवा वितरिक्त अन्य कल्पना करु नका तुका म्हणे जी शांती सर्व प्राणीमात्रापर्यंत प्राप्त होते ती मी खात्रीने योजलेली आहे. (अ 800)

634 ज्ञानीपुरुषदेखील विषय सेवनाने पशुसारखा होतो. विषयाविषयी प्रेम ठेवण्याने आत्मस्थितीचा भंग होतो. शब्दज्ञानी अनुभव न घेता ज्ञान सांगतो, त्याचे नशिबी संसारच राहातो. अशा ज्ञानाचा घात होतो. काम क्रोध, लोभ अडकून त्याची वाताहत होते. माणसाने आयुष्यभरात नुसते खरे बोलण्याचे व्रत पाळले तरीसुध्दा त्याला काही न करता भगवंताची प्राप्ती होते. सत्याने परोपकार होते. मनाने असत्याचा मळ टाकून दिला तर ते मन शांत होते. (अ 789)

635 अंत:करणात कोणत्याही प्रकारचा संशय ठेवणे हा दोष आहे. पाप आहे हे मानवी मनाच्या चांगल्या वाईट संकल्याने होते. म्हणून शूभ संकल्प करणे हेच उत्तम जसे बीज असेल तशी त्याला चांगली वाईट फळे येतात. प्रथम अंत:करण शुध्द करणे यातच हित आहे. तू कुशल चतुर वक्ताही होऊ नकोस, जाणता श्रोताही होऊ नकोस, अंत:करणात हरीविषयी प्रेम धरुन रहा त्यात तुझे कल्याण आहे. (अ 914)

636 ढोंगी लोकास देवाची प्राप्ती होत नाही. कीर्तनाची निंदा करणारास शिक्षा दिली पाहिजे. त्यासाठी एक शुध्द भाव पाहिजे त्यावाचून कराल तो व्यर्थ शीण आहे. आपले इच्छित फळ भावार्थाच्या बळाने मिळते. देव सर्व व्यापक आहे खऱ्या शुध्द भक्तीच्या कळवळ्याचे बीजभूत प्रेम किती आहे ते तो जाणत आहे. लाभ प्राप्त होण्याचा काळ आल्याखेरीज उतावळेपणा करुन चालत नाही. (अ 953)

637 अंतकरणांत भाव असो अगर नसो परंतु जे पंढरपुरात जातात चंद्रभागेत स्नान करतात पांडुरंगास पाहतात त्याना जन्म मरणचा संसार नाही. त्याचे नांव घेतल्याने वैकुंठास जात येते. चार वेद, सहा शास्त्रे श्रीहरीची कीर्ती वर्णू शकली नाही तेथे माझा वाणी किती पुरणार ? (अ 1016)

638 असत्य बोलणारा खात्रीने पतनास जातो. स्वत: नारायणाने अश्वथामा मेला, माणुस की हत्ती असे हे धर्माकडून खोटे बोलविले. त्यामुळे सदेह स्वर्गीय जात असता त्याच्या पायाचा एक अंगठा गळून पडला. जन हो तुम्ही सत्याला संभाळा अंत:करणातील खोटा भाव अखेर तुम्हाला दु:ख देईल. (अ 1021)

639 पंढरपूर क्षेत्रात एकादा नास्तिक गेला तर तेथील हरीकीर्तन ऐकून त्याच्या वृत्तित बदल होइल. त्यास भक्ति ज्ञानाची आवड निर्माण होइल. केवळ पंढरी पंढरी असा उच्चार केला असता पाप नष्ट होते. येथे अखंड हरीनामाचा

उत्सव चालतो. पंढरीक्षेत्र वैकुंठापेक्षा एका अक्षराने अधिक असल्याने त्याला ‘भूवेकुठ’ म्हणतात. (अ 1035)

640 हा नारायण जिवाचा जीव, जिवांना जगविणारा जीव, अमृताचे प्रत्यक्ष रुप आहे आणि विश्वाचे भूषण आहे. हा नारायण सुखाचा मित्र, काळाचाहि काळ आणि भक्तांचे निरुपद्रव स्थान आहे. तो गोडपणा, आनंद, प्रेम देणारा आहे तो नारायण विश्वातील सत्यपराधीपेक्षाही सत्य आहे. असा पांडुरंग माझा पिता व रुक्मिणी माझी आई आहे. मी आता दुष्ट, दुर्भागी, अनाथ नाही. पांडूरंग आमचा कैवारी आहे. (अ 1091)

641 संताच्या संगतीत पंगतीला बसून सर्वकाय ब्रम्हानंदाचे भोजन करु. नामामृताचे कितीही सेवन केले तरी पुन: पुन: करावेसे वाटते. हरीभजनाचे सुख भोगणाऱ्यास कितीहि जन्म प्राप्त झाले त्याचे दु:ख वाटत नाही. माझी विठ्ठलमाऊली माझी तहान भूक भागवते. विठ्ठल चरणाचे सुख त्रैलोकांत नाही. मी त्रिविध तापापासून मुक्त आहे. (अ 1100)

642 हरीच्या दासाला भय आहे असे, कधीही आणि कोणीही बोलू नये. हरीच्या दासाना चिंता आहे ही गोष्ट अशक्य आहे. गाढवास चंदनाचे महत्तव काय ? सापाचे दुधाचे उपयोग काय ?ते आपल्या वृत्तीनुसार सर्व नाश करील. एकातांत बसून मोठ्या आनंदाने, उत्साहाने भगवंताचे अनंत प्रेमसुख भोगावे. ते एक गुप्त धन आहे. हा प्रेमरस पचेल त्याप्रमाणे सेवन करा. (अ 1115)

643 गंगा यमुना तीर्थास जावून काय केले तर वरवरचे शरीराचे कातडे धुऊन टाकलेस, कडू कारले साखरेत घोळले कडूपणा जात नाही. जोपर्यत अंत:करणात शांती, क्षमा, दया आली नाही. तोपर्यत तीर्थयात्रेचा अभिमान व्यर्थ होय. निवांत राहून चित्त शुध्द करा. शुध्द चित्तामध्ये भगवान गोपाळ विनासायास येऊन राहील. शुध्द चित्ताने नामस्मरण घेणाऱ्यास घरबसल्या सुखसमाधान मिळते. नामाच्या ठिकाणी एकनिष्ठ भावाने रहा अलौकिक सत्य अनुभवा. (अ 1132)

644 भगवंता, तुझा दास म्हणवून घेतो परंतु तुझे ज्ञानच नाही. माझे जगणे निष्फळ आहे. देव दयाळू, पतित पावन, सर्वव्यापी, सर्वसाक्षी आहे असे नुसते शब्दच ऐकले आहे. आंता लवकर भेट दे. अभयदान दे. उध्दव, अक्रूर, व्यास, अंबऋषी व प्रल्हाद थोर भक्तांना रुप दाखविले. श्रुतदेव, जनकराजाकडे

गेलांत. विदूराच्या कण्या आवडीने सेवन केल्यात पांडवास, द्रोपदीस मदत केली. काया वाचा मनाने शरण आलो आहे तरी मला सनाथ करा. (अ 1164)

645 पंढरीनाथा माझ्या संसारभयाचे निरसन कर. भक्ताच्या मनांतील शंकाचे निरसन करा. माझ्या माथी अभय हस्त ठेवा. संसारात आनंदाने खेळत राहील अशी स्थिती निर्माण करा. तुम्ही कसे शिकवले तसे मी बोलत आहे. नामाचे चिंतन करीत असता मध्येच विराम देऊ नका. (अ 1217)

646 एकादशी व्रत सर्व व्रतात श्रेष्ठ आहे. एक दिवशीच्या उपासाने जीव जात नाही. त्यादिवशी जेवणापेक्षा जास्त खाणे होते. त्यादिवशी हरिकथा करावी. अथवा ऐकावी, वैष्णवाचे पूजन करावे, हे स्वहिताचे साधन आहे. मंदीरात जावे जागरण करावे हरिभजनाचा कंटाळा करु नये. जो हरिगुणगाण करतो तो नीच कुळातील असला तरी आदरणीय होतो. टाळाच्या नादाने, नामाच्या गजरसुखाने, हरीच्या जयजयकाराने सगुणाचे सुख आणि निर्गुणाचा आनंद होतो. वैकुंठाला जाण्याचा मार्ग म्हणजे हरीकथा. (अ 1421)

647 हरिनाम परमार्थ साधनाचे मुळ आहे. दैवातील संकटाचे भोग भोगण्याविषयी तयार असावे आणि आपल्या रक्षणाचा भार देवावर घालावा. तो कृपासागर आपले संकट निवारण करतो. मन भय निर्माण झाले की तूलाच माझी काळजी, पुष्कळ दु:ख सोसले आहे. संसारांतू केव्हां सुटका होईल ते कळत नाही विठ्ठले तूच माझी आई आहे.दु:खाच्या राशी निर्माण होतात त्याकरिता देवाला शरण जावे. दु:खाचा परिहार होतो. निर्मळ मनाने केलेली साधना सफल होते. (अ 1638)

648 पद्यनाभाचे दर्शन होणे हाच खरा मनुष्य जन्मांतील लाभ आहे. मी त्याच्या चरणाचे चिंतन करत आहे. काळ पाठीशी लागला आहे. तूच माझी आई आहे या निर्वाणीच्या वेळी धावून ये व काळाच्या हातून सोडव. (अ 1789)

649 सुकत चाललेल्या कोंबाला पाण्याच्या वर्षावाची गरज आहे. त्याप्रमाणे मला तुझी गरज आहे माझा प्राण कासावीस होत आहे. मनांत तुझ्या चरणाचे संकल्प आहेत. मनासह सर्व इंद्रिये तुझ्याकडेच आहे. वाणीने तुझे नामसंकीर्तन चालू आहे. माझ्या हृदयांत पांडुरंगाला पूर्ण भरुन बसविले आहे. (अ 1837)

650 संत व नारायणाची पूजा करा. संसाराची योगक्षेमाची जबाबदारी भगवंतावर सोपवा तो भक्ताची उपेक्षा करणार नाही. धनसंपत्तीसाठी आपण जेवढी

शक्ति, वेळ खर्च करतो तेच परमेश्वरासाठी खर्च केली तर त्याची भेट अवश्य आहे. भगवंता यात तुझा दोष कांही नाही पोटात आम्हास लबाड केलेले आहे. (अ 1887)

651 मी बाहेरुन साधुपणाचा वेष घेतला पण अंतरंगात मनाचे मुंडन केले नाही. काम क्रोध विकार तसेच राहिले. देवा माझे आचरण किती घाणेरेडे आहे, याचे माझे मनच साक्षी आहे माझे गुण दोष मला समजत आहेत. समर्थ सेवा घडल्यामुळे अंत:करणत भीती नाही. समर्थाकडे लहान, मोठा, राजा, रंक एकाच परमार्थाच्या पातळीवर असतात. सर्वांना सारखीच कृपा असते. (अ 1903)

652 जप, तप, पारायण, यज्ञ, याग करण्याचे मला प्रयोजन नाही. काळ माझा पाठलाग करत आहे. त्या भीतीने मी देवाच्या पाठीमागे लागलो आहे. आता ज्याची त्याची जबाबदारी त्याला संभाळावी लागेल. काळ आयुष्याचे माप टाकत आला आहे. देहाचा अस्त होणार, देवा सत्वर या. देवा तुम्ही लवकर येत नाही म्हणून माझी वाणी तुमचे गुणवर्णन करण्यास लाजत आहे. (अ 1925)

653 बुध्दिहितांना उपदेश करणे महणजे अमृतात विष कालविण्यासारखे आहे. आळशी माणसाचे मन फार वाईट असते. प्रेतासारखी भावना असते. मीपणाच्या आणि लाचारीच्या भावनेत मी तुमची सेवा करणार नाही. आम्ही आमचे शरीर तुम्हांस अर्पण केले. तुम्ही त्यांत शुध्द बीजाची पेरण करा. तुम्ही निर्गुणातून नामरुपास यावे. (अ 1941)

654 गुळाला माशी चिकटते तसा मी प्रपंचाला चिकटलो आहे. काळ पुरुषने मला ओढले आहे, सत्वर ये. सर्व आशा आकांशापासून माझे मन आवरते घेतले आणि आम्ही क्षेत्रीचे संन्याशी झालो. इतर देव-देवताचे केलेले आवाहन विसर्जित केले आहे. आता पांडुरंग फक्त तुझ्याच ठायी दृढभाव ठेवला आहे. संसारात इच्छा नाही. आम्ही तुला जीव अर्पण केला आहे. (अ 1954)

655 मीच दुराचारी बाकी सर्व चांगले आहेत. देवानी मला क्षमा करावी. मी आणि माझे धन-पुत्र स्त्री यांना माझे म्हणण्याचा माझा अपराध आहे. मी आत्मस्वरुपाला विसरलो, प्रपंचाकडे वळलो. मी पशुवत आहे. भगवंत अंत:करणात असून तो सर्वांना त्याच्या कर्माप्रमाणे नाचवितो. मी हरिदास झालो आहे. सर्व जीवन समर्पण केले आहे. (अ 1977)

656 माझ्या काया, वाचा, मनाने, डोक्याने, हातानी पायांनी न करावी ती कर्मे केली, देव, वेद, संत आणि इतर लोकांची निंदा केली आहे. भूतदया परोपकार मला माहित नाही. मी अविचारी, कपटी, लबाड, पापी आहे. अनेक अवगुणानी मी संपन्न आहे. पांडुरंगा, मायबापा मी शरण आलो आहे. (अ 2062)

657 धर्म नीतीला अनुसरुन प्रामाणिकपणे जो उत्तम व्यवहाराने पैसा मिळवितो आणि आसक्ती न ठेवता उदास वृत्तीने खर्च करतो, तोच उत्तम गतिला जाईल. मनुष्य जातीत उत्तम कुळांत सुखोपभोग घेईल, जो सदा परोपकारी आहे. परस्त्री माता बहिणीप्रमाणे आहेत. शांती स्वरुप आहे. पशूदया दाखवितो अशा गृहस्थामी पुरुषास वैराग्याचे सामर्थ्य प्राप्त होते. माझी फजिती झाली तरी वाणीने अखंड हरीनाम घेतो. (अ 2090)

658 अग्नी कोणाला बोलवत नाही ज्याला थंडी वाजते तो उष्णता घेण्यासाठी त्याच्याकडे जातो. पाणी कधी मला प्या म्हणत नाही. तहानेला आपोआप त्याच्याकडे जातो. वस्त्र म्हणते काय मला नेसा. गरजेनुसार लोक नेसतात. विठ्ठल म्हणत नाही माझे स्मरण करा. ज्याला आपला उध्दार पाहिजे, तोच स्मरण करतो, देवाचे स्वरुप हेच आपल्या मनामध्ये आहे. मनांतील मळ (राग, व्देष) टाकून खरा माल धरा. (अ 2120)

659 संसारातील सबंधी लोक सुखाचे सोबती असतात त्यांना सतत काही दिले - घेतले तरच ते चांगले म्हणतात. मात्र अंत:काळी आपल्या उपयोगी पडणारे नसतात. वृध्दपणी शरीर साथ देत नाही. तेव्हा बायको मुलेही टाकून निघून जातात. संसारात कमलपत्राप्रमाणे अलिप्त बुध्दिने राहीन, योग्याप्रमाणे अलिप्त राहीन. देवा स्वप्नाप्रमाणे खोटा भासणारा प्रपंच नाहिसा करा. (अ 2179)

660 जगातील जीवात तू अहंकार गर्व निर्माण करुन त्याना नाचवीत आहे. साऱ्या जगाला फसवित आहे. तू गारुडी विद्या जाणतोस. दयाळू वृत्तीच्या लोकांना अनाथाची करुणा येते. दयाळू वैद्य रोग्याला काढा देवून बरे करतात बुडणाऱ्यास पोहणारा वाचवितो. याना कोणता लाभ आहे ?अस्सल लोक पाहिजेत. सामान्य लोकाचे काम नाही. हे मना रिकामा राहू नको. नारायण नामाचेच पारायणे करीत जा. (अ 2279)

661 जप करण्याचे निमित्ताने डोळे झाकून झोप घेतो, त्याला देहाचा विसर पडतो. असले भजन अशुध्द आहे. ज्याच्या चित्तात अभिमान, अहंकार

भरला आहे. जे लोक देहनिर्वाणाचे साधन म्हणून परमार्थ करतात त्यांना देव कसा प्राप्त होईल. ज्याच्या चित्तात परद्रव्य, परकांता याचे आर्कषण नाही, तो इतर पापानी बांधला जात असे निश्चयपूर्वक सांगतो. विषयसंगतीमुळे चांगल्याचे वाईट होते. मनुष्याने धर्मनीतीला अनुसरुण केलेले चांगले, तिचा नीट अनुभव घ्यावा. (अ 2358)

662 अंतकाळी माय, बाप, धन, वित्त कांही बरोबर येत नाही. आपण आयुष्यभर जे करु त्याचे संचित तयार होऊन ते भोगावे लागते. खरा लाभ कशात याचा विचार करा दुसऱ्याच्या व्यवहारावर चित्त ठेवू नका. अंतकाठी देह जाईल तो खरा आहे, असे मानू नका. एका पांडुरंगावाचून भवसागरांतून सोडविणारा कोणी नाही. हातपाय धड आहेत तोपर्यत व्यवहारांतून सवड मिळताच टाळी वाजवा मुखाने नाम घ्या. विठ्ठला तुझ्या पवित्र, गोड नांवाखेरीज कांहीच नको. (अ 2438)

663 ज्याने निष्काम कर्म, निष्काम भक्ति, विवेक, वैराग्य एवढे मुद्दल जतन करुन ठेवले आहे त्यालाच भगवंताचा लाभ होतो. हरीचे गुण-वर्णनाच्या आनंदात इतर सर्व विषयांचा विसर पडला आहे. भगवंताने आमची काळी दूर केली आहे. आणि तोच आमचा कर्ता करविता आहे. मालकास आपल्या चाकराची काळजी घ्यावी लागते तो स्वामी आम्ही त्याचे दास आहोत. मी दु:खी होऊन तुला बोलावीत आहे. (अ 2445)

664 देहासंबंधी असणारे आप्त, इष्ट यांची उपाधी नष्ट झाली. देहबंधनातून सुटका झाली. आशेचे पाश तुटले. हे देवा तू कामक्रोधादी विकार (कुत्रे) माझ्या पाठीमागे लावून दिले आहेस त्यामुळे मी फार कष्टी झालो आहे. तुझा सहज खेळ पण आमचा प्राण जात आहे. मी सतत भीतीने ग्रासलेला असून दु:खी आहे. हा माझ्या प्रारब्धाचा गुण आहे. आम्ही मनापासून वित्त, चित्त, फार काय जीवदेखील अर्पण केला आहे. मी तुमचे श्रीमुख पहावे व सुखी व्हावे. (अ 2578)

665 ज्याच्या अंत:करणांत देव येतो त्याचा संसार नाश होतो हीच त्याची खुण आहे. त्याला लौकिकांत ममतेच्या पाश्यांत गुंतू देत नाही. ही देवाच्या प्राप्तीची चिन्हे आहेत. ज्याची संगती घडली असता साधकाची मनुष्यदशा जाऊन तो देवरुप होते. त्याला देवाची प्राप्ती झाली हे ओळखावे त्याची वाणी प्रपंचाचे

वर्णन करत नाही आणि असत्याचा मळ लागू देत नाही. तो देव आहे अस जाणावे. (अ 2583)

666 देवा, तुझ्यापुढे असत्य चालत नाही. कारण सर्वांचे अंत:करण काय आहे ते तू जाणतोस. वाकडा असलेला लोखंडी विळा परिसाच्या स्पर्शाने सोने होतो. त्याप्रमाणे जीवनमुक्त पुरुष देहाने कसाही असला त्यांच्या अंत:करणात बदल झाल्याने त्याचे चित्त समाधानी असते आणि हेच परमार्थाचे खरे गोड फळ आहे. विव्दत्ता, सत्ता संपत्ती मोठेपणा कालांतराने व्यय होतो म्हणून मोठेपणाच्या नादी न लागता आपला धर्म जो आहे नामसंकीर्तन याचे मी पारायण करीत आहे. त्यातच माझे हित आहे. (अ 2479)

667 माझा संचित कर्माचा ठेवा जसा असेल तसा तो भोगावा बरे. लोकाचे कांहीही मत असो देवाने माझे भलेच केले आहे. अनेक जण कीर्ती, धनसंपदाच्या नादात गुंततात. परंतु यमयातना व जन्ममरणाची शिक्षा भोगावीच लागणार. पांडुरंगासारखा कल्याणदायी सावकार सोडून इतराची अपेक्षा का करता ? कृपाळू देवाने त्याला शरण आलेल्याचा भाव खरा की खोटा पाहिले नाही. सर्वाचा उध्दार केला. (अ 2621)

668 देवा आपण भाग्यशाली आई आहांत आणि आम्ही भाग्यवान लेकरु आहोत. आधी आपला मार्ग स्वच्छ करावा, म्हणजे चालताना अडथळा येणार नाही. निवृत्तीमार्गात पापाचा आणि सकाम पुण्याचा व्यवहार प्रतिबंध करणारा आहे. संसारातील देहादी उपाधीचे घोंगडे विचाराने बाजूला टाकून पळा नाहीतर जन्म-मरण तुमचा पाठलाग करील. या निवृत्ती मार्गात जो वैराग्यसंपन्न शूर आहे तोच या बंधनातून बाहेर पडतो बाकीचे अडकतात. (अ 2676)

669 संसारात सर्व काळ विठ्ठल नामाचा जप करावा हेच सर्व सुख आहे परमार्थाचे मूळ आहे त्याने गोपाळ कृष्णाची प्राप्ती होते. काशी यात्रेची जरुरी नाही. अभिमान आणि कल्पना तीळभर असल्या तरी त्याच्या जवळ नारायण येत नाही. तुला आम्ही सेवेने ऋणी केले आहे, त्याचा मोबदला म्हणून प्रेम पाठवून दे, आत्मा आणि अनात्मा यांच्या विचाराने मागील संचित कर्माचा हिसेब संपला आहे हे निवाड्याने अनुभवास आले आहे. देवाच्या समागमाने मला विश्रांती मिळाली. (अ 2723)

670 जन्म मृत्यूच्या चक्राच्या फेऱ्यांत माझा देह रुपी गाडग्याचा गळा अडकला होता. आत्मस्थितीने स्वयंभू, निष्काम झालो आहे. देह मढ्यासारखा झाला आहे. मढे अग्नीला जाणते काय ? मी कळीकाळाला भिणार नाही. देह सुख पाहाणार नाही. तुमच्या नामाचा प्रसाद मागत आहे. (अ 2726)

671 ताक देण्यांत जो कृपण आहे तो जेवू काय घालील हे त्याच्या बाहय आचरणावरुन समजते. मी अव्दैताची मूस सोडून व्दैत झालो, व्यवहार करु लागलो आणि तुम्हालाच धर्म भक्ति रक्षणाचा कां आळस उत्पन्न झाला ? आता अवतार धरा 'नामसंकीर्तन' सोपे साधन लोकास समजाविले आहे. नाम धारकाला दर्शन देऊन त्याचा उध्दार करावयाचा तुझा नियम आहे. दान देण्याची हीच योग्य वेळ आहे. (अ 2735)

672 देवा, तुमचे माझे पिता-पुत्राचे नाते आहे. आजपर्यंत अज्ञानाने मी बोभाटा केला नाही. सामर्थ्यवान बापाच्या लेकराने इतके दीनपणाने ओरडत बसावे. निद्रा आणि आळस यांच्या वाढीमुळे मी अवगुणाचा (शरीर सुख, जिभेची आवड) आश्रय झालो आहे या अवुणामुळे परमार्थ प्राप्त होत नाही. त्यामुळे कोणाचेही हीत होत नाही. पूर्व संचिताच्या मताशी मी सहमत नाही. वाल्मिकी, अजामील याचे पूर्वपुण्य नसताना तू त्याचा उध्दार केला, मी वारंवार तुमचेकडे धांव घेत राहणार. (अ 2782)

673 ज्याला देहनिर्वाहासाठी ज्याची खरी गरज आहे ती त्याला द्यावी त्याला खरे पुण्य म्हणतात. आपलया जवळचे दान देऊन निश्चित व्हावे आणि उदार बुध्दीने पुण्याचा लाभ जोडावा. सत्य संकल्पाकरिता विवेक वैराग्याचे सूर्यबिंब ह्रदयांत उजळू द्या. मनामध्ये वेद, देव, गुरु याविषयी शुध्द भावाचा आदर राखावा. पांडुरंगा मी तुझा दास आहे. माझा जमेल तसा उध्दार करा. माझी बुध्दि हीन, नीच आहे तरी चित्तात अहंकार आहे. देवी मी अवगुणीअसल्याने स्वैराचार होण्यास प्रवृत्त होइल म्हणून तू माझा सांबाळ कर. (अ 2785)

674 देवा आपण सर्व विश्वाचे चालक आहात. सर्वांच्या बुध्दी व्यवहारांस आपणच कारण आहात. जे व्यवहारास धरून ओघाने आलेले असते तेच बरोबर असते, त्यात बदल करण्याची कोणाचीही शक्ति चालत नाही. देवा आम्ही जीवन समर्पून तुमच्याशी योग साधला आहे देवा आता अखरेचे सांगतो शरण आले आहेत त्याचा सांबाळ करा. (अ 2793)

675 देवा तू ज्ञान - ध्यान मार्गाने उपलब्ध होत नाहीस मोठ्या दर्शनकारास तू कळला नाही. देवा सहा शास्त्रे चार वेदाना तू कळाला नाहीस. ब्रहतादिक देवाना तुझ्या स्वरुपाची मर्यादा सांगता येत नाही. तुझा अंतपार कोणालाच कळत नाही. कोट्यावधी रुपयाचे धन मिळविले मेल्यावर लंगोटीसुध्दा बरोबर येणार नाही. विडे खाऊन तोंड रंगवितो मेल्यावर सपक तोंडाने स्मशानात जाशील, पण शेवटी गोवऱ्याच्या संगतीत निजावे लागते एका राजाला विसरले असता सारे दु:खच भोगावे लागते. (अ 2959)

676 विठ्ठला माझ्या प्रारब्धानुसार जे सुखदु:ख भोग प्राप्त होतील ते माझे मी शांतपणे भोगीत त्याबद्दलचे ओझे तुझ्यावर घालणार नाही. अंत:करणात तुझे ध्यान आणि मुखांत निरंतर नाम असावे. या दानाची तुझ्याकडे मागणी करत आहे. गर्भवासाचे दु:ख निवारण करण्यासाठी मी तुझ्याकडे काकुळतीस येणार नाही. त्याची मनात भीती नाही. तुझ्यापासून ध्यान आणि नाम याचेच दान मिळाले. मी आनंदाने नाचेन. (अ 2971)

677 जप, तप करुन जीवाचा आटापिटा करत नाही. तुला शुध्दोदक घातले नाही, फक्त नामचिंतनाव्दारे सेवा केली देह जर प्रारब्धाचा स्वाधीन आहे तर त्याचा भार डोक्यावर का घेऊ ? सर्व संकटांचे मूळ मी आणि माझे हा अभिमानाचा दोषच आहे. वेदामध्ये ज्या वर्णनासाठी जे विहीत कर्म सांगितले आहे त्या आचारतत्वाचा यथायोग विचार करुन त्या त्या वर्णनांनी ती ती कर्मे करावीत. हा तुमचा स्वधर्म आहे. तुमचे भोजन झाल्यावर उरेल ते सेवन करावे हे माझे कर्तव्य आहे. (अ 2976)

678 युध्द कथा ऐकताना बऱ्या वाटतात व सुख होते पण प्रत्यक्ष युध्द करताना यातना होतात त्याप्रमाणे हरीची भक्ती सुळावरील पोळीप्रमाणे आहे. हरिभक्तीचा प्रपंचाचा त्याग करुन देहावर उदार झालेला वीर पुरुष विरळाच देहाचे पोषण करीत बसल्यावर माणूस विषयाचा दास होईल. अशा पुरुषांना भगवंत कसा पावेल. प्रपंचाचा सर्व कामधंदा आणि तुझे माझे हा अभिमान विसरण्यास देवास शरण येण्याची आवड उत्पन्न झाली आहे, आता तरी माझा स्विकार करा. (अ 2992)

679 भगवंता आंधळ्याच्या टाळीत अचानक कावळा सांपडावा तसा हा मानवी देह मला प्राप्त झाला आहे. हे दातारा आता मात्र यापुढे अभयदान देऊन

अनेक देहांत जाण्याचे थांबवावे. वाहत्या पाण्यांत काडी आडवी पडली तरी पाणी प्रवाह अडतो आणि पाणी दुषित होते. एकच माशी संपूर्ण अन्नाचा नाश करतो. दुर्जनाची संगत वाईट असते. त्यामुळे अनेकाचे घात होतात. पंढरीस गेल्यास भजन कीर्तन नामस्मरणाचे वेड लागते. (अ 3115)

680 ब्रम्हदेवाच्या वंशात रावण जन्मला होता. त्याची लंका सोन्याची होती. सर्व बाजूने समुद्र असल्याने शत्रूच्या आक्रमणाची भीती नव्हती. बलाढय राक्षस सेना होती. सुंदर पटराणी मंदोदरी होती. पण त्याच्याकडे संपत्ती अमाप असूनहि अखेर एक कवडी देखील बरोबर गेली नाही भगवंता तुझ्याशिवाय कायमचे टिकून राहील असे कांही दिसत नाही म्हणून नाशिवंताची आशा टाकून दिली आहे. आणि अनन्यभावाने तुला शरण आलो आहे, तूच एक खरा आहेस बाकीचा केवळ पसारा आहे. (अ 3119)

681 जगांत आम्ही विष्णुभक्त भाग्याचे आहोत प्रसंगी आमच्यातील अखंड धैर्य दिसते. आमच्या माऊलीचे गीत आमही सुखाने गातो. आमची माऊली आमच्याजवळ नाही. पण आमच्या गरजा ती पुरवते आमच्याविषयी आमच्या माउलीच्या चित्तात विलक्षण प्रेम आहे. त्यामुळे सर्व सुखे आमच्याकडे आली आहेत. आम्ही वासना मूळापासून नष्ट केली आहे. सर्व पातकाचा नाश झाला आहे. विठ्ठल भक्ताची माऊली, कृपेची सावली आहे. (अ 3233)

682 जो कुळधर्म पाळतो सत्यवादी संसार करतो. निंदा-स्तुती करत नाही. साधना करतो त्याला ज्ञान प्राप्त होते. विवेक, वैराग्य प्राप्त होते. विठ्ठल हाताशी येवो आचाराने भक्तिचा उदय होतो. सद्गति प्राप्त होणे. कुळधर्म हा सर्व साधनाचे सार आहे आपण आपल्या विहित धर्माचे पालन केले असता लौकिक, सन्मान वाढतो. पितराचा उध्दार होतो. श्रध्दा असेल तर याच देहात देव दर्शन (साक्षात दर्शन) घडते. (अ 3312)

683 मोक्षासाठी इंद्रियावर जय मिळवून मन ताब्यांत आणावे उपवास, नाममंत्राचा जपाव्दारे पुण्याचे फळ मिळते. आसक्ती बाळगून संकल्प करण्याचा सोस टाकून द्या. दु:खनाहीसे होइल. स्वप्नांतील जखमांनी फुटक विव्हळत बसला आहेस. रडणाऱ्याबरोबर रडणे मिथ्या आहे. जोपर्यंत मनांत वैषयिक वासना आहे. केवळ बाह्य त्याग लोकांना दाखवून काय उपयोग ? आपल्या मनांत साक्षी ठेवावे

आणि भगवंतास करुणेच्या वचनानी आळवावे. देवाच्या प्राप्तीसाठी दूर जावे लागत नाही. मनाची साक्ष असलेला पांडुरंग आपल्याजवळ आहे. (अ 3365)

684 खेळ आणि काळला - सवंगडयानो त्रिगुणात्मक देहरुपी चेंडू तुम्ही वरचेवर झेला. वारंवार त्याला परमार्थाकडे लावा. जो हा चेंडू हातचा गमावील तो पाठीवर जन्म मृत्यूचा टोला खाईल. हा त्रिगुणात्मक देहरुपी चेंडू विचाराच्या हाताने, आत्मबुध्दीने झुगारुन द्या. ममत्व सोडून, अंतर्मुख दृष्टीने आत्मस्वरुपी स्थिर करा. स्वस्वरुपाच्या अनुभवाने व्यापक आणि उंच होऊन त्रिगुणात्मक देहरुपी चेंडू वरचेवर घरा. विचाराने पळत असणारा प्रपंचरुपी डाव जिंकतो. परंतु नामर्द भित्रा असेल तर जन्म मृत्यूच्या फेऱ्या त्याला घ्यावयला लागतील. देह प्रपंच विचारांत सांपडू नका, स्वकीय भोवतीच राहतील. जो हरीला जिंकणे तोच खेळाचे सुख अनुभवतो. (अ 3695)

685 भावभक्तिविना केलेली इतर साधनाने देवाची प्राप्ती न होता केवळ श्रम होतत. भाविकांना मात्र देव आपणहून आपले खरे स्वरुप दाखवितो. आपल्या आज्ञाधारक सेवकाचे चित्त, शुध्द आहे असे पाहून देव आपले खरे स्वरुप दाखवितो. ज्ञानीपणाचा अहंकार असणाऱ्या आणि तार्किक नास्तिकांना देव दूर घालवितो. जयाच्या चित्तांत बायको, मुले, द्रव्य, संपत्ती हया वस्तूचे ध्यान आहे ते पशुसमान समजावे. ज्यानी संसारात राहून हरीशी संगतकेली त्याच्या मनुष्य जन्माचे सार्थक झाले. (अ 3865)

686 गोपी निष्ठूर बोलल्या तरी ते सहन करुन कृष्ण गोपी बरोबर कोमल भाषण करुन हसत असे. आपल्या भक्ताचे दास्य करण्याकरिता कृष्ण निर्लज्ज होत असे. कौतुकाने भक्तांचे चरणरज डोक्यावर घेऊन त्यांना वंदन करीत असे. उग्रसेनाला कांही संकंट आले तर तो निवारण करीत होता. काया, वाचा, मनाने शरण आलेल्या भक्तांचे तो हरी रक्षण करतो किंबहुना भक्ताकरितांच तो अवतार घेतो. भक्तांच्या रक्षणाकरिता हातात सुदर्शन व गदा धारण करतो. त्याच्याबरोबर राहून रक्षण करतो भक्तांच्या मनाला कशाचीही काळजी नसते. कारण भक्ताचे योगक्षेमाचा भार तोच घेतो. (अ 3921)

687 विविध लोकांना पीडा देणारे असुर पृथ्वीवर फार वाढल्याने त्यांना देवाने मारुन टाकले. त्यांनी संताचा मत्सर केला होता म्हणून नारायणाने त्याचा घात करुन त्यांना अत्यंत अघोर नरकास पाठविले. जे नारायणाचे स्मरण करीत

नव्हते त्यांना यमाचे दुतांनी शिक्षा केली. ज्याना नारायणाचे नांव आवडत नव्हते ते नरकपुरीचे मिराजदार झाले. संताचे जे तोंडाने निंदा करतात त्यांना नरकाची शिक्षा होते. (अ 3622)

688 भगवंत प्रापत होण्याची वेद-उपनिषदात सांगितलेली साधने मोठ्या कौशल्याने करावयाची असतात परंतु जसे मंथन करुन लोणी काढावयाचे, तसे शास्त्रातील सर्व साधनाचे सार हरी आहे. अति उंच ठिकाणी झाडाला फळ असते त्या जागी पक्ष्यास जाण्यास कोणी प्रतिबंध करीत नाही. तो एकदम त्या फळापर्यत जातो. त्याप्रमाणे श्रीहरीच्या भक्तिने त्याची प्राप्ती एकदम होते. त्यांत कमी जास्त होऊन तूट होत नाही. तुका म्हणे आजपर्यत पुण्याचा संचय झाला त्याचा लाभ आज मला प्राप्त झाला, त्यायोगे मी समाधानी आहे. (अ 3945)

689 रामेश्वर भटजीचा दाह शमला तो अभंग - आपले अंत:करण शुध्द असले तर शत्रूदेखील मित्र होतात. एवढेच काय वाघ, साप हे त्याला खात नाहीत, दंश करीत नाहीत. विष घेतले तरी अमृत होते. आघात हितावह होतात आणि जे करु नये ते कर्तव्य शुभदायक होईल. ज्यामध्ये दु:ख आहे त्यापासून सुखप्राप्ती होईल व अग्नीच्या ज्वाला शांत होतील. सर्व जीवाच्या अंतरी त्याचा एक भाव असल्यामुळे तो सर्वांना प्राणापेक्षा आवडतो असा अनुभव आला म्हणजे कृपा केली असे जाणावे. (अ 3957)

690 अरे प्राण्या, एका बीजामंत्राचा उच्चार कर रोज 'रामकृष्ण हरी' अथवा मुरारी मुरारी' म्हण. मुखाने गोपाळाचे नांवाचा उच्चार कर हेच तझ्या जीवनकल्याणाचे साधन आहे. उपासतापास, वनांत राहणे, उपोषणे पारणे ध्रमपान, पंचाग्निसाधन यापैकी कांहीही करावे लागत नाही. हे साधन फुकाचे असून सुखसमाधान देणारे आहे. त्यासाठी तुला जवळचे कांही देणे नको. हरिनाम सर्व साधनाचे सार आहे. (अ 3999)

691 भगवंताचे नाम मानवाबरोबर नसेल तर हा मार्ग चालवत नाही. आपल्या शरीराची विटंबना होऊन भीक मागावी असे वाटेल आणि फजिती होइ्रल. तसे तुम्ही करु नका. सर्वजण 'राम राम' म्हणा. दिव्यावर पतंग उडी घालतो, आगीत फुकट मरतो तसेतू आपला घात आपण करु नका. जाणून विष प्याला व मरण्याचे वेळी वैद्याला बोलवून काय उपयोग ? कोणत्याही गोष्टीचा सुरुवातीला

विचार करावा. जोपर्यंत यमदूत आले नाहीत तोपर्यंत भगवंताचा विचार कर. (अ 4002)

692 जे देहावरील अहंभाव सोडून देहाविषयी उदासीन झाले आहेत. जे देवाला आळवितात. पंढरी, आनंदासारखा पवित्र तीर्थयात्रा करतात, नर्मदा प्रदक्षिणा करतात दुसऱ्याची तहानभूक जाणतात. जे परोपकारी पुण्यवान आहेत जे इंद्रियावर ताबा ठेवतात अशा हरिभक्तांना नमस्कार असो कारण त्यांच्या सहवासात सर्व इच्छा पूर्ण होतात. (अ 4008)

693 ज्या कृपानिधीने मला आयुष्य व अन्नपाणी देऊन जगविले, त्याचे मी चिंतन करीन, जो जगाचे अधिष्ठान आहे. त्या नारायणाचे गुण गाईन जो या विटेवर चंद्रभागेच्या तीरावर कटेवर हात ठेवून उभा आहे त्या विठ्ठलास अंत:करणांत ठेवून राहीन. जो वनमाळी हरी गोपाळामध्ये खेळतो, तो असुरांचा काळ, भक्तजनाचा कैवारी, जो आपल्या मायाशक्तीच्या व्दारा अनंत लीला करतो. चरणांवर माझे मस्तक त्या भगवान विष्णूस माझे दंडवत असो. (अ 4071)

694 हे कृपावंता, मायबापा, तूच अनाथांचा दाता आहेस. माझे दु:ख चिंता मोह नाहीशी व्हावी म्हणून मी तुला आता शरण आलो आहे. तू मला तारुन ने. तुझा विसर पडू नये म्हणून संतसंगती, चरणसेवा दे, हाच माझ्या अंत:करणातील भाव आहे. देऊन माझे मनोरथ पूर्ण कर. तुझे नामसंकीर्तन, भावकीर्तन करण्यासाठी मला भाव प्रेम दे. सर्व संकटांतून मला सोडव विनंती ऐकावी मला विषयसुख, संपत्ती, राजयधन नको तुझ्या भक्तिवाचून मला दुसरे कांही नको. माझे मनोरथ पूर्ण कर. (अ 4073)

695 हे भगवंता तुला वाटेल तसे कर, तार अथवा मार, जवळ अथवा दूर कर, संसारात घाल अथवा घालू नको. मी अज्ञानीपणाने तुला शरण आलो आहे. मला भावभक्ती व कशाचेहि ज्ञान नाही. मी मंद, नीच आहे. माझे मन स्थिर नाही. इंद्रिये विषयाकडे धांवतात. शांती निवृत्ती जवळ नाही. देवा तूला सर्व सांगितले, तुझ्यापायी जीव ठेवला आहे. तूच माझा सर्व ठाव आहे. तुझ्याठिकाणी विश्वास धरुन तुझी कास बळकट धरली आहे. योग्य वाटेल ते कर. (अ 4079)

696 देवा तू कृपेचा अथांग सागर आहेस तूच आमचा माय-बाप, भाऊ आहेस. तू भावबंध काळपाश तोडणारा आहेस. शरण आलेल्याना अभय दान देणारा, उदार अविनाश आहेस, देवा सर्वजण तुझी स्तुती करुन थकले मी मूर्ख

तुझा विचार कसा करु ? आता मला अंतर देऊ नका. मला भाव समजत नाही परंतु मी तुझा म्हणवितो पूजा करतो. तूझ्यावर आता सर्व भार आहे. (अ 4080)

697 हे भगवंता त्रिभूवतांत तू सर्वात सामर्थ्यवान आहेस. आम्ही तुझे आहोत. देवा तू प्रतापाचा सूर्य आहेस तू कृपेचा सागर असून गरीबाचा कृपाळू दाता आहेस बिभीषण तुला शरण आल्यामुळे सर्व राक्षसाचा रावणासह वध म्हणून मी तूला शरण आलो आहे. देवा मी सर्वाथाने पापाचा पुतळा आहे. मी तुला शरण आलो आहे. (अ 4143)

698 श्लोक अभंग - जयाला गुरुवाणी लाभली नाही, त्याची वाणी अमंगळ आहे. त्याचे मुखावलोकन करु नये, त्याच्या उध्दारासाठी कोणताही उपाय नाही. त्याने ईश्वरप्राप्तीसाठी कोणतेही साधनासाठी देह कष्टविला तरी खोटा आहे. समर्थाची सेवा करण्यामध्ये आपले कल्याण आहे. त्यांची कृपा लाभली तर ते भक्ताला आपल्यासारखे बनवतात. त्याच्या ठायी कोणतेही उणे उरत नाही. यासाठी हृदयांत विचार करा. मनांमध्ये त्याची आस धर, तू वंदनीय होशील तुका म्हणे. हेच मुद्दल आहे. माझे बोल सत्य माना. (क्षेपक अ 4)

699 ज्याचा पिता समुद्र आहे. बंधु चंद्र आहे. मेहुणा व्दारकेचा राजा आहे. तरीसुध्दा शंख दारोदारी भीक मागतो. (समुद्र, चंद्र, श्रीकृष्ण) कोणाच्याही घरी नसतो परंतु शंख मात्र प्रत्येक हिंदूच्या देवघरांत पूजेसाठी असतो तुका म्हणे आपले स्वहित ज्यात आहे. त करताना कोणाच्या मोठेपणाचा आधार न घेता उचित कार्य करावे. (क्षेपक अ 6)

700 शिवाजी महाराजाला तुकोबाराय म्हणतात. तुमच्याकडे आम्ही येऊन काय करावे. तुमच्याकडे भिकाऱ्याप्रमाणे अन्न मागण्यापेक्षा सन्माने पाच घरी भिक्षा मागणे क्षेयस्कर आहे. भरजरी वस्त्रे काय करायची ? त्यापेक्षा चिंध्या बऱ्या आहेत. लज्जा रक्षणाचे काम त्यासुध्दा करतात. झोपण्यासाठी दगडाची शय्या उत्तम आहे. राजगृही मान मिळतो. तुमाला आमचा राग येईल आम्हांला पर्वा नाही. कारण श्रीहरी आमची उपेक्षा करणार नाही. त्याची आस आहे. भिक्षेसारखे सुख नाही. तप, व्रत, यज्ञ करणारे आशाबध्द असतात. तुका म्हणे तुम्ही पूर्वजन्मी पुण्यकर्म केलेले भाग्यवान व श्रीमंत आणि हरि भक्त आहात. (क्षे.अ.82)

701 संताला शरण जात नाही त्याने कितीही पुराण वाचले तरी व्यर्थ आहे. विठ्इलाचा दास म्हणवून घेणारा परनारीला हसतोस ? अंत:करणात दयाधर्म नाही आणि विठ्ठलाची भक्ति करतोस ? धर्मवासना नाही आणि प्रदक्षिणा करतोस ? हे भक्तीचे रहस्य नाही. तेथे राम नाही. अशा लोकाच्या प्राणावर बेतले तरी त्याची कृपा होत नाही. (क्षे.अ.213)

702 हे पांडूरंगा मला भेट देण्यासाठी ये. माझे पाप, ताप, गुण-दोषाचे निवारण करा. काम, क्रोध हे शत्रू माझ्या हृदयातून बाहेर घालव आणि तू माझ्या अंत:करणात निवास कर. तू मनांत आणलेस तर काय करु शकत नाहीस हे त्रैलोक्य तू एका क्षणांत निर्माण केलेस. जो प्रपंचाची पीडा सोसतो. त्याचे आचरण पापी असते. जो आत्मीयतेने रामाचे नाम घेत नाही तो यमदुतास आमत्रंण देतो. त्याची संगत धरु नये. धरल्यास तो पापाचा वाटेकर होतो. (क्षे.अ.242)

703 चांगल्या वृत्तीने दुकानी बसावे, व्यापार करताना नामस्मरण, चिंतन करीत असावे. सार असार पाहून ग्राहकाप्रमाणे पोती रिती करावीत. व्यापारांत गर्व नसावा नामस्मरणाचा माल पूर्णपणे साठवावा. सत्याच्या तराजूत माल मोजून द्यावा, कृतिमपणा, खोटेपणा व्यापारात नसावा. तुका महणे - आम्ही (परमार्थिक) व्यापारी झालो. या व्यापारात चौऱ्याशी योनीचा दु:कारक मार्ग चुकविला. (क्षे.अ.307)

704 ज्याठिकाणी ब्रम्हात्म्याचे ज्ञान आहे. तेथे चतुर्भज नारायण हजर असतो. तेथे पाप नाही. काळाला प्रवेश नाही. हरिनाम कीर्तन हे परोपरी जरूरीचे आहे. तुका म्हणे हाच भाव माझ्या अंत:करणात आहे. ब्रम्हाचे वेद शंखासुराने पळविले त्याकरिता मत्स्यरुप धारण केले त्याने आत्मा ब्रम्हाडांस नेला नव्हता. ब्रम्हाने धाऊन कृपा केली व ते परत आणले. देवा माझे संरक्षण करा. (क्षे.अ.294)

705 स्वप्नातील धन चित्रीच्या ब्राम्हणास दिले. आपल्यावर जसे संसारात घडले तसे खोटे कर्म केले. तसे शब्दज्ञान केवळ बडबड असते. ज्ञानाची विक्री करु नये शब्दाचा भात शब्दाची कढी असे भोजन सेवन करुन कोण तृप्त झाला आहे. साखरेची गोडी कळण्यास साखर स्वत: खाल्ली पाहिजे. सांगून गोडी समजत नसते. तुका म्हणे कोणतीही अपेक्षा ठेवू नये निरपेक्ष बुध्दीने रहावे. (क्षे.अ.327)

706 स्त्री आणि धन हे खरे नाही. तिच्यापुढे अनेक थोर महापुरुष नागवले म्हणून स्त्री आणि धन या दोन्ही भ्रामक गोष्टी त्याज्य कराव्यात असे केल्याने तुम्ही खरे सुख प्राप्त करुन घ्याल. स्त्री आणि धन सर्व दु:खाचे कारण आहे. आशा सोडून द्यावी आणि निजपदी प्राप्त करुन घ्यावी. देहावरील अत्यंत प्रेमामुळे तो व्यर्थ जीवन जगत आहे. तुका महणे कोणतीही अपेक्षा ठेवू नये. निरपेक्ष बुध्दीने रहावे. (क्षे.अ.328)

707 गुणांचा विचार करता वानर तो प्राणी काय ? परंतु त्याच्या हृदयांत 'राम' विचार असल्याने तो वानर श्रेष्ठ आहे. अनेक हत्या करणारा वाल्याकोळी वाल्मीकी झाल्यावर त्रिभुवनात तो वंद्य ठरला. राम नाम हा चोरीचा व्यापार नाही. तरी तुम्ही वेळोवेळी 'राम राम' म्हणा. देव घरी येईल याविषयी शंका नको जेव्हा तुम्ही सर्व संग त्यागाचा परित्याग कराल आणि आसक्ती न ठेवणारे महानुभावी व्हाल देव तुमचा संभाळ करील. तुमा म्हणे. ज्याचे अंगी संतत्व आले ते राममय झाले. (क्षे.अ.348)

708 ब्रम्हदेवाने सकळ ब्रम्हांड निर्माण केले, त्यांत अनेक खेळ मांडले, त्याच्या नाना युक्ती, त्याच्या अंत:करणात ब्रम्हनिष्ठा, मनांत गुरुभक्ति असे हे तुझे प्रेम काही एक समजले. तू या विश्वाचे सुत्र आहेस. व्रत करुन मोकळा झालास. आमच्या मनांत भेटीचा हेतू आला. अरण्यांत उदासीन होऊन फिरलो. वस्त्र नव्हते शरीर मलीन झाले फलाहार केला. तुझ्या दर्शनाचा सोहळा काय वर्णावा तुका म्हणे त्याची चर्चा नको. (क्षे.अ.367)

709 अंत:करणात कांही श्रध्दा असेल तरच देव तेथे येतो. जनाबाईचा भाव पाहून देव तेथे पाणी भरीत होता. ज्याच्या ठिकाणी शुध्द भाव पाहून देव तेथे त्याच्या ठिकाणी देव राहतो. टाकीचे घांव सोसल्याखेरीज कष्ट सहन केल्याखेरीज मोठेपण प्राप्त होत नाही. स्तुती, मान, निंदा सर्व थुंकून टाकावे. सद्‍गुरुची सेवा हेच अमृतपान मानावे. आपल्यावर दु:खाचे कडे कोसळले तरी सुखाचे माहेर सोडू नये. तुका म्हणे आपण आपलीच फजिती जीवनात करु नका. (क्षे.अ.376)

710 मुंगी होऊन साखर खावी आणि निजस्तुती भेट घ्यावी. वाळवंटात साखर पडली तरय गज होऊन तेथे रडणे काय उपयोगाचे, हरिदास गोसावी झाला आणि त्याने मायिक क्रिया दाखविण्यास सुरवात केली. पाठांतराची विद्‍या म्हणजे केवळ लोकांची करमणूकच, अशांच्या ठिकाणी प्रेम, भाव, श्रध्दा नसते. तोंडाने

ब्रहतज्ञान सांगतो पण करणीला चुकत नही. खोटा मोठेपणा वाढवितो आणि व्यक्तिपूजेचे स्तोम माजवितात तुका म्हणे - लहान व्हावे निजवस्तू मागून घ्यावी. (क्षे.अ.383)



# 8. अध्यात्म, ब्रम्हज्ञान

711 देव भक्ताचा भाव पाहतो. देवा तुझे भाकित, ज्ञान सर्व मला प्राप्त झाले आहे. तू व्दैत भाव करु नको. तुझे सर्वव्यापी स्वरुप जाणवते. तुझ्या स्वरुपाच्या अज्ञानाने, वादाचे प्रसंग आम्हावर येऊ नयेत. देवा तू नाहीस असा एक परमाणू हि नाही. तू आकाशापेक्षा मोठा आहे. इतर सर्व वाद निरर्थक आहेत. (अ 12)

712 भजनाचा लाभ भोगवासनेच्या त्यागातूनच होतो. ज्ञानाने व्दैताचा नाश होतो व एक हरीच राहतो. आपल्या आत्म्याहून अन्यत्र हरीला शोधावे लागत नाही. ते निष्काम कर्माने व भक्तिने जाणावे. विषयाचा भोग घेणारा देह खरा नाही. संसार भ्रम आहे. निष्कारण दु:खी होऊ नका. तू स्वत: हरीच आहेस ते स्वरुप ज्ञानदृष्टीने जाणा. (अ 20)

713 त्यागाशिवाय संसारातील भोग सुटणार नाही. परमार्थ सुखाची व्यर्थ बडबड करु नका. भ्रामक देहाभिमान दूर ठेवा. त्यामुळे समाधान मिळेल तेच भगवंत दर्शन, मान अपमान दूर ठेवा. काम-क्रोधाची वृत्ति शांत ठेवा आसक्ति नको. स्थिर रहा हेच ब्रम्हज्ञान. (अ 87)

714 वाचाळ माणसे ढोंगी असतात चंदनास सुवास आपल्याजवळ आहे म्हणून सांगावे लागत नाही अंत:करणातील खरेपण सहज बाहेर येते. लपून राहत नाही. सूर्य लोकास जागे व्हा म्हणत नाही. आकाश मेघ दिसतांच मोर नाचतात सत्य लपत नाही. (अ 150)

715 अन्नाच्या नुसत्या वासाने भूक भागत नाही. नुसत्या शब्दज्ञानाने मोक्ष मिळत नाही. खरा परमार्थ पाहिजे तर नामस्मरण करा. नुसते पाणी पाहून तहान भागत नाही. वृक्ष पाहून त्याच्या सावलीची शीतलता कळत नाही. हरीभजन, गाणे ऐकणे, दृढ श्रध्दा यामध्येच हित आहे. (अ 196)

716 सतत समबुध्दी, आस्तिकस बुध्दी, भूतदया भेदबुध्दी नसणे, शत्रू मित्र, पुत्र आणि बंधू याच्या बद्दल समभावना, काया, वाचा, मन, बुध्दी यांत शुध्दाता असावी. मान-अपमान, मोह, आसक्ती हे सर्व खोटे मानावे.आहे त्या परिस्थितीत समाधान मानावे. त्यांना साधू सर्वकाळ भेटतात. (अ 199)

717 बीजापासून अंकूर उत्पन्न होऊन अखेर बीजच होते. एक अनंतापासून विश्व निर्माण होते कल्पाती व्यापले आहे आणि शब्दानेच विश्वाचा लोभ होतो. कारणापासून कार्याची उत्पत्ती, कार्यात कारणाची व्याप्ती आणि कारणातच कार्याचा लय होतो. (अ 241)

718 जागच्या जागी असणारे अव्दय ब्रम्ह तेच मी एक आहे. मी कोठे जात नाही. फिरुन येत नाही. माझे बोलणे व्यर्थ आहे. मला कोणी नाही. मी कोणाचा नाही. आम्हाला जन्म मरण नाही. आम्हास नाव नाही, रुप नाही व कर्म - अकर्मापासून आम्ही वेगळे आहोत. (अ 256)

719 परमार्थासाठी दोन पथ्ये पाळावी. एक परधन व दुसरे परनारी वर्ज्य मानाव्यात. सूर्य व त्याचे किरणे तसे भक्त आणि भगवंत होय. आमच्या सर्वांगांत देवच जडून गेला आहे. जसे साखर आणि गोडी. जो शब्दनाद उत्पन्न होते तो आकाशाच्या पोटात नाहीसा होतो. (अ 165)

720 विष व अमृत वेगळे आहे. भेद आहे. जगांत सर्वांबरोबर सारखा व्यवहार करु नये. शांतीसारखे सुख नाही बाकी सर्व दु:खच आहे. इंद्रपद दिव्य भोग आहे तो भक्तीचे दृष्टीने भोग नसून केवळ भवरोगच आहे. सर्व सिध्दी असार आहेत. मोक्ष सुख नसून दु:ख आहे. हरीवाचून सर्व शीणच वाटतो. (अ 271)

721 नवनीत आणि ताक एकत्र मिसळत नाही. आम्ही आत्मसार लोण्यापासून असार संसारात कधीही मिसळणार नाही. एकाच दह्यातून ताक आणि लोणी तयार होतात. देवा तू फार चांगला आहे सर्वांना अधिक आवडतो. (अ 299)

722 विश्वाला व्यापून टाकणारी माया तिच्या छायेने ब्रम्हाला झाकून टाकले आहे. त्यामुळे सत्य असून ब्रम्ह न कळल्यासारखे झालेले आहे. अविद्येचे ब्रम्हावर आक्रमण झाले आहे. आपलेच मन आपणास बंधन करते, देवा तुम्ही मला मायेच्या बंधनातून सोडवा. (अ 306)

723 दोरचे खरे स्वरुप कळत नव्हते तोपर्यंत ती सापच वाटत होती. बागुल बुवाचे सत्य स्वरुप कळल्यावर त्याची भीती वाटत नाही. त्याप्रमाणे परमार्थाचे ज्ञान झाल्यावर मृत्यूचे भय वाटत नाही. सर्व भूतमात्राला मी नमस्कार करीन. तयाच्यामध्ये तुमचा वास आहे. अशी क्षणोक्षणी जाणीव ठेवीन. तुमचे स्वरुप सर्वात पाहीन याला वेद प्रमाण आहेत. (अ 362)

724 चुंबकाच्या शक्तिने लोखंडात हलचल निर्माण होते त्याप्रमाणे ईश्वर अंतर्बाहय इंद्रियांना खेळवत आहे. दोरा, अग्नीचे भक्ष्य परंतु मोहरा नावाचा मणी दोऱ्यात ओवून अग्नीत टाकला तो जळत नाही. चंदनाच्या शेजारी झाडानाही सुवास येतो. (अ 391)

725 सर्व काळ देवपूजा एकांतवासात घालवावा. आहारात नियमितपणा आणि मितव्ययिता असावी. नियमीत विश्रांती असावी. इंद्रियाचा नियमीतपणा हेच सार आहे निद्रा जादा नसावी बोलणे माफक असावे. परमार्थ हे मोठे धन आहे. आपला देह देवाला अर्पण कर. त्याचा भार आपणाकडे घेऊ नका त्याने सर्व आनंद होइल. (अ 585)

726 दुसऱ्याचे द्रव्य आणि दुसऱ्याची बायको याची चित्तात अभिलाषा असणे हा खरा विटाळ आहे. जो यापासून दूर राहतो तो सोवळा आहे. गद्‌य पद्‌य ग्रंथ करुन दुसऱ्याचा पैसा हडप करु नये. त्यापासून आपली बुध्दी स्वाधीन ठेवावी. आत्मा काय व अनात्मा काय यांच्या विचाराने पापपुण्यातील आत्मा आहे. त्याच्या समाधानाचे भांडवल जोडावे. अशा माणसाला योग-तप करण्यासाठी वनांत जावे लागतनाही. संपूर्ण विश्व हे विश्वंभरासारखे दिसते, विश्व देव आहे हा अनुभव येतो. (अ 588)

727 तुम्ही ‘माझा’ अभिमान जाळा. नाहीतर तो घात करील. सेवन केलेले अन्न पचले तरच ते देहास उपयोगी होते ओकले तर निरोगी देहास पीडा होते. ज्ञानाभिमानामुळे परमार्थाचे नुकसान होते. मिळविलेल्या संपत्तीचा उपभोग घेणे हितकारक नाहीतर मृत्यूनंतर तिचा काय उपयोग. तुका म्हणे मी सेवक अडाणी बरा माझा उध्दार करा. (अ 690)

728 देहाच्या भ्रामक अभिमानाचा तू त्याग कर आणि सारखे करुणा वचनाने टाहो फोडून देवाला आळव. याशिवाय आपल्या अंतकरणांत दुसरे कांही नको. ह्या खोटया देहादी प्रपंचाचा खोटा अभिमान सोडून दे. म्हणजे तुझ्या ठिकाणी ब्रम्हानंद प्रगट होईल. (अ 756)

729 भगवंताचे नाम, ध्यान अंत:पूर्वक करणे हीच त्याची खरी पूजा आहे. सर्व जगाला मूळ कारण एक अधिष्ठान चैतन्याची सत्ता आहे तेथे योग्य असा सेवक भावाचा व्यवहार होत नाही. जीवाचा आणि ब्रम्हाचा सहज भेद आहे.

तसे तुम्ही आम्ही एक झाल्यावर सेवा कशी होईल तुका महणे यासाठी तुम्ही देव आणि आम्ही भक्त या भावाने तुमचे शरणागत म्हणविणे बरे. (अ 761)

730 भगवंता तुम्ही साक्षात वेद पुरुष आहांत तर वेद नेति नेति कां म्हणतात ? यज्ञाचे भोक्ते आहांत तर तो यज्ञ सांग होत नाही. ? सर्व प्राणी मात्रात आहे म्हणता तर बाह्य भेद का दाखवितात ? तपश्चर्या तीर्थयात्रा दान या कर्त्याच्या मागे अभिमान का लागतो चांभार आहे परंतु तो विष्णु उपासक आहे. तो धन्य आहे. तुका महणे - हरी भक्तीवाचून असणारे थोरपणास आग लागो. दुर्जनाचे दर्शन नको. (अ 780)

731 अविद्येच्या निद्रेतून आत्मजागृतीत येण्यासाठी तू सिध्द हो कारण तू स्वत: परब्रम्हस्वरुप आहेस. देवा आम्ही आजकाल जन्माला आलेली नगण्य नाहीत कच्ची नाही. फसणारे नाहीत तूमला पूर्णपणे कळला आहे. तुझ्या माझ्या स्वरुपात भिन्नता नाही. तुका म्हणे ज्या ठिकाणी मी आहे तेथे तुझ्या स्वरुपात नित्य मुक्त दिसत आहे. (अ 812)

732 योग्यांनी तप:श्चर्या केलेली असते म्हणून त्यांना सन्मान मिळतो. आत्मस्वरुपा ज्याने ध्यास घेतलेला आहे त्याला आत्मरुपाची प्राप्ती होते. संसाराची हाव खाणारा दु:खी होतो. प्रपंचात ज्याची इच्छा नसते त्यास शिवपदाच्या भोगाची प्राप्ती होते. मी देहापासून वेगळा सच्चिदानंद स्वरुप आहे. या विचारामुळे माझे जन्म मरण सुटले. सर्व चिंता नष्ट झाली. सहजस्थिती अनुभवास आली. (अ 814)

733 बायकोचा त्याग केल्याने वैराग्य प्राप्त होत नाही. उपाशी राहून वनात तप करीत बसू नको. सर्व भोगकाळी नारायणाचे चिंतन कर. संसारातील भेदभावना नष्ट कराव्यात, भोगांत गुंतू नको, त्यागाच्या भानगडीत पडू नको. वेळ येईल तसे भोग भोगून ते देवाच्या चरणी अर्पण कर म्हणजे ते बंधनकारक होत नाहीत आलेले भोग ते पांडुरंगास अर्पण करून त्याचेच चिंतन कर. (अ 817)

734 सर्व पांडुरंग स्वरूप आहे. हे गुह्य ज्ञान शंकारानी पार्वतीस सांगितले हरीनामाचा घोष आनंदाने करीत असताना दोष उत्पन्न होत नाही. प्रायश्चित त्याच्या पाया पडतात. जी सुख दु:खे येतील ती एका हरीच्या अंगावर सोपवावीत. हरी वाचून दुसरा आधार शोधू नये. मोठे आश्चर्य, मिथ्या जगास त्याने सत्याचा आभास करविला. तो अनेक प्रकारचा भासतो. हा प्रकृति स्वभाव

आहे परंतु भगवान यात एकत्वाने असतो बंधन मुक्ती हे आपणच जाणता. (अ 838)

735 देवा, जग आणि माया या दोन्हीमध्ये आपणच विभागलेले असूनसुध्दा जगाला आपल्यापासून दूर कां ठेवता ? सम-विषय यांचे प्रतिपादन करणारा तूच आहेस तेव्हां पाप-पुण्य देखील तुझाच प्रसाद आहे. अनेक प्रकारची खोटे सोंगे घेऊन खऱ्याचा भास करतात. पति, पत्नी, सोयरा विश्वभर भावाने हरीच झाला आहे. सर्वरुप हरीच्या ठिकाणी चित्त समरस झाले आहे. अखंड आनंद प्राप्त झाला. जिवाची पापे नष्ट झाली. (अ 841)

736 'मी' त्याचे खरे स्वरुप काय ? आपल्या स्वरुप स्थितीहून ते भिन्न नाही. पण ते कळत नाही. अहंकाराने आत्मज्ञानाचा प्रकाश नाहीस केल्यामुळे विचारदृष्टी अंध झाली. अशावेळी हरीभक्ती केल्यामुळे हरी 'मी' चे खरे स्वरुप दाखवील. हरी हा स्वामी सेव्य आणि आपण सेवक संमजसपणे कळत नाही. तोपर्यत संसाराचे बंधन बंधनकारक राहणार. जीव जीवदशेत असताना एकाद्या विषयाचे नादाते आसक्ती वाढते. (अ 844)

737 भगवंताच्या भक्ति प्रेमावाचून केवळ अव्दैताचे विवरण करतो तो वक्ता आणि श्रोता दोघेही दु:खी होतात. 'मी ब्रम्ह आहे' असे खोट्या अभिमानाने आपल्या देहाचा देव्हारा मिरवितो. त्या भांडखोराबरोबर बोलू नये. नास्तीक वेदबाह्य बोलतो तो काळ्या तोंडाचा आहे. कोरड्या ब्रम्हज्ञानापेक्षा शुध्द प्रेमयुक्त हरीची भक्ति करणारा चांडाळ श्रेष्ठ आहे. ? (अ 919)

738 जो माणुस आशा इच्छेने बांधला आहे तो सर्व जगाचा दास समजावा आणि नैराश्य असेल तर तो सर्वास पूज्य असे मानावे. जो माणूस जाणतेपणाच्या गर्वात असतो त्याच्यामागे अनेक प्रकारच्या उपाधी लागतात आणि नेणतेपणाला कोणताही त्रास नसून सिध्द असतो. ज्याच्या ठिकाणी काम, क्रोध असते त्याला मोठे भय पाठीमागे लागते. प्रपंचवाईक लोकांनी आपल्या हिताचा विचार करावा ते लोक विषयाच्या आधीन झाले आहेत तर त्यांना विषयाची गोडी लागलेली आहे. त्यांना चौऱ्याऐंशी योनी भोगाव्या लागातात. (अ 943)

739 वेदाचे बीज हरिनामाचा जप करणारास श्रेष्ठ ब्राम्हण समजावा. सर्व वर्णधर्म एका ब्रम्हाच्या समान आहेत. कावळा पिंजऱ्यात ठेवल्यास शोभून दिसणार नाही. ज्ञानभक्तिसाठी संस्काराने उत्तम जातीचाच माणूस हवा. मी

हत्तीपेक्षा चांगला आहे असे गाढवाने म्हटल्यासारखे आहे. सत्ता, धन, विद्वत्तामुळे मोठे समजून संतास तुच्छ लेखितात पण हा मोठेपणा हा मुलामा दिलेल्या नाण्यासारखा आहे. (अ 1010)

740 जर तुम्ही परमार्थाचा माल भराल, तर तुमचे मागचे संचित कर्माचे, पुढचे क्रियमाण, कर्माचे भोगरुपी वाईट ऋण फिटून जाईल, मुक्त व्हाल. लोक विषयाची आवड असल्याने त्यासाठीच धडपड करतात परमार्थाच्या उपदेशाला किंमत देत नाहीत औषधाशिवाय रोग कसा बरा होणार ? पथ्य हे औषधाचा गुण येण्यास साहाय्य करणारे साधन आहे. (अ 1151)

741 भगवंता सर्व विषयेच्छा नष्ट करुन तुझी गोडी लाव. मी तू पणाचा भ्रम नाहिसा कर. तुझ्या चरणी मन आणि बुध्दी राहू दे. देह तुझ्या रुपांत ऐक्य होऊ दे. वाद केल्याने स्वहिताचे नुकसान होते. मूर्ख लोक विषयाच्या इच्छेने नागवले जातात सिध्दाला विषय सेवनापासून बाधा होत नाही. परंतु अधमाला विषय सेवनापासून निश्चित बाधा होते. स्वाती नक्षत्राचा पाऊस शिंपल्यावर पडल्यास मोती होतात, आणि सर्पाच्या तोंडात पडल्यास विष होते. जशा प्रकारचे काम तसे फळ प्राप्त होते. (अ 1156)

742 भगवंता एकाद्याचे डोक्यावर साखरेचे गोणीचे ओझे असते, परंतु साखरेचा उपभोग दुसरेच घेत असतात. त्याचे भोगहि तसेच राहतात. गाईच्या स्तनातील दूध जवळ असून गोपिंड रक्त पिते हे सर्व प्रारब्धाने होते. देह निर्वाणासाठी पुष्कळ कष्ट पडतात. मी तुला शरण आलो आहे देवा मला प्रपंचापासून तार. मन इंद्रियाकडे धांवत आहे. देवा तूच हे सावरुन मला भवसागरांतून तारा. (अ 1158)

743 संकल्प-विकल्पाचे मूळ जी अविद्या तिचा जो निवृत्ती करतो. तोच सोवळ्याचे रहस्य जाणतो. जे सोवळ्याचे दंभ करतात ते विटाळाने कोंडले गेले आहेत, असे जाणावे. बालपणा, तरुणपणा आणि म्हातारपणात ज्याची बुध्दी सावध असते तोच मनुष्य या देहात आत्मज्ञानाची संधी साधत असतो. जे संशयी असतात त्यानी देहाभिमान भोगात गुरफटलेली असतात. चित्ताला समाधानी ठेवून सर्वत्र परमात्म बुध्दी असणे हेच खरे अखंड ध्यान आहे. त्यासाठी चित्त, वित्त अर्पण करा. (अ 1159)

744 आपल्या कल्याणासाठी प्रयत्नपूर्वक आणि निष्ठापूर्वक चित्त शुध्द करा. जो पर्यत अंत:करणांत आत्मबोध दृढ झाला नाही. तोपर्यत ब्रम्हज्ञान सिध्द होत नाही. आत्मानुभवाशिवाय सर्व शब्द पांडित्य व्यर्थ आहे. 'मी च देव आहे' असे सर्वांना तु सांगतोस. आणि तुझे अंत:करण तर विषयसुखासाठी टोकत आहे. स्वत: उपाशी आणि इतरांना अमृताच्या गोष्टी सांगतोस. तुका म्हणे - हृदयातील तळमळ नाहीशी होइल तरच तू केवळ निरंतर ब्रम्ह आहेस. वाचाळपणाचा काय उपयोग ?(अ 1193)

745 विषयसुखाचा अनेक विपत्तीच्या घाण्यांत निष्कारण पडू नका, संताप्रमाणे अज्ञान नष्ट करा. संत मुक्त होतात. मग तुम्ही कां प्रयत्न करीत नाही. बध्द, दु:खी राहता ? आपले चंचल मन घात करत आहे यात दोष कुणाचा ? माझ्या अंत:करणात प्रपंच आहे आणि बाहेरुन भक्तिचे सोंग आहे. प्रारब्धच असेल. देवा तुम्ही कृपाळु आहांत त्यामुहे माझा अंगीकार करालच. (अ 1243)

746 देठापासून तुटलेले फळ परत जोडले जात नाही. उतावळीपणा नको. योग्य ते करण्यात कार्यसिध्दी आहे परमार्थात उतावाळपणा कामाचा नाही. आत्मस्थिती प्राप्त न होता धर्म भक्तिचा त्याग करणे योग्य नाही. साधकाने भक्ताने पुढील साधने हस्तगत झाल्यानंतर मागील साधने करु नये. कच्ची फळे तोडताच ते नाश पावतात पिक त्यावर ते पडते. एका मनाचे योगे कार्यसिध्दि होते. धर्माच्या भक्ति योगाने स्थिर झालेल्या मनाला हरि गुरु कृपेचे निमित्त मिळाले की आत्मसाक्षात्कार होतो. स्वैराचारी मन कच्या फळाप्रमाणे फुकट जाते. आपले मनच कार्य सिध्दिला कारण होते. (अ 1246)

747 आपले मन बळकट झाले कां ते पहावे. जे निर्विकारपणे सुखदु:ख सहन करते. जे लाभ व अनिष्ट लाभ सहन करते, क्रोधामुळे शांतता ढळत नाही ते मन पूर्ण परिपक्व आणि बळकट समजावे. प्रथम जीवदशेने मरावे आणि ब्रम्हरुपाने मरावे. बाळ वृत्ति रहावे देव त्याची आईप्रमाणे रक्षण करतो. भोग भोगताना तो कृष्णार्पण करावा नंतर आपण भोगावा. ह्या भोगाचा सर्व भोक्ता देव आहे. निश्चयाने जाणून आपण अलिप्त रहावे. म्हणजे या देहांतच देवाची प्राप्ती होते. जो देवास अर्पण न करता स्वत: भोगतो त्यास पाप लागते. (अ 1249)

748 देवा आपल्या मायावी रुपाने रामकृष्णादी अनेक रुपाची सोंगे घेतली. आमचे वास्तव स्वरुप म्हणजे तूच आहे. हे आम्ही जाणले नव्हते तोपर्यत

तुमच्या आमच्यात भेद होता. मी (आनंद - अव्दय परब्रम्ह) घरी असताना अज्ञानाने माझ्या ब्रम्हभावाची चोरी केली. त्यामुळे जन्म मरण प्राप्त झाले. हरिकृपेने निवृत्त होताच माझे जन्म मरण खंडीत झाले. माझे देवाचे ऐक्य झाले. देवभक्तपणाचे सुखासाठीच कल्पित व्देत केले आहे. भक्ति सुखासारखे दुसरे सुख त्रिभूवतांत नाही. दहीभातकाला ब्रम्हदिकांनाहि दुर्लभ आहे. संतसंगामुळे सर्व मोक्षपदे मिळतात. देवा आपला अभेद पणा कायम राहु दे. (अ 1302)

749 प्रत्येकास जगण्यासाठी एक शेर अन्नाची गरज आहे. अधिकाची हाव व्यर्थ आहे. प्रत्येकास साडेंतीन हात जागेची गरज आहे. मोठ्या मिळण्याचे श्रम का करता ? तुम्ही नरदेहात आलात तर आत्मकल्याणाचा माल घ्या. हरिनामाची त्वरा करा. लाभ घ्या. स्वरुपाची अभिलाषा धरा. पायाला मिठी मारा. दर्शनाचा लाभ होइल. तुका म्हणे मला हरीचे सुख लाभले त्याचा प्रवाह चित्तात सुरु झाला आहे. (अ 1340)

750 दोरी सर्पाप्रमाणे भासते. संशय आला तो आपणासच बाधक होतो. त्याची भीती वाटते. आपणच आपल्याला तारतो व आपणच आपल्याला मारीत असतो. आपणचा आपला उध्दार करीत असतो. पोपट भ्रमाने जसे नळीवर गुंतूल असतो (तो मुक्तच असतो) त्याप्रमाणे तू देहप्रपंचामध्ये भ्रमाने गुंतन पडलेला आहे, पाप-पुण्याचा विचार केला तर बाकी एक राहते. दहावरचे शुन्य पुसल्यावर एक राहते शून्य पोकळ नसते ते ज्ञानाने भरलेले असते निविशेष आत्मा अवाशीष्ट राहतो हे तू ज्ञानी असून तुला समजत नाही. विनाकारण संसार मृगाजळाच्या मागे लागतोस. (अ 1351)

751 निष्काम बुध्दीने दारुचे सेवन केले असता माणसाची शुध्द नष्ट होते. आत्मा तो आत्मा जड नाही. आत्म्याचे सत्-चित् आनंद धर्म आत्म्याचेच आहेत व कर्तत्व, भोक्तत्व, दु:ख आणि स्थूलतवादी धर्म आनात्म्याचे आहेत, ते आत्म्याचे नाही. आत्म्याचे व्यापकत्व, आत्म्याला व देहाचे परिच्छिन्नव्त देहाला द्या. ज्याप्रमाणे कावळा गंगेत स्नान करुन जनावरांची क्षते हुडकतो तसे दुर्जनास उपदेश केला तरी तो आपला स्वभाव सोडत नाही. (अ 1516)

752 दिखाऊपणाने कीर्ती होत नसते. देव स्वयंप्रकाशाने सर्वत्र भरला आहे. देव विविध स्वरुपात आहे परंतु आपल्याजवळील शुध्दभावाने तो एक होतो. मी आत्मरुपाने सर्वत्र व्यापून राहिली आहे. अशी माझी अवस्था कोण हिरावून

घेईल ? कावळ्याने हंसाच्या गतीने चालण्याचा आव आणला, तरी तो हंस होत नाही. दांभिक मठपतीने मठ टाकून द्या श्रेष्ठ पांडुरंगास शरण जा. बोरामध्ये जी अळी असते तिला आटोळीपुरतेच जग वाटते डबक्यातील बेडकास समुद्र कसा कळणार ? (अ 1692)

753 ज्याच्यासाठी चारी वेद उत्पन्न झाले आहेत. त्या भगवंताचे नाम तुम्ही कंठात धारण करा. याविना अन्य साधन करु नका. नामासारखे सुलभ परमार्थ साधन नाही. अठरा पुराणामध्ये नामाशिवाय दुसरी कोणतीच गोष्ट महत्वाची नाही. ज्याने गीता संगितली तो श्रीकृष्णच पंढरीत विटेवर उभा आहे. दुसऱ्याचे दोष पाहत गेल्याने देव दुरावतो. इतराच्या गुणदोषांकडे पाहण्यामुळे सभ्रंमीत होऊ नये यासाठी मनास फार संभाळावे. श्रेष्ठ, मध्यम व कनिष्ठ प्रकारचे जनांची प्रचारता आहे परंतु सर्व जनामध्ये एक जनार्दनच सत्य आहे. (अ 1697)

754 नारायणा तुझे नाम गाऊन मला काळपुरुष भेटला तर हा कमीपणा तुमचाच असे. अधिकार नसता ब्रम्हज्ञानाचा उपदेश केला तर परिणाम व्यर्थच आहे. जसे जमिनीत ओलावा नसता बी पेरणे मुर्खपणाचे आहे. जीव देखील भगवंताचेच स्वरुप आहे. विश्वात्मक देवाला लहान समजण्यामुळे देवाला कमीपणा येत नाही. तर आपणच आपले स्वरुप शून्य केल्यासारखे होइल. देव सच्चिदानंद व्यापक असूनहि त्यांचे ठिकाणी छोटेपणाची कल्पना करणे मुर्खपणाचे आहे. (अ 1715)

755 निर्भय अशा परमधामाला जावे हे चांगले रांडेसारखे जगण्याची अपेक्षा करु नेय. जीव भगवंताच चरणी अर्पण केला तर मोक्षाचे गाठोडे प्राप्त होईल. संताच्या संगतीत राहिल्यास ब्रम्हानुभव प्राप्त होणे महत्वाचे आहे. हरीनामाच्या जोरावर संसार जिंकू. सेवाधनाची महाशक्ति माझ्याकडे आहे. मन हरीच्या गुणानुवादान तृप्त होऊन मला साधनेत साहय करत आहे. (अ 1803)

756 देवा आम्हाला तुझ्यासारखे व्हावयाचे आहे म्हणून मी ही तुझ्यासारख आहे असे मी म्हणतो उंदीर सापळ्यांत आपले घर समजून राहतात. पण ते मरणाच्या दारांत असतात. संसारापासून मत परावृत्त झाले म्हणजे निर्मळ आत्मज्योती दिसून येते. पूर्वी भोगलेल्या दु:खाचे स्मरण मनात नसणे चांगले आत्मज्ञानाने जे कुळ शुध्द झाले आता तेथे पापाची घाण कशी राहणार (अ 1810)

757 आरशांतील प्रतिबिंब व मुख वेगळे जाणवतात परंतु दोन्ही एकरुपच असतात. तुझे निर्गुण रुप आणि लिंग शरीरातील वेगळे वाटतात. पण दोन्ही एकच आहेत. प्रतिबंब नाहीसा होतात. सर्वत्र तुझे सुख प्रतययास येते. ब्रम्ह-ज्ञान झाल्यावर आपल्या मनाला जेथे जावेसे वाटेल तेथे जावे. त्याला विधीचे बंधन राहत नाही. देवाने नामस्मरण करणाऱ्या भक्ताला सुखी समाधानी केले आहे. (अ 1878)

758 तीन देहाहून आत्मा हा अलिप्त असूनहि देह अहंकाराच्या योगाने जीवात्मा अलिप्त स्थितीत येत नाही. देहाचे अनेक धर्म आपल्या स्वरुपी मानून ओझ्याने तो निरर्थक कुंथन बसला आहे. देहाविषयी आत्मबुध्दीच्या भ्रमाने बंधन लावून मी बध्द झालो असे वाटते, देव या भ्रमातून माझी सुटका करा. संसारी लोक भुलले आहेत. विषयाच्या संगतीत मरण ओढावते. जो माणूस शास्त्र दृष्टीने पंगू आहे. ज्याला शास्त्ररुपी पाय नाहीत तो पापी आहे. विषयाची संगती, शास्त्राचे अज्ञान, मोक्षाविषयी अज्ञान आणि ज्ञानभिमान या सर्वाला जिवाचा मूर्खपणा आहे. (अ 1967)

759 वेद शहाणा असला तरी भगवंताचे वर्णन करण्यास हतबल आहे. मात्र गोपिका त्याचेबरोबर खेळत होत्या त्या अडाणी असून हरीचे सुख भोगत होत्या. भगवंत भिल्लीणीची उष्टी बोरे खातो. दहयातील लोणी मंथनाचे तंत्रज्ञान माहीत असणाराच काढू शकतो. आत्म्याचे सामान्य ज्ञान सर्वास आहे. अंत:करणाची शुध्दी झाल्यावराचून आत्म्याचे विशेष ज्ञान कसे होईल. (अ 2034)

780 तु या मनाच्या अधीन होऊ नकोस व ते मन सांगेल त्याचे काहीही ऐकू नकोस. मनाचे हट्ट मोडून टाक व त्याला विठोबाच्या भजनास लाव. मनाला ताब्यात ठेव नाहीत र ते जीवाला घातक आहे. तुका म्हणे - सूर्य सर्व प्रकारचे रस शोषून घेतो पण त्यांतील गुण दोषानी लिप्त होत नाही. तो कोणचीही फसवणूक न करता सर्वांना समान प्रकाश देतो हे खरे ब्रम्हज्ञान आहे. (अ 2113)

781 साधकाने देवावर भार घालावाआणि अयाचितवृत्तिने राहावे हे परमार्थाचे सार आहे. देह देवाच्या स्वाधीन करावा योग्य काळी त्याची योग्य कर्माकडे योजना करणे सार मानावे. तो योगक्षेम चालविल असा बळकट विश्वास असावा. स्वामीचे वचन पाळले असता सख्यपणाचा अनुभव येतो. जोपर्यत भगवंतावर प्रेम श्रध्दा नाही तोपर्यंत डोळे झाकून कशाला मंत्र जपतोस ?

‘रामकृष्ण’ हा उघडा मंत्र आहे. तो घेण्यासाठी काळ, वेळ, शुचिता या आवश्यकता नाही. हेच वेदाचे सार आहे. (अ 2232)

782 आहार आणि झोप यांच्याविषयी फार आसक्ति ठेवू नये अतिरेक नको. पध्दत सोडून बोलणे निरर्थक असते. त्यामुळे मन, शरीर यांना त्रास होतो. माणसाने आत्मसाक्षात्कार करुन घ्यावा आणि समाधान मिळवावे आणि ते मिळाले आहे की नाही हे ज्याचे त्यालाच कळते. वास्तविक सर्व भूमी ही पवित्रच आहे हे लक्षात ठेवा. परंतु मानवी वासना अमंगळ आहे. त्यामुळे हे सर्व प्राणिमात्र अंगाला कुठलाही घाव न लागता घाबरले आणि त्यानी देवपण सोडले. सर्व देव देवाचीच रुपे आहेत परंतु नुसता संशय निर्माण झाला. जीव देव यांतील खोटा भेद नष्ट झाला म्हणजे जीव हा शुध्द ब्रम्हरुप आहे. (अ 2271)

783 परमार्थाने प्रथम अहंकारासह विषयत्याग करणे आणि धर्मानुसार आलेल्या कर्माचे (धर्मकर्तव्याचे) अपेक्षारहित वृत्तीने पालन करणे मुख्य आहे. याकारणे मनाला समाधान होते. आणि हेच खरे देवाचे दान आहे. देहाविषयी निराभिमान वृत्ती असावी. सम-विषम भावाचा परित्याग करावा. प्रेम हे भक्तिचे मुख्य अंग आहे. जो ज्याच्यासाठी झुरतो त्याला त्याच्याविषयी प्रेम निर्माण होते. प्रेम निर्माण होण्यासाठी हरी चिंतन चांगले आहे. त्यातून शुध्द प्रेमाचा लाभ होतो. (अ 2407)

784 देह हा अनित्य असून त्याच्या मोहापासून चित्ताची सुटका करु दिली नाही. नातेवाईकांनी प्रपंचातून सुटका दलीनाही तर प्रपंचाचे ओझे वाढते देवा आम्हास मोक्ष नको. जे कोणी मूर्ख ब्रम्हज्ञानी असतील त्याना मोक्ष देऊन फसव. मोक्षाची भक्तिसुखाची तुलनाच करता येत नाही. प्रारब्धानुसार संसार होतो आपण हिंमत धरुन रहावे. भगवंताची कृपा झाल्यावर प्रपंचात दुर्दशा अशी कोणतीच होणार नाही भगवंत कृपेने सर्व काही चांगलेचघडते. मग हीनपणे का जगावे ? (अ 2412)

785 हे विश्व खोटे आहे ते खरे भासवून काळ हा सर्व प्राणिमात्रांना किती म्हणून पीडा करीत आहे हे विठ्ठला तू सत्य आहेस असे त्रिवार सांगतो असे असता हा खोटा जगदाभास का दाखवतोस ?देवा तुमच्या मायेस आवरुन धरा निर्गुण, निराकार स्वरुपास साकार हे नाम ठेवून खोटाच भ्रम तुम्ही का वाढविला

? देवा आता हे चेटूक आवरा विठ्ठल वैकुंठीचा मार्ग साधकाला दाखवितो तो मोठा वैभवसंपन्न भक्ताकरिता विटेवर उभा आहे. (अ 2490)

786 ज्या वेळी देहममतेने, अहंकारामुळे तुमच्यापासून वेगळा होतो त्यावेळी मी माझेपणाच्या भ्रमात होतो. देवा परमानंदाचा ठेवा तुमच्याजवळ होता. आता एकी झाली तो आमच्या स्वाधीन झाला. मोक्ष आपोआप हातात आला. मान, दंभ, अभिमान, सन्मान पुण्यामुळे मिळते पण दगा होऊन जाण्याची शक्यता असते लिंबाच्या झाडाला साखरेचे आळे केले तरीसुध्दा कडूच फळे येणार. दुर्जनाचे चित्त अमंगळ असते त्याला हितोपदेश पटत नाही. तो ओकून टाकतो. चंदनाचे शेजारी वेळूचे बन असले तरी त्याला सुगंध येत नाही. (अ 2538)

787 साधुमार्गाने चालले तर ज्ञानियांच्या सिध्दी त्याच्या पायाखाली पायऱ्या होतात. सायुज्य मुक्ति त्यांची सेवा करतात. संत हरीच्या प्रेमाने समाधी स्थितीत असतात. त्यांना कोणतेही भय, शंका नसते 'मला त्या हरीचे सुख आहे मग चिंता कशाची ? असे संत म्हणत असतात. देवा मी योगी, श्रुतीच्या अंकित राहणारा कर्मठही होणार नाही तर मी तुझा दास आहे. जी वाणी व्यवहारामध्ये मलिन होते ती नामस्मरणाने शुध्द करा. (अ 2596)

789 सर्वांच्या देहातील चर्म, मांस भिन्न भिन्न नाहीत सारखे आहेत. तर शुध्द, अशुध्द कसे निवडता येईल देवाचे ठिकाणी विषय भाव नसतो त्यामुहे सर्व भूतांच्या ठायी तो समानच आहे. ओहोळे, विहीर नाला, नदी असा नांवाचा भेद असला तरी त्यातील पाणी भिन्न आहे का ? गायी भिन्न वर्णाच्या असतात पण त्याचे दूध भिन्न रंगाचे नसते. काळांत संपलेल्या सर्व जीवानाही रामनाम सोडविते. (अ 2598)

790 लेकराने आपली माय जशी असेल तशी ती चांगलीच मानावी, इतर परक्या स्त्रियांना व्यवहारापुरताच मान द्यावा. आईच्या मनात जिव्हाळा ओलावा, प्रेम असते तसे परक्यामध्ये नसते. कर्म करण्याच्या कौशल्याला चुकलो म्हणून कर्म बंधनात सापडलो. तेच कर्म माझा नाश करुन अनेक गर्भवास घ्यावयास लावते. कर्मानेच माझे तुझे भेदभाव निर्माण करुन मोह निर्माण केला. संसाराचे भय मागे लागले आहे. (अ 2681)

791 तृप्त झाल्यावरही ज्या अन्नाची अभिरुची उरते अशा अन्नाचे प्रकार चांगले असतात तसे म्हरसाचे भोजन आहे जे मन पवित्र भाव तसे धरुन

आहे त्याचा नारायण आत्मत्वाने भोग घेत असतो. मुळच्या सुखाला सुखाचे विरजण घातले आणि मंथन करुन त्यातून नवीनत काढले. ते ज्ञानोत्तर भक्तिचे लोणी आले ते सेवन करताना ब्रम्हानंद होतो. (अ 2690)

792 सागराचे पाण्याची वाफ होऊन ढग बनतात, पाऊस पडतो. गंगेच्या रुपाने सागरासच मिळतात, असे सागर आपल्याशीच खेळतो. देवा तुमच्यांत माझ्यात असाच प्रकार आहे. अविद्येमुळे जीव, मायेमुळे जीव, ईश्वर अशी तुम्हा आम्हांस नांवे प्राप्त झाली, पण तुमच्या माझ्यांत एकच ब्रम्ह आहे. बीजापासून वृक्ष पत्र, पुष्प, फळ परत बीज निर्माण होते. एकच ब्रम्ह सत्य आहे. सर्व भेद मिथ्या आहेत. (अ 2692)

793 प्रत्यक्ष पुरावा पाहिजे. अनुभवानेच खऱ्या खोट्याचा निर्णय करता येतो. देवा माझी बुध्दी जिवाशिवाच्या ऐक्य संधीत ठेवा. एकच पदार्थ सतत सेवन केला तर त्याची रुची लागत नाही. शरीरास रोग नवे अलंकार पोषाख हवे असतात. नामसंकीर्तना शिवाय श्रवण भक्तीचा प्रकार आहे. प्रसंगानुसार आई आपल्या मुलावर रागावते आणि कृपा करते हे दोन्ही भाव मुलाचे हिताचेच असतात, बिंबाप्रमाणेच प्रतिबिंबामध्ये सौंदर्य असते. शुभशकुन झाला म्हणजे फलद्रुप होऊन अनुभवास येतो. तुझ्याशिवाय माझा जसा भाव असेल तशी आठव. तुझ्या मनी असेल. (अ 2754)

794 आम्ही स्वत:ला हरीचे दास म्हणवून घेतो. त्यामुळे आम्हाला कोणतेही दु:ख अथवा चिंता नाही. संसार आमचा दास झाला आहे. संसार असो अथवा परमार्थ जे करावे त्यांच तोटाच असतो, कारण ज्याचे त्याचे प्रारब्ध होय. भोग भोगावे लागतात. काळ चुकत नाही. आम्ही तुझ्याजवळ असता काळाची सत्ता का चालावी ? (अ 2759)

795 सर्वच आत्मा आहे असा अनुभवासी ताळमेळ बसला महणजे मग मुक्त झाल्याची खात्री पटते आणि सर्वत्र आत्मदृष्टी झाल्यावर कोणी कोणास विरोध करीत नाही. जे प्राप्त करुन घेतले आहे ते हस्तगत होते. आपापली निश्चिती होते. आनंद, दु:ख तेथे नाहीसे होते. या आत्मस्थितीत व्देताचे कारण जी अविद्या नष्ट झालयामुळे आपण एकटेच राहतो. अशा स्थितीत व्दैत दिसत असले तरीसुध्दा ते व्यवहार करण्याच्या प्रसंगापुरतेच असते. या उपाधीपासून दूर झालो

आहे. वेगळा झालो आहे म्हणून मला समाधानाची गोडी लागत आहे. देवा कृपा करा, माझा अहंकार घालवा. (अ 2815)

796 संकित कर्माचा जसा भोग असेल तसा तुम्ही द्यावा आम्ही जीवानी तो भोगावा असा नियम आहे. माझे चित्त स्थिर आणि शांत राहील अशी मजवर कृपा करा सम विषम भाव उत्पन्न होणार असा शांत स्थितीचा येग करा. मी सच्चिदानंद आहे. देवा एकदा त्या अहंकाराची मान मोडून टाका म्हणून तुमचे पाय धरले आहेत. (अ 2828)

797 चारी वेदाचे सार विश्वात ईश्वर भरून राहिला आहे. नारायणने विश्व व्यापले आहे. अशी सर्व पुराणे सांगतात, नारायण मूळचा निराकार होता. पण भक्ति सुखासाठीतो साकार झाला सगुण रुप धारण करण्याने त्याच्या मुळच्या एकद्रव्यास बांध आली नाही कारण त्याच्या वास्तविक स्वरुपात भेद निर्माण झाला नाही, शून्यही नाहिसे करणारे जे निर्माण स्वरुप आहे तेच विटेवर उभे दिसत आहे. सर्व ठिकाणचे पाणी एकच असते. सगुण-निर्गुण एक नारायण आहे. (अ 2879)

798 अहंकाराचा कांही संबंध राहिला नाही. त्यामुळे जीवदशा तुटली, भगवंताने हे मर्म मला दाखविले. त्यामुळे सकळ संसाराचा भ्रम नाहीसा झाला, जसे आपला कान आपल्या हाताने मुरगळला असता वेदना होत नाहीत त्याप्रमाणे सर्वत्र आत्मबुध्दी झाल्यावर सुख दु:खाची पीडा होत नाही. देहाच हाती अभिमानाचा घाव पडू नये कारण तो निर्दय स्वरुपाचा घाव आहे आणि नभ्र भावाचा नाश करणारा आहे. त्यामुळे सुख दु:ख मान-अपमान व्दंव्दाचे वैर करुन तो देहाभिमान आत्महत्या करवीत आहे माझा गळा आशेच्या मोहात गुंतला आहे. आता भगवंतच वाचवणार. (अ 2925)

799 वाण्याकडे गुळ आहे का ते पहावे त्याच्या जातीचे काय प्रयोजन आहे ? तुळस उकिरड्यावर वाढली म्हणून काय फेकून का द्यावयाची ? गाय घाणेरडे पदार्थ खाते म्हणून तिचे दूध का सेवन करु नये ? आपल्याला फणसाच्या सालीशी कर्तव्य काय ? त्यातील गर काढून घ्यावा. दुर्जन गोड बोलत असला तरी त्याची संगत दु:खदायक असते. कांही शब्दज्ञानी आपले ज्ञान पोटासाठी विकून चावटपणे बोलतात. कढी-भाताचे शब्द वर्णन पोट भरू शकत नाही. कागदावर

साखर नांव लिहून तो चाटला तर गोडी लागेल काय ? कोरडे ब्रम्हज्ञान काय कामाचे ? (अ 29870)

800 नामसाधनेने अनुताप न होता भय आणि पाप राहत नाही. तळमळ असल्याने विटाळ कशाचा आहे ? या चित्ताची चैतन्याशी गाठ पडल्याबरोबर सर्व सृष्टी हरिरुप दिसते. मी माझे हे दोन्ही हरीच झाला आहे. पंढरीनाथाचे सगुण रुप डोळ्यांत, अंत:करणात आपले असता मनासहीत शरीर पालटते व ते हरिरुप होते. ध्यानाने नामसाधनेत अंत:करण सर्व वृत्ती हरिरुप होतात. ज्ञानगंगेच्या एकाच स्नानाने संचित पाप-पुण्ये नष्ट झाली व क्रियमाण पुण्ये लागेनाशी झाली आहेत. पाप पुण्याला टाकून स्वर्ग सुखाची पायरी केली आम्ही घरीच वैकुंठ आणले. (अ 3135)

801 जो पर्यत शेंडी, जानवे आहे तो पर्यत तू कर्माचरणात गुंतला आहे श्रुतीची आज्ञा मानणे तूझे कर्तव्य आहे. वेदाज्ञा चुकल्यास नरकात जावे लागेल. तू चतूर ज्ञानी झालास तरी आचारसंहिता सोडू नकोस. मानवी मनाचा अहंकार देवच चालवितो म्हणून माणसाचे मीच एक कर्तृत्ववान आहे. मीच सर्व कांही करतो असे समजू नये झाडाचे पान त्याच्या हुकुमाने हालते. मग मीपणा कोठा राहिला ? विठोबा आंत बाहेर भरून गेला आहे. (अ 3038)

802 मायेने मोहित होऊन अनेक लोक पाप करुन नरकांत जातात. अशा लोकाच्या संगतीने नाना व्यसने, काम-क्रोध जडतात. संन्यासी होतात पण विषयवासना सोडत नाहीत. अन्नाची टिंगल करतात. स्वत:च्या सत्काराची वाट पाहतात. अनेक गोसावी जटा वाढवून लंगोटी घालतात. अंगाला राख लावतात व पक्वान्न मिळण्याची वाट पाहतात. याचा स्वधर्म नाही खोट्या वादात पडतात. (अ 3044)

803 मनात जे जे संकल्प उठत असतात, त्याना अनुसरुन शरीर इंद्रियाकडून जे कार्य घडते त्यापासून पाप किंवा पुण्य उत्पन्न होते. देणे-घेणे प्रपंचासाठी आहे. याचे मूळ कारण आपले मन आहे. ज्या रसांत मन मिळवावे ते त्या रसात (विषयात) मिळते. नाना खटाटोपाची हालचाल बंद राहील तर गती प्रापत होईल. पाणी कोणत्याही भांड्यात ठेवल्यास त्याला पाणीच म्हणतात त्याप्रमाणे काया वाचा मनाकडून कोणतेही व्यवहार घडले तरी मूळ कारण मनच आहे. (अ 3102)

804 सर्व लोक मायेने मारले आहेत पण अंगावर कोणतेही व्रण नाहीत. त्या घावाच्या दु:खाने माणसाचा केस न केस दु:खाने होरपळत आहे. मायेतून सुटता येत नाही. तिचा पत्ता लागत नाही. तिला पिऊन अंगाला राख फासली परंतु ती त्याला छळती आहे. माया भगवंताची आठवण होऊ देत नाही. कोरडे बोलण्यास किंमत नसते. झाड लावण्यापूर्वी फळे येत नाहीत. संतानी माझ्यातील दुर्बलता पाहिली मला पुन्हा पांडूरंगापुढे उभे केले व प्रसाद दिला. (अ 3131)

805 भगवंत कृपा करील कतर हे संसारिक ज्ञानच ब्रम्त होईल जर नाराणाने कृपा नाही केली तर ज्ञानाचा अभिमान निर्माण होईल. भगवंत करण्याचे मनात आणील हेच सामान्य डोळे सर्व जगत् ब्रम्हरुप पाहण्याइतके दिव्य होईल. देवानेच आपले रुप दाखविले तर जीवदशेचे अज्ञान नष्ट होईल. देवानेच आपले रुप दाखविले तर जीवदशेचे अज्ञान नष्ट होईल. त्यासाठी अनन्य भक्ति केली पाहिजे. (अ 3139)

806 प्रपंच करीन आणि परमार्थ करीन त्यास दोन्हीपैकी एकही साधणार नाही. दोन्ही पैलावर हात ठेवू गेल्यास तर शरीराला अपघातच होतात. प्रपंच हा प्रवृत्तीरुप व परमार्थ हा निवृत्ति रुप असल्यामुळे परस्पर भिन्न आहेत. प्रपंच राजस, तामस आहे तर परमार्थ सात्विक आहे. दोहोच्या मागे लागलेल्यास दोन्हीकडे धक्के बसतात. वैष्णवापुढे काळ चिलटाप्रमाणे आहे तर सामान्य माणसाची काय कथा ? आमची आई विठाई आहे तिला आम्हा लेकरांची चिंता आहे. आम्ही आनंदाचे लाडू खात आहोत. (अ 3145)

807 गवतापासून दुध मिळत नाही. पण जनावरानी गवत खाल्ले तर त्याच्यापासून दुध मिळते. हरी हा सर्व व्यापून आहे. हे वर्म एका जाणत्या माणसालाच कळते. कर्दळीस फळ शेवटी येते. पण फळ येईपर्यंत धीर धरला नाही तर सर्व व्यर्थ जाते. आरशाने प्रतिबिंब दाखवून बिंब सिध्द केले बिंब मळाच्या आड राहिले, शुध्द नाही असे रुप दिसते. तेव्हा पुण्य पाप उत्पन्न करण्याचा कर्माचा शीण वाढवू नका. देवा भय निर्माता तूच आणि भय नाशक तूच. दोन्ही ठिकाणी तूच खेळत आहे. जे धैर्य आमच्यात नाही ते तू आम्हास दे. (अ 3356)

808 भगवत (देव) कोठून आला व कोठे गेला हे सांगता येत नाही. कारण तो आपल्या पारमार्थिक चैतन्याने, स्वरुपाने सर्वत्र सहज व्यापजक आहे. तात्विक दृष्टया तो सर्व व्यापक आहे आणि अज्ञानी अभाविकांच्या दृष्टीने कोठेच

नाही. वस्तुत: तो नाही असे कोणतेही ठिकाण रिकामे नाही. संत महात्मे देवाचा अनुभव घेऊन देवस्वरुप झाले. तुका म्हणे आम्ही देवाचे नाम गात देवाबरोबर वैकुंइाहून येतो आणि त्याचे बरोबर जातो. सारांश प्रत्येक अवतारांत आम्ही त्याच्या बरोबर असतोच. (अ 3933)

809 मुसलमानी अभंग - तुका म्हणे. तू मुंडन केलेस ते चांगले केले एक अल्लाच सर्वाचा सखा आहे. त्याला सतत स्मरा, हांक मारा. या जगात जो साक्षी होऊन राहतो, तो जिंकतो, म्हणून हा संसारातील तमाशा तू साक्षी होऊन पाहा कारण, अनेक धूर्त, कपटी लोक फासे घेऊन वेषधारी बसले आहेत ते तुला फसवतील हे वेषधारी या मायेच्या बाजारांत आपल्याला तडाखे मारीत आहेत, हे उघड दिसत असताना तू कसा भुलला आहेस ? दमडी-चमडीसाठी माणूस भुलला आहे, तो पुढे लाथ खाईल. तू कोणाला बोलवू नकोस. बध्दपणाने तू धक्के खाशील. (अ 3985)

810 मुसलमानी अभंग - तू आपले रक्षण कर. मोहरुपी मदिरेने उन्मत्त होऊन तुला विसर पडला आहे. तू स्वत:ला सांभाळ माझ्या बोलला नाहीस तर तुझे हाल होतील. हा देह तुला पुन्हा प्राप्त होणार नाही. या मुद्दलाला तू विसरला आहे. जन्म-मरणाच्या चक्रांत गोते खाताना तुला लाज कशी वाटत नाही. हाती भोपळा घेऊन गोसावी झालास तरी तसे करणे योग्य नाही. संसारावर आसक्ती ठेवून मूर्खपणा करु नकोस. तारण्यातील शक्ति सामर्थ्याची गोष्ट सोडून दे, म्हणजे चित्त स्थिर होईल. (अ 3986/5)

811 वैद्यगोळी - या जगांत देणारा आणि देवविणारा अल्ला आहे. औषध व ते घेवविणारा अल्लाच आहे. अल्लाशिवाय दुसरे कोणीही नाही. अल्ला करील तेच होईल. जो मर्द आहे तो औषध घेईल व जो भित्रा आहे तो धीर धरणार नाही, हे औषध सेवन करुन आपले मन प्रसन्न करावे. सर्व रसाचे सार म्हणजे भगवंताच्या भजनाची गोळी आहे. सर्वाचा तो पालनकर्ता आहे या विश्वासाने ही गोळी घेऊन जा. संप्रधातुत्मक व पंचमहाभूतात्मक शरीरावर मार करणारी भजनगोळीने भवरोगावर उतार पडतो. जयानी माझी भजनगोळी घेतली त्याना आत्मपद प्राप्त होते. (अ 3987/6)

812 गंगेचे पाणी इतर पाण्यासारखे नाही. वड-पिंपळ वृक्ष इतर झााडाप्रमाणे नाहीत. शिवलिंगाला पाषाण समजू नये. संत हे जगांतील इतर

लोकाप्रमाणे नाहीत, रुद्राक्ष इतर माळेसारखे नाहीत हे सर्व श्रेष्ठ असून भगवंताच्या प्रतिमा आहेत. वेळूची काठी इतर काठ्याप्रमाणे नाही. सातू हे सामान्य अन्न नाही. राम राम हे शब्द इतर शब्दाप्रमाणे नाहींत. चंद्र, सूर्य इतर ताऱ्याप्रमाणे नाहीत. वासुकी इतर सापाप्रमाणे नाही. ब्रम्हदेव, लक्ष्मी गरुड, परीस इतराप्रमाणे सामान्य नाहीत. सगुण ईश्वराचे आहेत. जीव हा आपल्या इच्छेने सोयऱ्याप्रमाणे बोलवता येत नाही. कृष्ण हा भोगी नाही. शंकर जोगी नाही. (अ 4008)

813 शेजारतीचे अभंग - आज सोन्याचा दिवस उगवला असून तो धन्य आहे. कारण संत सज्जनांच्या समवेत परिपूर्ण असे ब्रम्हरसाचे भोजन झाले. रामकृष्ण नामच्या प्रेमाने जेवणांतील प्रत्येक पदार्थ रुचकर झाला होता. अभेदरुपी काला तर फारच रसाळ आणि गोड झाला आहे. आम्ही विनंती केल्यावर रुक्मिणी मातेने (ब्रम्हरसाचे) भोजन दिले. आता केवळ विठ्ठल विठ्ठल म्हणू. (अ 4018)

814 दशइंद्रियांचा दसरा शुभ दिवस अत्यंत चांगला मुहूर्त आहे. म्हणून या शुभमुहुर्तावर हरीचे स्वरुप हृदयांत धरुन त्याच्या नांवाचा जयजयकार करा. आळस करु नका. प्रकृतीच्या स्वाधीन झालेल्या जेवढ्या बाया आहांत त्या हातामध्ये आरत्या घेऊन या (दोन वेळा सांगतात) कारण हरी सीमा उलंघन करण्याकरिता निघाले आहेत त्यांचे श्रीमुख ओवाळू व पावलांचे मस्तकाने वंदन करु. आम्हाला घरच्या घरी दैव प्राप्त झाले आहे. साडे तीन मुर्हुतामध्ये दसरा सण अक्षय मुहूर्त आहे. या मुहूर्तावर कोणतेही कार्य केल्यास संकट न येता पूर्ण होते. (अ 4055)

815 दसरा मुहूर्त आहे मागचा पुढचा विचार न करता सर्व कामे सोडून हरिभजनाला लागा. आपल्या चित्तामध्ये धरा. श्रवण करा हयगय करु नका हे सुख स्वप्नात देखीत मिळणार नाही. हे सत्य आहे. भगवंताच्या मस्तकावर कळस ठेवला आहे. त्याची विष्णुसहस्त्र नामाने पुजा करा. नारायण आमच्याकडे आला आहे. कृपा केली समाधानाने पोट भरले असून कर्तव्य संपले आहे. (अ 4062)

816 भगवंता संत संगतीत सुख आहे. तुझ्या नाम संकीर्तनात अधिक अधिक सुख वाढत आहे. सर्व पाप कर्माचे दहन होऊन मी सर्व काळ प्रेमानंदात डुलत राहतो. देवा तूच माता पिता, बंधु सखा, चुलता आणि सर्व प्रकारचे गोत तूच आहेस. या योगाने आम्हास कांही चिंता राहिली नाही. माझी तुला सतत आठवण येते. आत-बाहेर जवळ तू मला धीर देऊन असतोस हे चांगले कळून आले आहे.

आता दु:ख नाही. भक्ती मुक्ती या आमच्या दासी आहेत. तुझा कीर्तनाचा नामाचा ब्रमहरस आम्ही सेवन करीत आहोत. (अ 4082)

817 देवा, तुझ्याजवळ येता येत नाही याची फार चिंता वाटते. कारण माझ्या देहावर काम, कर्म, अविद्या, त्रिगुण पंचमहाभूते या सर्वांची सत्ता आहे मला स्वत:चे सामर्थ्याने अभिमानाचा भार पडला आहे मला सर्व कळत असून अज्ञान, काम, क्रोध चोरांनी माझ्या आत्मस्वरुपाची चोरी करुन मला लुटले आहे. कृपाकरुन मला संताच्या स्वाधीन करा. उपेक्षा करु नको. प्राण जाण्याची वेळ आली आहे. हे कृपासागर, घांव घाला, आता सर्व उपाय म्हणजे तुझे चरण आहेत. (अ 4084)

818 देवा, मी माणूस म्हणून जन्माला आलो हे फार बरे झाले. लाभाची रास आहे. परमात्म्याच्या प्राप्तीची पात्रता येते. हात, पाय, डोळे व बोलण्यासाठी तोंड सर्व इंद्रिये देवा तू बहाल केलीस त्याचा योग्य उपयोग केल्याने हे नारायणा तुझी प्राप्ती होऊन जीवपणा व संसारव्यथा नाहीशी होते. या परमार्थामुळे वाणीला तुझ्या चिंतनाचा लाभ होतो. तुझ्या उपकाराची फेड कशाने करु ? विठाई माझा जीव तुझ्या चरणी अर्पण करीन. (अ 4086)

819 केशवा आजपर्यंत अनेक कर्माच्या योगाने चौऱ्याऐंशी लक्ष योनीत फिरलो. माझे अंत:करण गुण दोषाने भरले आहे. त्रिविध तापाने भोग भोगावे लागत आहे. परमार्थात जीवाला देहाची प्राप्ती होणे शक्य नाही कारण जीव हा ब्रम्हरुपाने व्यापक व सत्य आहे. देह हा फोलपटाप्रमाणे पोकळ आहे. पुत्र, बायको, बंधु, माय-बाप याचा समुदाय दैववशांत देहाला मिळतात. कालांतराने दूर जातात. तुका म्हणे देह मी आहे आणि स्त्री, पुत्र माझे आहेत या भ्रमाला कारण असलेले अज्ञान नष्ट करण्याची कृपा तू कर. (अ 4087)

820 हे भगवंता तुझे गुण असंख्य आहेत. माझी बुध्दी अल्प आहे. संसारातून आम्हास तारणारे तुम्ही आहांत तुझ्या भक्तीची लक्षणे कशी जाणावी. पण तुमच्या चिंतनात काळ घालवित आहे. देवा व्यर्थ गोष्टीत माझे मन घालवू नका, दुसरे वेड लावू नका. सर्वार्थाने मी आपला जीव तुम्हास अर्पण केलेला आहे. माझा भाव वेडावाकडा आहे. तुझ्या ठिकाणी कोणतेही गुण कमी नाहीत. तू चतूर, ज्ञानी सर्व जीवाचा जीव आहेस. माझी सत्य स्थिती चरणाजवळ आहे. खरे खोटे तू जाणतोस. (अ 4090)

821 हे भगवंता आजपर्यत मृत्यूच्या आहारी गेलो नाही आणि जगलो बरे झाले. माझे उर्वरित आयुष्य तुम्हाला समर्पण असो. मागील आयुष्य भूशाप्रमाणे गेले ते जावो पण आता जे राहिले आहे त्या आयुष्याच्या साधनाने मी सच्चिदानंदपद घेण्याचे कार्य पूर्ण करीन. नदीच्या पैलतीराला गेल्यावर बुडण्याची गोष्ट खोटी ठरते. शेवटचा गोड घास ही अन्नाची खरी गोडी असते. तुम्हाला हाक दिली माझे भय संपले. रात्र संपी. तुझ्यासारखा कैवारी असल्यावर काम, क्रोध पाप कसे राहील. देहाचे सुख दंभाला आग लागो. मी तुला शरण आलो आहे.(अ 4093)

822 कुरुक्षेत्र भूमीवर एक पक्षीण व्याली तेथेच गवतात तिने पिलासाठी घरटे केले अचानक कौरव पांडवाचे युध्द तेथे चालू झाले. हत्ती, घोडे, रथ धांवू लागले हे पाहून भीतीने त्या पक्षिणीने तुझा धांवा केला त्यावेळी तिच्या हाकेला श्रीहरी धावून आला. एक हरीच्या गळ्यातील मोठी घंटा तिच्या घरट्यावर संरक्षण कवच म्हणून घातली. अठरा दिवस भयानक युद्ध झाले. त्याचा त्रास पिलाना व तिला झाला नाही समाप्री नंतर नारायणने अर्जूनाला ते पर्श दाखविले तुका म्हणे तूला भयाचे प्रेम आहे. तू आमची माऊली आहे.(अ 207)

823 गर्वाने अज्ञानी होऊ नका. देव तुमच्याजवळच आहे. त्याच्या आर्स्तवाची शंका येऊ देऊ नका. तो भैलोक्याचा एका क्षमांत घोट घतो. तुमच्या उद्धाराची तुम्ही सोय करा. स्मीला आपला पती चोराला चंद्र ज्याप्रमाणे आवडतो. असा प्रेमभाव विठ्ठलाच्या पायी लागला तर गर्भवासाचे दु:ख नष्ट होते. दुष्काळातील पिडलेव्यास भोजन तहानलेल्या पाणी आवडते त्याप्रमाणे पांडूरंगाची आवड निर्माण झाली तर तो भवसागर पार करील. (अ 210)

824 मगरीच्या तोडांतील मणी काढता येईल, सशाच्या शिंगाची प्राप्री होईल वाकून तेल काढता येईल. अश्यक वाटणाऱ्या सर्व गोष्टी प्रयत्नपूर्वक साध्य होतील परंतु मूर्खाला अपदेश करणे अशक्य आहे. ब्रह्यानंदांनी एकस क्षणांत तुकांबाल मुर्ख केले. पुंडलीने स्थिर केलेले भत विटेवर समचरण ठेवून कमरेवर हात ठेवून नीट ऊभे आहे. (अ 277)

825 पतीच्या शृंगार क्रीडेचे सुख कोणास सांगता येत नाही. जरी कुमारीकेला सांगितले तरी तिला काय सुख वाटणार तसा आत्मबोधाविषयी आधी बोलू नये. तो शब्दाने सांगता येत नाही. सांगितले तरी ऐकणास काय आनंद वाटेल. संत सुखाचा भाग देणारे आहेत ते साधुरुपाने प्रत्यक्ष ब्रम्हानंद आहेत.

संसार सुखास भुलू नका. प्रत्येक घटका काळांत विलीन होते आहे. कलिकाळाने तोंडघशी पाडलेले आहे. तुका म्हणे - सर्वस्वाचा त्याग करुन तू जगदिशाला सर्व अर्पण कर. (क्षे.अ.286)

826 हे देवा, तू क्षीरसागरनिवासी, शेषनयनी, गोपिकारमणा, भक्तभूषण, गुनिधाना असा आहेस. तू अनेक अवतार धारण केलेस, भक्तांचे भय दूर करणाऱ्या सर्वव्यापी सर्वात असून सर्वाहून वेगळा, गजेंद्राचे रक्षण करणाऱ्या देवा तुझ्याशिवाय कोणी असूच शकत नाही. चित्तचालका, भक्तांचा कैवारी, दुष्टांचा संहारक भक्ताविषयी अभिमान बाळगणाऱ्या नारायणा सर्व जीवांच्या आधार पांडूरंगा तू माझ्यासारख्या पतिताला पावन कर.(क्षे.अ.342)

827 यम, धर्म, ब्रम्हादिक देव, तुझ्या ठिकाणी श्रध्दा ठेवतात. जेथे शंकर-पार्वती स्मरण करतात, तेथे माझ्या पामराचे काय, शेषशाई भगवंता, तुझा जयजयकार सहस्त्र मुखाने केला जातो. तेथे माझे काय चंद-सूर्य-तारांगणे भ्रमण करीत प्रदक्षिणा करतात. तुका म्हणे देवा तुझे स्वरुप त्याना कळत नाही तेथे माझ्यासारखे गरीबाचे काय ? (क्षे.अ. 346)

828 शरीराला म्हातारपण आले. शरीराला कापरे भरले दांत पडले, दाढा पडल्या, हनुवटी नाकास भिडली बोलता येईना. हात-पाय, कान केवळ राहिले. डोळ्यात पाणी आले. मान हलू लागली अंगकांती परतली. चिंध्याप्रमाणे दिसू लागली. जीभ जड झाली शब्द फुटेने तुका म्हणे आता तरी हरीसी भजा म्हातारपणी कोणी विचारत नाही. तो सोडवणूक करील. (क्षे.अ.395)

829 मनाचे स्वरुप आणि मन शास्त्रज्ञ, जाणकार कोणास सांपडले नाही. एक क्षण धीर धरवत नाही. त्यामुळे हा रामराया अंतरतो. हरीचे जे अंकीत आहेत त्याच्यावर तो कृपा करतो. तुका म्हणे - जोपर्यंत चित्त स्थिर नाही तोपर्यंत धुडवण्याच्या गोष्टीसारखे आहे. (क्षे.अ.396)

830 शरीर दु:खाचे कोठार, रोगाचे भांडार, अपवित्र, घाणेरडी वस्तु आहे. उलट शरीर सुखाचा घडा आहे. शरीराने केले ते साध्य होते आणि खुध्द परब्रम्हाचे दर्शन होते. शरीर विटाळाने भरलेले, माया, मोहपाशाचे जाळे आहे त्याचे अध:पतन होते, काळाने ग्रासले जाते. परंतु शरीर शुध्द आहे. शरीर निधीचा साठा आहे. भावबंध तुटतो, मध्यभागी भगवंत राहतो आहे. मानवी शरीर अविद्या, अवगुणानी भरले आहे. तुका म्हणे - शरीराला सुखाचा भोग देऊ नये त्याचा त्याग करु नये.

ते चांगले नाही आणि वाईटहि नाही एक हरिचिंतन, भजनाची सवय लावा. (अ 4113)

831 माझ्या मनाला कोरड्या ब्रम्हज्ञानाच्या गोष्टी आवडत नाही. तुका म्हणे - त्याप्रमाणे मला मोक्ष, सामुज्यमुक्ती याची वार्तासुध्दा नको केवळ तुझे सगुण दर्शनाची मला आवड आहे. चित्त प्रपंचात गुंतल्यामुळे ममतेने वेडे झाले आहे. पांडुरंगा अंगावरील संकटाचे तू निवारण कर आणि यातून सोडव. अभिलाषेच्या व्यापात गुंतल्याने तुझ्या नामरुपामध्ये आमची ताटातूट झाली आहे. (क्षे.अ.28)



# 9. सर्वासाठी उपदेश

832 विष्युभय मानने, भेद अभेद अभंगल, भ्रम आहे असे जो मानतो तोच वैष्णव व वैभव धर्म होय.स्वत:चे खरे हिन साधा कोणत्याही जिवाचा व्देध, मत्सर करू नका कारण सर्वव्यापक ईश्वराच्या पूजेचे वमर् आहे, जगातील कोणत्याही जीवाला दु:ख झाले असता तेच ईश्वरास प्राप्त होतात. विष्णमय व्हा, निर्मत्सर व्हावे. (अ 21)

833 तुका म्हणे - सर्व अवगुण, अहंकार, आशा, निंदा, कपट, देहाभिमान आणि मन शुध्द झाले की मानवी शरीर चिंतामणीसारखे मनोकामना

पूर्ण करणारे होते. मग तीर्थक्षेत्रे गंगाजळ, जो वैराग्य, भक्तिज्ञान या सर्वांनी सुशोभित असेल व ज्याने आपले सर्वस्व पांडुरंगास अर्पिले असेल स्त्री, पुत्राची अपेक्षा नसेल तो पुरुष परिसाहून श्रेष्ठ आहे अशा संत पुरुषाच्या भेटीमुळे सायुज्य मुक्ती मिळते. (अ 28)

834 तुका म्हणे - परस्त्री आईसारखी मानल्यास आर्थिक नुकसान काय ? दुसऱ्याची निंदा व त्याच्या पैशाची अपेक्षा नको. यामुळे कांही नुकसान होणार नाही. ऐके ठिकाणी बसून राम राम म्हणा कोणते श्रम होणार ? संत वचनावर विश्वास ठेवा, सत्य बोला व नीति धर्माने आचरण करा देवाची प्राप्ती होइल, इतर साधनाची जरुरी नाही. (अ 36)

835 शुध्द बीजापोटी चांगली फळे निपजतात. ज्याच्या मुखात मधूर अमृतवाणी आहे. ज्याचे जीवन ईश्वर सेवेत आहे. मन निर्मळ आहे अशा उत्तम पुरुषाच्या दर्शनाने विविध ताप जातात जीवाला विश्रांती मिळते. (अ 37)

836 जो कोणी पापी माणसाच्या पायकृत्याला प्रोत्साहन देतो त्याच्याशी जवळीक करतो तो त्याच्याइतकाच गुन्हेगार असतो दुष्टाचा पक्ष घेणाऱ्याच्या घरचे अन्न खाते. म्हणजे मद्‌यपान केल्याच्या देवाचे भागीदार झाल्याचे होय. (अ 136)

837 मन प्रसन्न करा तेच मोक्ष, बंधन, सुख, समाधान सर्व सिद्धीचे कारण आहे. मनानेच देवाची प्रतिमा स्थापन केली. मनानेच देवाची पूजा केली मनच सर्वाची माता आहे. मनच गुरू आणि शिष्य आहे व आपलेच दास्य आहे. तेच आपणास गती व अधोगत देते. त्यास नेहती प्रसन्न ठेवा. मनाशिवाय दुसरे दैवत नाही. (अ 152)

838 वैद्‌याच्या औषधामुळे जर रोगी बरा होत असेल तर देवाचा धांवा कां करतात ? देवाचे साहय्य न मागता प्रयत्न केले, तरी प्रारब्धांत नसेल तर यश मिळत नाही. उदार पांडुरंग सर्वाचाच विचार करतो. (अ 187)

839 विषयाकरितां परमार्थ आणि विषयाकरितां संसार या दोन्हीचे स्वरुप एकच आहे. पोरासाठी सोंग घेऊन, नाटकी लोक धनासाठी भोगासाठी परमार्थ करतात. दोघेहि नरकास पात्र आहेत. क्रोध निंदा करु नका यांनादूर ठेवून जपादी कर्मे करा आणि नैष्कर्‌म जे ब्रम्ह त्याची प्राप्ती करा. (अ 255)

840 मानवी जीवनांत निर्मळ व न विटणारे तसेच खरे तेच घ्यावे. ते असे घ्यावे की ज्याच्यामागे तोटा होणार नाही. तू आपलेच चित्त आपणासाठी

साक्षी ठेव दुसऱ्याच्या शिष्टाचाराची गरज नाही. ज्याच्यांत आपले अपार हित आहे तेच खरोखर सार आहे. (अ 166)

841 मापात धान्य मालक भरतो म्हणून श्रेष्ठ होते. एरव्ही ते रिकामे देवा माझ्याठायी असा अभिमान येऊ देऊ नकोस. जेथे राजाचा शिक्का चालतो. त्याचा शिक्का नसेल तर गरीबास कोणी विचारत नाही. ज्याच्या हाती सत्ता तोच थोर खोट्या अभिमानास अर्थ नाही. (अ 310)

842 पंचमहाभूताचा देह आत्म्यापासून वेगळा आहे. मन सारखे विषयाकडेच धांवते. जो मनाला विषयापासून परावृत्त करतो. तो शूर, समार्थ्यवान समजावा. विषयलालचेच मन तुला कोणत्या संकटात घालील हे तुला आज कळणार नाही. मनाने अनेक शहाणे लोकांना फसविले आहे. (अ 371)

843 इंद्रिये मन अंकित असलेला मनुष्य गाढव होय. कुत्र्याप्रमाणे पुन्हा पुन्हा पाप करणारा व ढोंगी आचरण करणारा अनेक दोष असणारा पापी मनुष्य असला तरी आम्ही आमच्या संगतीने त्याला शुध्द करु त्याची वाणी सत्य करु. (अ 392)

844 देहाभिमान ज्या अनुष्टानाने गळून जातो त्याला योग-तप म्हणतात. याकरिता आपणास जे करावयाचे आहे तेच करा. परंतु ते सत्य आणि हितकारक असावे. जन्म-मृत्यू चुकतील. देहाभिमानाचा भार जाईल. मानापमानाचे बंधन नसावे म्हणजे त्याचे दु:ख अथवा संतोष मानू नये. (अ 395)

845 जे सर्वशास्त्रांत प्रवीण आहेत परंतु ते विधिनिषेधामध्ये, वादामध्ये, मतवादी खंडण-मंडणात गुंतलेले आहेत. असार भुसाच्या उपणण्यांत काय मिळणार. मंथन करुन ज्यातील लोणी काढले आहे अशा ताकास पुन्हा घुसळून काय मिळणार ? कांही नाही. (अ 517)

846 पतंग दिव्यावर प्रेमाने झडप घालतो व मरतो. सासू केली म्हणून सून रडते हेही खरे प्रेम नव्हे. कपटी माणूस तोंडाने गोड बोलतो फसविण्यासाठी. बगळा नदीकाठी डोळे मिटून ध्यानस्थ बसतो सोंग करुन मासे खातो. त्याप्रमाणे रजोगुणी माणूस ढोंगर करीत कथा ऐकत असतो. (अ 590)

847 मना कोणाच्या मागे जावू नकोस दुस-याविषयी असणाऱ्या स्नेहामुळे आम्हास दु:ख होत आहे म्हणून जगांत निष्ठूर असण्यांतच हरीचे प्रेमसुख आहे. कोणी निंदा, स्तुती, दया करीत त्याच्या सुखदु:खाची इच्छा मी

करणार नाही. यासाठी योगी एकांतात जगतात व हे मना विचार करुन वज्राप्रमाणे कठोर हो. (अ 594)

848 ज्या कामाचे कौशलय माहीत नाही व ते काम करण्याची वेळ आली असता वाईट प्रारब्धामुळे फजिती होते. गाढवाला चंदनाची उटी लावली ते राखेत लोळून येणार मुळ गुण बदलत नाहीत. मुर्खाला हितकार उपदेश आवडत नाही. तो आपल्या मनाप्रमाणे वागतो. (अ 626)

849 पाप करणाऱ्यास आणि त्याला साह्य करणाऱ्यास दोघास नरकवास आहे. लोण्यांत विष घातले तर लोणी विषारी होते म्हणून दुर्जनांच्या मैत्रित्यागामध्ये होत असते. हरी कीर्तनांत वाईट बुध्दि नष्ट होते. आणि समाधि लागते. हरिकथा श्रवणारे भक्तास भक्तीची गोडी लागते. कीर्तनांत प्रतयक्ष पांडुरंग उभा असतो. तुका म्हणे ह्या सुखाची प्राप्ती ब्रम्हादिकाली दुर्मिळ आहे. (अ 649)

850 देवाने तुम्हाला नरजन्म देऊन सत्संग दिला आहे. माझे संचितात हरिभजन नाही म्हणू नका. लवकर उठून बिजाने बीज वाढवा. घडणारे क्रियामाण घडले ते संचित, उरलेले ते प्रारब्ध होय. चित्त असत्य चालीने चालते. आपण जो भोग भोगतो तो वाईट विषयाच्या भोगाचा परिणाम आहे. जिव्हा अनवार झाली त्याचा परिणाम अपचन होते हगवण लागते. (अ 381)

852 संतानी ज्याचा धिक्कार केला आहे त्याचे जगणे अमंगळ आहे. त्याचा त्याग करावा. जो मूळ राखतो त्याला फळाला काय कमी म्हणून मुळ रक्षण करणे. अशी लक्षणे चतूरपणाची आहेत. योग्य ठिकाणी प्रयत्न करावा. अंधारात दिव्याचा उपयोग करावा झाडाचे ओले मूळ खडक फोडते. त्याप्रमाणे अभ्यासाने कोणतेही कार्य पूर्णत्वास जाते. दोरीने सतत घासल्यास दगडही कापला जातो. रोजच्या सरावाने विषही पचते. (अ 848)

853 तुम्ही अमर आहात. हा जड देह माझा असे. असे म्हणू नका. सर्व जगच आपण आहोत. या अवस्थेत कोणापासून कसले भय ? तुका म्हणे मी आणि माझे खोटे छंद टाकून भेदशून्य सर्वापेक्षा निराळा झालो आहे. मी विवेकाची काठी घेऊन देहाच्या मागे लागतो आहे. माझ्या सुखदु:खाचा भोक्ता देव आहे. विवेकाने देहाला तादाम्य नाशरुपी मृत्यू आणून, आत्मरुपाने अमर होण्याचा अनुभव घेणे फार चांगले आहे. (अ 851)

854 हरीचे कीर्तन चांगले आहे त्यामुळे देह हरीरुप होतो. हरीच्याव्दारा सर्व जगाचा संबंधित होतो. जीवदशा नाहीशी होते. व्दैत जाते. मन विषयाच्या संकल्पाकडे धांव घेते त्यामुळे पापपुण्य उत्पन्न होते. तुमच्या नामाशिवाय बाकी सर्व व्यर्थ आहे. प्रारब्धा हाती सुखदु:ख असताना, लोक विनाकारण सुखासाठी संसाराचा खटाटोप करुन कष्टतात. गळाला लावलेल्या खाद्याच्या आशेने माशाला दु:ख होते. आशेचा त्याग करण्यासारखे सुख आहे. (अ 854)

855 आपण गरीब भिकारी होऊन जगाला धर्मसंकटात टाकणे व मला हे द्या ते द्या असे मागणे अभाग्य आहे. मनुष्य भिक्षा मागतो याचे खरे कारण त्याची देवावरची अश्रध्दा, अविश्वास होय ज्याने मला उत्पन्न केले तोच माझा योगक्षेम चालवील असा देवावर पूर्ण विश्वास असेल तो भिक्षा मागणार नाही. हरीचे चरण विश्वासाने धरावे हे परमार्थाचे सार आहे भक्ती शक्तीमुळे योगक्षेम चालतो. नेहमी समृध्दी राहते. (अ 859)

856 ज्ञानाने संचित क्रिया कर्माचा विचार सोडून शरीराला प्रारब्धाच्या आधीन करावे. शरीरास सुखदु:खे आली असता चित्तात त्याचा खेद होत नाही. आपण अपमान, अप्रतिष्ठा व देहाची विटंबना भोगावी. जो इच्छा करतो तो तसा होतो. संसार करेल तो संसारी होइल व दु:ख भोगील. देवाची इच्छा करील तर देवच होइल. विधिपूर्वक विषय सेवन करणे हे त्यागासारखेच आहे. हरीचे चिंतन करा लाभ होइल. (अ 876)

857 ज्याच्या अंत:करणात जीव ब्रम्हैक्याविषयी संदेह नाही तोच मुक्त आहे व ज्याला ब्रम्हाचे अज्ञान देहादिकाबरोबर तादाम्य व संसाराची चिंता आहे लाज आहे तो बध्द होय. ज्याने एकांताचे सेवन केले आहे त्यास शांती, सुख प्राप्त होते आणि संसाराचा परमार्थाचा लौकिक दंभ मिरविण्याला दु:ख प्राप्त होते. हे सुटण्यासाठी विचार करावा लागतो तो उपाय थोडाच आहे. परंतु विचारांचा उपाय न जाणणारे अविचारी आहेत त्याना बध्दतेची व दु:खाची लक्षणे फसवितात. (अ 908)

858 जो आपले स्वहित करीत नाही. दुसऱ्याच्या घाताची वाईट इच्छा मात्र करतो. ते त्याच्या प्रारब्धामुळेच घडले जाते. त्याची अधोगती होते. देवतरी त्याचे काय करणार ? ज्या गावाल जायचे असेल त्या गांवाच्या वाटेचा शोध करुन जावा. हिताचा मार्ग कोणता आहे हे वेद उपनिषिदाना आणि संताना विचारुन तो

अनुसरावा. भक्ताचे काम करताना देव मनामध्ये कसलीही शंका धरीत नाही आणि पाताळवासी बळीचे दारांत व्दारपाल होऊन राहिला आहे. अर्जुनाचा सारथी झाला, पुंडलिकासाठी विटेवर उभा आहे. ह्या देवाला दीनानाथ नांव शोभते. (अ 947)

859 श्रीकृष्णाची अर्जुनासाठी प्रतिज्ञा मोडली हातात शस्त्र घेऊन भीष्मावर चाल केली. देव कधीच फसवणुक करत नाही. मी भगवंतास माझ्या अंत:करणात धारण केले आहे. गोविंदास सहन न होणारी हरिजनाची, हरिभक्ताची निंदा टिंगल कोणी करु नये. भगवंत साकार होऊन भक्तांचे संरक्षण करतो. द्रोपदीस वस्त्रहरण होत असता संरक्षण केले. अश्वत्थाम्याने छापा घालून पांच पुत्र मारले म्हणून देवानी त्याच्या सर्वांगामध्ये दुर्गंधी ठेवली. (अ 1001)

860 जीवात्मा मूळचाच मुक्त असा ब्रहत होता. पण अविद्याबळाने पंचमहाभूतात्मक स्थूल देह मी आहे व देहासंबंधी माझे आहेत. अशा पूर्व भ्रमाने बध्द झाला. कर्माचा कर्ता मी, भोग्य वस्तुचा भोक्ता मी असे मानून पापपुण्याच्या कर्माच्या ठायी, विषयभोगाच्या ठायी मी बध्द होऊन राहिला. देहादी खोट्या प्रंपचाच्या मोहाने मूर्ख लोक भुलतात व परिश्रमी होतात. (अ 1011)

861 आपल्या योगक्षेमाचा भार भगवंतावर घालावा पोटासाठी परागंदा होऊ नका. देह प्रारब्धाच्या आधीन आहे. सुखासाठी जेवढा हव्यास कराल तितके अधिक दु:खवाढेल. धंदा, नोकरी व्यवसाय पैसा प्राप्तीचे निमित्त कारण असून सुख संचित आहे आणि तेच फळ देत असते. प्रपंचामध्ये काबाडकष्ट भरपूर करावे लागतात त्यामुळे त्याची हौस जिरुन जाते. (अ 1036)

862 अंत:करणांतील देवास किंवा गुरुजीस सांगावे. कारण कपटी वृत्ती परिणामी दु:खकारक असते. मनाला जिंकून आपला आपण धर्म नीतीने व्यवहार करावा आणि धर्म नीतीला धरुन आहे किंवा नाही याविषयी आपले मनच खरे साक्षी असते. कोणाशीही बोलताना विचार करुन बोलावे. अविचाराने बोलल्याने शब्द परत येत नाहीत. त्यामुळे लोकविरोधाचे दु:ख भोगावे लागते. (अ 1057)

863 स्वत:च्या अवगुणाची उपेक्षा करु नका कारण त्याच्यापासून होणारे दु:ख कोण भोगणार ? अर्थात ज्याचे त्यालाच भोगावे लागेल. आपणच आड वाटेने जावून पायात काटे मोडण्यात काय अर्थ आहे ? शहाणा मनुष्य, स्वत:च्या दु:खाचे दोष कोणावर ठेवीत नाही. स्वत:लाच दोष देतो. (अ 1086)

864 विषयाचा त्याग करुन ज्याला दु:ख आणि पश्चाताप नाही. त्यागाचा अभिमान नाही त्यालाच खरा त्याग घडत असतो. त्याग खरा किंवा खोटा देवच जाणतो. टाकलेल्या विषयाचे चिंतन होत असेल ती त्यागाची विटंबना होय. तो खरा नव्हे. आपल्या त्यागाचा आपणच विचार करावा. (अ 1092)

865 काम क्रोध विकारामुळे तू वाईट स्थितीला पोहचला आहे. आत्म प्राप्तीची साधने आहेत ते सावधपणे उपयोगी करा. मन, बुध्दी आणि देह जिज्ञासु साधक व तुला सारखेच आहे तर साधकाला फायदा व तुला तोटा कां ? श्रोते असोत अथवा नसो हरिकथेव्दारा देवाचा निरोप सांगताना मनांत भीती बाळगू नकोस. जो बाळगतो त्यास परलोकांत सुख प्राप्त होत नाही. (अ 1109)

866 जीवन व्यवहारात परमार्थात शौर्याला कर्तृत्वाला किंमत आहे. वायफळ बोलणे उपयोगी पडत नाही. जीव गेला तरी हरकत नाही पण केलेल्या प्रतिज्ञेचा त्याग करीत नाही तोच खरा धैर्यवान व शहाणा आहे. धैर्यवानाला भगवंत साहाय्य करतात. भक्ताचे रक्षण करतात. (अ 1110)

867 इंद्रियावर विश्वास ठेवू नका. केश पांढरे होतात देह कृश होतो. कान बहिरे होतात. दृष्टी अधू होते. इंद्रिये, देह सुखोप-भोग देतात. पण कोणाही भोग देणाऱ्याचेउपकार वाटत नाही. शेवटी भोग देणाऱ्याही सोडून जातात. दुर्दशा करतात अधिक सुखोपभोग न घेता आवश्यक तेवढेच भोग घ्या. प्रामुख्याने देहाने हरीची प्राप्त करा. (अ 1124)

868 प्रपंचात दु:ख असून मी त्याच्या नादी लागलो आहे. मी हेतूपर्वक दगडाच्या नावेत बसले आहे. इंद्रियास विषयाची ओढ आहे, हा मनाचा स्वभाव आहे. हरी माझी स्थिती आंधळ्यासारखी झाली आहे. मला वाट दाखव.. वेद शास्त्र संत यांचे शब्द मानतो, तो सज्जन आणि दुसऱ्यास निष्कारण पीडा देतो त्याला दुर्जन म्हणावे. जो सात्विक आहे तो मर्यादित आणि सत्य बोलतो. जो वाचाळ आहे तो खोटे बोलतो. परोपकार करतो तो चांगला. सद्‌गुणाने हित होते. दुर्गणाने अहित होते. (अ 1176)

869 ज्या भुंग्यास मोठ मोठी लाकडे पोखरण्याची पर्वा वाटत नाही तो नाजूक कमल पुष्पांत अडकतो कारण तेथे तो प्रेमाने बांधलेला असतो. प्रेमापुढे सामर्थ्य चालत नाही. निर्गुण परमात्मा देखील भक्ताच्या प्रेमाने व भयाने आकारास येतो. प्रेम देवावर सत्ता गाजवते व त्याला नांवरुपाला आणते. भाविक

भक्ताकडे सर्व ऋध्दिसिध्दी न बोलविता येतात पण भक्त तिकडे लक्ष देत नाही, तो भजनांत निमग्न असतो. (अ 1283)

870 धान्यातून खडे बाहेर काढले तरच दळण शुध्द चांगले होते न केल्यास जेवताना दातांस खडे लागतात याला कारण आळस होय, शेतात वाढलेले तण खुरपून काढून पिकाचे रक्षण करावे लागते. धर्मनीतीचा विचार न केल्यास आपले भले होणार नाही. दुर्जनाची मानखंडना सुखाने करावी पाप लागत नाही. वाटेवर पडलेला दगड बाजूस काढून वाट सोपी करावी. दुर्जना संबध्द अशुध्द मानावा. हाताची नखे आपण काढून टाकतो तसे त्याचा संबंध टाळावा. भगवंता संकटकाळी, शरीरव्याधी, दु:खे या वेळी तुझ्या चरणाची आठवण करु. (अ 1449)

871 आईशिवाय बाळास कोणाचा आधार आहे ? तू माझे भले न केल्यास मी भिक मागेन. सत्तादीश विठ्ठलाचे बाळ अन्नासाठी भीक आहे असा तुझा लौकिक होइल माझी तुमच्याकडे कोणतीच सेवा झालेली नाही. आता मला शिक्षा कर. रुग्णास भविष्य काळातील सुखासाठी कडूलिंबाचा रस देणे चांगले आहे. बाळाच्या कल्याणाचे गूढ आईच्या हातात असते. आई आपल्या बाळाचे कायेने, वाचेने मनाने रक्षाण करते ती कृपाळू उदार आहे. (अ 1457)

872 भूक लागलेल्या कोणत्याही प्राणिमात्रास पात्रतेचा विचार न करता अन्न द्यावे. वर्म ओळखून धर्म करावा. प्रसंगी ते ओळखणे जरुरी आहे. द्रव्य आणि अन्न दान करावयाचे असेल तर घेण्याराचे कुळकर्म पाहिले पाहिजे. विचारपूर्वक धर्म घडला तरच पुण्य पदरी पडते. आणि पुण्य पदरी असेल तरच स्वहिताची प्राप्ती होते. भगवंताला जीव अर्पण करणे यासच खरी देवपूजा म्हणतात. बिगारीच्या पूजेला बिगार म्हणतात. खरी की बिगाराची यासाठी आपल्या अंतकरणातील हरीच साक्ष आहे. बीजासारखे फळ, कारणासारखे कार्य असते. मिठाचे कार्य खारटच जशी पूजा तसे फळ असते. (अ 1484)

873 कांही लोक निरर्थक बडबड करतात त्याच्या बोलण्याला आग लागो. गुणाना किंमत असते. अवगुणांना नसते. धान्याला किंमत असते, भूशाला नाही. मुखातून अश्लील शब्द येऊ नये. मनांत वाईट संकल्प येऊ नये, बुध्दी वाईट निश्चय घेऊ नये असे भगवंताकडे मागावे काम. क्रोधावर दगड पाडण्याचा प्रयत्न करा. तुम्ही तुमचे मन विषयात आसक्त होऊ देऊ नका ही सुख प्रीतीची

खुण आहे. कारण इच्छेजवळ दु:खप्राप्तीचे वर्म आहे. इच्छेने माणसास श्रम होतात. इच्छा ते दु:ख, निरिच्छा तेथे सुख अशी व्याप्ती आहे. (अ 1494)

874 माझे परमार्थ भांडवल तुमची सेवा आहे. ते माझ्या हातात आहे. भूक माणसाला नाचविते. भूक शमविण्यासाइी खरे-खोटे धंदे करतात. फजीत होतात. हलक्या वृत्तीचे लोक अवगुणच वाढवितात दुर्‌जन म्हणजे नरकच होय. मंत्र सामर्थ्याने साप पकडता येतो पण दुर्जन माणसाची जात त्यापेक्षा निकृष्ट आहे. नीच माणसास कोणतीही उपाधी कमीच पडते. दुर्जनाचा त्याग करावा. कांद्यापेक्षा कांदा खाणाऱ्या माणसाच्या तोंडाची घाण येते. जयाच्या पंक्तिला बसाल तसा लाभ् मिळेल. (अ 1507)

875 देवाचे निर्माण केलेले अन्न त्याची सेवा केल्याखेरीज खाऊ नये. नोकरी न करिता धन घेऊ नये. विषयाची उन्मत्ता माणसाला धर्ममर्यादा सोडून आचरण करावयास लावते. स्वत:चा नाश करणे मुर्खाचे काम आहे. वेळूचे घर्षणाने अग्नि निर्माण होतो. जाळले जाते. दुसऱ्याच्या संगतीने आपला नाश होतो. मुर्ख स्वहिताचा नाश करतात. संगती टाळावी एकांतात राहावे कांही सांगावयाचे असल्यास आपल्या मनास सांगावे. (अ 1530)

876 देहाचे वरचे कातडे स्वच्छ करुन काय उपयोग ?अंत:करणातील घाण तशीच राहिली जाते आपण वाईट आणि लोकाशी भांडून काय उपयोग. हरि चिंतनाचे ढोंग करुन आनंद कसा मिळणार ? मौन धारण करुन मनाने इंद्रियाचे पाठीस लागतोस काय उपयोग. सर्व पोट भरण्यासाठी व्यवहार असे दंभ सोडून सारभूत विठ्ठलाचे नाव घे. (अ 1555)

877 ज्याच्या अंत:करणात भगवंताविषयी भाव नसेल तर त्याचा मोठेपणा व्यर्थ आहे. धनाला वारसा नाही म्हणून मुलाला दत्तक घेऊ नये. खडकावर, जेथे आलेपणा नाही तेथे बीज पेरु नये. पेरणारा फसतो. कस लावून शुध्द आहे का ते पहावे वरच्या रंगाला भुलू नये ज्यामुळे तोटा होणार नाही असे पाहावे रुप विषय आवडू नये व अन्नादि रसविषय आवडू नयेत. आपल्या सर्व इच्छा भगवंता चरणी अर्पण कराव्यात. हे नारायणा मला तुमच्यासारखे करुन टाका. तसे करण्यासाठी माझी वासना अविद्‌येसह नष्ट करा. मी संसारात असलो तरी संसारी नसावे. (अ 1575)

878 भगवंत सर्व प्राणीमात्राची योग क्षेमाची काळजी घेतात. बाळाकरिता दुधाची उत्पत्ती कोण करते ? परमार्थाची अक्षरे पाठ करणे आणि सांगणे, याप्रमाणे आचरण नसेल तर त्याचा काय उपयोग नाही. लोभी मनुष्य विपुल द्रव्य मिळवून मातीत पुरुन ठेवतो. मेल्यावर तीच माती त्याच्या तोंडात पडते श्रध्दा आणि प्रेमपूर्वक हरिकथा केल्याने तो स्वत: तरतो आणि इतरांचाहि उध्दार करतो त्याला नारायण भेटतो यांत संदेह नाही. (अ 1604)

879 सोने ताविल्याशिवाय त्यांतील हीनता जात नाही. मन शुध्द केल्याशिवाय मनुष्य देवरुप होत नाही. मन शुध्द होताच पूर्वीचे शत्रु मित्र वाटू लागतात. दैवानुसार येणारे सुखदु:ख भोगावेत. मनाला सोशिक करावे. आपले हृदय हर्ष, क्रोध याचा बाहेर परिणाम न दिसू देता, पोटांत जिरु द्यावा. टाकीचे धाव सोसलयाशिवाय दगडाला देवपण येत नाही. देवपण येताच लोक पाया पडतात. कुमार्गाने मिळविलेले धन अमंगळ आहे. त्याचे धन जाताच त्याचे अशुभ शब्द निघतात. साप आपले विष टाकण्याचा विचार करता नाही त्याप्रमाणे पापी माणसे पापकर्माचा आदर करतात. (अ 1642)

880 कठोर बोलणे शरीराला घायाळ करत नाही परंतु शस्त्राप्रमाणे अंत:करणाला भेदने हे सहन न होण्याचे कारण म्हणजे देहाला मी समजणे याकरिता अहंकाराचा त्याग केला पाहिजे. अहंकार पचविला तर नारायण हृदय मंदीरात वस्ती करील. आता माझ्या मनांत कपट नसावे. सत्याने वागणाऱ्याचे कधीही नुकसान होत नाही. कामांत सत्य असेल तर त्याचा आरंभ व शेवट नारायण गोड करतो. बुध्दीपुढे शक्ति तृणावत आहे भोजन घासाघासाने करावे. पचन चांगले होते. (अ 1681)

881 प्रपंचात कोठेही सुख नाही. संसार म्हणजे दु:खाचा बंदिखाना कोठेही सुख नाही. एकाच दह्यापासून ताक आणि लोणी निर्माण होते परंतु दोन्हीची समान किंमत नाही एकाच आकाशात चंद्र आणि तारांगणे असतात दोघाकडे एकाच दृष्टीने पाहू नये. पृथ्वीच्या पोटी हिरा आणि गारगोटी असते परंतु त्यांची किंमत सारखी करु नये. जगात संत आणि संसारी लोक एकत्र असताना त्यांना एकसारखे समान मानू नये. त्याची समानतेने सेवा करु नये. (अ 1730)

882 अंत:करण शुध्द झाल्यावरच भक्ति घडते. मन शुध्द आहे का नाही हे ज्याचे त्यालाच समजते. पाप-पुण्याचा निर्णय मात्र पुढे फळ मिळाल्यावर

कळून येते. कांही शहाणे आपल्याच गर्वात असतात. मिथ्या जगाचा अभिमान धरणाऱ्या लोकांच्या प्रारब्धात फळाच्या दृष्टीने अपयशच असते. कांही लोक घाण्याच्या बैलाप्रमाणे तीर्थयात्रा गंगाप्रदक्षिणा करतात परंतु हरिप्राप्ती साधण्याचे ज्ञान नसते. देह निर्वाणाची चिंता सर्वास असते. स्वत:साठी जगत असतात. पुन्हा पुन्हा जन्म  घेतात. (अ 1746)

883 अरे मना दु:खी संसाराची आठवण येऊ देऊ नको. राम नामाचा आवाज ऐकू दे, दुसऱ्याचा मत्सर मनात नसावा त्यामुळे लाभ न होता स्वत:चे व दुसऱ्याचे स्वास्थ्य जाते. अंगी शांती क्षमतेचे बळ असले म्हणजे मन शांत राहते. दोन समान वृत्ती, समान स्वभाव असल्याखेरीज एकमेकाबद्दल आदर वाटत नाही. निष्काम भक्तीने निर्मळ झालेल्या चित्ताला पुन: पुन्हा श्रवण मनन निदिध्यास करा. भ्रम संशयरहित होइल. (अ 1765)

884 जो दाता असतो जीवदान देतो. देणारे घेणारे आपणच झालो आहोत. एकाच्या पुढे शुन्य दिले तर दहा होतात परंतु एकाचा फाटा पुसून टाकला तर फक्त शून्य राहते. अहं बुध्दीचे ओझे संपले आहे. राजाने लाडक्या कुत्र्याला राजसिंहासनावर बसविले तर त्याची सुध्दा सत्ता चालते त्याप्रमाणे विश्वंभर करुणाकराने माझे रक्षण केले. (अ 1816)

885 चंदनाचा गुण लपत नाही. सुंगध तात्काळ वेधून घेतो. आपले रुप आरशांत पाहिल्यावर दुसऱ्याने कांही न सांगता त्याचे सर्व ज्ञान होते. मुखाने देवाचे नामस्मरण करण्यात उदार व्हावे, म्हणजे विश्वंभर संतुष्ट होइल आपला संकल्प सत्य असेल तर त्याची फळे बीजाप्रमाणे येतात. जे शुध्द असेल ते नाश पावत नाही. जोपर्यंत जिवंतपणा आहे तोपर्यंत जीव देवाच्या भक्तिमध्ये लावावा, नाहीतर जन्ममरणाच्या फेऱ्यांत सांपडतात. (अ1825)

886 संकल्प करण्यास नारायण हेच चांगले ऐकमेव ठिकाण आहे. चित्तात देव राहिल्याने इहलोकी व परलोकी फायदा होतो. मोळी विकल्यास सिंहासन मिळाले तरी मोळी विकण्याचा धंदा परत करावा वाटतो. एक हाव पूर्ण झाली तरी वैभवाचे रक्षण करण्याचे सोडत नाही. भक्ताने देवाचीच गरज ठेवावी, आपले चित्त निषिध्द कर्माकडे विभागू नये. दुष्टाची दृष्टी क्षुद्र गोष्टीकडे असते. दया करणे संताचे भांडवल आहे. (अ 1845)

887 आई-वडीलाच्या भेटीत लहान मुलांचा संकोच नाहिसा होतो. ज्ञानाने देहादी उपाधीविषयी उदासीन असतात, त्याचा देह ब्रम्हरुप असतो. त्याना पाप-पुण्य लागत नाही त्याच्या ठिकाणी वैराग्यरुपी अग्नीच्या ज्वाला असतात. जोपर्यत अंत:करणातील प्रपंचाविषयी चिंता गेली नाही, तोपर्यत जीवाला बध्दता आहे. माझे तुझे पणाचे ओझे कोणी वागवावे बरे ? भ्रांतपणे जगण्यात भगवंत दूर जातो, त्या जगण्यांत उपयोग काय ? (अ 1887)

888 कोटी रुपये आयुष्यभर मिळविले तरी अखेरीस लंगोटीदेखील बरोबर येत नाही. अखेरीस आपल्या सोबत भगवंताने यावे म्हणून त्याचे नांव कंठी धरा. त्याचे नामस्मरण करा. जे वृक्ष चंदनाजवळ उगवतात त्यास चंदनाचे गुण येतात. मन स्थिर करणे कठीण आहे त्याचा निग्रह करणे प्रपंचवाईकाना शक्य नाही. म्हणूनच नारायणास नामसंकीर्तनाव्दारा आळविणे सर्वात सोपे आहे. (अ 1894)

889 सर्वस्व अर्पण करुन भगवंत साध्य करुन घ्यावा त्यायोगे संचित प्रारब्ध क्रियामाण नष्ट होते. कर्मरुपी बीजाचे अंकुरच जळून जातात. जन्म-मरण चुकते. ज्याने जन्म दिला त्यालाच देह द्यावा. माझा मीपणा आगीत जळून जावो. जो आपल्या वाणीने बोलतो ते सर्व नारायणाला पोहचते. केवळ श्रध्दापूर्वक ‘गोविंदार्पणसतु’ असे म्हणावे वासरु ज्याचे जवळी असते, तेथेच गाई येऊन दुध देते. संगडीचा ताफा फोडून त्याचा जो आश्रय करील तो नक्कीच पाण्यांत बुडेल. दुराग्रही व्यक्ति पापांची मूर्ति असते. (अ 1919)

890 कल्पनेने अक्षरे जुळवून केलेले काव्य व वतृत्व होते पण ते भगवंतास मान्य नाही. त्यासाठी खऱ्या सिध्दांताचा अनुभव पाहिजे. तेच लोकांना आवडेल. ताब्यांच्या दागिन्यावर सोन्याचा मुलामा दिल्यास ते टिकत नाही. विस्तवाजवळ नेताच मुलामा विळून जातो. धांदरद, अव्यवस्थित माणसाच्या कामांत ताळमेळ नसते आणि मूर्ख माणसाला सदुपयोग कळत नाही. अशुध्द जातीस शुध्द व दुर्जनास सज्जन संगत करतां येत नाही. त्याचा धिक्कार करणे बरे. (अ 1935)

891 हीन बुध्दि माणसाला त्याची बुध्दिच त्याचा नाश करते. सुखाचे लालसेने प्रपंचात अडकलेला जीव माशाप्रमाणे तडफडतो. दु:खांत पडतो. श्रणिक सुखासाठी संसारांत न पडता परमार्थ विषयक बुध्दि कायम टिकवावी. तुमचा वेळ

चिंतनाशिवाय वाया घालवू देऊ नका. मन मेकळे राहिल्यास ते विषयकाडे जाईल व ते क्रिया नष्ट व स्वभाव दुष्ट बनेल. नारायण ज्याला ओळखेल तो आनंदी होतो नाहीतर दु:खी होतो. रत्नपारख्याना हिऱ्याची पारख असते. नाहीतर गाढवाच्या पाठीवरचे चंदन केवळ ओझेच असते. (अ 1957)

892 गाढव त्याच्या प्रवृत्तीमुळे उकिरडा पाहतांच लोळण घेते. तद्वत मूर्ख माणसासा घाणेरडे विषय आवडतात. मौल्यवान माणिक मोती आंधळा काय पारख करणार. मूर्ख माणसास परमार्थाचे महत्व कसे कळणार. हा प्रपंच फोल आहे आणि भगवंत हे खरे सार आहे. संसार मिथ्या भ्रामक आहे. सत्य अशा विठाबाचे नाम घ्या. हरिनामरुप ब्रम्हरसाने सर्व विषय निरस केले आहे. पुन:पुन्हा त्याचेच सेवन करा. (अ 1962)

893 प्रथम गुरु होऊन शिष्य करावा हे अधम आहे. सर्व प्राणीमात्रात नारायणच आहे हे खरे आहे लहानमोठा भेदभाव नाही. दोराचा बोध न झाल्याने साप भासतो त्यामुळे भय दोष निर्माण होतो. याकरिता दोरीचे ज्ञान संपादन करुन भय घालवावे. सर्व भूतांत नारायण या ज्ञानाने भ्रम भेदभाव नष्ट करावा. गुणदोषात सापडू नये. (अ 2024)

894 वाघाने कोल्हयास उपदेश केला तू कधीतरी मरणार आहे. मी भूकेने व्याकूळ होऊन मरत आहे मला तुला खाऊ दे. कोल्हा म्हणाला तुझे खरे आहे. देह जाणारच आहे तर मग माझ्या देहाची हिंसा करुन जगण्यापेक्षा मला जीवनदान दिल्यास परोपकाराचे पुण्य लाभेल. तूच समजून घे. एका ठकास महाठक भेटला, परस्पर स्वार्थी उपदेश करतात. सर्व प्राणीमात्रांना अन्न द्यावे पण द्रव्य देताना पात्रता पहावी. बीज उगवेल तेथेच पेरावे जे करावयाचे ते विचारपूर्व करावे. (अ 2228)

895 साखरेची पोती बैल पाठीवरुन वाहतात. बैलाना साखर मिळत नाही त्याला कडबाच खावा लागतो. लोक प्रपंचाचे ओझे अंगावर घेऊन धनाचा हव्यास वाढवितात. पण शेवटी त्यांचे आप्त त्याना यमाच्या स्वाधीन करतात. जयाचा लाभ असतो तोच त्याची गोडी जाणतो. कवेळ भारवाह-काला, गरीबाला व्यर्थ शीण होतो. माणसाची अहंता गळाळी पाहिजे. ग्रंथाचे पाठांतर झाले पण अंत:करण शुध्द नाही तोपर्यंत ते व्यर्थ होय. पांडुरंग पाहिजे तर त्याचे ठिकाणी भाव धरा. (अ 2247)

896 ज्याने संसाराला जिंकले त्याला खरा शूर म्हणावे अहंकार ज्याच्यावर स्वार होणे असला बापडी घोडी आहेत. ज्या दानाने समाजात कीर्ती वाढते तोच खरा उत्तम दानधर्म आहे. जाण्याची वेळ येताच सर्व वैभव एका क्षणांत जाईल, ते येथेच राहील देह तरी निघून जाईल, स्त्री, मुले नातेवाइक हे कष्टाने मिळविलेल्या तुझा धनाचा चकाचूर करतात. तुझे आयुष्य संपत आले आहे. अजून तरी जागा हो नाहीतर दगा होईल. (अ 2264)

897 सहा प्रकारचा काळ आहे. यांत नक्षत्रे क्रमाने येतात. त्यांत बदल केल्याने लोकांना तोटा सहन करावा लागतो. नक्षत्रे आपल्या वेळेनुसार काम करतात. विश्वकर्त्याने प्रत्येक गोष्ट नियमित केली आहे. काळानुसार उपयोगी असे बोला. पाया खोल खणा म्हणजे भिंत खचत नाही. बोलण्याच्या आरंभी मध्ये आणि अखेरीस देवच प्रतिपाद्य आहे ते बोलणे अबाधित असते. (अ 2649)

898 धनदांडग्या जाती संपत्तीमस्तवाल असतात. ह्यांसाठी त्यांच्यापासून शहाण्या, सूज्ञ व्यक्तींनी फार दूर असावे हे बरे. विष हे अंर्तबाह्य विषय असते. त्याच्या कोणत्याही अंगात गोडपणा नसतो. सापाला जर मृदूपणाने कुरवाळले तरी ते त्याला कळत नाही. म्हणून त्यापासून दूर असावे. तसे नीच माणसापासून दूर असावे. (अ 2777)

899 योग्य वेळ साधण्याकरितां माणसाने प्रसंगी आपल्या बुध्दिचे बळ खर्च केले पाहिजे. केव्हां लाभ होईल. केव्हां नुकसान होईल याचा भरवसा नाही. लाभ होणाऱ्या गोष्टीचेच नियोजन करावे. योग्य वेळी, योग्य नियोजन योग्य प्रयत्नाने लाभ होतो, जसे हुशार शेतकरी करतो. योग्य वेळी नांगरणे, पाणी घालणे, पाऊस पडलयानंतर तिफणीने पेरणी करतो. तण काढून पिकाचे रक्षण करतो. भरपूर धान्य निर्माण करतो. (अ 2811)

900 संकल्प पुण्याचे असले तरी पाप होतात. भीती निर्माण होते. मनाला चैन पडत नाही. तुका म्हणे जे जे होईल ते ते पहात बसावे आणि स्वस्थ चित्ती असावे. जमिनीत बियाची पेरणी करुन त्यावर जलसिंचन करुन रक्षण केल्यास फळ आल्याशिवाय राहणार नाही. प्रयत्न न करता फळाची अपेक्षा करणे वेडेपणाचे आहे. देहाचे ठिकाणी राजस, तामस, सात्विक स्वभावानुसार कर्म करावे फळ येत असते. अविचारी लोकांनी आत्म्याला परिछिन्न समजून जीवदशेचे रक्षण केले. धन मिळवून ते जमिनीत पुरुन ठेवले. मर्यादीत उत्पन्नावर गुजराण केली

रंडकी, विधवे समान उपजिविका केली. हे लोक आत्मसुखाच्या अधिष्ठानावर दु:ख भोगतात. विधिलिखीत गोष्टी वेळेवर होतात. त्याबद्दल आग्रह धरु नये. (अ 2839)

901 शुध्द चित्ताला हित कळते, तसेच योग्य काय आहे, तेही कळते. सोंग संपादणीला परिहार द्यावा लागतो. शुध्द आचरणाने खरे फळ प्राप्त होते. बाहेरुन चांगले आणि आंतून हिणकस सोने कसाला उतरत नाही. खरे पुण्य करुन चित्त शुध्द ठेवले तरच त्याचे हित होते. देवाने हरिभजन करण्यासाठी सुदृढ देह दिला आहे. आपण प्रपंचात बटकत फिरणारा करतो. अहंकाराने मान ताठ करुन चालतो. साधु संतापुढे नम्र होत नाही. हरीचा दास म्हणून घेण्यास कमीपणा वाटतो. अशा दुष्ट लोकांचे ऐकू नका. (अ 2844)

902 माग-पुढे, आत-बाहेर एक भगवंत भरलेला आहे. अंत:करणातील सर्व विकाराचा झाडा केल्याने आणखी कांही उरले नाही. वाद करण्यासाठी जो उभा राहतो, तो फंद फितुरीत सांपडतो. महापुरे झाडी जाती तेथे लव्हाळे वांचती (नम्रतेमुळे) बलवानाला स्पर्धक भेटण्याची शक्यता असते. तो त्याला दु:ख देऊ शकतो. नम्र माणसाला बलवान काही करु शकत नाही. जो सर्वासी एकरुप होतो त्याला सर्व लोक जवळचे होतात. (अ 2921)

903 गाढव त्याचे ओरडणे कधी थांबावयाचे नाही. त्याला सुशोभित केले तरी घोडा होणार नाही. कारण स्वभावाला औषध नसते. कुत्र्याला पालखीत बसविले तर ते न भुंकता शांत कधी बसणार नाही. तुका म्हणे पशू असो वा मनुष्य असो प्रत्येकाचा जन्मजात स्वभाव, कर्म आणि जातीरुप धर्म असतात ते कधीही जात नाही. (अ 3063)

904 ज्या साधकाच्या हाती क्षमारुपी हत्यार आहे. त्याला सामर्थ्यवान कोणताही दुष्ट काय करणार आहे ? गवत नाही अशा ठिकाणी दावाग्री पडला. तो शांत होईल. क्षमा सर्व सुखाचे साधन आहे. हरिकथेत बसून जो तंबाखू खातो त्या गोहत्येचे पाप लागते. तंबाखू ओढून धूर काढतो त्याचे घर बुडेल. कीर्तनांत जो कोणी बडबड करेल तो बेडूक होईल, इतर कामे करीत असताना त्याबरोबर 'राम राम' म्हणण्याचे एक काम करा. संसाराचा श्रम निघून जाईल आणि सुखप्राप्ती होईल. तरुन जाल. (अ 3088)

905 दुसऱ्याचा घात झाला असता आपल्याला जर आनंद वाटला तर आपल्या अंगी दु:ख आणि पापाचा दोष लागतो. म्हणून दुसऱ्याचा घात व्हावा ही

कल्पना स्वप्नादेखील आणू नये आणि पापाची वृध्दी करु नये. ते पाप आपले समाधान संपविते. चित्तात पाप घडल्याची टोचणी सतत असेल तर ती व्यथा आपल्या मनाच्या अंगी कायमची पिडते व सुख समाधान नष्ट करते. एकाद्यावर रागवल्याने केलेल्या पुण्याचा क्षय होतो याकरिता कोणी कितीही नुकसान केले तरी त्यावर रागावू नये. प्रारब्धाप्रमाणे सर्व घडते. (अ 3149)

906 ज्यांना इंद्रियाना ताब्यात ठेवता येत नाही किंवा नियम लावता येत नाही त्यांनी पोकळ राम राम म्हणण्यांत काय साधरणार ? भोजन करताना अन्नाबरोबर माशी पोटात गेली तर ते जेवण दु:ख़दायक असते. कीर्तन करावे परंतु त्याप्रमाणे आचरण करावे. माझ्या इच्छेप्रमाणे मला प्रसाद मिळाला आहे. मी समाधानी आहे. माझा मायबाप विटेवर पंढरपूरात उभा आहे तो मोठ्या काळजीने भक्ताचा सांभाळ करतो. जसा ज्याचा भाव असेल तो नाना रुपे धारण करुन त्यांचा सांभाळ करतो. (अ 3183)

907 भवसागर असा अवघड आहे तो कसा पार करावा हे समजत नाही. या मायारुपी सागरांत काम-क्रोधदि मोठे हिंसक आहेत. मायेचे अहंकाराचे भोवरे आहेत. वासनेच्या जोरदार लाटा आहेत. उव्देगरुपी हेलकावे बसतात यास सुलभ युक्ति म्हणजे हरीनामाचे नौकेत असावे आणि तरुन जावे. लबाडाचे जेवण जेवल्याखेरीज खरे नसते. त्याची वागणूक खरी नसते त्यामुळे त्याचा भरवसा धरता येत नाही. तुका म्हणे चार्वाक तत्वज्ञान व्यर्थ आहे. त्याचे मते लज्जास्पद आणि हास्यापद आहेत. दसऱ्याला आपट्याची पाने सोन म्हणून देतात त्याला गहाण कोण ठेवणार ?(अ 3205)

908 सासू पंढरीस निघाली पण वेशीपासून परत आली सूनबाईस म्हणाली दुध-दही खर्च करु नकोस. फुटके पाळे जपून ठेव. माझे मन उखळ, जाते, मुसळ यांत अडकले आहे. तू कमी जेव, खर्च जास्त करु नकोस, पोराबाळांत माझे पंढरपूर आहे. मायेत जग अडकले आहे. देव सगुण आहे असे वैखरीत बोलावे तो नुसता सगुण साकार नाही असा निर्गुणाचा स्वत: अनुभव घ्यावा. देहाची देहावर आवड असते तिचा अंत:करणात अनुभव मिळतो. (अ 3208)

909 भक्त सम्राट पुंडलिकाने वैकुंठीच्या देवाला पृथ्वीवर आणून, तो सर्वात धन्य ठरला आहे त्या आई वडीलाची सेवा केली तया पुण्याईने त्याला हे निधान सांपडले अनादि परब्रम्ह ज्याच्या संगतीत राहिले. कसतुरी मृगाच्या अगांत

कस्तुरीचा सुगंध असतो. मृगाला त्याची किंमत नसते. भाग्यवान पैसे देऊन खरेदी करतात त्याचे ओझे वाहणारे तसेच मरतात. भ्रमराला सुगंधाचा चारा मिळतो. आंधळ्याच्या हाती मोती व्यर्थ जातात. (अ 3246)

910 काया, वाचा, मनाने अर्थाने परोपकार करणे हे पुण्य-कर्म आणि दुसऱ्याला दुःख देणे पाप आहे याशिवाय दुसरे पाप पुण्य नाही. सत्याने वागणे हाच धर्म आहे आणि असत्य कर्म करणे हे पाप आहे. धर्म आहे याखेरीज दुसरे वर्म नाही मुखात भगवंताचे नाम असणे हीच श्रेष्ठ गती आहे. नामाला विसरल्याने भ्रम निर्माण होतो संताचा सहवास म्हणजे स्वर्गवास आणि त्याविषयी उदास असणे हा नरकवास आहे. तुका महणे - मी हित, अहिताचे सांगितले योग्य वाटेल ते आपण घ्यावे. (अ 3313)

911 शिवाजी महाराजासाठी-तुम्ही पाठविलेले दिवट्या, छत्री, घोडे, वैभव चांगले आहे. तरी मी त्या मोहात पडत नाहीय. पांडुरंगा मला या वैभवात मला कां गुंतवता ? मान, दंभ प्रतिष्ठा ही मला डुकराच्या विष्ठेप्रमाणे भासत आहेत. माझ्या चित्ताला जे आवडत नाही तेच देवा मला कां पुरवता ? का माझे मागे लागलात ? आंता एकांतात राहावे वाटते. लोक, धन, शरीर सर्व ओकारीप्रमाणे वीट आणणारी वाटतात. (अ 3388)

912 शिवाजी महाराजास - तुका म्हणे हे शिवराया तुम्ही आम्हाला असा कोणता ठेवा दिला आहे. कारण आम्हाला याची गरज नाही. आम्हाला विठ्ठलच पाहिजे आहे. तुम्ही उदार आहात तुमचे उदारपण चांगले दिसून आले. आम्हाला तुमचे धन गोमांसासारखे त्याज्य आहे. तुम्ही तोंडाने केवळ विठ्ठल म्हणा म्हणजे आम्ही सुखी होऊ. तुमचे इतर धन संपत्ती सर्व मला मातीसारखे आहे. गळ्यांत तुळशीमाळा मिरवा आणि एकादशी व्रत करा. (अ 3395)

913 मी पांडुरंगा नमस्कार करतो. मी पांडुरंगाचीसेवा करतो. गुण-अवगुणाचा विचार केला पाहिजे. म्हैस ती म्हैस असते. रेडा तो रेडा असतो. जनांत जर्नादन आहे याचा मला अनुभव आला आहे. त्याच्यापुढे मी नतमस्तक झालो आहे. व्यवहार दृष्टया चांगले कोण ? वाईट कोण ? निवाडा मी करीत असतो. दळण दळताना धडधड आवाज करणारे खडे लागले तर ते बाजूला काढले पाहिजे. (3460)

914 पांडुरंगास पत्र - हे देवाधिदेवा केवळ नाम:स्मरण करणाऱ्या पातकाच्या राशी नाहीशा करतोस त्याची तुमचे विविध महापातके जाळून टाकतोस. सर्व सुखी ऋध्दिसिध्दी, मुक्ती तुझ्या पायी आहेत. जे पद इंद्रालाही दुर्लभ आहे. ते तुझे नामगीत गायिले असता आम्हाला सहज प्राप्त होते. पांडुरंगा, योगयाग करण्याची शक्ती नसलेल्या जड जीवाच्रा उध्दाराचे तू जीवन आहेस (अ 3535)

915 विरह - पांडुरंगाचे पत्राचे उत्तर न आल्याने तुका म्हणे माझे पत्र आपणास मिळाले नसेल आपणाकडे भक्तजनांची खूपच गर्दी असेल. त्यामध्ये माझे कोण मनावर घेतो. परंतु माझा मायबाप कृपेचा सागर आहे. तो दुरावा करणार नाही. त्याला पुष्कळ कान आणि डोळे आहेत. तो त्रैलोक्यास व्यापून आहे. न सांगताही तो सर्वांच्या मनातील जाणतो आणि ज्याची जी इच्छा असेल ती तो पूर्ण करतो. माझा त्याच्याविषयी विश्वास आहे. तो जे वचन देतो तो पाळतो त्याचे बोलणे व्यर्थ जात नाही. माझे प्रारब्ध कसे आहे ते कळत नाही. (अ 3567)

916 धर्मनीती (1) गृहस्थाश्रमामध्ये ज्यांच्या पत्नी आज्ञेत आहेत त्याच्या हातून धर्म घडतो. तो कोणाला लाजत नाही. भीत नाही. त्याच्या हातून कर्म घडते. परोपकार हेच पुण्य आणि परपीडा, परनिंदा हे पाप आहे असे समजा. जो नित्य हरीचे नाम घेतो त्याला परमार्थाचा लाभ होतो. स्त्री-पुत्रादी गुंतला की त्याची हानी होते. संताची संगती हेच सुख आहे. परमात्मा सर्वत्र असून त्याच्या स्वरुपास भेदबुध्दीने पाहणे, हे दु:ख आहे. (अ 3693)

917 धर्मनीती (2)ज्याची बुध्दी स्वाधीन आहे त्याला परमार्थाचे कोणतेही साधन करता येते. जो दुसऱ्याच्या बुध्दीने वागतो. त्याचा मोठा घात होतो. जो इंद्रियांचा निंग्रह करतो तो सर्वात श्रेष्ठ असून जगाचा मान मिळवितो. जो परस्त्रीच्या अधरामृताचा स्वाद घेतो. त्याचा पदोपदी अपमान होतो. जगाचे सत्य स्वरुप जाणतो त्याला शास्त्रज्ञ म्हणावे. दुसऱ्याबरोबर वाद घालून भूषण मानतात त्यांना मूर्ख म्हणावे जो गया क्षेत्री माता पितराचे श्राध्द घालतो दान धर्म करतो त्यास सुपुत्र म्हणावे. जो मिळविलेले धन अनाठायी खर्च करुन परस्त्रीगमन करतो त्याला कुपुत्र म्हणावे. (अ3693)

918 जो अतिथीला आणि गाई साठी अन्न देतो मुलाबाळांसह भोजन करतो. तो आचार संपन्न असे. असे न करतो तो अनाचारी होय. श्रीहरीचे दासत्व मानतो ते धन्य झाले. विषयभोगात गुंतले त्यांचा धिक्कार असो. त्याच्या

आयुष्याचा नाश होतो. ज्याची देव, वेद, गुर याच्याविषयी श्रध्दा आहे तो शूर बलवान होय. त्याच्या विषयी अश्रध्दा आहे तो नामर्द आहे. गुरुवचनावर श्रध्दा ठेवतो तोच खरा सयंमी, गंभीर वृत्तीचा होय. ज्याचेकडे धीर नाही तो उधळ होय. ज्याचे अंत:करण शुध्द आहे त्याला चांगले म्हणावे. ज्याना कामक्रोधाची दुर्गंधी येते, त्याला वाईट म्हणावे, विठोबाचे नाम हेच सारभूत असून गोड आहे आणि संसार कडू आहे. संत संग धरा आणि विठ्ठलापायी स्थिर रहा यापेक्षा उध्दाराकरिता दुसरे साधन नाही. (अ 3693)

919 प्रथम तू मुक्तावस्थेत होता. हा संसार एकदा तुझ्या पाठीवर बसला आहे. तो कांही केल्या उतरणार नाही. पंचभूताचा पेला भरवून आत्म्याने आत्म्याला आत्मबुध्दीने मिठी मारली. त्यामुळे विकाररुपी पोरे तुझृया पाठीवर बसून कुरघोडी करु लागली आहेत. मनुष्य पूर्वपुण्याईने सत्ता, धन भोगाच्या उच्च स्थानावर चढला तरी पुण्य क्षयाने खाली येईल. तुका म्हणे - मनास किती आवरणार. या जगांत मी आणि माझे काय आहे कळत नाही. तो मायारुपी मातेशी अनैतिक सबंध ठेवणारा आहे. देह, स्त्री, पुत्र, धन प्रारब्धा स्वाधीन आहेत. देहाभिमानाचा त्याग करा. आपल्यावर कोणताही अपवाद येऊ देऊ नका. (अ 3697)

920 लोकहो, तुमचे शरीर सुदृढ आहे तोपर्यत स्वहित करुन घ्या, तीर्थयात्रा करा, कुचराई करु नका. जोपर्यत तुमचा नाश करणारा काळ दूर आहे तोपर्यत हरिगुण उच्चारा, श्रवण करा, सत्वर वेगाने, शुध्द भावाने, कुसुर न करता हरिसेवा करा. धनप्राप्ती करुन ते पुरुन ठेवू नका सपात्री दान करावे. तरुणपणांत विषयाधीन होऊ नका. काम, क्रोध, लोभ, मोह मत्सरांचा त्याग करा व संत संगती धरावी. यमाची आज्ञा मानावी लागेल सत्ता, संपत्ती, द्रव जागचे जागी राहिल. संचित तुमची साथ भरण्याकरिता पुढे जाईल. (अ 4108)

921 परद्रव्य, परनारी याविषयी आर्कषण, अभिलाषा काढून टाका. मग बाकीचे व्यवहार खुशाल करा. दंभ ढोंगाची खटपट करु नका शांतता बाळगून राहा. जिभेने रामनामाचा सुगंधरस सेवन करा. रामनामात आळस करु नका. सर्वाचा मित्र बनून राहा आणि तोंडाने अशुभ वार्ता करु नका. दुर्जनाचा संग धरु नका. संताच्या भेटीसाठी, स्नेहासाठी प्रयत्न करा. तुका म्हणे - विश्वास ठेवून धीर

धरा, या विश्वात देव सर्व गोष्टी करतो आणि घडवितो हा विश्वास असू द्या. अशा जो राहतो त्याचा योगक्षेम देव वाहातो. (अ 4114)

922 संत असतील ते ठिकाण कृपेची सावली होय. तुका म्हणे अनुकूल कार्यासाठी आपले सामर्थ्य आणि युक्ति हवी. जसे हरिनाम मुखामध्ये असावे. तसे भक्ति ज्ञान वैराग्य आले तसे अंत:करणात असावे. जसा बाहेर भाव आहे तसे अंत:करणात बसला पाहिजे. जसे कोंदण करुन हिरा बसविला म्हणजे विशेष शोभा देतो. तसे मनापासून अंत:करणापासून भक्ति, ज्ञान, वैरागयाचे कर्तव्य शोभते. (अ 4127)

923 ग्रंथवाचून करुन विचाराच्या फापट पसाऱ्यात पडून विनाकारण निरर्थक वाद का करिता ? संसारात पडून देहाला कष्ट कां देता ? कांही कष्ट करु नका फक्त नामस्मरण करा. रुचिहीन पदार्थापासून मिष्टान्ने बनविण्याचे व्यर्थ श्रम का घेता ? रुची असली तर पाकसिध्दी अधिक रुचकर होते. तुका म्हणे भगवंत भक्ती ज्या घरांत असेल अशीच माणसे सन्मार्गी लागता. (क्षेपक अ 17)

924 अज्ञानी माणसाचे ज्ञान सुखोपभोगापुरते मर्यादित असते. त्याला किती ज्ञानोपदेश केला त्याला त्या संगतीशिवाय रहावत नाही. सर्व उपदेश व्यर्थ जातो. त्यासाठी संगत उत्तम असावी एवढाच उपाय आहे. कोणाचीही निर्भत्सना करणे अधर्म आहे. श्रम हाच देव आहे. चित्ताला हाच चांगुलपणा शिकवा. परोपकारासाठी झालेला त्रास बोलून दाखविला तर पाप लागते. जीव प्रारब्धाच्या स्वाधीन असल्याने करुणा करुन उपयोग नाही. (क्षेपक अ 21)

926 अविद्या शेजारीण आहे आणि तिची पांप पोरे म्हणजे शब्द, स्पर्श, रुप, रस गंध पाच महाभूताचे पांच विषय जिंकण्यास कठीण आहेत. दुसऱ्यास उपदेश करतात, आपण मात्र तसे आचरण करीत नाही. विष खाऊन, वर पाणी मागणाऱ्याचे प्राण लगेच जातात तुका म्हणे अवगुणाचा ठेका टाकून द्या आणि गुणाचा स्वीकार करा. चला आळंदीला जावू ज्ञानेश्वरा डोळ्यांनी पाहू. ज्ञानोबाच्या नामस्मरणाने जन्म मृत्यूचे फेरे चुकतील. (क्षे.अ.33)

927 देव अंतर्यामी आहे. तीर्थ स्थळी त्याच्या शोधात फिरु नकोस. हरीणाच्या नाभीमध्ये कस्तुरी असते आणि तिच्या सुवासाने बेचैन होऊन तो तिच्या शोधात रानांत सैरावैरा पळतो. उसामध्येच सारखर, दुधामध्ये लोणी असते. तुका म्हणे - अज्ञानी जन हो, देहामध्ये तुम्ही तुम्ही देवाचा शोध घ्या. (क्षे.अ.93)

928 तुकोबास शिवाजी महाराजास सांगतात. चांगल्या गोष्टीचा कंटाळा करु नये. अंगी वाईटपणाचा दोष लागेल असे काम प्रयत्नपूर्वक करु नये. निंदा करणारे दुर्जन पदरी असतातच, त्याच्या सल्याने वागू नको. राज्याचे खरे रक्षणकर्ते कोण आहेत याचा विवेकबुध्दीने शोध घ्यावा. आम्ही सांगणे योग्य नाही. कारण तुम्ही सर्वज्ञ आहात. अनाथाच्या सहाय्यास धाऊन जावे. आपण ऐकलेत हेच समाधान आहे. दर्शनास येण्याची आवश्यकता नाही. कल्याण कारण अर्थ एवढाच की सर्वांचा आत्मा एक आहे. त्या आत्म्याच्या ठिकाणी भक्त तुम्हास पहात आहे. तुका म्हणे हे राया तुझी कीर्ति तिन्ही लोकी आहे. (क्षे.अ.111)

929 पापाची वासना डोळ्यांनी पाहण्यापेक्षा आंधळेपण चांगले. निंदेचे बोल ऐकण्यापेक्षा बहिरेपणा जास्त सुखदायी आहे. अपवित्र वाणी बोलण्यापेक्षा मुकेपण चांगले. परस्त्रीचा संग नको त्यापेक्षा मृत्यू बरा, डोक्यावर, कमरेवर अशा दोन घागरी घेऊन स्त्री तिचे चित्त घरी असते. पतंग आकाशात उडतो हातांत दोरी धरीली तरी आपले चित्त वर त्याचेकडेच असते. तुका म्हणे कोणताही व्यापार करा परंतु परमेश्वराच्या ठायी चित्त गुंतून ठेवा. (क्षे.अ.262)

930 हे देवाधि देवा तू कृपाळू आहे. तू पतिताचे रक्षण करणारा आहे. मला तुझे नाम स्वभावत:च आवडते. तुला विटेवर पाहताच माझी मनाची इच्छा पूर्ण होते. ज्यांनी आयुष्यांत चांगले काम केले, त्याच्याबरोबर चांगलेच सहप्रवासी असतात. वाईट कृत्यू करणाऱ्याबरोबर कोणीहि असत नाही. तुका म्हणे जग हे दोन तोंडाचे आहे. ज्याच्या जवळ सावज आहे. त्याच्याकडे ते फिरते. (क्षे.अ. 306)

931 हे छत्रपती राजा (शिवाजी) आम्ही सांगतो ते ऐकावे आपण रामदास स्वामीकडे सत्वर लक्ष द्यावे. समर्थ हे उत्तम संतसोयरे आहेत त्याचे तुम्ही मनन करा. समर्थ म्हणजे प्रत्यक्ष हनुतंताचा अवतारच त्यानी तुम्हास उपदेश केला आहे. त्याप्रमाणे 'रामनाम' हा तारणारा मंत्र आहे. त्यामुळे शंकर देखील शांत झाला. वाल्याचा वाल्मिकी झाला आता तू भलत्याचा संग, स्नेह करु नकोस. रामराया, पांडुरंग कृपा करील. आमची तू आस धरु नकोस. रामदासाच्या चरणी तुमचे लक्ष्य केंद्रित करा. तू राजा आहेस आणि आम्ही त्रैलोक्याचे छत्रपती आहोत. भगवान पांडुरंगाची आमची भेट झाली आमचे हातात तरोटी दिली. श्री समर्थ रामदास शरण जावे त्याना माझा साष्टांग नमस्कार. तुका म्हणे राजा तुझे कल्याण असो. (क्षे.अ.354)

932 कडू रोपाला साखरेचे आळे केले तरी त्याचा कडूपणा जाणार आहे का ?कावळ्याचे पोर कौतुकाने सांभाळले तरी ते विष्ठा खाल्याशिवाय राहील काय ? गांधील माशीच्या पोळ्याला अलिंग देताच काय होईल ? वर्णन करणे अवघड आहे. तुका म्हणे असे होणार नाही असे सांगणारेहि सुधारणार नाहीत. (क्षे.अ.393)

933 मायेने सर्वाना नागवे केले आहे. सर्व लोकाना या मायेने भांबावून सोडले आहे. आशा तहान, दंभ, ढोंग पाठी लागले आहेत. मोह स्थिर बसू देत नाही. काम क्रोधाने कुटूंबास आग लावली आहे. निंदा - हिंसा सतत मागे लागल्या आहेत. पुढे लाज आडवी होऊन राहिली आहे. ती माणसाचा घात करते. तुका म्हणे आम्हास गर्भवासाची चिंता लागली आहे. (क्षे.अ.)

# 10. श्रध्दा, अंधश्रध्दा, ढोंगीपणा

934 गाई राखणाऱ्या परमभक्त गोपाळास भगवंत प्रसन्न होतो. त्यास पूजा साहित्याची गरज नाही. केवळ श्रध्देमुळे भगवान तृप्त होतात. त्यास आपलेसे करण्यास गोपाळांना मान-सन्मान आदरतिथ्य काही करावे लागले नाही भगवंत भावाचा भुकेला आहे. तो गरीब, श्रध्दाळू भक्ताबरोबर नित्य असतो. (अ 60)

935 ज्याचे अंत:करण शुध्द नाही त्यास गंगा काय पवित्र करणार, देवाबद्दल भक्ति नाही प्रेम नाही त्याने गळयांत माळा किंवा कपाळावर टीळा लावून काय उपयोग ? अंत:करणात प्रेम नसेल तर त्याचे बोलणे कुत्र्यासम केवह शीण आहे ज्याच्याचित्तात जी वासना असते त्याप्रमाणे त्याची भावना असते. चोरास सर्वत्र चोरच दिसतात. ( 110)

936 दुसऱ्याची हानी झाली असताना ज्याना आनंद होतो असे लोक पापी आहेत. जे शीघ्रकोपी आहेत ते नरकवासाला जातात. परनिंदा, वाईट गोष्टी जो लक्षपूर्वक ऐकतो आणि बोलतो तो पापी आहे. भांडखोराच्या तोंडाला स्थिरता नसते. हे दुष्ट समजावे. (अ 147)

937 दुष्ट स्वभाव, कठोर अंत:करण, सतत भांडणारा अशा लोकांचा चांगुलपणाहि व्यर्थ होय. अंगचे गुण माणसाच्या श्रेष्ठत्वाचे प्रमाण आहे. जयाच्या सेवनाने स्वास्थ बिघडणार नाही असेच अन्न शिजवा ते चविष्ट, पाचक, स्निग्ध, रसदार गुणाचे असावे. (अ 194)

938 जे भाषण (वाणी) अमंगळ आहे ती ऐकू नये ज्यास आई-बाप आवडत नाही ते पापच होय. स्वर्ग मृत्यू पाताळ सर्व भाषमय आहेत. सर्व जग विष्णुमय आहे. जातीयता केवळ विश्वकर्त्याचा खेळ आहे. नारायणची कृपा म्हणजे सर्व दु:ख (विष) अमृतासमान आहे. (अ )

939 शुध्द मनाने मूर्तिपूजा, भयंकर संकाटातून वाचविते परंतु सज्जनाचे दुर्जनापुढे कांही चालत नाही. ते कुत्र्याचे शेपटाप्रमाणे सदैव वाकडेच राहते. कडूलिंबास गोड फळे येणार नाहीत. जसे बीज तशीच फळे येतात. दुष्टाचे हृदय वज्रापेक्षाही कठीण असते. (अ 261)

940 जो सोयरे यांना मेजवानी व साधू संताना जोंधळेच्या कण्या देतो. जो गायीला मारतो घोड्याची सेवा करतो. जो ब्रम्हणास सुपारी सुध्दा देत नाही. वेश्येना पानाचे विडे देतो. जो बायकोचे लाड करतो व आई वडिलास घरांतून बाहेर काढतो - तुका म्हणे अशा माणसाच्या तोंडावर थुंका तो यमाचा पाहुणा होय. (अ 300)

941 बोलण्यात वरवर रसाळता असली तरी अनुभव शून्य असल्यामुळे त्याचे बोल पोकळ असतात अशा फसवे ढोंगी लोकांना इहलोकात व परलोकात सुख मिळत नाही. जो ऐकतो एक व सांगतो एक त्याचा परमार्थ शून्य होय. कुत्र्याचे भांडणाप्रमाणे वेदांती भक्कती सोडून वेदातील शब्दावर वादविवाद करतात. (अ 365)

942 लबाड माणसे अंगात भूताचा संचार आणतात. भोळेभाबडे लोकास शकुन सांगतात. जे खोटे कपटाने वागतात त्याच्या जवळ गोविंद राहत नाही. ते आत्मज्ञान नव्हेच. (अ 392)

943 रोज स्नानसंध्या करितो पण निषिध्द भोजन खाऊन ती निष्फळ करतो. त्यास ना लाभ ना तोटा. ज्याला पापभिरु बुध्दि नाही, सात्विक साहस नाही त्याना देव पावत नाही. ज्याचे अंत:करण शुध्द भावाचे आहे तो श्रध्दावान भाविक धन्य होय. देवाला त्या भाविकाचे श्रध्देप्रमाणे करावे लागते. (अ 400)

944 देवाची कथा ऐकतो पण हरीप्रमाणे नाटक करतो. मनात पापकर्म करण्याचे असते. भोंदू मुद्रा लावतो सोंग करतो व योगशास्त्रात प्रवीण असल्याचे नाटक करतो. गोसाव्याचे सोंग घेऊन परस्त्री व परधनावर लक्ष्य ठेवतो. कीर्तनात

हरिप्रेमचेसाठी रडतो. पडतो मायावी ढोंग करतो, त्याच्याजवळ देव कधीच राहत नाही. (अ 403)

945 वेद, साधु संत उध्दाराची स्थळे आहेत. श्रध्दा स्थळे आहेत. देव श्रध्देनुसार फळ देतो. अंधश्रध्दा-वानास हानी पोहचते. चांगली इच्छा करणारा चांगले तर वाईटास वाईट फळ मिळते. तुका म्हणे जगणे फार थोडे राहिले आहे. अश्रध्दा निर्माण न होऊ देता खरोखर ज्यात कल्याण आहे अशा गोष्टींचा तू विचार कर. (अ 421)

946 दंभाने भक्ति केल्याने करणाऱ्याचे पोट भरते. कीर्ती होणे समाधान मान वाढतो. तिथापि या स्वहिताचे कार्य कांहीच होत नाही. मी मोठा सर्वज्ञ आहे अशा अभिमान धारण केल्याने मी तुझ्यापासून दूर जाइन तुझे पाय मला दुरावतील. शरीराचे अनावश्यक पालपोषण केल्याने कामक्रोधादी विकार जादा जडतात. हे परमार्थ मार्गावरील अडसर व शत्रू आहेत. (अ 458)

947 कोणत्याही प्रकाराने उध्दार करा आम्ही तुझे अंश आहोत. आम्ही दोन आहोत. आता भय धरुन चिंता कशा करता ? आम्ही तझे अंश आहोत. आप्तपणाचा संबंध घेऊन काय करायचे ? तुका म्हणे आम्ही नास्तिक आहोत श्रध्दाहीन आहोत म्हणून देव दूर जात आहे. (अ 572)

948 भूत, भविष्य वर्तमान काळाचे ज्ञान असावे असे ज्याला वाटते तो दुर्दैवी आहे आमच्या सारख्या विष्णुदासानी चित्तामध्ये देवाचे ध्यान करीत रहावे. जे कांही व्हावयाचे असेल ते प्रारब्धानुसार होइल. ज्योतिषाचे दुकान आहे परंतु त्याने नारायण दुरावतो. तुका म्हणे भूत भविष्याचे आकलन या गोष्टी दु:खदायक आहेत. (अ 638)

949 नरजन्मात येऊन परमार्थ करीत नाही तो गाढव आहे. ब्रम्हज्ञानाचा अनुभव नसताना शब्दज्ञानाचा भार वाहतो तो बैल आहे तो वादविवाद करतो. भक्तिहीन मनुष्य कितीही भाग्यवान, विव्दान असला तरी तो अधम आहे. त्यांनी संतपणाची माळ-मुद्रा घेतली तरी त्याला काय आग लावावयाची ? (अ 654)

950 कलियुगामध्ये ब्राम्हण ब्राम्हधर्माच्या आचाराचे पालन करणार नाहीत. त्यामुळे अधर्म, धर्म म्हणून मान्य होइल असे संतानी पूर्वीच सांगितले

आहे. आता अधर्म चालू आहे. जप, तप, देवदर्शन नाही. तुका म्हणे जे कोणी भ्रष्टाचारी ब्राम्हण आहेत ते नरकात जातील. (अ 656)

951 भगवंता आम्ही कतुझ्या मनांतला फसविण्याचा हेतू जाणला. आणि कर्ज वसूल करण्याससाठी तुझे पाय घट्ट धरले आहेत. चुकवाचुकवी करु देणार नाही. आमची सेवा घेतल्याबरोबर परतफेड केली असती तर ते आता ऐवढे जड झाले नसते आता आम्हांस सर्वस्व दिले तरी ते कर्ज फिरणार नाही आता आम्हास सर्वस्व दिले तरी ते कर्ज फिटणार नाही. (अ 699)

952 जीव ब्रम्ह आहे समजून सर्व भोग भोगतात. सकळीकडे देव आहे समजतात पण पैशासाठी एकमेकाची डोके फोडतात. सर्व ढोंगी माणसे हे जग मायावी व नाशवंत आहे असे निरुपणात सांगतात पण मनात चांदी, सोने द्रव्याची अपेक्षा करतात अशा प्रकारच्या शब्दज्ञान्यानी जरी कोट्यावधी वर्षे जन्म घेतले तरी त्यांना देव भेटणार नाही. (अ 747)

953 ज्ञान सांगणे कठीण आहे त्याचा हृदयांत अनुभव येणे कसे घडेल ? अज्ञ जीवानी हरिभजन व हरिकथा ठिकाणी चित्त ठेवल्यास दु:खाचा परिहार होईल जो हरिकथा ऐकतो तो हरिभजन आनंदाने करतो. ते आठही प्रहरी शुभ आहे. ज्ञानीपणा देवाच्या मस्तकी बरा. आम्ही अज्ञानीच बरे आहोत. लाडक्या मुलाना मोठ्यापासून भीती नाही. त्याचे चित्त व बुध्दी खेळाच्या ठिकाणी सम असते. सर्व काळ आणि सर्व दिशा मोकळे खेळण्याचे ठिकाण आहे. (अ 790)

954 आपण आपल्या स्वरुपाचा विचार करावा कारण आत्मस्थितीरुपी प्रसन्नता हे जीवन सार आहे याला मन साक्षी आहे. खोट्या देहाचा अभिमान दु:ख प्राप्त करुन देतो. नामरुपरहित ब्रम्हाचे सुख अबाधित सत्य आहे. विविध भूमिकाची सोंगे दाखविणे व निंदा-स्तुती करणे हा सर्व बोभाटा पोट करविते. मनांत धैर्य, क्षमा नसताना अंगास राख लावणे ही देह विटंबना आहे ते शृंगारल्या प्रेतासमान आहे. तो ढोंगी आहे. (अ 8570

955 सतत रामनाम घे, तू धन्य होशील, तो सर्व प्राणिमात्रांचे ठिकाणी आहे. तो दयावंत आहे. जप, तप, ध्यान योग आणि ज्ञान साधना जाणत नाही. आईशी गैरव्यवहार करणारा आणि गुरुनिंदा करणारा व अभक्ताचे तोंड पाहू नका. एकांतात राहणे चांगले. निंदा करणारा चांडाळाच्या अंत:करणात विषमता असते. त्याला पाहिल्याबरोबर पाप वाढते त्याच्याशी बोलू नये. (अ 9170

956 ज्या माणसाजवळ पुण्याच्या राशी असतील तोच देवप्राप्तीविषयी खटपट करतो. एकाद्यास काशीयात्रेस पाठवितो त्यास यात्रेचे आधे पुण्य, तो यात्रेकरु तिकडे मेलातरी मिळते. सुखरुप परत आला ते मिळते. पुण्याचे नियम पापासाठी वापरु नये. आणि पापाचे नियम पुण्यासाठी वापरु नये. नदीला महापूर आला असता मोठे वृक्ष वाहून जातात तेथे लव्हाळे वाचतात कारण त्याचा नम्रपणा दीनभावाने नम्र होणे हेच भवसागरातून पार होण्याचे सारभूत साधन आहे. (अ 939)

957 वेद पांरगत वक्ते, पंडीत व ग्रंथाचे वाचक याचे एकमेकांशी कधीच पडत नाही. जे कोणी आत्मनिष्ठ असतात त्याची व्यवहार भलतेच दिसतात. कांही योगी शांत न दिसता क्रोधी वाटतात. विव्दान, पंडीत, ज्ञानी पुरुष याचे घरी देव शोधला असता तेथे देव नसून ज्ञानाभिमानच त्याचे मागे दिसत आहे. (अ 980)

958 मनांत किंतु ठेवून परस्त्रीस माता म्हणण्यात काय अर्थ आहे ? तो धर्माच्या मोठ्या गोंष्टी सांगतो परंतु तो उष्टया हाताने कावळा मारीत नाही. कारण हातातील शीत कावळा खाईल. कारण जे जे पापकर्म केलेले असतो ते ते प्रंसगी त्यासमोर उभे राहते. तुका म्हणे बोलल्याप्रमाणे वर्तन करतो तो माणूस महान आहे. (अ 1020)

959 देवाला दोष देण्यापेक्षा माझ्या नशिबी कलयाण असेल तर होईल नाहीतर नाही ज्याना देव आणि शास्त्र कळत नाही त्याच्या सर्व क्रिया भ्रमरुप असल्याने निष्फळ होतात. घागरभर दुधात दारुचा थेंब पडला तर ते पिण्यास अयोग्य होते. तव्दव जयाचे मन अभिमानाने विटाळलेले आहे असा माणूस कितीही ज्ञानी असला तरी त्याचे मुखाने भक्तिज्ञान उपदेश घेऊ नये. तो अपात्र आहे. (अ 1056)

960 विषामुळे अमृताचे श्रेष्ठत्व कळते. कडू पदार्थामुळे गोड पदार्थाचे महत्व कळते. दुष्टामुळे सज्जन कळतात दुष्ट मजुरी न घेता, साबण न घेता आमची टवाळी करुन पाप धुण्याचे काम करतात. ते सज्जनाशी शत्रुत्व करुन त्याच्या पापाचे ओझे वाहतात. (अ 1122)

961 श्रध्देने केवळ विठ्ठल मंदीराचा कळस जरी पाहिला तरीसुध्दा अहंकाराचा तात्काळ नाश होऊन मोक्ष प्राप्त होतो. असे पंढरी क्षेत्राचे महत्व आहे.

तीर्थ, क्षेत्र आणि देव हे एकत्र ते सर्वोत्तम आहे. शास्त्राधार आहे जी माणसे मानवी देहांत आली काया, वाचा, मनाने भक्ति प्रेमरंगात रंगली धन्य आहेत. ज्याच्या मुखांत व चित्तात विठ्ठलाचे नाम आणि ध्यान आहे. (अ 1134)

962 मी ज्याच्याकडे पाहतो ते सर्व माणसे तुझ्या मूर्ती वाटतात महाल मंदीरे झोपड्या राजवाडे सर्व देवालय वाटतात. आम्ही विठोबाचे दास झालेले आहोत. या भक्ती सुखाने तृप्त झालेले आहोत. हरिकथेत सर्वजण आनंदाने नाचतात. त्याच्या अंगात प्रेमाची संवेदना आलेली असते. देवाने निस्सीम हरिभक्तास प्रेमाच्या श्रध्देच्या बदल्यास स्वत:स विकून टाकले आहे. (अ 1230)

963 देह देवाचे मंदीर आहे. त्यातील अज्ञान, काम, क्रोध द्रव्याची चोरी देवानीच केली आहे. जीवरुपी देवालय भिकारी केले आहे. देव अव्यक्त निराकार आहे. कोठे शोधू. जीवेश्वर परमऐक्य झाले. देहरुपी घरावर काळरुपी चोर घाला घालतील. परमार्थरुपी धनाचे रक्षण करा. कोणाला द्यावायचे नाही आणि कोणाला भ्यावयाचे नाही. दक्ष रहा. (अ 1239)

964 झाडाच्या मुळाला पाणी घातले की ते संपूर्ण झाड विकसित करते. त्याप्रमाणे भिन्न भिन्न देवाना न भजता एकाच देवाला श्रध्देने चित्तामध्ये बळकटपणे धरावे. एक राजा वश झाला. सर्व प्रजा वश होते. एक चिंतामणी मिळताच सर्व सर्व इच्छा पूर्ण होतात. एक पंढरीनाथाकडे धाव घ्या संपूर्ण विश्रांती मिळेल. (अ 1338)

965 देवाच्या प्राप्तीसाठी अन्न न खाता ध्यानस्थ बसणाऱ्या ढोंग्यांना देव भेटत नाही. कारण सर्प सुध्दा अन्न खात नाही. ध्यान करुन बगळा सुध्दा बसतो. अंत:करणामध्ये भक्ति न धरता खोटी बुध्दी धरली तर वरपांगी भक्तिचे सोंग निरर्थक आहे. अंगाला राख फासून देव प्राप्त होत असेल तर गाढव राखेत लोळते. गुहेत बसल्याने हरी भेटत असेलत रत उंदीर बिळात राहतात. गंगेत स्नान केल्याने देव पावतो तर पाण्यात सुसर अखंडपणे असतात. (अ 1340)

966 आयुष्यभर व्यभिचारात घालवलेल्या वेश्येचे उध्दार केला आणि स्वत:चा पिता दशरथ 'राम राम' म्हणत मेला या अधोगतीला देवा तूच कारण आहे. सर्व जगाला खावून अतृप्त असलेला हा काळ आम्ही केलेल्या हरिगुणानुवादाने तृप्त झाला. अग्नीसारखा काळ शीतल झाला आहे. साधका तू ब्रम्हरुपी काढा घे म्हणजे तुझी जन्ममृत्यूची पीडा नष्ट होइल. वाचेने विठोबाचे

अखंड नाम स्मरण करा. अन्य कांही नको हेच पथ्य पाळा. त्यामुळे भवरोग नाहीसा होईल, भूतबाधा होणार नाही. (अ 1384)

967 भगवंत सर्वज्ञ आहे. भक्तांना जे आवडते तेच देव देत असतो. मागताना विचार करावा. जे पेरले असेल त्याचेच फळ घ्यावे लागते. डोरल्याचे (रानवाग्यांचे) झाडाला केळी कशी येतील. तुका म्हणे तुझे अहीत माझ्या हाताने आणि अविचाराने झाले आहे. देवा नांवे ठेवण्यात कांहीच कारण नाही. परमार्थात तुझा तूच शत्रू आहेस तुझा तूच मित्र आहेस. मन दाही दिशा भटकत असेल तर त्यावेळी मौन व्रताचा अर्थ काय ? साधुवेश आहे पण आंत विषयवासेत मग्न आहे. इंद्रियानिग्रह नाही. दिखाऊपणाचा काय उपयोग नाही. ? (अ 1404)

968 आम्ही हरीभक्त असल्याने आमच्या जवळ दैन्य दु:ख येतच नाही. सर्व पापे जळून खाक होतात. आमची मुख्य आवड संतसंगत तर दुसरी आवड नामाची आहे. भगवंताचे सेवेचे सुख सोडून कोणास मोक्षाची गरज आहे. ज्याचे मन निषिध्द विषयानी विटाळलेले त्याच्या धिक्कार असो. ‘अहं ब्रम्ह’ या वृत्तीत गुंतलेल्या ज्ञानाला भक्ति प्रेमाचे सुख समजत नसते. (अ 1434)

969 नावांत काय आहे ? नांव कुबेर पण, प्रत्यक्षांत लाकडाची मोळी वाहतो. नांव सावित्री पण समाजात विधवा वावरते. दांभिक भक्तीला कसला आला आहे अभिमान. भगवंता विश्वातील कोणता पदार्थ तू नाहीस, मुंग्यापासून अनेक प्रकारचे प्राणी पर्वत, नद्या, समुद्र सर्व ठिकाणी तूच आहेस. तू हे अनेक नाटक दाखवतोस आम्ही किती त्रास सोसावादेवा तू आमच्या हृदयात खरा आहेसच त्यामुळे तू आता जाशील कुठे ?

970 अविचाराने पंढरीत जीव दिला तर तो पतित अध:पाताला जातो. पंढरीत तीर्थ उपवास केलेला देवाला आवडत नाही. कथेशिवाय इतर कर्म करणे दोष आहे. उच्च-नीच भाव पाहतो. वैष्णवात भेद पाहतो तो आचार संपन्न ब्रम्हण हीन होय. जी बाई माहेरी आई-बापासमोर येत नाही ती व्यभिचारी असे जाणावे. पंढरीत येऊन संप्रदायाप्रमाणे वागत नाही तो नरकास जातो. चंद्रभागेत स्नान हरिकथा, काला, देवाचे दर्शन उध्दारास पुरे आहे. (अ 1490)

971 देवा तू गाढव-कुत्रा, बैल आहेस. खोटा आहेस मला कळाले आहे. माझे बोलणे सहन करतोस धन्य आहे. आम्ही अडाणी बालक आहोत तू आमचे मा बाप आहांत तुम्ही बालकाचे हट्ट पुरवता. अपराध पोटांत घालता. हे नारायणा

आम्ही कोणाजवळ सांगू. वैष्णवाचे बळ पाहून काळ पळून जातो. मानवी शरीर नाहिसे होणार आहे. बायकां, मुले, शरीर, द्रव्य नाश होणार आहे. पुढे अनेक योनीत फिरावे लागणार आहे. त्यापेक्षा जेथून तू आलास त्या परमेश्वराच्या स्थानाला जा. (अ 1537)

972 बाहेरुन शरी स्वच्छ करण्यांत काय अर्थ आहे ? अंत:करणांत तुझे मन मळलेले आहेच कारण आयुष्यभर असत्याचा व्यवहार करुन तुझे मन अनेक दोषानी व्यापले आहे. असत्याचा व्यवहार सोडून दे. मन आणि वाणी शुध्द कर. याबद्दल तूच साक्षी आहे ऊस वाढविला तर साखर मिळेल. कांदा लावला तर थोडी बहुत घाण मिळेल. तू सत्य असत्याचा विचार कर भगवंताची मुर्ती पाषाणाची, पायरी पाषाणाची एकाची पूजा तर दुसऱ्यावर पाय पडतात. मूर्तीची शास्त्राधारे प्राणप्रतिष्ठा करतात. तेथे देव मानतात, श्रध्दा ठेवतात. रहस्य नास्तिकास कळत नाही. (अ 1553)

973 प्रभूचे गुण गाणाऱ्यास व श्रवण करणाऱ्या सारखेच फळ मिळते. ज्याला आत्मकल्याण साधावयाचे आहे तो हरिकथेवर प्रेम करतो, या जन्मांत शेंडी गळयांत जानवे असले तरी पूर्वजन्मीचे मलमूत्र अंत:करणात तसेच असते. असे लोक दुसऱ्याची सतत निंदा करुन परटाप्रमाणे पापे धुऊन काढण्याचा उद्योग करतात. ते पूर्वजन्मी परिट असावे. जो देवाच्या नामाची निंदा करतो त्याचे मला दर्शन नको. तुका म्हणे - नाम निंदकाना मी संत मानीत नाही. (अ 1622)

974 जाखाई, जोखाई, मायराणी या क्षुद्रदेवता भक्ति करण्यास योग्य नाहीत. रंडी, चंडी, शक्ति या मद्य-मांस खाणाऱ्या देवता आहेत. भैरव, खंडोबा, भरीत-रोडगा खाण्यासाठी देव झाले आहेत. विशाल देहाचे गणपती बाप्पा लाडू मोदक फस्त करणारे आहेत मुंजाबा, म्हसोबा पोरासारखे आहे त्यांना कोण मानतो. पंढरीनाथ सामर्थ्यवान असून सर्व देताचा सत्ताधीश आहे. त्याला आपल्या हृदयात साठवा. (अ 1624)

975 जो देवाना दगड समजतो, तीर्थाना पाणी समजतो, अशा अश्रध्द माणसाचे सकृत्य व्यर्थ जाते. त्यांना शांती लाभत नाही. देवा, परस्त्री व परधन याची इच्छा माझ्या मनात येऊ देऊ नको. प्राण्याचा मत्सर आणि संतनिंदा याचे पाप माझ्याकडून होऊ देऊ नको. देहाभिमान होऊ देऊ नकोस समर्थाचे (संताचे)

सदन नेहमीच भक्तिज्ञानाने, ध्यान्याने परिपूर्ण असते. देवा तुझ्याच कृपेने संत समागम झाला. (अ 1871)

976 मनाचे मूळ जो हरी. त्याचे ठिकाणी बसून रहावे आणि विश्वातील सर्व सद्‌गुण हरीच्या पायाजवळ आहेत असे समजावे. पद्‌यनाथावर श्रध्दा ठेवली म्हणजे तो योग्य फळ देतो. देव केवळ श्रध्देने भेटतो. इतका तो भोळा आहे. परंतु माणसाला अश्रध्दा भेडसावित असते. पूर्वपूण्य, शुध्द प्रारब्ध असल्याखेरीज माणसाला परमार्थाची इच्छा होत नाही. पुष्कळ धनामुळे कधी देवाची प्राप्ती होत नाही. केवळ आपले पापच आपल्या हिताच्या आड येते. अविचाराने आणि आक्रस्ताळेपणे एखादा माणूस गंगेत देहत्याग करेल, तर गंगा त्याला पवित्र करीत नाही. उलट त्याला आत्महत्येचे पाप लागते. (अ 1932)

977 अहंता, देहाभिमान आहे. केवळ ग्रंथपठणाचा काय उपयोग ? ज्ञान थोडे पण अभिमान फार ओ अंत:करणात परद्रव्य व परस्त्रीची अपेक्षा आहे. मन काम-क्रोधाने विटाळले आहे. तोंडात तंबाखूची नळी धरली आहे, असे ढोंगी संत कलियुगांत फार झाले आहेत. तुका म्हणे हे सर्व सोंग आहे तेथे पांडुरंग कोठ असणार ?(अ 2078)

978 एकादी वस्तु हरवली तर त्याची हळहळ मानू नका. हरवलेली वस्तु देवाला पावली असे म्हणा. त्यामुळे ती देवाला पावते. यामूळे सहज भक्ती घडते. ज्या गोष्टीने दैवानी घडणार असतात त्या अटळ असतात त्याचा सकंल्प देवाकडे करताच पुण्याचा सहज लाभ होतो. आपले मन राग व्देषापासून मुक्त ठेवले तेच सर्व पुण्य आहे. (अ 2134)

979 बायकोला अलिंगन आनंदाने देतो, परंतु संतासाठी कचरतो. जावई आल्याचे स्वागत करतो. परंतु इतर अतिथीसाठी पाठमोरा होतो. मुसलमानाच्या दासीला भाव देतो, परंतु ब्राम्हणास नमस्कार करत नाही. बायकोला साड्या घेतो पण भगवंताचे वस्त्राकडे लक्ष देत नाही. घोडा बाळगतो पण गायी पाळण्याची इच्छा करत नाही. अशा नीच माणसाच्या तोंडावर थुंकावे संतचरण सेवा करून ब्रम्हज्ञान प्राप्त करुन संसार तरुन जावे. (अ 2237)

980 ज्याचा देवावर विश्वास आहे तर त्याचे हृदय अनायसे श्रम करावे लागत नाहीत त्याचे हृदय अनायसे ब्रम्हरसाने भरु जाते. जे शुध्द भावाने चित्त अर्पण करुन देवाला शरण गेले आहेत त्यांना सर्व वैभवाची प्राप्ती होते. जीव

ब्रम्हरुप आहे असे जाणले तरी नेणतेपणा अंगी ठेवला म्हणजे त्याच्या इच्छेप्रमाणे देव आपल्या आपण होतो. मी प्रपंचाचा आणि परमार्थाचा सर्व भार देवावर सोपवला आहे. (अ 2378)

981 कडू वृंदावन गुळाने माखले तरी गोड होणार काय ? विंचवास प्रेमाने कुरवाळले तरी तो नांगी मारण्याचा स्वभावधम्र दाखवतोच. माणसाने माणसाची स्तुती करुन आपल्या आयुष्याचे वाटोळे केलेले असते. भगवंताचा विसर पडताच माणसाच्या हातून पापकर्म घडतेच. भगवंताने जिवासारखे महत्वाचे दान दिले त्या नारायणाचा अवमान करु नये. जे संताना मान देत नाही. मुसलमानाची नोकरी (सेवा) करतात. आणि नीच माणसापुढे लोटांगण घालतो त्यांना धर्माचा अर्थ कळत नाही. ते भ्रमिष्ठ असतात. (अ 2418)

982 मी कुठेही असले तरी माझे चित्त तुझ्या पायी असो द्यावे. देवा माझ्या मागे लागलेल्या काळ पुरुषाचे परिपत्य कर, माझे मन संपत्ती व विषयापासून परावृत्त कर. वात, कफ, पित्त हे देहादि रोग देह पडण्याच्या वेळी माझ्यापासून दूर ठेव. तूच सर्वांना उत्पन्न केले आहेस आणि तुझे सर्वांशी ऐक्य आहे. माणसाचे चित्त शरीर-इंद्रियाकडे लागले म्हणजे कल्पना धांवतात. हातपायामुळे शरीर चालताना दिसते परंतु मुळ सत्ता जिवाची असते. भिन्न भेदामुळे तो वेगळा दिसतो. भगवंता तुम्ही जगाचे प्राण आहांत, जीवनवायू आहात तुमच्या चिंतनाची मी सेवा करत आहे. (अ 2432)

983 मी कुत्र्याप्रमाणे आहे, भुंकत जन्म-मरण रुपी संसार बाहेर घालवितो. मी तुमच्या निजधामाच्या पायाजवळ येऊन दडतो आणि 'छू' म्हणताच भुकंतच मृत्युलोकाकडे धांवतो. कोणालाही आपल्या घरचे संसाररुपी ताक खाऊ देणार नाही. भगवंताच्या भक्तिप्रेमाने मी बांधलो आहे. वेळप्रसंग पाहून मी भूकंत असतो. परमार्थ करणाऱ्या कुत्र्याची आपले स्वरुप स्थितीचे घर राखावे अशी श्रध्दा असते. दुजेपणाचा, व्देताचा वारा आपल्या स्वरुपाच्या घराला लागू न दिला पाहिजे. महाभूत अहंकार क्षेत्राची मोडतोड केली पाहिजे. भगवंत त्या कुत्र्यास हरिनामावाचून भुंकू देत नाही. (अ 2455)

984 धन्वंतरीने रोग्याला आवडेल ते खाण्यास परवानगी देणे म्हणजे रोग्याची फजिती होय. त्याचा घात करणे योग्य नाही. प्रपंचात नातेवाइकांच्या मोहपाशात अडकल्याने दु:ख वाढते. मोह माणसाला ओढीत असतो. संकल्पामुळे

सुख दु:खे निर्माण होतात, देवा आम्ही (मन, वाणी, शरीर) सर्वस्व अर्पण केले आहे. तुमच्या सेवेत कांही अपूर्णता असेल ती पूर्ण करुन घ्या. देवा तुमची पूजा कशी करावी हे मला समजत नाही. तुम्ही ते जाणता. लेकराचे सुख दु:ख जाणण्याचे आईचे कर्तव्य आहे. माझे मन तुमच्याजवळ राहील असे कृपादान घ्या. (अ 2468)

985 आमचा कर्ता करविता स्वामी पांडुरंग म्हणतो आम्हास भक्ताच्या अंत:करणातील एक शुध्द भावच मान्य होतो. विव्दत्ता, शहाणपण वगैरेची गरज नाही. माझा स्वामी पांडुरंग सर्वज्ञ आहे. तो रक्षणकर्ता आहे. तो माझा सांगाती आहे. जो यज्ञ, याग, दान याने प्राप्त होणार नाही. त्या देवावर एकनिष्ठ भक्त सत्ता गाजवितात. आपल्या आवडत्या माणसाची भेट झाल्यावर मनाला शांतता मिळते आणि समाधान प्राप्त होते. तोच या जगातील प्रत्येक गोष्टीचा मालक, पालक आहे. ज्याल महत्व कळाले त्यालाच गोडी अनुभवास येते. (अ 2497)

986 देवा, कासवीप्रमाणे माझ्यावर प्रेम दृष्टी असू द्या. कारण कृपा करणे, न करणे तुमच्या हाती आहे. संतानी दाखविलेला मार्ग सोडून जो आडमार्गाने जातो, त्यास कष्ट भोगावे लागतात. आडमार्गाने जाणारे बरेच लोक आहेत. विष खाऊ नका असे सांगूनसुध्दा विष खाणारे कमी आहेत काय ? जो विचार पूर्वक निर्णय घेतो त्याचे नुकसान होत नाही जो माणूस आपल्या जिवावर रुसून प्राण देतो, त्या गाढवापुढे कोणाचे काय चालणार ?(अ 2500)

987 अंगी परमार्थाचा अनुभव पाहिजे. बाह्यवेशाच्या सोंगसंपादणाने हित साधत नाही. तू वरपांगी रंगाला भुलू नको. खरे स्वहीत लवकर करुन घे. बहुरुपी नारायणाचे सोंग करतो परंतु आहे तोच राहतो. धोत्र्याच्या झाडाला कनकाचे झाड म्हणून वंदन केले तरी ते सोनेरी होत नाही. पाषाणाच्या देवाचे नाव देऊन पूजा केली तर सात्विक श्रध्दा त्याला तारते. पण तो पाषाण तसाच राहतो. ज्याची श्रध्दा त्याला तारते. अहंकार धरणारे नाश पावतात. वेद, उपनिषिदे तुझी स्तुती करण्यास असमर्थ आहेत. तेथे मी मतिहीन तुझे रुप काय वर्णन करणार. माझ्या बुध्दीप्रमाणे तुझे गोजिरे रुपाचा भावना करुन हृदयांत धरले आहे. सुखाच्या मुशीत ओतले आहे समजून श्रीमुख तन्मयतेने पाहतो. चित्ताला समाधान मिळते. तहानभूक हरपते. (अ 2503)

988 वाघाचे कातडे पांघरुण वाघाचे सोंग घेतले तरी खऱ्या वाघाची शौर्याची क्रुरतेची लक्षणे नसतात. वर मुलामा असलेले नाणे कसाटीस उतरत नाही. त्याप्रमाणे एकाद्याची भेट होऊन विशेष परिचय झाला की खऱ्या स्वभावाचे रंग आपोआप कळतात. खोट्या साठा करणाऱ्याची लवकर फजिती होते. सापाला दूध पाजले, तर त्याचे विष होते म्हणजे आपल्या हातांनी दुधाचा नाश होतो. पापी माणसाला योग्य वेळी शासन केले नाही तर पुढे होणाऱ्या पाप कर्मात खंड पडणार नाही. (अ 2597)

989 पशूची हत्या करुन मांस खातो तो वैरी निर्माण करुन ठेवतो. एक जीव दुसऱ्या जीवाची वेदना जाणून घेत नाही. अशांची कोण दया माया करील ? दुसऱ्याला मारण्यासाठी सुरीला धार लावताना आपले बोट कापले जाणार नाही याची काळजी घेतो. मी लहान बालक आहे अज्ञान आहे. मी तुझा दास आहे असा बोभाटा जगात झाल्याने संताच्या पंक्तीत मी बसलो आम्ही तुला जिंकले आहे. (अ 2533)

990 देव जप तप करुन प्राप्त होत नाही. इतका तो अवघड आहे. परंतु त्याचे नामगुण गायलयामुळे तो आम्हाला सुलभ झाला आहे. ध्यान, धारणा कांही न करता केवळ हरिकीर्तन करीत राहिले तर तो हरी त्यात येऊन नाचतो. ज्याला रुप, आकार नाही असा तो निराकार ईश्वर आमच्यासाठी साकार होऊन कमरेवर हात ठेवून विटेवर उभा राहिला आहे. ज्याच्या पोटांत अनंत ब्रम्हांडे सामावली आहेत त्याला आम्ही भक्तिबळाने हृदय संपुष्टात साठविले आहे. जे अंर्तबाहय शुध्द आहेत. ते देवाच्या प्राप्तीचे खरे वर्म जाणतात. (अ 2563)

991 या विश्वाला विठ्ठलाच्या आनंदाचा आश्रय आहे आणि तो झरा शब्दादी विषयांच्या उपाधीमध्ये सावकाश वाहत असतो. अशी ज्या प्रभूची लीला आहे. त्याचे सामर्थ्य कोणास कळणार ? माणूस जर देव झाला तर देव त्याला अमर्याद आनंदाच्या स्थानाला पोहचून देईल. एवढे जादा कष्ट करुन मठ कशासाठी बांधता, मोजकेच अन्न घ्या. संसाराचे ओझे टाकलेत, तर परत डोक्यावर कां घेता. मायेचे दु:ख स्वत: नष्ट करा. प्रापंचिक दु:खाने मी त्रासलो आहे म्हणून आपली दया मागत आहे. (अ 2644)

992 भविष्यात आपली फजिती होईल हे अज्ञानी लोकास माहीत नसल्याने प्रपंचात अनेक हव्यासाने माझी वस्तु नेऊ नका, असे अत्यंत काकुळतीस

येऊन सांगतात. अंतःकरणात भय धरुन लोभाने स्वकार्यासाठी कोणी भांडी मागावयास आला तर ती जाळू नका असे म्हणतात. दुसऱ्यावर उपकार न करता असे प्रकारे विचार करतात, असे लोक घातक असतात. आम्ही सुख-दुःख तुला अर्पण केले. त्यामुळे काळ नाहिसा झाला. देवाचा विसर पडला भेदभाव गेला. (अ 2647)

993 देह प्रारब्धाच्या अंकित असताना मी निष्कारण काळजी करत आहे. सुख दुःखे त्याच्याच आधीन आहेत. या विचाराचे वर्म चुकल्याने भ्रमामुळे दुःख झाले. हा कांही अंगचा रोग नाही. तो प्रारब्धाचा आहे. मग भोग कसचा होईल. ज्याच्या अंतःकरणात भगवंताचे नाम आहे. त्याची किर्ती झाल्याचे ऐकतो. साधकाजवळ श्रध्दा असली म्हणजे श्रध्दा असली म्हणजे झाले. यापेक्षा तरुन जाण्याकरिता एक कवडीदेखील मोल द्यावे लागत नाही. संताचे दास झाल्याने पुढे कशाचीही इच्छा राहत नाही. संतसेवा हीच उत्तम सेवा. (अ 2685)

994 आम्ही एकनिष्ठ झालो आहोत भक्ती करण्याच्या वासनेचे रक्षण करत आहे. दृढ निश्चय केला आहे. आम्हाला गूढ, खोल तत्वज्ञानाने समजत नाही. परंतु आम्ही वृत्तीने एकनिष्ठ आहोत. यात बदल नाही होणार. तुझे नाम आमचे जीवनसाधन आहे. देवा तुम्हीसुध्दा आशाबध्द होऊन बळीराजाच्या घरी गेला होता. आशा म्हणजे हवी ती वस्तु मिळविण्यासाठी दीन होऊन वाट पाहावी लागते. देवा तुम्ही उदार आहात माझी आशा वाढत आहे. मी सेवेची मर्यादा सोडणार नाही. धर्मरक्षणाचा उद्योग सर्वकाळ करील. तुम्ही दान द्यावे. (अ 2740)

995 गोमुखीत (जपमाळेची पिशवी) हात घालून जपमाळेचे मणी ओढून जपाचे ढोंग करतो परंतु अंतःकरणात निंदेचे विचार असतात. क्रोधरुपी मांग अंतःकरणात राहिला आहे तो कुत्र्याप्रमाणे भुंकून जप करतो अशा ढोंग्याचे पुर्वज व तो नरकात जातात. जो सत्ता, पैसा, विद्या, सामर्थ्य, रुप या अभिमान भरल्यामुळे ताठ राहतो. देवापुढे संतापुढे वाकत नाही. प्राण जातेवेळी हरिचिंतन करत नाही. ते ढोंगीच होत. (अ 2742)

996 संसारात कितीही समृध्द असलो तरी तुझ्या एकाशिवाय आम्ही दुर्दैवी आहोत. प्रारब्धाचा भोग भोगण्याकरिता मी ज्या ज्या ठिकाणी जाईन, तेथे तुला विसरणार नाही. देवा तुझा दास झाल्याने आयुष्याचे कल्याण करुन घेतले

आहे. 'मी' माझे या भ्रमाने मला जन्म मरणाचे कष्ट फिरवीत आहेत. मी तुमच्या आशेचे पालन करणारा झालो आहे आणि माझ्या जगण्याकरिता तुला एकमेव आधार आहे. (अ 2803)

997 आम्ही सदैव सद्‌गुणाचा साठा करु आणि दोषाच्या मार्गाला जाणार नाही. विविध प्रकारच्या छंदानी असंख्य लोक आडमार्गाने जावून दु:खी होतात. त्यासाठी संतसंगतीत राहावे. माझे शिकलेले शाब्दिक ज्ञान आरशांतील प्रतिबिंबाप्रमाणे व्यर्थ आहे. खऱ्या अनुभवाची जरुरी आहे. त्यासाठी नामबीजाचा गूढ अर्थ (परमात्मा) कळला पाहिजे आणि त्यासाठी देवा तुझे कृपादान हवे आहे. तुमचे मनांत असेल तर देवू शकता. (अ 2849)

998 भक्तिने देवाची प्राप्ती होते असे मी लोकांना सांगतो परंतु मी भक्ति केली नाही. त्यामुळे माझा मीच दु:ख भोगीत आहे. आम्ही दंभाने भक्ति करत आहोत. सोंग दाखवीत आहोत. कारण आपणास लोकांनी मान, धन द्यावे. आमच्या अंत:करणात काय आहे, याचा साक्षीदार तूच आहे. तुला सर्व कळते मग आम्ही गर्व कसे करु. कावळ्याच्या गळ्यात मोत्याची माळ शोभेल का ? बगळ्यास दंभाने ध्यान करु नको सांगून काय उपयोग ? अंधश्रध्दाळू माणसास उपदेश करु नये. (अ 2956)

999 सुगरणबाई तू स्वयंपाकांत भाजीत जादा गुळ घालून नाश केलास. खिरीमध्ये हिंग, दुधामध्ये बोळ घालून चांगल्या पाकाचा खरा नाश केला. जात्याची भरडाने पाळी भरुन दळण दळले आणि औंगळ नाश केला. कापुराच्या बाजारांत लसूण आणला तर श्रम आणि दु:ख पदरी येते रत्नाची दृष्टी असते तोच रत्नाची पारख करीतो. चांगला योग असला तर ठीक. मीठ पाण्यात पडल्यावर पुन्हा वेगळे करता येत नाही. तुका म्हणे मी माझा जीव तुझ्या पायाखाली बळी दिला आहे. (अ 2966)

1000 देवा तू अनाथ जीवाची माऊली आहेस. माझ्यावरील संकटातून मला मुक्त करण्यास आळस करु नका. भवसागरातून पलिकडे न्या. भगवंता तुम्ही ज्याचा स्वीकार करता, त्याला पुन जन्म नाही. तुम्ही विठ्ठलाचे चरणांचे चिंतन मनांत ठेवा गळ्यात तुळशीमाळ धारण करा व अलंकार म्हणून मिरवा. (अ 2978)

1001 भगवंताची भक्ति श्रध्देने, सर्व चिंता टाकून कर संसारात गुंतवू नको. एकवेळ केवळ पंढरीचा राजा अंत:करणात दृढ करा मग तुल पुढील उपाय

सुचतील आता तरी सावध हो आणि परमार्थाचा मार्ग आणि खऱ्या आनंदाचा अनुभव प्राप्त करुन घे. ज्याला ब्रम्हज्ञान कळत नाही. स्वधर्म आचार विचार पाळत नाही. जनतेला फसवितो त्या चांडाळास गाढव समजावे. (अ 3002)

1002 कांही कानांना मोठे भोके पाडतात त्यात लाकडी कर्णभुषणे घालतात. नाथपंथी म्हणवितात. कांही मलंग कवडी कवडी करता डोके फोडून रक्त काढतात, कातडे पांघरतात. लोखंडी साखळी हातात घालतात. गोविंद प्राप्तीचे वर्म त्याला कळत नाही. कांही महानुभापंथी दाढी आणि डोक्याचे मुंडण करतात व अंगावर काळी वस्त्रे घालतात कांही जंगम होऊन विभूती भस्म लावतात. घरोघरी शंख फुंकतात यांना शंकराची श्रध्दा-भक्ति नसते. (अ 3048)

1003 फुटक्या गाडग्यांत पाण्याला आधण येईल असे म्हणता येत नाही. कारण असे घडणे शक्य नाही. हरिकथेने दृष्टावर सुसंस्कार होणार नाही पालथ्या घागरीवर पाणी घातले सारखे आहे. चित्तात कामक्रोध असून वैराग्याचा सुंदर देखावा करतात. जे भोळे लोक आशा दिखाऊ संताच्या संगतीला लागतात त्यांना त्या दांभिकांबरोबर तशीच अधोगती प्राप्त होते. (अ 3123)

1004 अज्ञानी लोकांची भक्ति संपत्ती मिळविण्यासाठीच असते. मग त्यांच्या अंत:करणात ज्ञान कसे असणार ? अज्ञानी भक्तांनी केलेली पूजा कामिक भावनेने केली जाते. त्यामुळे त्याच्या ध्यानांत देव कसा असेल. अज्ञानी माणसाकडून निष्काम कर्म घडत नाही कारण फळाची आशा हा त्याच्या भक्तिचा केन्द्रबिंदु असतो. ज्याच्या अंत:करणात विषयाचे वेड असते बाहेरुन संतपणाचा वेश घेऊन काय उपयोग दांभिकाची भक्ति कशी घडेल त्यासाठी शुध्द भावच पाहिजे. (अ 3151)

1005 मुक्तीच्या नंतर पंचम पुरुषार्थरुप भक्ती कोणती असेल तर मुखाने नारायण नारायण असा निरंतर उच्चार करणे होय. या पंचमपुरषार्थ नामाने भक्तच देव होतो. आपल्या जीवाप्रमाणे दुसऱ्याचा जीव आहे हे त्या कसायाला समजत नाही. तो दुसऱ्या जीवाची मान कापण्यास तयार होतो. नारायण ‘आत्मा’ या रुपाने मानवी शरीरात आहे. तसाच तो पशूत आहे. सांप्रत कलियुगात अधर्म वाढल्याने धर्म-शास्त्राचे वाटोळे झाले. नीति शास्त्राची माती झाली दोष करणाऱ्याची संख्या वाढली आहे. वेद मंत्रात तात्काळ फळ देण्याचे सामर्थ्य राहिले नाही. हा अधर्माचा परिणाम होय. (अ 3195)

1006 ज्या गांवातील लोकांचे एकमेकाशी जमत नाही. चांगल्या माणसांनी त्या गांवी वास्तव्य करु नये. पुढील क्षणांत काय घडेल ते कळत नाही. संतांना दोष नसताना त्यांना तेथे शिक्षा-दंड होतो. तेथे अविचाराने प्रजेला बुडवितात अशा ठिकाणी राहूच नये. न्यायालयात खोटी साक्ष देणे, पापाचरण करतो त्याचा परिणाम दु:खकारक होतो. अशा अधनाचे दान घेणारा अधोगतीस जातो. (अ 3226)

1007 कांही भोंदू लोक हेंदरी-शेंदरी देवताचे वारे अंगात भरुन लोकावर दया करतात. त्या भोंदू भक्ताचे कांहीच फायदा होत नाही. देव्हाऱ्यांत बसून सुपे हालवतात. लहान मुले खेळात ढोंग करतात. त्याप्रमाणे हे सर्व लोंकाना भुलवतात. या लोकांना शेवटी देवता प्रसन्न असतील तर त्याचे पारे का मरतात. तीर्थ अंगारा देणारा खरा नसतो. अधम माणसाचे मन आणि चित्त अहंकारी असते. उपदेश करणारास शीण येतो. विधवेचा शृंगार व्यर्थ आहे. अधमाचे चित्त दुश्चित असते. तो ऐकत नाही. (अ 3236)

1008 जे ब्रम्ह आनंदरुप, एकटे निर्मळ स्वरुप आहे व त्या निज वस्तुचे योगीजन ध्यान करतात. विटेवर समचरण ठेवून सुंदर रुपाने विठ्ठल उभा आहे. त्याचे आत्मदर्शन घ्या. श्रुतीला त्याचा अंत कळत नाही. ते पुंडलिकाकरता साकार झाले. ज्याचे ध्यान सनकादिक संत करतात. ते आमचे कुलदैवत आहे. देवा, अपरोक्षानुभव प्राप्त न होता 'आम्ही देव झालो' बोलू नका नरकांत पडाल. जो पांडुरंगाच्या स्थानाची, ईश्वराची बरोबरी करण्याची इच्छा करतो. तो पातकाची राशी आहे. (अ 3274)

1009 जोपर्यंत मनांतून विषयासक्ती गेली नाही. तोपर्यंत प्रपंचाचा, स्त्री-पुत्रादिकांचा त्याग केला त्यास कांही अर्थ नाही. दुराचारी माणसाचे हरिभजन पापमुक्त वाईटच होय. संताची निंदा करुन वेद, उपनिषदे शास्त्राचा अभ्यास व्यर्थ आहे. कपटी माणूस गोड बोलतो परंतु मनात फसवाफसवी असते. ते केव्हांही उघडी पडते. भोजनात विष कालवावे त्याप्रमाणे कपटी गोड बोलतो. पण मनांत मारण्याचे विचार असतात, वरुन आदराचे सोंग दाखवितो. (अ 3344)

1010 जो ब्रम्हनिष्ठ म्हणून घेतो आणि त्याने प्राणिमात्राच्या नावाने गवताची काडी मोडली तर त्याला गुरुहत्येचे पातक लागते. त्याला गुरुने केलेला उपदेश खोटा ठरतो. कानांत सांगितलेला ब्रम्हरुपाच उपदेश जो लोकांना सांगतो.

ब्रम्हज्ञानी म्हणवून घेतो आणि भूताचा व्देष करतो त्याचे ब्रम्हज्ञान चोर घेऊन जातात. जो भेदापोटी क्रोध वाहतो. त्याच्या वाणीचा सारा वेळ शक्ति, लोक निंदा स्तुती करण्यांत जातो. त्याचे ज्ञान व्यर्थ जाते. (अ 3345)

1011 देवाच्या साहाय्यावाचून कोणासहि हिताचा मार्ग दिसणार नाही. हरीच्या मार्गाने जाणारा चतुर शहाणा समजावा. जे लोक आपल्या बुध्दीने कोणत्या तरी मार्गाने गेले त्याची फजिती झाली. स्वबुध्दीने आणि अंधश्रध्देने त्यांना अनुसरणारे दोघेही मार्ग चुकतात. पुढच्याचा मार्ग चुकला आहे. मागच्याने विचारपूर्वक सावध राहिले पाहिजे. अधिकार नसताना, दुराचाऱ्याला मार्गदर्शक करणारा, अविचारी मनुष्य वयस्कार असला तरी लहान समजावा. जो मनुष्य संताचा, देवाचा, गुरचा हितोपदेश ऐकत नाही त्याच्यामागे शहाण्याने जावू नये. हरीमुखीचा उपदेश ऐकणारे सुखी होतात. (अ 3868)

1012 लोकांना आपले कौतुक सांगता यावे याकरिताच देव भक्ताला देहभानावर आणतो. देवाला परमार्थात नांव, रुप, आकार नाही. पण हे भक्ताच्या मुखातून कळले. भक्ताच्या मुखावाटे तोच बोलत होता. देव, भक्त दोन्ही अंगानी भिन्न नाहीत. जो दोन्ही वेगळे आहेत असे मानतो, त्याच पृथ्वीवर भार होतो. भक्ताचा राग, निंदा, व्देष कोणी केला त्याच्याकडून सर्व पापे घडतात. भक्ताचा व्देष करणारी संगती हिताचा नाश करते. म्हणून ती कोणालाही घडू नये. संतनिंदा ऐकणाऱ्याचे अध:पतन होईल. संत सेवकांना महालाभ होतो. त्याला नाश नाही. (अ 3902)

1013 अनंतावाचून तप, दान, व्रते केली तर त्या कर्माचा भोग चुकत नाही. नारायण भक्तांना दर्शन देऊन त्यांचे जन्म-मरण चुकवितो गोपीकांनी काया वाचा मनाने भगवंताचे भजन केले. त्यांच्या मनांत कृष्णाशिवाय दुसरा विषय आणि हेवा नव्हता. त्यांना दुसरा छंद नव्हता. जागृतीत स्वप्नात कृष्णाचे ध्यान होते. ज्यांना हरीचे भावश्रध्देप्रमाणे साक्षी आहे. मधुरावासी आपल्या पूर्वपुण्याईने भगवंताला आठवत होते. जेथे दैत्यांनी लोकांना पीडा दिली होती तेथे देवाने दुसरी व्दारका नगरी वसवली. (अ 3925)

1014 समुद्राचे बेटावर नाना रत्नांनी कृष्णाने व्दारका सुवर्ण नगरी वसवली. एकाहून एक सुंदर मंदीरे उभा केली. मोठे किल्ले, आवारे, गांवकोट, देशी गोपुरे, शिवरे, प्रशस्त उद्याने निर्माण केली. दानशूर, सामर्थ्य संपन्न नारायण या

नगरीत रहावयास आले. व्दारकेतील लोक बळाने, नीतीने देवासारखेच होते. सर्व स्त्री-पुरुषात नारायणाची संगत घडली. श्रीकृष्ण देवाधिदेव असून वेदाज्ञेचे पालन करीत होता. ब्राम्हणाचा आदर होता. वैष्णवाचे, अतिथीचे पूजन करीत होता. सोळा हजार एकशे आठ स्त्रिया, प्रत्येकी दहामुळे, छप्पन्न कोटी यादवाचा परिवार सह श्रीकृष्ण सुवर्ण व्दारकेत राज्य करत होता. (अ 3928)

1015 वासुदेव - अरे बाबा आयुष्यातील तीन प्रहर संपले. पहिला गर्भवासाचा, दुसरा बालपणाचा, तिसरा तरुणपणाचा असे अज्ञानरात्रीचे तीन प्रहर जावून चौथा प्रहर वृध्दपणाचा आला आहे. अद्‌याप तुम्ही सावध का होत नाही. सावध होऊन कांहीतरी दान द्‌या. उगाच डोळे झांकू नका मी वासुदेव ‘रामकृष्ण हरीचे भजन करा’ म्हणून लोकांस सांगत आहे आणि आपल्या हातांत, टाळ, चिपळ्या वीणा घेऊन मुखाने नारायण नामाची गर्जना करा. फळ, फुल, पाणी कांही मिळेल ते देवास अर्पण करा. झोपेचे सोंग घेऊन निजू नका. देवाला धन संपत्तीची जरुरी नाही. तो भावाचा भुकेला आहे. श्रध्दाभाव त्याचे चरणी अर्पण करा. (अ 3976)

1016 भगवंताची माया न कळल्याने नारदानी त्याची एक बायको मागितली त्या मायिक नारदीला नारदापासून साठ मुले झाली अखेरीस नारद लज्जित झाला हा विश्वव्यापक हरी कोणासही न कळणारा आहे न सांपडणारा. मोठा चपळ आहे. मारुतीला भेटण्यासाठी श्रीकृष्णाने रामरुप धारण केले. सत्यभामेला सीता होण्यास सांगीतले पण तिला सीता होता येईना, ती लज्जित झाली तिचा स्वरुपविषयी अभिमान गळाला. (अ 3994)

1017 या कलियुगात जे आचारभ्रष्ट व क्रियाहीन आहेत आपले महत्तव स्वत:च सांगतात, बायकोचा दास होऊन आई-वडिलाचा त्याग करतात. भिकाऱ्यास भिक देत नाहीत. बुध्दि वैभवाच्या बळावर इतरारी वाद घालून त्रास देतात. गांवातील देवाच्या दर्शनास जात नाहीत. ब्राम्हणास भोजन देत नाहीत सदैव संताची निंदा करतात. मिळविलेले धन जमिनीत पुरुन ठेवतात आणि पोटाला उपाशी मारतात. दानधर्म करत नाही. भक्तिचे सोग करुन गाळ्यात माळा घालतात. देव, गुरु, संत यांच्या पुढे नमत नाहीत त्यांच्या तोंडावर थुंका, अपमान करा. (अ 4006)

1018 स्वत:च्या पोटासाठी रडणारी, शिताचे दान मागणारी सेंदरी-हेंदरी, दैवते-देवी, भूते-खेते यांची पूजा कोण करतो ? आपली मनोरथ पूर्ण व्हावीत, म्हणून इतरांना पिडणारी ही दैवते काय देणार ? अल्प रोकडी अधीर बुध्दी आणि धैर्य नाही त्याची जोडी घेऊन काय मिळेल हे मला कळले. दासीचा पाहुणचार काय उपयोगाचा. ही सर्व दैवते दुर्बल आहेत. साचलेले डबक्यातील पाणी घेऊन करायचे काय ? या देवता शेंदूराने आपले तोंड झाकून घेतात, आपल्या भक्तांकडून अंगावर शस्त्राचा घाव घेतात. मांसाचा नैवद्य दाखवितात. अशा देवताना देव म्हणतो तो वेडा असला पाहिजे. माझा नारायण अल्पबुध्दीचा नाही. त्या देवाधि देवाची उपासना करा. (अ 4074)

1019 हा प्रपंचाचा मार्ग तरुन जाणे अवघड आहे. त्यातूनच पार पडून जाण्यासाठी प्रयत्न केला तर त्याचे उल्लंघन होत नाही. आतापर्यंत या प्रपंचात असंख्य लोक फार दूर वाहविले गेले. त्यांना पैलतीर गाठता आले नाही, असेच किती जन्म फेरे घेत गेलात विकास झाला नाही. देहबुध्दी गेली नाही देवाकडे बुध्दी वळली नाही. भोग भोगत राहिलो. प्रपंच खोटा असून खऱ्या असल्यासारखा दाखवितो. त्यामुळे लोक भ्रष्ट होऊन देवद्रोही होतात. (अ 4115)

1020 तुझ्या कीर्तीचे गुणगाण करताना जिव्हेला प्रेम सुख वाटते. एका झाडावर दोन पक्षी बसले होते. त्याच वेळी पारध्याने त्यावर बाण सोडण्याची तयारी केली. त्यावेळी ससाणाही त्याचेकडे येत होता. उडावे तर ससाण मारील, गप्प बसावे तर पारधी बाण सोडील, अशावेळी त्यानी देवाचा धावा केला तेव्हां देवाने क्षणात सर्पाचा वेष धारण पारध्याच्या पायाला दंश केला आणि पारध्याने सिध्द केलेला बाण नेम चुकून ससाण्यास लागला आणि ससाणा, पारधी धरणीवर पडले. आपल्या दासांचा संकटात असे रक्षण करतो. (क्षेपक अ 14)

1021 गाढवी दुधाळ झाली तरी तिला गायीप्रमाणे महत्तव प्राप्त होत नाही. कुत्रे चांगले असले तरी भोजनाला संगती घेऊन बसता येत नाही. सिंदळकी करुन चांगली झाली तर वेश्येला पतिव्रतेचा दर्जा देता येत नाही. गुरुनी सांगितलेले ब्रम्हज्ञान मिळेल. पण पांडुरंग समजण्यास भक्तिच पाहिजे. मुळत: नीच असलेले प्रयत्नानेसुध्दा उच्चता प्राप्त करु नाही. असे तुकाराम महाराज म्हणतात. (क्षे.अ.47)

1022 अनेक जन्माची येरझार केली. परंतु भक्ति केली नाही. केवळ माझे माझे म्हणून हाव धरली आणि त्यातच मेले. खावून पिवून मजेत आहेत पण संत सज्जनासाठी त्यांना भेटण्यास वेळ नाही. पोथ्या पुराणे वाचून आम्ही संत आहोत असा दावा करणारे, परस्त्री पाहून कामविव्हळ होतात. टिळा, टोपी हे संतपणाचे ढोंग घेतलेले संत कलियुगात घरोघरी निर्माण झाले आहेत. पोटासाठी दारोदार हिंडतात. ही संत निंदा नव्हे. खऱ्या संताना मी अनन्यभावे शरण आलो आहे. (क्षे.अ.56)

1023 अर्थ समजल्याशिवाय केलेले पाठांतर काय कामाचे निष्कारण श्रम होय. अर्थ पाहून पाठांतर करावे. तुका म्हणे ज्याला अर्थ कळाला त्याला वर्म कळाले. मन निर्मळ नाही तर सोवळे काय कामाचे ? पुस्तकांतील अक्षराची घोकंपट्टी करुन काय उपयोग ? केवळ टाळ मृदंग बडवून काय उपयोग ? ज्यामध्ये जर पांडुरंगाच्या भक्तिचा ओलावा नाही. बोलण्याप्रमाणे कृती केली तर ज्ञानाच्या गोष्टी कशाला कराव्यात. ‘तुका म्हणे’ दांभिकपणाने गोष्टी सांगू नका. हितकारक बोला, करा. (क्षे.अ.294)

1024 गणेश हातामध्ये परश घेऊन भक्ताची विघ्ने दूर करतो. त्यांच्या चरणी माझे चित्त लागो. सेंदूर शमी वृक्षाची पाने ज्याला आवडतात त्याच्या शिरी दुर्वांकुराचा तुरा शोभतो. उंदीर त्याचे वाहन असून मस्तकारवर हिरेजडीत मुकूट आहे गळ्यांत जानवे शुभ वस्त्रे ल्यालेली मूर्ती आहे. भावाचे मोदक केलेले आहेत. तुकोबाराय त्याची पूजा करत आहेत. (क्षे.अ.231)

1025 पायाला नारु झाला तेथे कापूर बांधून चालणार नाही ते बिब्याचे काम आहे. घरचा गुलाम किंवा दासी तर तिची नोकर किंवा बटकीची वागणूक दिली पाहिजे. देव्हाऱ्यावर विंचू आला तर पादत्राणानेच मारावा. कांही वेळा अधमाशीअधमपणानेच व्यवहार करणे योग्य असते. तुका महणे जातीसाठी हलके काम करावे लागते. (क्षे.अ.258)

1026 पापी, दुर्जन, दुराचारी, दुष्ट माणसे आपले संचित करणी किंवा पापाची भीती आठवत नाही किंवा बाळगीन नाही त्याचे दु:खद परिणाम भोगायची वेळ आली की देवाची निंदा करुन त्याला बोल लावतात. तुका म्हणे अशा दुर्जनाच्या तोंडाला काडी लावावी. पापाच्या संचितामुळे देहाला शासन मिळते.

नारायणा तुझ्यावर माझा बोल नाही. कडू जिरे पेरुन अमृत फळे मागू नये. सुख-दु:खे हे देहाचे भोग आहेत. त्यासाठी ज्ञानाचा नाश करु नये.

1027 भक्तिशिवाय जीवन संसारातील दु:खाला कारण होतात. वीस लक्ष वृक्षांमध्ये, नऊ लाख जलचर प्राणी, होऊन अकरा लक्ष किड्यांचा जन्म, दहा लाख पशु, माणसाचा जन्म चार लाख वेळा प्रत्येक योनीतून कोटी फेरा घातल्यावर माणसाचा जन्म मिळतो. तुका म्हणे अशा दुर्लभ मानव देहाला भक्तिशिवाय मूर्खाने व्यर्थ घालविले. (क्षे.अ.288)

1028 जो बोलतो तसा वागतो. त्याचे मी चरण वंदितो. त्याचे घराचे अंगण स्वत: स्वच्छ करीन, त्याची सेवा करीन, त्याचा किंकर होईन. दोन हात जोडून त्याच्या सेवेस उभा राहीन. जयाच्या मनात देवाविषयी श्रध्दा आहे त्याचे चरणी माझी निष्ठा वाहीन असे तुकाराम महाराज म्हणतात. (क्षे.अ. 296)

1029 वरपांगी चांगलेपणाचे सोंग आणणारी माणसे मनांतून दुर्जन असतात. त्याच्या चांगल्यापणाच्या सोंगाला भुलू नये. डोक्यावर टोपी, कपाळी टिळा आणि गळ्यांत माळ हे बाह्यरुप झाले त्यावर जाऊ नका. तुका म्हणे अशा लोकांना यमच शासन करतात. अहो भगवंता पांडुरंगा तुमच्या भेटीसाठी कासावीस झालो आहे तुझ्याशिवाय मला कोणीही नाही. माझी अपेक्षा पूर्ण करा देवा सत्वर धांवून यावे. (क्षे.अ.299)

1030 स्वप्नातील गोष्टीचा व्यवहार चर्चेचा नसतो. जागृतीचा व्यवहार स्पष्ट असतो. शब्दज्ञानाच्या पसाऱ्याने शब्दच्छलाने केवळ बडबडच ज्ञानाची विक्री करु नये. केवळ शब्दाचा भात शब्दाची कढी वर्णली ? तर ते जेवून कोण तृपत होणार आपण साखर शब्द कागदावर लिहिला आणि तो शब्द चाटला त्यातून साखरेची गोडी मिळणार काय ? तुका म्हणे - असे शब्दच्छल ज्ञान काय कामाचे (क्षे.अ. 325)

1031 स्वत: पूर्णपणे रिकामा असा माणूस पण दुसऱ्यासाठी अश्रू ढाळतो त्या रिकाम्या माणसाचे बोल सर्व वाया गेले. खऱ्या सुखाच्या सावलीत राहत नाही. कारण अंगी ज्ञानाची घमेंड आणि मस्ती. तुका म्हणे असा माणूस मूर्ख समजावा आणि त्याची शहाणपणाची घमेंड नष्ट करावी. (क्षे.अ.329)

1032 राजाची मर्जी संपादन करण्यासाठी द्रव्य खर्च करतो, पण पर्वकाळी दान करीत नाही. सोयऱ्याला पाहुचार करतो पण संताची उपेक्षा करतो,

बायकोच्या नातेवाईकांना आवडीने खाऊ घालतो पण मातापित्याचा आदर करीत नाही. वेश्येला फुले देतो, गायीला मारतो, मद्यपान करतो तुका म्हणे - अशाप्रकारे प्रपंचात गुंतून उचित-अनुचित ज्याला कळत नाही ते विठोबाला दुरावतात. (क्षे.अ. 267)

1033 विठ्ठला हा पाषाण असे कांही लोक म्हणतात ते मूर्ख आहेत त्याचा संग नको त्याच्या वाचेला महारोग होतो. शालीग्राम धोंडा म्हणतो त्याच्या तोंडात किडे पडो. जो सद्‌गुरु आहे त्याचे आयुष्य कमी का करावे ? भक्ताची जो चेष्टा करतो त्याच्या तोंडात विष्टा पडो. सर्व नातेवाईक किंवा धनसंपत्ती माझो आहे सांगणे वेडेपणाचे आहे त्याची काळाचे हातून सुटका नाही. एका भगवंताशिवाय दुसरे कांही नाही. (क्षे.अ. 388)



